महाराष्ट्र–राज्य–साहित्य–संस्कृति–मंडळ आणि ... कर निधि–पुरस्कृत

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

वर्ष ५०] त्रैमासिक [अंक १–४

ऐतिहासिक संकीर्ण साहित्य

१३ वा खंड

(स्वीय ग्रंथमाला, क्र. १०४)

BHARATA ITIHASA SAMSHODHAKA MANDALA, POONA

Vol. L] QUARTERLY [Nos. 1-4

Miscellaneous Articles on Indian History

Vol. XIII

श. १८९२] किंमत ६ रु. [A. D.
रा. श. २९७] Price Rs. 6 [1970

निवेदन

श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांच्या दिनचर्येचा हा दुसरा खंड आहे. या दिनचर्येचा पहिला खंड मंडळ त्रैमासिकाचा ४५ व्या वर्षाचा जोड अंक किंवा ऐतिहासिक संकीर्ण साहित्य १२ वा खड या रूपानें ३ वर्षांपूर्वीं प्रकाशित झाला. त्या खंडाच्या प्रस्तावनेवरून लक्षांत येण्यास हरकत नाहीं कीं, या दिनचर्येचा दुसरा खंड लवकरच प्रकाशित होण्याचा संभव होता. त्याप्रमाणें थोडया उशिरानें कां होईना पण प्रस्तुत दुसरा खंड प्रकाशित होत आहे. यांत चिंतामणरावांच्या दिनचर्येच्या उरलेल्या भागांतील वेचक अंश तर आला आहेच; पण ते वारल्यावर त्यांचे वारस धुंडिराज उर्फ तात्यासाहेब यांच्या दिनचर्येचा कांहीं अंशही आला आहे. चिंतामणरावांची दिनचर्या श्री. य. न. केळकर यांस मिळाली; तर धुंडिराजांची दिनचर्या कित्येक दिवसांपूर्वीपासून मंडळांत आहे. मंडळ त्रैमासिकाचे ४५ वें व हें ५० वें वर्ष मिळून आतां दिनचर्या पूर्ण केली आहे. म्हणजे तीमधील वेचक भाग पूर्ण केला आहे.

या अंकांत प्रा. रा. वि. ओतुरकर यांचा श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांच्या परिचयाचा लेख घातला आहे. त्याचप्रमाणें डॉ. अ. रा. कुलकर्णी यांचा संपूर्ण दिनचर्येंतील महत्त्वाच्या वैशिष्टयांचें दिग्दर्शन करणारा लेखही समाविष्ट केला आहे. या दोन लेखांमुळें दिनचर्येच्या उपयुक्ततेंत भर पडली आहे.

दिनचर्येच्या या व मागील अशा दोन्ही भागांच्या संपादन-प्रकाशनासाठीं सध्याच्या सांगलीच्या राजमाता सौ. पद्मिनीराजे यांनीं पांचशें रुपयांची देणगी दिली. हें त्यांस व त्यांच्या पूर्वजांविषयीं असलेल्या अभिमानास साजेसेंच आहे. या देणगीबद्दल त्यांस हार्दिक धन्यवाद.

श्री. सरदार गं. ना. मुजुमदार यांचा मंडळाशीं गेलीं साठ वर्षें अत्यंत निकटचा संबंध आहे. त्यांनीं मंडळाची केलेली सेवा चिरस्मरणीय अशीच आहे. त्यांची मंडळसेवेची तळमळ पूर्वी इतकीच असली तरी त्यांचें ८५ वर्षांचें वयोमान लक्षांत घेतलेंच पाहिजे. त्यांनीं केलेल्या सेवेबद्दल मंडळ त्यांचें सतत ऋणी राहील. त्यांच्या साहित्यसेवेचाही परिचय या अंकांत घातला आहे.

नौरोसजी वाडिया कॉलेजचे डॉ. आर्. डी. चोक्सी यांनीं पुण्याचें अन्यक्रामणकार्यालय व लंडनचें इंडिया ऑफिस यांतील कागद मोठ्या परिश्रमानें तपासून निवडलेल्या कागदपत्रांचें संपादन करून राजा प्रतापसिंह ऑफ् सातारा हें पुस्तक तयार केलें होतें. तें त्यांनीं मंडळास प्रकाशनार्थ दिलें येवढेंच नव्हे तर त्याच्या

[मलपृष्ठ ३ वर]

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें. स्वीय ग्रंथमाला क्र. १०४

(त्रैमासिक वर्ष ५०)

सांगली संस्थापक

श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब

यांची

दि न च र्या

खंड २ रा

संपादक

श्री. य. न. केळकर

श्री. ना. के. जोशी

श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन


सांगली संस्थानचे आद्य संस्थापक

श्रीमंत चितामणरावांच्या दैनंदिनीचा पहिला हप्ता मंडळ त्रैमासिकाच्या वर्ष ४५ अं. १-४ मध्यें येऊन गेलेला आहे. या प्रस्तुत अंकांत त्यांच्या दैनंदिनीचा उर्वरित भाग कांहीं किरकोळ संक्षेप करून सादर करीत आहोत. ही दिनचर्या प्रसिद्ध करण्याचा हेतु पहिल्याच हप्त्याचे प्रसंगीं 'निवेदनां'त सांगितला होता त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. त्याच अंकांत श्रीमंताचे कौटुंबिक जीवन चरित्र श्री. य. न. केळकर यांनी लिहिले आहे. तेव्हां त्याचीही येथे पुनरुक्ति नको. येथें कांहीं नवीन उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारें त्यांच्या राजकीय जीवनावर प्रकाश टाकणारें असें एक टिपण वाचकांस सादर करीत आहे.

या टिपणास मुख्यतः दोन प्रकाशित व एका अप्रकाशित साधनाचा आधार आहे. इ. स. १९६७ साली सांगलीचे वयोवृद्ध निष्ठावंत कारभारी श्री. कुंटे यांनी सांगलीच्या 'विजय' पत्रांत 'धीरोदात्त राजा' या शीर्षकाखाली एक प्रदीर्घ लेखमाला लिहिली. दुसरे साधन म्हणजे महाराष्ट्र सरकारच्या पुरावस्तुखात्यानें इ. स. १९६९ सालीं एक नं. ६ चा साधन ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांत इ. स. १८१७–१९ या दोन वर्षांत पुण्याचा ब्रिटिश रसिडंट एल्फिन्स्टन आणि इतर अधिकारी, व श्रीमंत आप्पासाहेब पटवर्धन यांचेमध्यें झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे. सदरहू साधन ग्रंथ आमचे मित्र श्री. वि. ग. खोबरेकर यांनीं संपादित केला आहे. तिसरे अप्रकाशित साधन म्हणजे प्रा. सुं. ह. जोशी पुणे यांनीं मंडळाचे स्वाधीन केलेले हस्तलिखित हे त्यांचे मामा श्री. वसंत यशवंत काळे, सांगली यांचे संग्रही असलेले त्याचे वडील यशवंत गंगाधर काळे यांनी लिहिलेले श्रीमंत कै. धुंडिराज चिंतामण पटवर्धन यांचे चरित्र होय. धुंडिराज हे आप्पासाहेबांचे चिरंजीव. इ स. १९०१ मध्यें वारले. सदरहु हस्तलिखित चरित्र भक्तिभावानें व सहृदयतेनें लिहिलें असून त्यांत प्रसंगानें कै. आप्पासाहेबांच्या जीवनांतील घटनांचाही उल्लेख आहे.

कै. आप्पासाहेबांचा जन्म शके १६३७ च्या पौषात शु. ४ स म्हणजे इ. स. १७७६ साली झाल्याचे श्री. केळकर यांनीं वर्ष ४५ च्या अंकात लिहिले होतें. परंतु त्यांच जन्म इ. स. १६९६ साली पौष शु. ४ स. म्हणजे बरोबर एक वर्ष आधी झाल्याचें श्री. कुंटे यांनीं लिहिलें आहे. (ता. ४।१०।६७ चा विजय) व त्याबरोबर त्यांची कुंडलीही दिली आहे. ती येथें जशीच्यातशी उतरून देणे इष्ट होईल. श्री. केळकर यांचे लेखनांत आणखीही एक नजरचूक आढळते. सदरहु चरित्रांत

आप्पासाहेबांचे चुलते पांडुरंगराव हे ज्या सावशीच्या लढाईत जखमी होऊन हैदर-कडे पाडाव झाल्याचे ते लिहितात ती त्यांच्या म्हणण्याप्रमाणे इ. स. १७७६ साली झाली नसून ता. ९ जानेवारी १७७७ रोजी झाली असे इतिहास संग्रहांतील पट-वर्धनी वाका या साधनाचे आधारे श्री. कुंटे लिहितात.



कै. चिंतामणरावांचा जन्म इ. स. १७७५ त व मृत्यु ता. १९–७–१८५१ रोजी झाला. सवाई माधवरावाचा जन्म इ. स. १७७४ चा हे लक्षांत घेतां चिंतामण-रावांनीं मराठी राज्याचा अस्त व इंग्रजी अंमलाचा उदय व त्या राज्याची महा-राष्ट्रावर पकड कशी पक्की बसली हे दोन्ही पाहिलें. ते आठ वर्षांचे असतांच त्यांना सरदारीचीं वस्त्रें मिळालीं. परंतु आप्पासाहेब लहान असल्यामुळें दौलतीचा कार-भार वडीलकीच्या नात्याने त्यांचे चुलते गंगाधर बाळासाहेब हे पहात असत व लष्करी कामगिरी परशुरामभाऊ करीत असत. पुढें चुलत्या पुतण्यांत अनेक कारणांनीं कुरबुरी उत्पन्न होऊन मिरजेच्या पटवर्धन घराण्यांत द्वैत माजलें. त्यांत अनेक वर्षे हे प्रकरण भिजत राहून शेवटी इ. स. १८०८ सालीं मिरज जहागिरीची वाटणी होऊन आप्पासाहेब आपला निम्माहिस्सा (आजमासे ६ लक्ष वसुलाचा मुलूख) तोडून घेऊन सांगलीस येऊन राहिले व या वाटणीस दुसऱ्या बाजीरावाची संमतीही मिळाली. अशा रीतीनें सांगली संस्थानची स्थापना झाली. परंतु या सर्व अंमळ नंतरच्या घटना होत. बाजीराव गादीवर आल्यापासूनच त्याच्या मनांत पटवर्धन सरदारांशीं वैर होते. व त्याच्या मनांत पटवर्धनांची जहागीर समूळ खालसा करावी असें होते. बाजीरावाची ही वृत्ति लक्षांत घेऊन पटवर्धन सरदारांनीं प्रथमपासून इंग्रजाशी सलोख्याचे संबंध राखले होते. पुढे वसईच्या तहानंतर जेव्हां वेलस्ली बाजीरावास पुण्याच्या गादीवर बसविण्यासाठीं निघाला तेव्हां पटवर्धनही आपले पथक घेऊन त्याजबरोबर निघाले. बाजीराव गादीवर आल्यावर वेलस्लीनें बाजीराव व पटवर्धन यांच्यांत मध्यस्थी करण्याचा यत्न केला पण त्यास शिंदे भोसले यांच्याशी लढाई करण्याची निकड असल्यानें तिकडे जावे लागले. या इंग्रज-मराठे युद्धांत पटवर्धनांनी भाग घेतला नाहीं. हे युद्ध संपल्यावर पुनः बाजी-रावानें पटवर्धनांची जहागीर खालसा करण्याचा उपक्रम सुरू केला. परंतु इंग्रजांनी मध्यस्थी केली व पुनः वाटाघाटी सुरू झाल्या. त्यासही अखेर यश आले नाहीच

तेव्हा इंग्रजांनीं कंटाळून बाजीराव व त्याचे जहागीरदार यांनीं आपल्यांतील तंटे हवे त्याप्रमामे सोडवून घ्यावेत असे ठरवून ते त्यातून अंमळ दूर झाले. यानंतर बाजीराव पटवर्धन सरदारांच्या जहागीरी खालसा करण्याच्या उद्योगास लागला. व तेही त्याच्याशी बाकून ताठरपणे जरूर तर युद्धप्रसंग करण्याच्या तयारीनें उभे राहिले. अशारीतीनें महाराष्ट्राच्या दक्षिण भागांत दंगल होणार व अखेर ती इतरत्रही पसरणार हें पाहून पुण्याचा ब्रिटिश रेसिडेंट एल्फिन्स्टन यानें पुनः या प्रकरणी हात घातला. व त्यानें बाजीराव व पटवर्धन सरदार यांच्यांत तडजोड करण्यासाठी एक मसुदा तयार केला, व त्यास बाजीरावाची संमति मिळविली व त्यास बरोबर घेऊन तो पटवर्धन सरदारांशी वाटाघाटी करण्यासाठीं पंढरपूर येथें गेला (इ. स. १८१२) तेथें उभयपक्षीं असलेले फार दिवसांचे वितुष्ट मिटून पेशवे पटवर्धन यांच्यामध्ये एक करार झाला. हाच इ. स. १८१२ चा प्रसिद्ध पंढरपूर करार होय. या कराराचा मसुदा महाराष्ट्र सरकारनें प्रसिद्ध केलेल्या उपरोक्त साधन ग्रंथांतील पत्रव्यवहारांत पृ. १३ वर परिच्छेद ५४ मध्यें छापलेला आहे. या अटींचा सारांश असा कीं पटवर्धन जहागिरदारांनीं आपल्या जहागिरी बाहेरच्या मुलुखांत लुटालूट करू नये. त्यांनीं आपली जहागीर संभाळून राहावे. व बाजीरावानें त्यांच्याकडे कांहीं जुने हक्क उगवून घेण्याच्या सबबीवर जादा मागण्या करू नयेत. करारापमाणें जहागीरदारानें बाजीरावाची चाकरी करावी. या अटी उभयपक्षी पाळल्या जाण्यासाठीं ब्रिटिश सरकार हे जिमेदार रहातील.

यानंतर इ. स. १८१७ त इंग्रज व बाजीराव यांच्यात युद्ध उद्‌भवलें तेव्हां एल्फिन्स्टननें पटवर्धन सरदारांस बाजीरावाचा पक्ष सोडून इंग्रजास यऊन मिळण्या-विषयीं लिहिले, परंतु पटवर्धनबंधूस ही गोष्ट मान्य करवेना. या युद्धांत पटवर्धनांची बाजीरावाचे बाजूने सहानुभूती असली तरी त्यांनीं त्याच्याबाजूनेही फारशा लष्करी हालचाली केल्या नाहींत व पुढें झालेल्या लढायांत इग्रजांनींही पटवर्धनांच्या जहा-गिरीचा मुलुख युद्ध-क्षेत्रापासून अलग ठेवला. यानंतर युद्ध संपलें व बाजीरावांस आपल्या राज्यावर उदक सोडणें भाग पडून तो ब्रह्मावर्ती निघून गेला. तेव्हां पट-वर्धन सरदारांशीं नव्यानें करार-मदार करण्यासाठीं एल्फिन्स्टननें तें प्रकरण हातीं घेतले व पंढरपूर कराराचे धर्तीवर पेशव्याचे ऐवजी इंग्रज सरकारशी एकेकाकडून करार करून घेण्याचा उद्योग आरंभिला. तासगाव, मिरज, कुरुंदवाड, जमखिंडी येथील पटवर्धन सरदारांनीं हे करार मान्य केले पण चिंतामणराव हे सहजासहजी त्यास मान्यता देईनात. याच प्रसंगानें इंग्रज सरकारचे एल्फिन्स्टनादि अधिकारी व चिंतामणराव यांच्यांत झालेला पत्रव्यवहार पुरावस्तुखात्यानें प्रसिद्ध केलेल्या उप-रोक्त बुलेटिन नं. ६ मध्ये आला आहे. त्यांत २६ डिसेंबर १८१८ चें पत्रांत चिंतामणराव लिहितात, आमचे पूर्वज गोविंद हरि यांनीं पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांची नोकरी पतकरली. ती वंशपरंपरा निष्ठेनें चालू होती. अशा

स्थितीत जर आम्ही पेशव्यांचे कुटुंबखेरीज इतर कुणाची चाकरी करण्याचे पतकरू तर ते '**श्रीगणपतीचे येथे मंजूर नाही.**' हा पत्रव्यवहार मोठा लक्षपूर्वक वाचण्यासारखा आहे, कारण त्यात एका बाजूस चिंतामणरावाचा स्वाभिमान व परंपरागत स्वामिनिष्ठा आणि दुसऱ्या बाजूस बदलत्या काळाची जाणीव व त्यातील द्वंद्व ही सर्व चांगली दिसून येतात. तसेंच या वाटाघाटींत मुद्याला मुद्यानें शह देण्याची त्यांची सनदशीर पद्धत ही चांगली दृष्टीस पडते. कारण जेव्हां एलिफन्स्टननें पंढरपूर करार तुम्हास मान्य आहे ना ? असा प्रश्न केला तेव्हां ते म्हणतात, तो करार मान्य आहे हे खरे पण 'त्यांत श्रीमंतांचे व आमचेमध्ये किलाफ (संशय) आल्यास श्रीमंतांची नोकरी करू नये आमची (कंपनी सरकारची) नोकरी करावी असे कांहीं लिहिलेले नाही.' या पत्रव्यवहारांतील ताठरपणा एलिफन्स्टनला मानवला नाहीं तेव्हां त्यानें चिंतामणरावांना आपली भेट घेण्यासाठी इ. स. १८१९ च्या मे महिन्यात बेळगांवी बोलाविलें. त्याप्रमाणे चिंतामणरावांनीं त्याची बेळगांवी भेट घेतली. परंतु पुढील वाटाघाटी उभयतांच्या वकिलामार्फतच झाल्या. या वाटाघाटींत शेवटी चिंतामणरावांच्या एकंदरीत लक्षात आले कीं ब्रिटिश सरकारचे सार्वभौमत्व मान्य केल्याखेरीज आता निभाव लागणार नाहीं तरीही ते ओढून धरीत होते. अखेर कंपनी सरकारनें चिंतामणरावांच्या सहीसाठी एक कागद पाठविला. त्यात दोन महत्त्वाचे मुद्दे होते. १) कंपनी सरकारचे वर्चस्व मान्य करावे आणि २) इतर पटवर्धनसरदारांवर आपले असतील ते सर्व स्वामित्वाचे हक्क सोडून द्यावे. ही बोलणी चालू असतां मध्यंतरीच्या काळांत एलिफन्स्टन हा आपल्या कमिशनर पदावरून वर चढून मुंबईचा गव्हर्नर झाला. व वाटाघाटीचें काम त्याच्याऐवजी चॅप्लीन व जनरल प्रिझलर यांचेकडे आले. चिंतामणरावांनी उपरोपत्र अटी मान्य असल्याचा १५ मे १८२० च्या तारखेचा कागद स्वतः प्रिझलरच्या हवाली केला व हे वाटाघाटीचे पर्व संपले. यानंतरही कांहीं दिवस चिंतामणराव आपला बाजीरावाशी स्वामिनिष्ठा दर्शविणारा जुनाच शिक्का कागदोपत्री वापरीत. पुढें ही विसंगति त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यावर त्यांनीं दुसरा शिक्का तयार केला व तत्संबंधीही आणखी एक करार २६ जानेवारी इ.स. १८२० रोजी चॅप्लीन याजबरोबर झाला. उपरोक्त दोन्ही करार सदरहु नं. ६ च्या बुलेटिनमध्ये पृ. २९ वर प्रसिद्ध झालेले आहेत. ते मुळातूनच वाचण्यालायक आहेत.

या पुढील काळातही श्रीमंत चिंतामणराव कंपनीसरकारशी ताठरपणें वागले हे कै. एडवर्ड वेस्ट यांच्या मेमॉयर्स ऑफ दि सदर्न मराठा कंट्री या ग्रंथाच्या पृ. ४२ ते ४६ वरून दिसून येईल. बाबाजीपंत गोखले या इसमानें इंग्रजांच्या फौजेतील एका युरोपियन अधिकाऱ्यास ठार मारले व सदर गोखले सांगलीकरांच्या राज्यांत येऊन राहिला असता त्यास कंपनी सरकारचे हवाली करण्यास चिंतामणरावांनी नकार दिला. शेवटी इंग्रजांनीं फौज पाठवून धमकी दिल्यावरच त्यास त्यांच्या हवाली

केले. आपणांस दत्तक घेण्याचा हक्क आहे अशाबद्दल चिंतामणरावांनी कंपनी सरकारशी हुजत घातली. या सर्वांचा एलिफन्स्टनला फार राग येई पण पुढे काळ पालटला. चिंतामणराव कंपनीसरकारशी एकनिष्ठेने वागू लागले. त्यांनीं एलिफन्स्टच्यानंतर आलेला मुंबईचा गव्हर्नर माल्कम याची मैत्री संपादिली व अखेर त्याच्या मध्यस्थीनें सांगलीकरांचा दत्तक घेण्याचा आग्रह मान्य करण्यात आला. इ. स. १८२९ मध्ये उद्भवलेल्या कित्तुरकर-देसाई यांच्या दंग्याचा व १८४४ मध्ये कोल्हापूर संस्थानांत उद्भवलेल्या गडकऱ्यांच्या उठावाचा कंपनीसरकारास सैन्य पाठवून बंदोबस्त करण्याचा प्रसंग आला असता श्रीमंत आप्पासाहेबांनीं कंपनी सरकारास चांगली मदत केली व त्या मदतीची मान्यता म्हणून कंपनी सरकारनें खूष होऊन त्यास एक मौल्यवान तरवार इ. स. १८४६ साली बेळगांव येथे मोठा दरबार भरवून समारंभाने नजर केली.

पुढील कांहीं वर्षांतील श्रीमंत आप्पासाहेबांचा काळ कसा जात असेल याची कल्पना प्रस्तुतच्या व आधीं प्रसिद्ध झालेल्या दैनंदिनीवरून येण्यासारखी आहे व त्या दोहोतील फरक सहृदय वाचकास सहज जाणवण्यासारखा असल्यानें त्यासंबंधी अधिक लिहिणें नको. श्रीमंत आप्पासाहेबांचे चरित्र लेखनाचे काम सांगलीच्या विद्यमान राजमाता सौ. पद्मिनी राजे पटवर्धन एम्. ए. एल्. एल् बी. यांनीं करण्याचे मान्य केले होते व त्यांचे कडून ते होते तर त्या लेखांत अधिकच जिव्हाळ्याची अपूर्वाई आली असती पण त्यांचे एकाएकी परदेशी जाण्याचे ठरल्यामुळें हें चरित्रविषयक टिपण या दैनंदिनीस जोडले आहे.

– रा. वि. ओतुरकर

दिनचर्येचा परामर्ष

मराठी सत्तेच्या अस्तमानकालीं म्हणजे १८०८ सालीं पटवर्धन घराण्यांतील कै. चिंतामणराव आप्पासाहेब या प्रसिद्ध पुरुषानें सांगली संस्थानाची पायाभरणी केली. सांगलीच्या या खाशा स्वारीनें मराठी राज्याचे बदलते स्वरूप पाहिले होते. नाना फडणीसाच्या आमदानींत कळसास पोहोंचलेली मराठी सत्ता १८०३ नंतर कशी ढळूं लागली, आणि पुढें कायमची नाहींशी झाली हे सांगलीकरांनीं पाहिले होते. इंग्रजी राजवट आली, आणि भारताच्या राजकीय जीवनांत, सामाजिक व्यवहारांत बदल घडूं लागले. ते देखील स्वारी पहात होती. प्रस्तुतच्या दिनचर्येत हिची कालमर्यादा जरी अवघी ४ वर्षांची असली तरी या बदलत्या जीवनाचे अंशत: आपल्याला दर्शन घडते.

सामाजिक इतिहासाची गुंफण करण्यासाठीं, खाजगी पत्रव्यवहार, दिनचर्या, कैफियती, वाके, हकीकती, करीणे, शकावल्या ही अतिशय मोलाची साधनें होत. अर्थात एका जहागिरदाराच्या रोजनिशींत समाजाचे प्रतिबिंब ते कितीसे पडणार असा युक्तिवाद येथें केला जाईल. परंतु प्रस्तुत रोजनिशीचें परिशीलन केल्यास यांत राजकारण किती अल्प आहे, चरित्रनायकाच्या गौरवाचा भाग किती कमी आहे, आणि सामाजिक इतिहासास उपयुक्त अशी माहिती किती विपुल आहे याची कल्पना येईल. १८४७ ते १८५१ या चार वर्षाच्या कालखंडांतील बरीचशी सामाजिक, राजकीय माहिती ही दिनचर्या आपल्याला देते.

दक्षिणी संस्थांनाच्या दृष्टीनें १८४७ हे वर्ष महत्त्वपूर्ण म्हणावे लागेल. सातारकर आणि ब्रिटिश सरकार यांच्यामधील लढ्यानें या सुमारास नवीन वळण घेतले होते. आगामी घटनांची चाहूल लागत होती. १८३९ सालीं प्रतापसिंह राजाला पदच्युत करून ब्रिटिशांनीं आपलें खरें स्वरूप स्पष्ट केले होते. आप्पासाहेब गादीवर आल्यापासूनच राज्य खालसा करण्याचे मनसुबे रचले जात असावेत. साताऱ्याचा विषय हा अत्यंत जिव्हाळ्याचा असल्यामुळें सांगलीकरांच्या रोजनिशींत त्याचा उल्लेख येणें अनिवार्य होते. प्रतापसिंह उर्फ बुवासाहेब काशीला वनवासात होते. इंग्रजाकडे त्यांचा कज्जा चालला होता. चौकशी होऊन महाराज निर्दोष सुटले. पुढें त्यांनीं बाळासाहेब सेनापतीच्या मुलास दत्तक घेतला. बाळासाहेब हे प्रतापसिंह महाराजांचे कैवारी. त्यांनींही महाराजांबरोबर वनवास पत्करला म्हणून नूतन राजे आप्पासाहेब रुष्ट झाले आणि त्यांनीं बाळासाहेबाची सारी जायदाद जप्त करून लिलाव केली. मोठ्या वस्तूंची किंमत कमी लावून त्या साऱ्या वस्तू आपल्या घरीं भरल्या. प्रतापसिंहानें या साऱ्या व्यवहाराला विरोध केला. गुन्हा माझा आणि शिक्षा बाळासाहेबाला कां असा युक्तिवाद पण केला. पुढें प्रतापसिंह निर्दोषी

ठरल्यानंतर बाळासाहेबाच्या मालमत्तेविषयीं चौकशी झाली तेव्हां २५ हजाराला लंपास केलेल्या जिंदगीची किंमत १।। लाख रुपये रेसिडेंटानें केली आणि आप्पासाहेबानें त्याची भरपाई करावी अशी आज्ञा केली. (४२)

आप्पासाहेबांचा गादीवर येण्यापूर्वीच दुर्लौकिक पसरला होता. एका कलावंतीणीच्या मुलाला झुंजारराव किताब देऊन जुन्या लोकांनीं त्याला भर कचेरींत ताजीम दिली पाहिजे असा हुकूम सोडला. पण 'लहान मनुष्यास कामाशिवाय मोठा मान देणें हे नीट नव्हे' अशा विचाराचे मानकरी असल्यामुळे महाराजाच्या या 'अनन्वित' करण्याला लोक कंटाळून गेले होते (४३). दुसऱ्या एका कसबीणीच्या मुलाला सेनापती हा किताब देऊन त्याल दोन नवऱ्या केल्या व त्यासाठीं २-२।। लक्ष रुपये खर्च केले. (४२). प्रतापसिंह, बाळासाहेब, आप्पासाहेब यांच्या स्वभावविशेषावर या प्रसंगामुळें चांगलाच प्रकाश पडतो. 'दौलतीवर हुकुम रेसिडन्ट साहेबाचा महाराजाचे हाती कांहीं नाहीं.' (७८) याची कल्पना सर्वत्र होती. साताऱ्याचें दत्तक प्रकरण बरेंच गाजले, आणि त्या निमित्तानें हें राज्य १८४८ सालीं खालसा करण्यांत आले, या सर्व घडामोडींचीं नोंद या दिनचर्येंत आली आहे. (१००; १०४; खं. २ : ३३, ६७).

श्रीमंत बाजीराव पेशवे, छत्रपती प्रतापसिंह यांना साताऱ्यास गडावर भेटावयास गेले असतांना त्यांच्यामध्ये झालेल्या संवादाची आठवण आबा पारसनिसानें दिली आहे ती उल्लेखनीय आहे. 'श्रीमंतांनीं सर्वत्रास सांगितले जे कोणी अगदी कांहीं बोलु नये मी महाराजास प्रश्न करितो याचे उत्तर काय करतात ते पाहू. म्हणोन बोलावून महाराज बसून कचेरीस हातनिमच्या श्रीमंतांनीं हातातील घेऊन आता तरवार कशी माराल म्हणोन महाराजास म्हणाले तेव्हां महाराजांनी उत्तर केले की तुम्ही तरवार मारता कोणाची म्हणताच श्रीमंत वगैर सर्व संतोष जाहले.' आपला धनी पक्का आहे, आपल्या सार्वभौमत्वाची त्याला जाणीव आहे हे पाहून बाजीरावाला संतोष झाल्यास नवल नाहीं. (खं. २ : २).

समकालीन राजकारणांतील, आणि सातारा प्रकरणाशीं निगडीत असलेली एक प्रमुख व्यक्ती म्हणजे बाळाजीपंत नातू. साताऱ्याची दिवाणकी मिळाली नाहीं म्हणून रुष्ट होऊन निरोप घेऊन गेलेला नातू प्रतापसिंहाच्या पदच्युतीनंतर नव्या राजवटींत आपली महत्वाकांक्षा पूर्ण करून घेतो. आप्पासाहेबाच्या कारकीर्दीतील कर्तुम अकर्तुम शक्ती म्हणजे बाळाजीपंत. इंग्रजाच्या दरबारीं त्याचें चांगलेच वजन असल्यामुळें सांगलीकरही त्याला सन्मानानें वागवितात, त्याच्या भेटीस जातात. सांगलीकरांना कंपनी सरकारांतून तलवार भेट आली होती. मेजर ग्रॅहम यांनीं सांगलीकरांची भेट घेऊन त्यांचा खास गौरव केला होता '...आम्हा लोकांत असी अब्रू कोणास मिळाली नाही तसी आपली अब्रू विलायतपर्यंत जावोन तरवार आली आहे. अशा तरवारी आपले जवळ बहुत असतील परंतु या तरवारेची अबरू

मोठी आहे" (१) बाळाजीपंताने खाशा स्वारीच्या या भेटींत इंग्रजांकडून मिळालेल्या करांचलीची गोष्ट काढून त्यांचा गौरव केला आणि प्रतापसिंहाला ती कशी मिळाली नाहीं याची आठवण देऊन "आपण पुण्यवान सबब या गोष्टी घडली" अशी त्यांची खुशामत केली. (८४) नातूला सांगलींत मेजवानी झडत होत्या. (८६). पेशवे आणि पटवर्धन यांच्या मधील झगडा एलफिन्स्टनच्या मध्यस्थीनें १८११ सालीं पंढरपूर येथें मिटला होता. या पंढरपूरच्या करारांतील मुद्दे हांशील करून घेण्यासाठीं सांगलीकरांना नातूंची मदत हवी होती. संक्रांत तोंडावर आली आहे ती करून जा म्हणून नातूला आग्रह करून ते ठेवून घेतात. पागेपैकीं 'एक उंट व कर्डी बराल्या सिंगा असे सामानासूद्धा' त्याला देतात. मेजवानी होते, कागदपत्रांचे अर्थ लावण्यासाठीं बैठकीं होतात, आणि शेवटीं निरोपादाखल २२५ रु. किंमतीची शालजोडी व पागोटे, मुलगा नाना यास २०० रु. किमतीचा दुपट्टा व पागोटे इत्यादि वस्तू देऊन संभावना करण्यांत आली. (८८) इचलकरंजी, मिरज, नांद्रा असा प्रवास करीत, चहुंकडचा पाहुणचार झोडीत नातू साताऱ्यास परतले. इंग्रजी राजवटींत त्याला कसे महत्त्व प्राप्त झाले होते हे या त्याच्या स्वागतावरून दिसून येते.

रास्ते, सातारकर, करवीरकर आणि इंग्रज यांचेकडून बाळाजीनें खूप मालमत्ता संपादन केली होती. बाळाजीनें सावकारीचा जोडधंदा सुरू केला. इंचलकरंजीकर तात्यासाहेब हे बाळाजीपंताचे जामात. त्यांना एक लक्ष आठ हजार रुपये कर्जाऊ दिले होते. त्याचे व्याज झाले ९० हजार. असा २ लक्षाचा पट काढला. तात्यासाहेब असहाय्य झाले. करवीरच्या ग्रॅहमसाहेबानें सुचविले कीं व्याजाचा प्रश्न घरगुती बोलणी करून तडजोडीनें सोडवावा, आणि तसें न झाल्यास त्याचा गाव जप्त करून तो तुमच्याकडे चालवू असें आश्वासन इंचलकरंजीकरांना देण्यांत आले (२:४) या एकाच उदाहरणावरून बाळाजीच्या आर्थिक व्यवहाराची कल्पना येईल.

प्रस्तुत दिनचर्येंत चरित्र नायकाच्या स्वाभावाचें दर्शन घडणे स्वाभाविक आहे. खाशांची स्वारी आपल्या जहागिरींतील निरनिराळ्या गांवांना भेट देते, तेथील लोकांची त्यांच्या योग्यतेनुरूप संभावना करते, इत्यादि घटना विपुल प्रमाणांत नोंदविल्या आहेत. कर्नाटकच्या दौऱ्यावरील अनेक प्रसंग येथें आले आहेत तीर्थक्षेत्रांची वर्णनें, भोजन समारंभ, पूजा अर्चा, ऐकीव माहिती, व्यक्तिचित्रणें या दिनचर्येंत अनेक आली आहेत. यांतील प्रसंगावरून खाशांचा जिज्ञासूपणा, दिलदार वृत्ति, धार्मिकता, इतिहासाची आवड, रसिकता इत्यादि विविध गुणांचे दर्शन वाचकास घडते.

बेळगांवच्या पाध्याकडे असलेली लांकूड कापावयची, कातावयाची यंत्रे, तसेंच विहिरींतून पाणी काढण्याचा पंप ते बघून येतील. (५) तेथल्या किल्ल्यांतील

डॉक्टरच्या दवाखान्याला भेट देऊन त्याची माहिती करून घेतील (१४) कांकणे कशी तयार करतात हे समजावून घेतील (७) लोखंड करणार आणून भट्टीची माहिती घेतील (३५). या गोष्टी त्यांचा जिज्ञासूपणा दाखवितात.

हिंदु-देवताप्रमाणेंच ते पीराला, मशिदींना भेटी देतील. (५, ३१) ब्राह्मणांना मुक्त हस्तानें दक्षणा दिल्याची, कलावंताना बक्षिसे योग्यतेनुसार बिदागी दिल्याची वर्णनें तर विपुल आहेतच, पण शिरहट्टी तालुक्यांतील मौजे सासुरवाड येथें मांकडे फार आहेत त्यांस हरभरे चारण्यासाठीं "पंचवीस रुपयांची जमीन कुळास लावणी करून त्यांतील हरभरे उत्पन्न माकडास चरणेविषयीं इनाम दिली आहे. (२·२०.) सांगलींत दगडकामाचे सुंदर "जसा कांहीं आरसा" असे गणपती मंदीर बांधले (८४) मारवाड देशांतून संगमरवरी दगडाचे उत्तम जिन्नस आणविले (१०१) धारवाड-कर्नाटकांतून चंदनी पेट्या आणल्या (२८) छापखाना काढला (८४) तेरदाळच्या रयत लोकांनीं नव्या विहिरी खणून मळे केले ते पाहून आले (४४) इत्यादि विविध स्वरूपाची माहिती खाशांचे स्वभावदर्शन घडविणारी मिळते.

सांगलीकरांना ऐतिहासिक माहिती गोळा करणें, कागदपत्रें, तसबिरी जमा करणे, आबा पारसनीस, बाळाजीपंत नातू सारख्या जुन्या मंडळीकडून माहिती संपादन करणे, गोंधळ्याकडून जुने पवाडे मिळविणें या गोष्टींचा छंद होता. इंग्रज–मराठे युद्धास तोंड फुटले तेव्हां बाजीरावानें पुणें सोडून जाऊं नये असे मिरजकरांनीं परोपरीनें सांगितले; इंग्रजांनीं श्रीमंतास कैद केले तर आपण घोडी चालवून मरून जाऊ पण श्रीमंतांनीं पुणें सोडूं नये. पण ही 'रांगडी मसलत' बाजीरावाला रुचली नाही अशी हकीकत दाजीबा गोळे पुणेकर सांगतात. (६६, ६७) हैद्राबादेहून आलेल्या भाऊ कापश्याला पंक्तीला बोलावून त्याला शेला पागोटे देऊन खडर्याच्या लढाईंत 'निजाम अल्लीखान भागानगरहून खरड्यास गेले ते कोणकोणच्या मार्गानें गेले त्या गांवाची नांवे व नवाबाबरोबर फौज किती होती त्याचा तपशील करून' लिहून पाठविण्यास सांगितले. (९२) पिंगळ्यांच्या वंशातील एक माणूस भेटला. त्यानें पहिल्या श्रीमंतांच्या वेळच्या बऱ्याच गोष्टी सांगितल्या. त्या साऱ्या लिहून पाठविण्यास त्यास सांगितले (७२) नाना फडणीसासारख्या दैववान माणसाची जन्मपत्रिका मेणवलीहून आणवली. (१०६) भाऊसाहेब तोतयाच्या पंक्तीस बसल्याबद्दल संसर्गाची प्रायश्चितें घ्यावीत अशा संबंधीचा श्रीमंतांचा हुकुम तासगांवकरांच्या संग्रही होता. तो नकलून आणला. (२ : ५) लावणी करणाऱ्यावरून धोंडजी वाघाच्या स्वारीचा वाका आणविला. (२ : ७३) 'ग्रॅटसाहेब याणी श्रीमंतांचे कारकीर्दीचे बुके छापिली.' त्यापैकी कांहीं भाग ऐकून घेतला. (२ : ४) करवीराहून फिरदोसीच्या शहानाम्याची एक प्रत सांगलीस आली. ती फार छान होती, पण किंमत २५० रु. मागितली होती. सांगलीकरांनी ती बहुतेक खरेदी केली असणार. (२ : २२) एलफिन्स्टनशीं झालेला सारा पत्रव्यवहार सांगलीकरांनीं

जतन करून ठेवला होता. (२ : ५) हा पत्रव्यवहार आता महाराष्ट्र सरकारच्या पुरातत्त्व खात्यानें प्रसिद्ध केला आहे. (बुलेटिन नं. ६, सन १९६९) तसेंच कै. शंकरराव जोशी संपादित 'पानिपतचा रणसंग्राम' हे आप्पासाहेबांच्या या संग्राहक वृत्तीचेंच फळ होय.

क. आप्पासाहेबांच्याकडे ऐतिहासिक पुरुषांच्या तसबीरींचा मोठा संग्रह होता, आणि सर बार्टल फ्रिअरनें त्या मागवून घेतल्याचा उल्लेख दिनचर्येत आहे. (२ : ७३).

१८१८ नंतर, इंग्रज माणूस, इंग्रजी आचार–विचार, इंग्रजी शिक्षण यांचा हळु-हळु प्रवेश महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांत होऊं लागला होता. संस्थानिकांच्या-कडे साहेबाची येजा सुरूं झाली; मडमा, मुलें येऊं लागली; त्यांचे आदरातिथ्य होऊं लागले. मेजावर जेवणाची स्वतंत्र व्यवस्था होऊ लागली. (३). साहेबाच्या जेवणाचा बेत कसा असतो, जेवणाची भांडी, सुऱ्या कातऱ्या, अन्न गरम ठेवण्या-साठीं वापरलेलें कुकरसारखे भांडे या संबंधीची माहिती गोळा होऊं लागली. (८, ९) मेजवानीनंतर अत्तर गुलाब विडे होऊन साहेबाच्या करमणुकीखातर कसबणीच्या नाच गाण्याच्या मैफिली झडूं लागल्या.

कांहीं ब्रिटिश अधिकाऱ्यांना आपल्या बायकामुलांना सोडून दूरदेशी चाकरी चाकरी करावी लागे. अशा एकाकी साहेबाची दुःखे या दिनचर्येत आढळतील मडमा व मुले "सर्व विलायतेत आहेत. त्यांच्या तसबीरा काढल्या आहेत त्या नित्य पाहात असतो." असें म्हणून "एक ऐनावर" काढलेल्या सहा तसबीरा तो खाशांना दाखवितो. (२४) आणि इतर प्रपंच्याच्या गोष्टी करतो. (२५)

इंग्रजी शिक्षणाच्या सरकारी पाठशाळा निघत होत्या. कर्नाटकच्या दौऱ्यावर असतांना धारवाडच्या पाठशाळेला भेट दिली. तेथील गडबोले पंतोजीना दरमहा ३० रु. पगार होता. त्यांनीं मुले उत्तम तयार केली होती. म्हणून मुलांना मिठाई-बद्दल ५० रु. दिले. त्या शाळेशेजारी असलेल्या कानडी शाळेलाहि भेट देऊन मुलास १५ रु. दिले. (२५, २९). या सुमारास एका साहेबाने दक्षिणेंतील सरदार जहागिरदारांच्या कडून देणग्या घेऊन शाळा काढण्याची कल्पना काढली आणि सांगलीकरांच्याकडे दोन हजारांची मागणी केली. "आम्हांस हवे तर आम्ही शाळा चालवू" म्हणून हे बेकायदा कृत्य खाशांनी धुडकावून लावले. (२:२८)

प्रस्तुत दिनचर्येवरून त्यावेळच्या करमणुकीच्या साधनांचीही कल्पना येते. कसबिणींचे गाणे बजावणें, तमाशा, लावण्यांचे फड, बहुरुप्यांचीं सोंगे, दशावताराची नाटके, कीर्तने, लळितें, जनावरांचे खेळ इत्यादींचे विपुल उल्लेख येथें आले आहेत. गणेशोत्सव, वसंतपंचमी, धुळवड, रंगपचमी, रामनवमी, दशहार श्रीकृष्णाबाई, इत्यादि अनेक उत्सव संस्थानांत होत असत. अनेक कलावंतीणींची नांवे येथें आली आहेत. राधी, तुंगसानी, रणमल्ली, इमाम, आवडी मिरजकर, राधा

शिवरामाची, आवडी करवीरकर, चिमणी बक्षीची, रमा, गुलाबी, नैनी, विठा नायकीण गोवेवाली इत्यादि यापैकी कांहीं तमासगीर होत्या; कांहीं कर्नाटकी आणि हिंदुस्थानी दोन्ही प्रकारची गायकी म्हणणाऱ्या व नाचणाऱ्या होत्या. (७; १०) काश्मीरी अस्वलें नाचणारा दरवेशी (३६) हत्तीचे खेळ (३१) धामण व माकड यांचे खेळ (३३) रामावतारी नाटक (३३) हालगे करदोल वाजवणाऱ्यांचे फड, टिपऱ्या खेळणारे (३४) शास्त्रीय गायन व रुद्रवीणा वादन (४०) बडेखान सारंगीवाला याची सतार (६१) यांचे उल्लेख, कलावंताना दिलेली बिदागीं, त्यांच्या कसबा विषयीचे अभिप्राय येथे आढळतील. हिंदुस्थानांतून नगारखाना वाजविणारा व गाणारा कोणी मुसलमान कलावंत आला होता. पण त्याची कला खाशांना 'सुमार' वाटली (१०५)

ब्राह्मणांना वेळोवेळी मिळणारी दक्षणा, कोणत्या प्रसंगी किती दक्षणा दिली जात असे यासंबधीच्या प्रथा यासंबंधीचे आडाखे बांधण्यास या दिनचर्येत भरपूर पुरावा आहे. नित्याच्या शिरस्त्याप्रमाणें दक्षणा मिळाली नाहीं म्हणून यजमानाला 'घेराव' केल्याची मनोरंजक हकीकत येथे आली आहे. आपल्या काकूच्या तेराव्या दिवशीं ब्राह्मणांना आठ पैसे देकार देण्याचें तासगांवकरांनीं ठरविले. परंतु ब्रह्म-वृंदांना ते अमान्य होते. "तेव्हां दहा पांच हजार ब्राह्मणांनीं कट करून गांवच्या साऱ्या वेशी बंद करून पाणी बंद केले आणि म्हणाले कीं, बाईचा विषय लाख रुपयाचा गांडीखाली घालून ब्राह्मणास चवल देता × × × फार बोलले भाऊसो तासगांवकर हे ब्राह्मण आपणांस मारतील म्हणून भिऊन घरांतून बाहेर आलेच नाही तेव्हा पदरच्यानी ब्राह्मणास चार आणेप्रमाणे देवविले आणि तोड काढली आणि मोकळील केली. (७०) अर्थात् हे वर्तमान ऐकीव आहे अशी नोंद, दिनचर्याकाराने केली आहे.

लग्नप्रसंगीं ब्राह्मण भोजनें मोठ्या प्रमाणावर होत. करवीरास एका लग्नांत पांच दिवस पंचगंगेवर झाडीत ब्राह्मणांची प्रयोजने उठत होती, त्यास तीन, चार, पाच सहा, आणि नऊ हजार या अनुक्रमानें ब्राह्मणमंडळी उपस्थित होती. ब्राह्मणास एक रुपया, मुलास चार आणे, बायकोस आठ आणे, गोसावी, बैरागी कोमटी यांना आठ आणे अशी दक्षणा वाटली. (५०) पर्जन्याकरितां गांवांतील सर्व ब्राह्मण अनुष्ठानास लाविले आणि त्यांनीं अस्तमानापर्यंत उपोषित अनुष्ठान करावे असे ठरविले, आणि त्यांस फराळास व साखरपाणी सरकारांतून देण्याची व्यवस्था केली (२:३७) एक व्यवसाय म्हणून भिक्षूकीचें समाजांतील स्थान समजून घेण्यास ही दिनचर्या उपयुक्त ठरेल. 'माधुकरी' ही संस्था तशी पुरातन आहे पण १९ व्या शतकात तिचे स्वरूप काय होते आणि या गरीब बिचाऱ्या माधुकऱ्यांचा कळवळा येऊन खाशांनी त्यासाठीं काय केले याची कल्पना पुढील नोंदीवरून येईल. 'पावसाळा हिवाळा त्यात गांवातील विद्यार्थि वगैरे १५० सुमार आजमासे हे

दोनप्रहरी मधोकरीस जातात त्यास ऊन लागते. पाय पोळतात सबब त्यास जेवणाचा बेत भोजन घालणेचा बेत आज दहा वर्षे सुमार चालला आहे...सदरहू विद्यार्थ्यांच्या भोजनाचे काम काशिनाथ कानिटकर याजकडे सांगितले आहे." (१००).

संस्थानांतील कांही पद्धति उल्लेखनीय आहेत. दिपवाळी निमित्त 'देव, गाई. बंदीवान बारगीर' यांना 'तेल बुका वाटली' पाठविण्याचा शिरस्ता होता (७८; २:१८).

नवे विचार येऊं लागले तरी रूढी, आचार, समजुती तितक्या वेगाने बदलत नव्हत्या. खाडिलकर नांवाच्या कोंकणस्थ शास्त्र्याचा मुलगा द्रव्य घेऊन बाटून 'किरिस्थाव' झाला व आणखी ब्राह्मणांची मुले बाटणार हे काशीहून आलेले वर्तमान दुःखानें नोंदविलेले आहे. (८१) ब्राह्मणाचें आचरण ढळले तर समाज त्याला क्षमा करावयास तयार नव्हता. "करवीरास पाच चार ब्राह्मण आसामी याणी कळवातीण मुसलमान इचे घरी तिचे हातून मद्यपान व कोंबडी वगैरे मास खाल्ले हे वर्तमान पंडीत कारभारी यास समजले नंतर त्यास धरून अंतर पदरी घालून त्याची धिंड काढून ब्राह्मण्यांतून भ्रष्ट करून सोडून दिले." (२१, २२) हे वर्तमान ऐकून झाले ते ठीक झाले अशी खाशांची प्रतिक्रिया झाली.

प्रभु जातीचा माणूस खाशांच्याकडे जेवावयास येत नाहीं (५) दत्तक घ्यावयाचा तो देखील 'देवीस चिटथा टाकून मग आज्ञा येईल त्यास घ्यावयाचा अशी पद्धत प्रतिनिधीसारख्या सुशिक्षितांकडे सुद्धां आढळते (१२,१३) चतुर्थाश्रम स्वीकारल्याची (६२) सती जाण्याचा हट्ट करणारी मोहित्यांची बायको (६३) अशी कांही तुरळक उदाहरणेही आढळतात.

तत्कालीन लोकभ्रम, समजुती याची कितीतरी उदाहरणें या दिनचर्येत आली आहेत. देवाचा बिछाना विस्कटल्याचा शागीर्दाला झालेला दैवी चमत्कार (७७) घरीं होणारा पिशाच समंधांचा उपद्रव आणि एक वर्षभर अभिषेक केल्यानंतर तो दूर होणे (९१) छत्रपती आजारी पडले तेव्हां त्यांना उतार पडावा म्हणून श्रीपाद-वाडीस गुरूचरित्रास ब्राह्मण एक व सांगलीच्या गणपतीस प्रदक्षणा घालण्यास एक ब्राह्मण यांची नेमणूक (९९) अशा हकीकती येथें आहेत. जमखंडीकडील एका जागृत दैवतासंबंधीचा नथ चोरी प्रकरणांत साहेबानें स्फोट कसा केला याचा किस्सा मनोरंजक आहे. 'मारूती लबाड आहे, मी नथ उचलली असता या गरीब बाईवर तुफान घेऊन कौल देतो म्हणून रागास येऊन श्रींची पूजा वगैरे बंद करून कवाडास कुलुप घालून त्या कुलपास बेडी लोखंडा घातली आणि श्रीस नैवेद्याबद्दल तीन पैसे देऊन त्याकडील जमीन वगैरे नेमणुकीची जप्ती केली.' (१०३) अर्थात हे वर्तमान ऐकीव असल्याचा खुलासा केला आहे.

कांहीं वैद्यकीय स्वरूपाची माहिती येथें आढळते. खाशांच्या पायाला गांठ झाली तेथें प्रथम जळवा लावल्या. (७३) नंतर ती गांठ त्यांनीं स्वतः सुईनें भोंक पाडून

रेशमानें टाका घालून जखम बांधली. (७६) आपल्या प्रेयसीबरोबर भांडून, तिचें नाक कापून कुंभार प्रियकर पळून गेला. तेव्हां तिच्या नाकाचा तुकडा बसवून सभोंवती टाके घातले. (७८) असे उल्लेख आले आहेत.

तासगावच्या रमाबाईच्या प्रसुतीची हकीकत, तिच्या आप्तेष्टांनीं बाई प्रसुत झालीच नाहीं, मुलगा विकत आणला असा तिच्या विरूद्ध केलेला कट, आणि रेसिडेंटानें दिलेला निर्णय या संबंधीची सारी हकीकत मनोरंजक आहे. (२:२७, ५३, ५९, ६०). जारकर्मासारख्या सामाजिक गुन्ह्यांची गंभीरपणें दखल घेतली आहे. (२ : ३७, ८५) शृंगेरीकर स्वामी आणि हुबळीचे जंगम यांच्यामध्यें झालेल्या पालखी प्रकरणांचा दिलेला ब्रिटिशांचा निर्णय सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे. 'जे सरकारी रस्त्यांत कोणास पाहिजे त्यानें चालावे कोणी हरकत करूं नये.'(२ : २७)

या दिनचर्येच्या शेवटीं सांगलीकरांच्या अंतःकाळचें वर्णन, देवाजवळ जावे ही त्यांची आंतरिक इच्छा, वयाच्या ७६ व्या वर्षी झालेला त्यांचा मृत्यू इत्यादि घटना आल्या आहेत. सुतकासंबंधीची माहिती जहागिरदारांच्या चालरीती समजावून घेण्यास उपयुक्त आहे.

थोडक्यात, श्री. य. न. केळकर आणि श्रीं. ना. के. जोशी यांनीं या दिनचर्येचें भा. इ. सं. मं. च्या सभांतून सातत्याने वाचन करून त्यांतील निवडक भाग इतिहासाच्या अभ्यासकांना उपलब्ध करून दिला त्याबद्दल त्यांचें आभार मानणें आवश्यक आहे. सामाजिक इतिहासाचें एक साधन म्हणून दिनचर्या किती महत्त्वाच्या असूं शकतात हे श्रीमंत चिंतामणराव पटवर्धनांच्या दिनचर्येवरून स्पष्ट होते.

— अ. रा. कुलकर्णी

श्री. सरदार गं. ना. मुजुमदार यांचें लेखन-प्रकाशन

(१) श्री. सरदार गं. ना. उर्फ आबासाहेब मुजुमदार व भारत इतिहास संशोधक मंडळ यांचा संबंध फार जुना आहे. ते शक १८३२ सालीं म्हणजे मंडळ-स्थापनेच्या वर्षीच व म. म. पोतदारांच्याही आधीं मंडळाचे सभासद झाले. पुढें शक १८४१ पासून शक १८६८ पर्यंत व शक १८७९ ते १८८५ पर्यंत या मंडळाचे ते एक चिटणीस होते. शिवाय शक १८७६ पासून ते शक १८९१ पर्यंत त्यांनीं मंडळाचे खजिनदार म्हणून काम केलें. हीं दोन कारभारी कामें ज्याप्रमाणें त्यांनीं केलीं, त्या-प्रमाणें संशोधन, संग्रहण व संकलन हींही कामें त्यांनीं केलीं. मंडळांत असलेल्या चित्रसंग्रहापैकीं कित्येक चित्रें त्यांनीं आपल्या वैयक्तिक जबाबदारीवर येथें आणलीं. पण यामुळेंच कांहीं चित्रें त्यांना मालकास परत द्यावीं लागलीं. तरीही कित्येक चित्रें अजूनही मंडळांत शिल्लक आहेत. जसें हें चित्रसंग्रहाचें काम त्यांनीं केलें, त्याप्रमाणें कागदपत्रें, पोथ्या व बाडें यांचेही लहान मोठे संग्रह त्यांनीं मंडळांत आणले. एवढेंच नव्हे तर अशा सामग्रीपैकीं कांहींवर त्यांनीं मंडळांत टिपणेंही वाचलीं तीं यथाशक्य प्रसिद्ध झालीं आहेत. या टिपणांत सर्वाधिक भरणा वाङ्मया-त्मक टिपणांचा आहे आणि त्या खालोखाल ऐतिहासिक टिपणांचा आहे.

(२) मंडळाचे कार्य नुकतेंच सुरू झालें त्या वेळीं जुनें मराठी वाङ्मय व कागद-पत्रें यांची अशी स्थिती होती कीं, जें हातीं लागेल. तें बहुधा नवीनच असावयाचें. मंडळस्थापनेच्या अगोदर मराठी इतिहास व वाङ्मय यांचें संशोधन अजिबात होत नव्हतें असें नाहीं. तथापि या संशोधनाला मंडळस्थापनेनंतर जोर चढला. आणि शेकडों टिपणें—टाचणें प्रसिद्ध होऊं लागलीं. आज तीं अगदीं प्राथमिक स्वरूपाचीं वाटतात. त्यांपैकीं कांहीं टिपणांतील माहिती आज अधिक संशोधनानें चुकीची ठरलेली आहे; तर कांहीं टिपणांतील माहिती मर्यादित स्वरूपांतच वास्तव ठरत आहे. पण ज्या वेळीं तीं प्रकाशित झालीं, त्या वेळीं त्यांना आजच्या मानानें पुष्कळच अधिक महत्त्व होतें. आबासाहेबांनीं आतापर्यंत सुमारें १५० टिपणें लिहिलीं आहेत. त्यांत सुमारें १०० वाङ्मयाभ्यासाचीं असून बाकीचीं ऐतिहासिक विषयासंबंधीं आहेत. ते संगीताचे गाढे अभ्यासक असल्यामुळें त्यांचीं कांहीं टिपणें संगीत विषयक आहेत. आबासाहेबांचें घराणें पेशव्यांचें मुजुमदार घराणें असल्या-मुळें त्यांच्या ऐतिहासिक टिपणांत अनेक पेशव्यांविषयीं असावींत यांत अनैसर्गिक असें कांहीं नाहीं. पेशवे छत्रपतींचे प्रधान असल्यामुळें त्यांच्या टिपणांत छत्रपतीं-विषयींही कांहीं टिपणें आहेत. पेशवे व मुजुमदार दोघेही गणेशोपासक असल्यामुळें त्यांच्या टिपणांत गणेशाविषयीं कांहीं आहेत. आबासाहेबांच्या मंडळांतील संशोधनाचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांचे फार्सी भाषेंतील कागदपत्रांचें काम

होय. त्यांना फार्सी येत असल्यामुळें त्यांनीं ऐतिहासिक फार्सी साधनांवरही कांहीं टिपणें वाचलीं आहेत. पण त्याशिवाय त्यांनीं पुण्यांतील पारसनीस घराण्यांपैकीं कै. आण्णासाहेब व कै. बाळासाहेब यांजकडील फार्सी कागद तपासून त्यांपैकीं इंग्रज व मराठे यांमध्यें झालेल्या पत्रव्यवहाराचा एक खंड मंडळांतील मुन्शीच्या सहाय्यानें संपादून प्रसिद्ध केला आहे. मंडळाच्या प्रारंभीं मंडळापुढें वाचलेल्या निबंधास जोडलेले मूळ कागदपत्र शिवचरित्रसाहित्य, ऐतिहासिक संकीर्ण साहित्य इत्यादि मालांत स्वतंत्रतेनें प्रकाशित करण्याची योजना नव्हती. तेव्हां त्यांच्या कांहीं टिपणांत मूळ कागदही प्रकाशित झाले आहेत.

(३) त्यांच्या प्रकाशित व अप्रकाशित लेखांचो सूची खाली देत आहे.

प्रकाशित लेख–पुस्तक, मथळा व पृष्ठ

षाण्मासिक वृत्त (१) शके १८३४

१. शके १५९१ मधील एक महजर — ५६
२. ‘गौरनाल आलपिण्टण’ची मुद्रा — ८०
३. शनवारवाड्याची आग — ८१
४. पेशव्यांच्या शिकारखान्याची जागा — ८२
५. नानाची पेठ — ८२

वार्षिक इतिवृत्त शके १८३५

६. पेशव्यांच्या ग्रामदेवता व कुलदेवता — १०४
७. खरपुडी येथील रामेश्वराचे देवालयावरील शिलालेख — १६०
८. तुकाराम समकालीन व्यक्ती — २२७
९. गाणपत्यांची एक यादी — २२९
१०. मौजे चिंचोली येथील गहिनीनाथाचे देवालयावरील शिलालेख — २४०
११. विवेकसिंधु व गुरुचरित्र — २८२
१२. कपिलानिर्णय — २८५
१३. वाकेनीस (ठोसर) — ३०५
१४. पेशव्यांचा गोळाना — ३१५
१५. नासिक येथील श्रीसुंदरनारायणाचे देवालय — ३१६
१६. श्री. दादासाहेब पेशवे यांचें एक पद — ३९९
१७. निंबगांव येथील श्रीखंडोबा — ४४८

वार्षिक इतिवृत्त शके १८३६

१८. महाराणा अरिसिंह याचा एक ताम्रपट — ११९
१९ ब्रह्मदेवकृत शैवशक्ति ग्रंथ — १२०
२०. शिवागम — १२१
२१. शामजीसुत कृष्ण — १२२
२२. नामापाठक विरचित नामरत्न माला — १२२
२३. रामदासकृत स्वरोदय — १२३
२४. पूर्णब्रह्मकृत रसप्रकरण — १२४
२५ साहें सुदर्शन — १२५
२६. बळवंतकृत योगवासिष्ठसार — १२६
२७. माधवकृत गणेशपुराण — १२८
२८. भट्टभटात्मज शिवरामकृत चैतन्यचंद्रिका — १३०
२९. करीनाचाल देशपांडेपण — १३१
३०. शके १७३९ नंतर — १५४

त्रैमासिकातील लेख

	वर्ष अंक पृष्ठ
१. जिजाई, शिवाजी व चित्राव	१–२-३–३३
२. श्री. नानासाहेब पेशवे यांस मुखत्यार पत्र	१–१–४२
३. श्री. तुकारामांचे गुरु बाबाजी उर्फ केशव चैतन्य	२–१–१५०
४. शिवाजी महाराजाच्या राजकारणाचा एक मासला	२–१–१५७
५. खोर येथील आत्रे घराणे	७–१–४९
६. श्री. शिवाजीचा वाडा–लालमहाल	९–२–३२
७. माधवसुत आणि मराठी रुक्मिणी स्वयंवर	१२–३–१३०
८. भैरवपुराण	१२–३–१३९
९. गणेशयोगीकृत गणेश विजय	१२–४–१५३
१०. उत्तमश्लोक विरचित प्रबोधनसार	१२–४–१५४
११. पुनः निवृत्तिकृत भगवद्गीताटीका	१२–४–१६५
१२. अंतापूर येथील एक मूर्ति	१४–३– ९
१३. संगीत मकरंदाच्या छापील ग्रंथाचें निरीक्षण	२०–१–८७
१४. यशवंत गंगाधर चंद्रचूडकृत वृत्तद्युमणि ग्रंथ	२०–१–७१
१५. बाळाजी बाजीराव प्रधानकृत गणेश कुतुकामृत	२१–२–४६
१६. पूर्णब्रह्मकृत आरोग्य पीयूष	२३–१–९९
१७. जगद्गुरु वामनशिष्य त्रिमलविरचित ज्ञानदर्पण	२३–१–१००
१८. पुण्यांतील जमीन मोजणी	२४–१–७७
१९. हिंगणगांव (जखणगांव) येथील शिलालेख	२८–१-२–११
२०. पुण्यांतील ताबूत व पंजे	३२–१-४–५३

अप्रकाशित लेख

वाढदिवस (वा) संमेलन (सं) इतर पाक्षिक सभेतील

	सभा व शक
१. नेऊरगांवचा शिलालेख	सं. ४–३८
२. ऋग्वेदी व यजुर्वेदी यांचे वृत्तिपत्र	पा. ४–३९
३. कबीरमठ	पा. १–४३
४. मौजे बाबुळगांव येथील देशमुखीचा ताम्रपट	३–४३
५. कंक यांचे वेतनपत्र	६–४३
६. खेडचे देशपांडे	७–४३
७. तीन सोंड्या गणपती	११–४३

इतर कांहीं अप्रकाशित लेख

● ● ●

श्रीमंत सरदार गंगाधर नारायणराव मुजुमदार



जन्म : शके १८०७, पौष वद्य १३, इ. स. १८८६ फेब्रुवारी १

भारत – इतिहास – संशोधक – मंडळ, पुणें

वर्ष ५०] त्रैमासिक [अंक १–४

दिनचर्या श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन, खंड २ रा

११ जून १८४८ : रा. अण्णा देसाई याजकडून धारवाडाहून धारवाडचे किल्याचा नकाशा चितारी याजकडून लिहून पाठविणे विशी लिहिले होते. त्याजवरून लिहून आला आहे. चांगला आहे.

शिरहट्टीहून मामलेदार यांचे पत्र सरकारात आले त्यात श्रीमंत परशरामपंत भाऊसाहेब हे मुळगुंदास होते तेथे निळोपंत जोशी म्हणोन सावकारी करून फार वर्षे होता. त्यास कारभारी याणी दरसाल दोन होन प्रमाणे चारसालचे आठ होन देणे म्हणोन तसदी लाविली त्याणे देत नाही म्हणोन आग्रह केला. तेव्हा त्याची बेअब्रू केली. त्याने जिव्हा असडून प्राण दिला. नंतर आठचार दिवसांनी श्रीमंत भाऊसाहेब यास ज्वर आला. ज्वरात निळोपंत जोशी याणे येऊन भय दाखविल्या-सारखे करून दृष्टी पडावे, असे होत होते. तो ज्वर आल्या दिवसापासून आठवे दिवशी जेष्ठ ॥ ७ गुरुवार छ ६ रजबी प्रातःकाळी वारले. त्याची पत्नीही तेथेच आहे. मुळगुंदचे रयत लोक सर्व परागंदा होऊन गेले आहेत. सुतकास आज सहावा दिवस. सरकारातुन नगारखाना दहा दिवसपर्यंत बंद करविला आहे.

१६ जून १८४८ रा. व्यंकोबा मोडक हे नरगुंदास चाकरीस गवई होते ते हल्ली तेथून निघोन येथे आले आहेत रुद्रविणा वाजवितात. बहूत नामी वाजवितात. त्याणी आज सकाळी खाशाजवळ वाजविला. सखाराम बाबा वगैरे मंडळी ऐकावयास आली होती.

१८ जून १८४८ साल गुदस्ता प्रमाणे अडिच महिने गावातील विद्यार्थी वगैरे यांस जेवणाचा बेत करून दुवक्ता घालीत असतात. त्याची आज समाप्ती. सबब आंबे पिकले खरेदी करून आंबरस करून जेवण घातले. चार पैसे दक्षणा दिली. जेवणाचा बेत परजन्यामुळे वे. रा. बाळंभट पुराणीक यांचे घरी केला होता. दोनशे सुमार पात्र जाहले.

१९ जून १८४८ : तिसरे प्रहरी आबा पारसनिस सातारकर प्रभु हे चिमणाबापू

चिटणीस याचे सासरे. ते करविरास देवीचे दर्शनास आले होते. सांगलीस आपले जावयाचे समाचारास आले होते. ते आज खाशाचे भेटीस आले होते. श्रीचे मंडपांत कचेरीस भेट जाहली. पारसनिस हे पारसी शिकले आहेत. बोलण्यात चमत्कारिक पारसी बैता वगैरे म्हटल्या. त्या खाशानी लिहून घेतल्या. श्रीमंताच्या वेळच्या ऐकीव गोष्टी व पाहीलेल्या निघाल्या होत्या त्यात श्री. कै. महाराज बुवासाहेब महाराज वगैरे त्रिवर्ग बधु हे साताऱ्यास गडावर होते. त्यासमयी श्रीमंत रा. पंतप्रधान बाजीरावसाहेब हे राजदर्शनांस आले होते ते समई श्रीमंतानी सर्वत्रांस सांगीतले जे कोणी अगदी काही बोलु नये मी महाराजास प्रश्न करीतो याचे उत्तर काय करतात ते पाहू. म्हणोन बोलवुन महाराज बसून कचेरीस हातनिमच्या घेऊन बसले होते तो निमच्या श्रीमंतानी हातातील घेऊन आता तरवार कशी माराल ? म्हणोन महाराजांस म्हणाले तेंव्हा महाराजानी उत्तर केले की तुम्ही तरवार मारता ती कोणाची ? म्हणताच श्रीमंत वगैरे सर्व संतोष जाहले ही गोष्ट वगैरे आणखी गोष्टी बहुत बोलण्यांत आल्या. खाशानी आपले कित्ते कै. लक्ष्मणराव चिटणीस यांच्या हातचे वगैरे दाखविले व श्रीमंत तात्यासाहेब यांच्या हातच्या पुस्त्या वगैरे दाखविल्या व त्याणी वर्तमान सांगीतले की बुवासाहेब महाराज याणी बाळासाहेब सेनापतींचा मुलगा घेतला होता तो इंग्रजी सरकारातून नामजूर जाहला. हल्ली अपासाहेब महाराज याणी भोसल्याचा मुलगा आपण जिवंत असते वेळेस घेतला नंतर अंतकाळ जाहला तो बिलायतेहून मजूर जाहला तो गादीवर कायम होईल म्हणोन सांगितले. नंतर विडे देऊन ठिकाणास गेले.

२२ जून १८४८ : रा. गोपाळ माणकेश्वर म्हैसकर हे इंग्रजी सरकारचे हुकूमावरून कागवाडास श्री. रा. त्रंबकराव अप्पासाहेब यांचे दौलतीचा कारभार एक वर्षसुमार करीत आहेत त्याचे इलाख्यातील नंदगाव म्हणोन खेडे आहे त्या गावी सोनार याणा नवे शिक्के करून रुपये पाडीत असे वर्तमान म्हैसकर यांस समजताच याणी त्या सोनारास आणवुन चौकशी करून अंतर पदरी घातले त्याजवरून आपराधानुरुप दंडही घेतला त्याजवळचे शिक्के सरकारात ठेवले असे असता कोणी लुच्चाने इंग्रजी सरकारात मेहेरबा अंडरसनसाहेब याजवळ फिर्याद केली जे मध्येच दोन रुपये खाऊन ही गोष्ट दाबली इंग्रजी सरकारास कळवीली नाही म्हणोन याजवरून साहेबानी आपला मुनशी रा. विष्णुपंत जोशी यास कागवाडास पाठवुन चौकशी केली त्यात हा मजकूर आप्पासाहेब कागवाडकर यास विचारला याणी आपलेकडे गोष्ट घेऊन जे केले ते मी केले मीच सोनाराचे शासन केले मजकडे ऐवज गुन्हेगारीचा जमेस आहे वगैरे खरा मजकूर होता तो सांगावा ते न करता कानावर हात ठेवीले जे विचारण्याचे असेल ते म्हैसकरास विचारावे म्हैसकरांस कैद करून बेळगांवास चौकशीस नेले आहेत.

२३ जून १८४८: आज खासा स्वारी मिरजेसच आहे. तेथील ओढयाच्या कार-

खान्याची माणसे काही कमी जाहली उदईक अगदी होणार नंतर येथून वडर वगैरे नेले आहेत त्याजकडून काम ओढ्याचे चालीस लावणार असे आहे.

रामतिर्थकर स्वामी सांगलीस आले. समारंभाने वाजत गाजत आणले त्यास जागा जनार्दन मोरेश्वर कुंटयांचे घरी दिली.

२७ जून १८४८ : स्वामी जवळचे वर्तमान असे. सन खमस अरबैनांत करविरास बंडाई जाहली त्यावेळी हे स्वामी भिमाशंकराकडे होते त्यास बंडवाले याणी धरून हातपाय तोडले म्हणोन त्यास वाईट वर्तमान ऐकीले होते परंतु ते खरे जाहले नाही त्याजवरून हे वर्तमान कसे जाहले म्हणोन विचारले स्वामीनी सांगीतले जे खरे आहे त्यातील मजकूर असा जाहला आम्ही पुण्यादेशांत भिमाशंकाराचे डोंगरात नजीक होतो त्या वेळेस बंडवाले यानी येऊन आम्हास गाठून आमची व आम्हा बरोबरची मंडळी होती त्यांची वस्त्रे पात्रे भांडी वगैरे सामान गोळा केले व आमचा स्वयंपाक होता तो विटाळला ते आम्ही त्या सर्वत्रानी म्हटले जे बाबाहो वस्त्रे वगैरे सर्व आमची घेऊन चला अन्न शिवला हे जेवा परंतु आम्हास मारू नका असे म्हणताच त्यास बुद्धी उत्पन्न होऊन ते अन्न जेवले नंतर आमची वस्त्रे आम्हास दिली आम्ही त्यास काही चमत्कार करून दाखविला त्याजवरून ते फार संतोष होऊन आमचे भजनी लागले आम्हावर फार प्रीती करू लागले पुढे कांही दिवसानी आम्ही निघोन गेलो नंतर आमचे बरोबर ब्राह्मण फिरस्ते वगैरे होते त्यातील एकाने इग्रजी सरकारांत जाऊन वर्तमान समजावीले की भिमा शंकराचे डोंगरात बंडवाले आहेत त्यास आम्ही धरून देतो. आम्हांस बक्षीस द्यावे म्हणोन त्या प्रमाणे बक्षीस कबुल करून आपण सन्याशाचा वेश धरून तो ब्राह्मण त्या बंडवाल्याकडे आला बरोबर पांच चार मंडळी होती आणि सांगीतले जे रामतीर्थकर स्वामींचा गुरु आलो आहे. म्हणोन म्हणताच ते येऊन त्याणी बडदास्त मोठी त्यांची केली पुढे एक दिवस प्रसाद म्हणोन जेवणाचा बेत करून सान्या बंडवाल्यास जेवणास बोलावीले आणि इंग्रजास सुचना करून दोन चारसे शिपाई आणुन त्या डोंगरात अदकासांचे अंतऱ्याने घेरा देवाला इकडे जेवणाची पाने मांडून बंडवाले जेवावयास बसावयाचे त्याणी एक अनानी टेहळ्या झाडावर बसविला त्यास गुरु समजताच दगा म्हणोन आरडला खालचे सावध होऊन अन्न टाकून उठले ज्या ब्राह्मणाने वेष सन्याशाचा घेतला होता त्यास धरून मुसक्या बांधल्या व त्यास ठार मारिला पळोन गेले त्या गोष्टीचा लोकांत आमचा झाला त्यास याचा संदर्भ असा म्हणोन स्वामीनी सांगितले.

२८ जून १८४८ : दोन घटका अदिवस हत्तीची मौज पाहीली तेथे कोणी शुद्र माणदेशचा बाकोसह बाजारातून करविरास जागेस आला तो गणपति महाराजाचे दर्शनाकरीता आत जाऊ लागला स्वारी बसलेनुळे त्यास माहोती नव्हती जवळच्या लोकांनी त्यास दबावला ते खाशानी पाहून लोकांस रागे भरून त्या उभयतांस आत पाठवुन श्रीचे दर्शन व देवालय दाखविले त्याचे स्त्रीस देवाचा प्रसाद नारळ व कुंकू

व तांदूळ मापटेभर ओटचात घालून त्यांस संतोष करून लाऊन दिला.

रात्रौ सखाराम बावा गवई यांस बलाऊन आणून पदे वगैरे म्हणवीली व श्रीमंतांचे वेळचे अनुभवीक स्वतः गोष्टी निघाल्या होत्या.

२ जूलै १८४८ : तिसरे प्रहरी नव्या बंगल्यात स्वारी जाऊन घटकाभर बसुन सखाराम बावाचे गाणे क्षणभर जाहले.

पूर्वी श्रींगेरीकर स्वामींनी हुबळीकर जंगमाला रस्त्यातुन आडवी पालखी चालू नये म्हणोन सरकारात खटला नेला होता त्याचा निकाल इंग्रज सरकारांत चौकशी होऊन असा झाला की रस्ता सरकारी त्यात कोणी कसा जरी चालला तरी चालेल चिंता नाही. ही गोष्ट हिंन्दु धर्मास फार वाईट जाहली पुढे आणखि कसे होते पहावे.

४ जूलै १८४८ : श्री. रा. केशवराव तात्यासाहेब इचलकरंजीकर हे रा. बाळाजी-पंतदादानातू याजकडे खासगत कामाकरिता पाचवडास जाण्यासाठी इचलकरंजीहून निघोन आज सांगलीस आले आहेत.

५ जूलै १८४८ : आज भोजनाचे वेळी तात्यासाहेब इचलकरंजीकरांनी सांगीतले की, मला अलीकडे कर्ज फार झाले सबब करविरास ग्रामसाहेबाकडे मजकूर कळविला त्यानी कर्जाचा पट द्यावा म्हणजे बंदोबस्त करून देतो. म्हणोन सांगीतले. त्याजवरून एकंदर पट दिला त्यात बाळाजीपंत नातु यांचे कर्ज मुद्दल एक लक्ष आठ हजार त्याचे व्याज नव्वद हजार नेमणुक सुद्धा असे दोन लक्षाची भरती त्या पैकी मुद्दल एक लक्ष आठ हजार रुपये प.वले. असे आहे तेव्हा साहेबांनी सांगीतले जे ते तुमचे सासरे ते पक्षी तुम्ही एक वेळ त्याजकडे जाऊन घरगुती विचाराने त्यानी बोलावे व व्याजाचे रकमेची तडजोड करून घ्यावी त्यानी न ऐकल्यास आम्ही त्याज-कडील गांव जप्त करून तुमचेकडे चालवितो म्हणोन यास्तव मी पांचवडास जातो.

६ जूलै १८४८ : श्री स्वामीस देवळातील वाडचात भिक्षा केली स्वामीस पंधरा रुपयाचा छाटी व शंभर रुपये रोख दिले हे रुपये स्वामी रामतिर्थास देवाचा मंडप बांधणार आहेत सबब दिले.

रात्री इंचलकरंजीकर निरोपास आले त्यावेळी मागील गोष्टी चत्मकारीक श्रीमंतांचे वेळच्या निघाल्या होत्या व ग्रांट साहेब याणी श्रीमंतांचे कारकिर्दीचे बुके छापीली आहेत ते काढून कांही वाचून दाखविले. तसेच नगारखानाही पत्तेचा शाहजाने वाजवुन नगारची याजकडून दाखविले.

७ जूलै १८४८ : फोळंपंत जोशी सातान्यास गेले होते. त्यांचे पत्र आले त्यात मजकूर की चाफळास वे. रा. दाजीबा आचारी यांचा मुलगा गादीवर संस्थानास मालक करणेकरिता नेला होता त्यास विलायतचा हुकूम येऊन कायम झाला नाही.

८ जूलै १८४८ : भिमराव मुंडरगी याणी वाघाची पिल्ले दोन कर्नाटकातून हरपन-हळीहून पाठविली आहेत ती आज येऊन पोहचली लहान आहेत.

९ जूलै १८४८ कर्नाटकांत बेनासी गाव म्हणोन गोकर्णाचे वाटेने हानगल जवळ आहे. तेथे कोणी ब्राह्मण चितांबर म्हणोन साधु अलिकडे प्रकट झाले आहेत ते कुष्ठ वगैरे रोग बरे करितात असा त्याचा चत्मकार सांगतात.

१० जूलै १८४८ : कागवाडकर श्रीमंत त्रंबकराव अप्पासाहेब यांचे प्रकृतीस बरे नव्हते त्यांस औषध राघो बावाजी करमरकर याणी दिले त्यांस बक्षिस सोन्याचा तोडा वजन तोळे सतावीस अंनताचारी यानी सांगीतले.

११ जूलै १८४८ : मु. सांगली. आज मिरजकर फकिर तीर लावणारे यास बागेत नेऊन तीर लाविले.

कर्नाटकातुन एका अतिशुद्राने चंदनाच्या पेटचा लहान दोन व एक थोर. अशी तीन कुसर केलेल्या विकावयास आणल्या आहेत.

सितासानी कर्नाटकी मिरजकर इची नात कृष्णासानीची लेक औरस ही मिरजेन येथे आली आहेत तिचे नाव बाईजासानी-ही खाशाकडे मुजऱ्यास आली होती तिचे गाणं रात्रौ दोन घटका जाहले.

१२ जूलै १८४८ : बेळगावचे वर्तमान बेळगावांनजीक सालाबादप्रमाणे लक्ष्मी मोठी बसवून जत्रा भरत असते. तशी आठ-पंधरा दिवस भरली होती तेथे हजारो मनुष्ये पहाण्यास मिळाली होती त्यात साहेब लोकही मडमेसहीत रथात बसुन आले होते त्या गर्दीत तुडवून पाच माणसे मेली म्हणोन वर्तमान शहापुरचे लिहून आले.

१३ जूलै १८४८ : इंचलकरंजीहून मोरांचे बच्चे बरेच मोठे चार व बकूळीच्या ंडचा अश्या आल्या आहेत व श्रीमंत कै. पंतप्रधान सवाई माधवरावसाहेब यांचे कारकिर्दीस भाऊसाहेबांचा तोतया जाहला त्याचा पत्ता लागल्यावर जे त्यांचे पंगतीस जेवले त्यास संसर्गाची प्रायश्चीते देण्याविषयी कै. भाऊसाहेब तासगांवकरास श्रीमंतानी पत्र लिहीले त्याची नक्कल इचलकरंजीहून आली.

२२ जूलै १८४८ : मु. सांगली आज दोन तीन दिवस पर्जन्य चांगला जाहला याजमुळे कृष्णाबाईस पाणी पूर आला आहे श्री मारुतीचे देवळानजीक पाणी गेले आहे.

श्री. रा. धुंडीराव तात्यासाहेब यांस अकरावे वर्ष लागले सबब वाढदिवस जाहला सांप्रदायाप्रमाणे अभ्यंग वगैरे जाहले.

अस्तमानी तात्यासाहेब इचलकरंजीकर यांस बागेतून फिरवून आणुन नंतर बाजीराव साहेब पुणे सोडून बाहेर निघाल्यावर एल्फीस्टन साहेबांची आलेली पत्रे व त्यांस खाशानी पाठविलेली उत्तरे वाचून दाखविली.

२३ जूलै १८४८ : वे. शा. सं. दिवाकर दिक्षीत यांचे वंशज हे सांगलीस आले होते त्यांस संभावना दहा रुपये व पाच रुपयाचा धोतरजोडा देऊन निरोप दिला.

२५ जूलै १८४८ : बेळगावाहून इनइरारेटी साहेब यांचा निरोप आला आहे की,

सांगलीस सरकारात छापखाना आहे त्यातील कामगार माणसे पाठवून द्यावी छापखान्याचे काम चालू करावयाचा बेत आहे म्हणोन. त्याजवरून माणसे आहेत त्यापैकी एखाद दुसरे माणुस पाठवून द्यावयाची योजना झाली आहे.

दिनकरराव गायकवाड सरखवास निसबत करवीरवासी महाराज यांस इंग्रजी सरकारातून सन खमस अरबैन साली बडाई करविरास जाहली त्या समई कैद करून अशेरच्या किल्ल्यात ठेवीले होते त्यांचा काळ जाहला म्हणोन समजले आज चौदा पंधरा दिवस झाले.

२६ जूलै १८४८ : तिसरे प्रहरी ह. भ. प. सिताराम बावा गोसावी नाशिककर यांचे किर्तन गणपती महाराजांचे देवळात झाले.

खासा स्वारी देवीचे दर्शनास गेली तेथे यात्रेहून आलेल्या म्हैसुरच्या लोकांची गाठ पडली त्यांस म्हैसुरास कुंभार राज्याचा वतांत विचारला व इंग्रज सरकारानी पट्टण हल्ला करून घेतले ते कधी याची माहिती पुसली त्याणी सांगितले जे शके १७२० कालयुक्ताक्षी नाम संवत्सरे चैत्र वद्य ३० मंदवारी घेतले. त्या गृहस्थास ठेवून घेतले आहे.

२९ जूलै १८४८ : रात्रौ सखाराम बावांचे गाणे जाहले.

३० जूलै १८४८ : अलिबक्ष हत्तीस मस्ती आली आहे सबब त्यास सोडून मैदानातले ठाण्यात बांधून ठेवीला आहे.

३ ऑगस्ट १८४८ : राव रंभा निंबाळकर यांचे कलवंतीणीचे चिरंजीव रुस्तुम दौला याजकडून पत्र घेऊन माणूस हैद्राबादेहून आला आहे त्यात बसावयास घोडा चांगला पाठवुन द्यावा म्हणोन लिहीले आहे. त्या प्रमाणे पाठवयाचा बेत झाला आहे.

४ ऑगस्ट १८४८ : नागपचमी आज ऋग्वेदी आश्वलायन व यजूर्वेदी ब्राह्मण या सर्वांची श्रावणी झाली. कारण पौर्णिमेस श्रावण नक्षत्र आहे. त्या दिवशी व्हावयाची परंतु त्या दिवशी सिंह संक्रमण सबब व्हावयाची नाही म्हणुन आज झाल्या.

गावांतील बाईका व सरकारी काठीच्या कुर्णाबिणी वगैरे यांस श्री. सौ. मा. बाईसाहेब यानी बोलावून नागपंचमीचे गाणे व नाचणे श्रीचे वाड्यात पुढील चौकांत करविले.

६ ऑगस्ट १८४८ : श्री. कै. मा. अनुबाई घोरपडे इचलकरंजीकर ही पूर्वी श्री. कै. सदाशिवराव भाऊसाहेब पेशवे यांचा तोतया झाला तो खरा म्हणोन त्याची खात्री झाली होती त्याजवरून कै. नाना फडणीस व श्री कै. पांडुरंगराव तात्यासाहेब याणी पत्रे त्यांस लिहीली त्यात सदरहू विसीची आपली खात्री होऊन आपले चिरंजीव व्यंकटराव घोरपडे हे त्यास सामील जाहले ही गोष्ट श्री. पंतप्रधानसाहेब यांस समजली या नंतर आपले वृद्धापकाळी अनुचित सबब आपण आता श्री. महायात्रेस जावे म्हणोन वगैरे मजकूराचे लिहीलीली, त्याचा नकला इचलकरंजीहून श्री. रा. केशवराव तात्यासाहेब यानी पाठविल्या त्या आल्या आहेत.

७ ऑगस्ट १८४८ : वाड्यातील कुणबिणी वगैरे यास आणवुन श्रीचे मंडपात नागपंचमीचे गाणे म्हणवीले व फुगडी वगैरे नाचविल्या सदरहू प्रमाणे रात्रीस कुणबिणी व गौळणिही नाचविल्या त्यास पांच रु. दिले.

स्वारी हरीपूरास गेली ते समई वाटेत सांगलीतील करंढोल वाजविणार भेटले त्यांस कसे वाजविता ते वाजवून दाखविणे म्हणोन सांगितले त्याजवरून ते येऊन श्रीचे मंडपात अस्तमानी वाजवुन दाखविले.

८ ऑगस्ट १८४८ : परवाचे दिवशी रामचंद्र अनंत खाडिलकर हरीपुरकर यांचे मेव्हणे विसोबा रानडे सांगलीत असतात त्यांचा मुलगा वर्षाचा सुमार होता तो अंथरुणांत निजला होता तो कोणास न कळता दुसऱ्याने वळकटी करून ठेवीली त्या योगे तो मुल आत मेला. वाईट गोष्ट झाली.

९ ऑगस्ट १८४८ सांगलीस शुक्रवार पेठेत दत्तात्रय महाराजाचे देवालय आहे त्या देवालयात विश्वनाथ भट देवधर ब्राह्मण कुटूंब सुद्धा दोन तीन वर्षे मृत्तिकेची लिंगे दररोज सहस्त्र करून अस्तमानी पुजा वगैरे करून माधोकरी आणून भोजन करावे असे करीत आहे त्याची बायको प्रसुत व्हावयास जाहली आहे सबब ब्राह्मण अडचणीत पडला आहे कोणाचे घरी राहावे खर्चास नाही म्हणोन चिंतेत होता तो गेल्या शनीवारी त्यांस दृष्टांत जाहला की कोणी एका मनुष्याने स्वप्नात येऊन पाटी-भर माती काळी आणुन दिली आणी सांगितले जे तुला खर्चास नाही त्याला सिताराम बावा नाशिककर गोसावी हे येथे आले आहेत याजकडे जाणे म्हणजे ते तुम्हांस सव्वाशे रुपये देतील ते घेऊन निरवाह करावा म्हणोन. दुसरे दिवशी याणे विचार केला ! दृष्टांत तर असा झाला नाशिककर बावा हे देशावरास नुकतेच सांगलीस आले त्यासच खर्चाची अडचण हे आम्हांस वगैरे सर्वास माहीत असे असुन त्याजकडे कसा जाऊ म्हणोन बोलून उगीच बसला तो पुन्हा दुसरे दिवशी दृष्टांत तसाच श्री चा जाहला नंतर देवधर याणी शिवराम नाईक आपटे म्हणोन बाजारात सराफी करून असतात त्याजबरोबर बावाकडे सांगुन पाठविले की मला तो दोन वेळ दृष्टांत जाहला आहे काय असेल ते पाहावे म्हणोन. जे दिवशी देवधर यांस दृष्टांत जाहला तेच दिवशी बावासही दृष्टांत जाहला की विश्वनाथ भटजीस खर्चास नाही तर सव्वाशे रुपये त्यास द्यावे तो मजकूर बावानी आपटे याजजवळ सांगीतला मोठेच आश्चर्य मानून बावास सांगलीत पाच पन्नास रुपये मिळाले होते तीतके दिले बाकी आणखी देतो म्हणोन करार केला आहे. याप्रमाणे चमत्कार झाला.

१२ ऑगस्ट १८४८ : इग्रजी सरकारातुन तरवार आलेली तीचे पडदळे व येथुन सोन्याचे साखळीचे पडदळे नवे केले ते, असे दोन्ही पाहण्यास मेहरबा ग्रामसाहेब याजकडे करविरास कृष्णा मोरे हुजरे याजबरोबर पाठविली आहेत.

२० ऑगस्ट १८४८ : मिरजकर शिंपी याणे मांजरपाटी चार गज हमचौक तंबु एकखांबी शिवुन त्यावर वेलाची नक्षी झालरीत वगैरे वेल करून तात्यासाहेब

याज करीता आणीला तो उभा करून पाहीला.

२१ ऑगस्ट १८४८ : कीर्तन श्रीचे देवालयात गणेश वाडीकर गोसावी याचे झाले. ह्. भ. प. निरंजन बाबा मिरजेस असतात ते उत्सवास हरीपूरास आले आहेत त्यांचे दर्शन खाशानी घेतले.

२४ ऑगस्ट १८४८ : अवशीचे सहा घटका रात्री करविराहून पत्र आले त्यात श्री. रा. महाराज छत्रपती आबासाहेब महाराज यांचे वडिल चिरंजीव यास काल श्रावण वद्य १० बुधवारी १० घटका रात्री आवशिस पुत्र जाहला म्हणोन आले आज दुसरा दिवस त्याजवरून त्याच वेळेस किल्ल्यातील व श्री गणपती महाराज यांचा नगारखाना सुरू करविला चार घटका सुमार सुरू होता व तोफेचे बार दाखल्या प्रमाणे काढवीले व साखर वाटली इश्वराने फार गोष्ट चांगली केली खाशास तर संतोष कारक जाहले कारण शिवाजी महाराज या महारांजाचे आजे होत त्याणी खाशास चिरंजीव असे म्हटले होते त्या दिवसापासुन लोभ इकडे फार तो लोभ स्मरून संतोष तर फारच जाहला.

२६ ऑगस्ट १८४८ : कुरुंदवाडाहून रामाजी पंत हे विष्णुचे वगैरे सोन्याचे किरीट दाखविण्या करीता घेऊन आले आहेत

२७ ऑगस्ट १८४८ : विष्णुचा किरीट कुंडल सहीत व लक्ष्मीचा कुंडल सहित व गणपतिचा किरीट त्याजवर शिरपेच मयुराचा जडावाचा केलेला असा रामाजी पंतानी दाखविला तऱ्हा कर्नाटकी आहे विष्णुची किरीट कुंडले आहेत ती हत्तीच्या तोंडाची आहेत.

तिगस्ता स्वारी धारवाडास गेली त्या समयी चंदनीपेटचा करणारे सुतार आले होते त्यास सांगलीस येणेविसी सांगीतले होते ते आले आहेत. त्यानी चंदनाची खिळीचे व्यासपीठ बारीक काम खोदीव वर गणपती व एकीकडे मूर्ती दुसरी अशी करून ती व फुलाचे तबक ठेवावयाची तिवई लहान अशि करून आणून दिली त्यास ते आहेत तवपर्यंत सहा असामीचा शिधा देवविला.

२९ ऑगस्ट १८४८ : मु. सांगली गणपती महाराज संस्थान कसबे सांगली यांचे उत्साहास प्रारंभ जाहला.

आज तिसरे प्रहरी चार पाच घटका पर्जन्य पुर्वा नक्षत्राचा चांगला जाहला रात्रौ कीर्तन ह-भ-प आण्णाजी बाबा मंगळवेढेकर यांचे झाले.

३० ऑगस्ट १८४८ : मिरज मळ्यातील गणपती उत्साहास खासा स्वारी व भाऊसाहेब तोफा दोन लहान जंबुरे व कवाईती बरोबर नेल्या होत्या मिरज करांस सांगलीस उत्सावास येणेविषयी सांगीतले नवी ढाल खरेदी करून रोगण व फुल्या नव्या करवील्या ती ढाल दाखविली नंतर सांगलीस चार घटका दिवसास स्वारी परत आली.

सांप्रदाया प्रमाणे प्रातःकाळी गाणे ब्राह्मण भोजन तिसरे प्रहरी नाच छबीना जाऊन आला.

काशिनाथ बावा भिडे वाईकर यांचे कीर्तन झाले.

रा. बाबाजी रावजी तोरगलकर हे उछाहास आज करविराहून आले. त्याणी सांगितले की पुत्रोछाहा बद्दल सांगलीस तोफा उडवून संतोष व्यक्त केल्याचे वर्तमान कळून महाराज व राणी साहेबास फार संतोष झाला कारण की आम्हां लोकांस हे दिवस प्राप्त झाले याचा उत्सव करणारे सरदार दुसरे कोणी नाहित म्हणोन बोलणी फार प्रकारे जाली.

गणपती महाराजांच्या मृत्तिकेच्या मुर्ति छापीव करून रंगवुन दोनशे-तीनशेपर्यंत पदरच्या मंडळीस व अन्यत्र ठिकाणी इस्ट मंडळीस पाठविल्या.

३१ ऑगस्ट १८४८ : बापु दिक्षीत चिदंबर दिक्षीत मुरगुडकर यांचे चिरंजीव आहेत त्याचकडे शिधा वगैरे पाठविला.

श्री गणपती महाराजास चोपदाराची काठी रूप्याची खवलेदार नवी करून त्याजवर सोन्याचा मुलामा दिला आहे ती काठी उदईक चतुर्थीस देवाकडे द्यावयाची श्रीस सोन्याचा किरीट नवा करून त्याजवर हिरे जडाव केला तो किरीट काल सकाळी आठ घटका दिवसास मुहूर्ते श्रीचे मस्तकी घातला.

तिसरे प्रहरी छबिन्यानंतर स्वारी माघारी आली कवाईती लोकांची तयारी व दरेस चांगला आहे किंवा नाही ही खाशानी पाहणी केली रात्री किर्तन आण्णाजी बाबा मगवेढेकराचे झाले.

गोदूनाना सातान्याहून आले त्यांचे सांगण्यात महाराजांचा अंतकाल झाला त्याचे पूर्वी पाच-सहा दिवस दौलतीची व्यवस्था आपले रूबरू करून त्याच्या यादी करून सखारामपत अण्णा फडणीस यावर पूर्ण विश्वास त्यास समजून दिल्या आणि राण्यांस जवळ बोलावून सांगितले जे हा मुलगा दत्त घेतला आहे.हा तुम्हास अधिकारी व कारभारी वाकबगार फडणीस यांचे विचारे दौलत चालवावी नंतर अंतकाळ झाला. हल्ली दत्त आहेत ते धनी रेसिडंट साहेब येऊन कचेरीत बसतात दत्त मुलास विलायतेहून वस्त्रे लौकरच येतील. पूर्वी जमखिडीस रावसाहेब याजवळ सरस्वती म्हणून होती ती महाराजाजवळ होती पुढे तिजवर इतराजी होऊन दुसरे गावी राहीली होती तिला महाराजांनी विषय दोन लक्षांचा दिला तो विषय घेऊन तू पाहिजे तिकडे जा असे तिला सांगताच ती म्हणाली मी दुसरीकडे राहणार नाही आता सर्व विषय सरकारचाच आहे मला शेर नेमुन द्यावा मी राणीसाहेबांची चाकरी करून राहीन हे अैकुन साहेबांना आश्चर्य वाटले व म्हणाले नेक आहे काळजी न करीता स्वस्त राहावे म्हणुन आश्वासन दिले थोरले महाराज काशिस गेल्या तागाईत त्यांचे ममतेचे गृहस्थ सातान्यास होते त्यांची वर्दी रोजचे रोज डाकेतून त्याजकडे काशिस जाई हल्लीही विलायतेमध्ये त्या मनुष्याचा पेगाम आहे

की हा मुलगा खरा न व्हावा त्या महाराजांनी काशिस बाळासाहेब सेनापत्तीचा मुलगा आपला म्हणवीला तो गादीवर कायम करावा हे वर्तमान साहेब यासही समजले साहेबांनी त्या मनुष्यास आणुन विचारले त्यानेही कबुल केले

रा. बाळाजी पंत नातु पुण्यास गेले आहेत माझी त्यांची गाठ पडली नाही असेही भिलवडीकर म्हणाले

१ सप्टेंबर १८४८ : स्वारी श्री चे देवालयात येऊन स्नान करून श्री गणपती महाराजांची पुजा करून नैवेद्य समर्पण करून ब्राह्मणांचे भोजनाचे उदक सोडून स्वारी हरीपुरास गेली लागु व जोशी व खाडिलकर व करमरकर व गणेश शास्त्री यांचे घरी जाऊन श्री गणपती महाराज पार्थिव याची दर्शने घेऊन दक्षणा नारळ ठेऊन स्वारी परत श्री गणपती हरीपूर बागेतील नजीक श्री कृष्णाबाईस स्नान करून पुजा करून नंतर स्वहस्ते दुर्वा काढून स्वारी बागेतील श्री चे देवालयात येऊन श्री ची पुजा करून तोफेचे बार पाच झाले नंतर स्वारी निघाली ती सांगलीस पद्माकर पंत खाडिलकर व फडणीस व अमृतरावजी व बापु शहापूरकर व राघाप्पा नाईक धारवाडकर व उपाध्ये व पुराणीक बाबा यांचे घरी जाऊन श्रीचे दर्शन घेऊन दक्षिणा ठेऊन स्वारी श्रीचे वाड्यात आली वाड्यातील गणपतीचे दर्शन घेऊन दक्षणा नारळ ठेऊन श्री चे देवळात येऊन दर्शन घेऊन वे. मु. रा. गोपीनाथ दादा यांचे घरी जाऊन श्रीचे दर्शन घेऊन स्वारी किल्ल्यात अस्तमानी गेली नंतर स्नान संध्या होऊन गोप्रदान दिले श्री गणपती महाराज पार्थिव याची पुजा शोडषोपचार आगमोक्त केली श्रीस कमळाचे व शमी व दुर्वा सहस्त्र नामे वाहिली दोन प्रहरी किल्ल्यात ब्राह्मण भोजन जाहले ब्राह्मण सुमारे १६०० (सोलासे) जाहले रात्रौ जागर व्हावयाचा सबब ब्राह्मणास नेमणुकीप्रमाणे आमंत्रण करून किल्ल्यात रात्रौ फराळाचा बेत होऊन फराळ झाले ब्राह्मणाचे पाय तात्यासाहेब व भाऊसाहेब यानी धुतले फराळ जाहले नंतर ब्राह्मणांस विडे अत्तर गुलाब हार तुरे दिले नंतर ब्राह्मणांनी वेदास आरंभ केला उगाडेतोपर्यंत ऋग्वेदी व आपस्तंभ याणी म्हटले

स्वारी सहस्त्रनामे वाहिल्यानंतर श्रीचे तिर्थ घेऊन गणेश पुराण श्रवण करून वेदघोषश्रवणांस येऊन बसणे जाहले तेथे शास्त्री मंडळी याणी काहि चर्चा केली ती हि श्रवणात आली या प्रमाणे चारी प्रहर खाशांनी जागरण केले नंतर अरुणोदयाचे सुमारे स्वारी श्रीचे देवळात स्नानास आली गणपती महाराज संस्थान सांगली यांचे संबंधे प्रातःकाळी पुजा व गाणे दोन प्रहरी ब्राह्मण भोजन तिसरे प्रहरी नाच होऊन छबीना सांप्रदयाप्रमाणे जाऊन अस्तमानी आला रात्रौ एकवीस ब्राह्मण जागराचे त्यास आमंत्रण करून उपहाराचा बेत श्रीचे वाड्यात होऊन जागरण जाहले.

भाऊ भट केळकर हे उच्छाहास आले आहेत.

स्वारी फडणीसांचे घरी गेली ते समई कै. आबा फडणीस याणी बाळगलेले

वासुदेव पंत पेडसे यांची कन्या काशी ही तात्यासाहेबास पत्नी करावी असे खाशाचे मानस मुलगी सुरूप आहे असे मागेच ठरले आहे ती मुलगी खाशानी मेण्यात घेऊन जेथे स्वारी श्री.चे दर्शनास गेली तेथे तिजकडून श्रीस दक्षणा एक रुपया नारळ ठेववीला.

कुंटे यांचे घरी बापु दिक्षीत मुरगोडकर आले आहेत त्यांचे दर्शन खाशानी घेऊन प्रसाद घेतला.

वाड्यात कमळाची सहस्र नामे वाहिली ती रा. गोपाळ बापुजी शिराळकर याजकडून व बाजी गुंडो शिराळकर याजकडून बत्तिसशिराळयाहून आणविली

सवाल महिन्याची पहिली तारीख कालची त्या विशीचा निमाज मुसलमान लोक इद म्हणोन पढत असतात त्यास इमामाची निशाणे तासे सर्फेवाले यांस परवानगी होऊन गेले

मुंबईकर सौदागर मुसलमान शेख इमामुद्दीन याजकडून पारसी किताब सुमार एकतीस किंमत रु. १०० गाडी व सुरती देऊन खरेदी घेतल्या

२ सप्टेंबर १८४८ : वाड्यात ब्राह्मण भोजन झाले ३१०० पात्र झाले

श्री चे देवळात लळीत जाहले. सांप्रदायाप्रमाणे पाऊलपुजा वगैरे सर्व झाले मानकरी येवलेकर गोसावी यांचे चिरंजीव मोरोबा गोसावी यास मानाची सनगे दिली

४ सप्टेंबर १८४८ : करवीरकर महाराजांना पुत्र जाहला त्याची साखर घेऊन रावजी पारसनिसांचे चिरंजीव रामचंद्रराव पारसनीस प्रभु हे घेऊन आले इकडूनही साखर वाटून नगारखाना वाजविला व तोफेचे बार करविले

प्रहर रात्रीचे सुमारे किल्ल्यात लळीत झाले सर्वत्र मंडळीस बोलावणे दिवटचा वगैरे जाऊन मंडळी आली लळीताची सोंगे महादु शेणवी याजकडून आणविली.

५ सप्टेंबर १८४८ : बापू दिक्षीत चिदंबर दिक्षीत मुरगुडकर हे येथे आले त्यास आज निरोप दिला संभावना रोख पन्नास रुपये व धोतरजोडा दहा रुपयाचा दिला ते ब्रह्मावर्तास श्रीमंतांकडे गेले होते. श्रीमंतांनी सत्कार एकंदर १५००० रु. दिले म्हणोन वगैरा मजकूर सांगत होते.

करंढोल वाजवणारे रबकवीचे साठ असामी उच्छाहास बोलाविले होते त्यास शिधा देविला

राव निंबाळकर सरलष्कर यांचा चित्ता – वाघ दोमालीस असतो (दानोलीस ?) त्याणे मालगावचे रानात काळवीट मारला तो घेऊन दरवेशी आले होते

काल दिवसास किल्ल्यात नाच होत होता त्यात रमा तेरदळकर नाईकीण ही नाचत होती तिचे गळ्यातील पेटचा हिऱ्याच्या गमावल्या सापडल्या नाहीत

चार घटका दीवसास उत्तर पुजा होऊन स्वारी निघाली श्री ची स्वारी किल्ल्याचे मैदानातुन घटका रात्रीचे सुमारे देवालयाजवळ आली श्रीची स्वारी

कृष्णाबाईंच्या लक्ष्मी घाटावर जाऊन नावेत बंगला लाकडी करवीला आहे त्यातून वाजत गाजत अर्धे नदीत नेऊन पार्थिव मूर्ती टाकली

काल आज एकंदर माणुस परगावचे वगैरे मिळोन वीसहजार सुमार उत्साहास जमले होते समारंभ सर्वोत्कृष्ट झाला असा पाहण्यास यावयाचा नाही

श्री कडिल आयन्याची आंबारी मर्दाना हत्तीवर लादली होती ती रात्री उतरताना खाली पडून काही आयने फुटले

६ सप्टेंबर १८४८ मिरजेस कवाईती लोक नवे पोरे दहा बारा वर्षांची नवी ठेवली आहेत ती पाहण्यास त्यांनी काल सांगलीस पाठविली होती ती काल श्रीचे स्वारी बरोबर होती.

७ सप्टेंबर १८४८ : करंढोल वाजविणारे रबकविच्या लोकांकडून करंढोल बाजवुन घेऊन खाशानी त्यास पन्नास रुपयांचा तोडा बक्षीस देऊन निरोप दिला.

रात्री संतासानी तेरदळकर इच्या लेकी व फकीरी तेरदळकर इचे गाणे श्री पुढे झाले.

इचलकरंजीहून सरकारात पत्र आले त्यातील हशील "मे. ग्रामसाहेब बहाद्दूर यांचे पत्र आले त्यात इचलकरंजीकर व करवीरकर महाराज यांचे वाकडे पहिले पासुन पडण्याचे कारण काय ? व लढाया वगैरे कशा झाल्या ? व पेशजो पेशवे सरकारातुन कुमक वगैरे झाली त्याचा वाका लिहून द्यावा म्हणोन

८ सप्टेंबर १८४८ : आज पदरचे शिलेदार बारगीर कवाईती हशम व दिमतीतील हशम वगैरे मराठे व मुसलमान वगैरे मंडळीस जेवण घातले पात्र दोन हजार झाले.

रबकवीकर–रणमल्ले खेळ करणार आणविले होते त्यांचा खेळ किल्ल्यात करवीला. ९ सवाल.

८ सप्टेंबर १८४८ : भाद्रपद शुद्ध १० सदाशिव भट फडके हे मौजे बुधगांवास आपले मळयास गेले होते ते येते समई वाटेत आडवा नाग येऊन फणी काढून उभा राहीला. तेव्हा त्यानी धोतर वर टाकून त्यास धरून आणीला तो सरकारात दाखवायास आणीला होता बराच लांब अडीच हात सुमार व मोठाही बराच होता त्यास चार पैसे दक्षणा देऊन व शिधा देऊन रानांत सोडवुन देववीला

रामचंद्र रघुनाथ वाडेगणकर रमाबाई घाटगे कागलकर याकडून आले आहेत खाशास भेटले.

राघोपंत गोखले निसबत करविरकर महाराज आष्टे पेटयास मामलेदाराचे हाताखाली असतात ते पूर्वी पासुन कै. नाना फडणीस या जवळ होते वाक्वगार व वृद्ध आहेत त्यांचा परीचय ही खाशाचा आहे त्यास दोन तीन पत्रे येणे विशी पाठविल्यावरून ते आज आले आहेत.

खासा स्वारी तीसरे प्रहरी मिर्झा शेर बेक बारगीर सरकारचा त्याजवर लोभ

कारण श्री. सवाई माधवरावापाशी या सांडणीस्वाराचा बाप होता त्याचा हा लेक त्याणे ती कारकीर्द पाहिली त्याची प्रकृती बिघडून कंबर अगदी केली वृद्धापकाळही जाहल सबब त्याचे ठिकाणी जाऊन त्याचा समाचार घेऊन येणे जाहले.

नंतर नव्या बंगल्यात सखाराम बावा गवई यांचे गाणे झाले रात्रौ श्री तात्यासाहेब यांचे चौकांत रवकवीकर रणमल्ले यांचा खेळ जाहला बापु नारायण तोरगलकर याचे येथे कोल्हापुरचा गवई नाना म्हणोन आला आहे त्याचे गाणे घटकाभर खाशा जवळ होऊन रणमल्ले यांचा खेळ श्रीचे पुढे मंडपात दहा घटका रात्र पर्यंत झाला खासे व बहुत मंडळी होती.

११ सप्टेंबर १८४५ : राघोपंत गोखले याजकडून कांही माहीती श्री. सवाई माधवराव साहेब वारले तेथुन बाजीराव साहेब गादीवर येईपर्यंत हकीकत लिहून घेतली गोखले उद्या आष्टयास जातील.

१२ सप्टेंबर १८४८ : किल्ल्याचे खंदकात माती उकरत होते तेथे बुरुजाखाली मातीत एक बाण काल संध्याकाळी सापडला शुभ्रवर्ण आहे लांब लिंबा येव्हढा चांगला आहे काल सोमवारचा दिवस म्हणोन त्याची पुजा वगैरे करविली शुभदायक आहे.

दादा भिडे पुणेकर हे रामाजी नाईक भिडे यांचे वडिल पहिले ते हल्ली पंढरीस असतात ते काशी यात्रेस गेले होते तिरस्थळी करून ग्वालेरीस आले त्यांचे बंधु चीमणाजी नाईक हे तेथे आहेत त्यांची भेट झाली नंतर ते पुण्यास आले पुण्याहून पंढरीस भाद्रपद श. २ आले दादांचे वडिल कै. आंतोबा नाईक भिडे यास मौजे राहाटणी नजीक पुणे तीन कोस हा गाव बाराशे रुपयाच्या आकाराचा इनाम आहे तो अलिकडे पांच सहा वर्ष जप्त होता त्या विशी विलायतेस लिहून गेले होते त्याचे उत्तर अंतोबा नाईक याचे चिरंजीव चिमणाजी नाईक याचे पुस्त–दरपुस्त चालवावा येविसी पुणे कलकटरास हुकूम आला तो तो हुकूम दादा कडे पाठविला हल्ली दादा पंढरीस येऊन पत्र पाहीले त्यात अंतोबा नाईक याचे आम्ही तिघे वडील मी दुसरे चितामण नाईक वारले त्याचे चिरंजीव आहेत तीसरे चिमणाजी नाईक, असे असता चिमणाजी नाईक याचेच नाव लागुन मोकळीकेचा हुकूम आला आहे त्यास येथुन थैली त्रिवर्गाचे नांवे लाऊन जावी म्हणजे मोकळीकेची सनद त्रिवर्गांचे नांवची येईल म्हणोन थैलीच्या नकला वगैरे असे आले आहे व रामाजी नाईकासही पत्र श्री चे मावंदे करण्याची योजना आहे तुम्ही यावे म्हणोन आले आहेत.

तिसरे प्रहरी स्वारी मंडळीसहीत बंदुखा घेऊन नावेत बसुन श्री कृष्णाबाईत वर पदमाळच्याकडे थोडीशी लांब नाव घेऊन, हवा घेऊन आली.

१४ सप्टेंबर १८४८ : सखाराम बाबा गवई परांजपे मिरज हे म्हैसुरास जाणे करीता निरोप घेतला निरोप समई पन्नास रुपये दिले.

१५ सप्टेंबर १८४८ : खासा स्वारी नांदऱ्यास गेली होती तेथे रघु छेऱ्या खिजमतगार निसबत सरकार हा मौजे शिरगाव येथे आपले घरी होता तो आला होता त्याणी विनंती केली जे सारे इलाख्यात शिराळे तालुक्यातील एका गावचे पाटीलकीचे वतन माझे परंतु दुसरे भाऊबंद हे खटला करून वतन चालवित नव्हते सबब छत्रपती अप्पासाहेब महाराज हे सालगुदस्ता पेटे पाहण्यांस गेले होते ते समई मी आर्जी दिली परंतु चौकशी होऊन माझे वतन माझे हवाली झाले नाही तसाच स्वारीत बरोबर होतो एक दिवशी × × गाव येथे छत्रपतींच्या स्वारीचा मुक्काम होता तेथे खाशा घोडयापैकी घोडा मोतददाराचे हातातुन सुटला त्याणे दंगा करून दुसरे घोडयावर व माणसावर पडून जाया केली घोडा सापडेना तेव्हा महाराज बोलले जे घोडा धरील त्यास बक्षीस देऊ ते मी ऐकीले मी एका झाडा खाली घोडयाची मौज पाहात बसलो होतो त्या सुमारास घोडा अकस्मात येऊन माणसावर पडू लागला इतक्यात मी आपले अंगावरील घोंगडे घोडयाचे तोंडावर टाकुन डोळे झाकीले आणि धरला आणी आपले पायाचे स्मरण करून त्यावर बसुन महाराजाजवळ गेलो. महाराज संतोष होऊन मला पुसले की तु कोठील तेंव्हा मी विनंती केली जे मी अप्पासाहेबांचे पदरीचा खिजमतगार माझे वडिलाने अप्पासाहेब यांचे वडिल तात्यासाहेब यांची सेवा चाकरी पट्टणात कैदेत असताना फार केली त्याचे आज्ञेवरून मला अप्पासाहेबानी इनाम दिले आहे हल्ली मी पाटीलकीचे खटल्यामुळे येथे आलो आहे तेव्हा शहाजी महाराजानी तेच बैठकेस मला सनद पत्र करून देऊन माझे वतन माझे हवाली करून दिले सर्व प्रताप या पायांचा असे म्हणोन विनंती केली.

१७ सप्टेंबर १८४८ : आनंदराव माने बारगीर हे पुण्यास जिन्नस खरेदी करीता गेले होते ते आज आले त्यानी जिन्नस आणीला त्यात हौसन साहेब याणी सोरटी गाय तीची पाडी दिली ती व कबुतराचा जोडा एक ससे पांढरी जोडी एक बीलोरी सामान व सोन्याचे वर्ख करणार कारागीर असे आणीले आहे.

१९ सप्टेंबर १८४८ : हजरत फैज अलीशा गुजारती साहेब कनवडकर याजवळ सिलेमानी मणका होता तो थोर होता तो पाहण्यास म्हणोन आणविला तो घेऊन तो फकीर आला.

२१ सप्टेंबर १८४८ : काल पाऊस पडून स्वानंद भुवन तळचास दोन हात उंचीचे पाणी आले व गणेश तळचास पाणी दीड हात उंचीचे आले.

२२ सप्टेंबर १८४८ : रबकवीकर रणमल्लीस खास पोशाख पैकी दुपट्टा दिल्ला निरोप दिला.

शिवराम भट लाटकर हे पहिले स्वामीचे पदरी होते त्याजवर स्वामीचे संस्थानांत कांही गैर केल्या प्रकरणी ठपका मोठा येऊन धारवाडात कैदेत होते त्याजकडून दंड घेऊन ठेप सरल्यावर त्याजकडून जामीन घेऊन मोकळे केले ते पुन्हा सांगलीस

आले आहेत त्याजकडे चंदी वैरण दिली खाशास आजच येऊन भेटून गेले.

२३ सप्टेंबर १८४८ : आज एकादशी (भाद्रपद वद्य ११ मंदवार) सबब काशिनाथपंत भिडे वाईकर यांचे किर्तन श्रीचे देवालयात मंडपात जाहले.

२४ सप्टेंबर १८४८ : फकिरा नाईकीण तेरदळकर ही उछाहास आली होती तीला सर्वत्र दैव रवकविकर यानी चाकरी दाखल रवकविस ठेवीली आहे सबब दैवातील मुखत्यार पराप्पा उमदी याचा आग्रह पडला जे हीला बहूमान सरकारातुन शाल जोडी द्यावी यामुळे व ती गातीही बरी सबब शालजोडी देऊन निरोप दिला.

कृष्णाजी सुतार चंदनाचे काम कोरीव करणार कर्नाटकातुन येथे आणविला होता त्यास निरोप दिला त्यास चंदनाचा देव्हारा करून आणावयास सरकारी पितळेचा देव्हारा मेघडबरी आहे त्याचा मासला दिला व त्याच मासल्याप्रमाणे दुसरा मासला त्याचे दिढी असा करावयास दिला.

ऐकीव वर्तमान कागवाडकर श्रीमंत त्रिंबकराव अप्पासाहेब यांचे इलाख्यातील एका गावांत रानांत कुंपाचे कडेस एक मुलगा लहान अदमासे दिड महीन्याचे पडला होते त्यास नाग मोठा जवळ येऊन त्यास वेटाळून फणीने गोंजारीत होता ते वाटेने जाता एका महाराचे दृष्टीस पडले त्या महाराने नागाचे पाया पडून प्रार्थना केली 'महाराज हा जीव इश्वराचा आहे यास सोडावे जीवदान द्यावे' असे म्हणताच एक घटका भराने त्यास सोडून नाग निघोन गेला नंतर ते मुल महाराने आपले घरी आणुक एक दोन दिवस ठेवले हे वर्तमान कागवाडकरांस समजल्यावर त्यानी मुलास व महारास आणुन चौकशी केली तो सर्व वर्तमान खरे ते मुल आपले जवळ आणुन पाहुन त्यास शुद्राची दाई ठेऊन तीचे हवाली केले म्हणोन.

२५ सप्टेंबर १८४८ : आज श्री. कै. सौ. मा. यशवदाबाई माई खाशांची तीसरी पत्नी यांचे सावंत्सरीक श्राद्ध वद्य १४ चे आज तात्यासाहेबानी केले.

काशिनाथ बाबा भिडे वाईकर कथेकरी यांस पंगतीस अस्तमानी बोलावुन श्लोक दोहरे वगैरे ऐकुन कांही लिहूनही घेतले.

संगाप्पा मेलीकट्टी याचा भाऊ व गुमास्ते येथे आहेत ते आज आपले दुकानापुढे रणमल्लीचा खेळ करणार त्या वेळी रात्री दंगा होईल सबब सरकातुन बंदोबस्ताकरीता पहारा मागीतला तो दिला.

२६ सप्टेंबर १८४८ : कागवाडकराना प्रश्न पडला आहे महाराला सापडलेले मुल कोणाचे त्याचा पत्ता लागत नाही पण ते महाराचे दुध प्याले तेव्हा कसे करावे.

२७ सप्टेंबर १८४८ : आज कारभाऱ्यानी हशमांची हजेरी घेतली व कवाईतींची हजेरी तात्यासांहेबांनी घेतली तात्यासाहेब यांची खेळणी आज सबब विटी दांडू वगैरे खेळ खाशानी पाहिले.

२८ सप्टेंबर १८४८ : वडगावकर बाबा हे पंगतीस भोजनास होते त्यांस धोतरजोडा व शेला व रुमाल व बरोबरचे मंडळीस रोख रु. अकरा दाखल्या प्रमाणे दिले

आज राहिले आहेत निरोप घेऊन उदईक जातील.

श्री. सत्यनारायण स्वामी जगतगरुमठ नरसीपुर तालुके म्हैसुर याजकडून द्वार पाल पालक भिमाचार्य वगैरे आले आहेत.

श्री. सौ. मा. बाईसाहेब यांस ग्रह अनिष्ट आले आहेत सबब सोन्याचा नाग दोन तोळयाचा करून दान दिला त्याची पुजा खाशासहीत किल्ल्यात केली.

ऐकीव वर्तमान कोकण बंधारीचा कोणी एक सुतार श्री पंढरीस लोटांगण घालीत कऱ्हाडावरून जात होता तो कराडाजवळ श्री कृष्णेचे दक्षिण भागी आला तो तसाच पाण्यात लोटांगण घालीत चालला आजुबाजूने नावा चालत होत्या तेथील कमावीसदार वगैरे याणी नांवेत घालु लागले तो काही जाईना लोटांगण तसेच पाण्यावरून चालले जसे जमिनीवर जाते तसेच चालले तेथे गुढग्या इतके पाणी बाजुने झाले नांव चालत आहे. असा चमत्कार ऐकीला तो सुतार तसाच पंढरीस पुढे लोटांगण घालीत गेला.

श्री जगत् गुरु याचे पत्र आले त्यात चिंचणीचे पांडूरंगभट व हरभट व वामनभट जोशी यांचेकडून ब्रह्मकर्मात विरुद्ध झाले. सबब गाव गन्ना निग्रह पत्र बहिष्कृत केल्याची पाठविली आहेत आपण त्या प्रमाणे बंदोबस्त करावा म्हणोन लिहीले आहे

२९ सप्टेंबर १८४८ : मिराभाई वैद्य करविराहून आले आहेत याजकडे जेवणाचे पात्र व चंदी वैरण पाठविली

चिंचणीहून श्री कृष्णाची तसबिर कर्नाटकी तऱ्हेची मोठी आयना लावलेली पहावयास आली आहे.

१ आक्टोबर १८४८ : मेहरबा ग्रामसाहेब याचे पत्र करविराहून आले त्यात करविरकर छत्रपती व सातारेकर छत्रपती यांचा तहनामा श्री कृष्णेवर जाहला त्या अलीकडे लढाया वगैरे जाहल्या त्यात कोणी कोणी कशी कामे केली व लढाया कोणाच्या झाल्या त्या विशीची एकंदर हकीकात लिहावयाची आहे तर आपणांस माहीती असेल ती तपशिलवार लिहून द्यावी म्हणोन मजकूर आहे.

३ आक्टोबर १८४८ : दौलतीस कर्ज झाले खार्चाची निभावी झाली पाहीजे सबब सर्व लहान मोठे पदरच्यास कारभारी यानी सांगीतले जे साल मजकरी एक साली तैनात वगैरेची दिली पाहीजे म्हणोन सर्वत्रानी बरे आहे सरकारचे कामांस आम्हा कडून हरकत नाही म्हणून सांगीतले.

खंडोपंत करमकर हे करवीरास असतात ते येथे आले आहेत त्यास शाबरी मंत्राचा योग ठाऊक आहे त्यांनी खाशाजवळ खडीसाखर व पेढे बर्फी बुक्का वगैरे जिन्नस केला चमत्कार वाटला.

६ आक्टोबर १८४८ : त्र्यंवक विष्णु सहस्त्रबुद्धे पंतोजी यांचे घरी तात्यासाहेब सुद्धा स्वारी जाऊन साखर पाणी घेतले तात्यासाहेब यास सिलटी ढाल दिली बरी आहे.

७ आक्टोबर १८४८ : आज दसरा. आज मुहूर्ताने पागेपैकी चांदाचे औलादीची सिंगी व दुसरी अप्पा मंगळवेढेकर यानी दिलेली जर्द याजवर खाशांचे व तात्यासाहेबांचे बसणे जाहले.

रा. काशीनाथ गंगाधर कानिटकर छापखाने याणी श्री. भागवताची पुस्तके छापुन तयार केली मोठी मेहनत केली ती पुस्तके खाशाना चातुर्मासात सनसित अरबैन साली दिली सबब त्यास बक्षीस सोन्याचे कडे दोनशे रु. किमतीचे दिले व शेला पागोटे दिले.

रामाजी नाईक भिडे यांस तरवार नव्हती सबब खाशानी एक गुरदा दिला दसऱ्याबद्दल सनगे दिली. पुणेकर सोन्याचे वर्ख करणार आला आहे त्याणे दोन वर्ख व सोने दसऱ्याचे असे आणुन दिले.

८ आक्टोबर १८४८ : पंढरीचा एक मनुष्य त्याज बरोबर एक गाय आहे त्या गाईस स्तन अगदी नाहीत कास मात्र आहे ती गाय दोन वेळ व्याली तीसरे वासरे वर दुधाने जगली आहेत हल्ली तिसरे वेळ व्याली पाडी आहे वर दुध पाजणे बद्दल तीन रुपये दिले.

करवीरास जोशीराव याणी अलिकडे श्री गणपतीची स्थापना देवालय बांधुन केली आहे त्या गणपतीचा नकाशा सरकारात आला आहे.

१० आक्टोबर १९४८ : शिवगिरी गोसावी याणी सरकारात गौरी शंकर रुद्राक्ष आणून दिला तो रुद्राक्ष असा आहे की दोन रुद्राक्ष जसे आडवे जोडावे तसे अखंड आहे फार नामी दुर्मिळ वस्तु आहे.

१३ आक्टोबर १८४८ : ऐकीव वर्तमान तेरदळ किंवा जमखिंडी इलाख्यातील गांवात एक जैनाची मुलगी सहा वर्षांची आहे ती शरीराने फार मोठी सोळा वर्षाच्या मुली एवढी आहे रोज जेवण पायलीभर धान्याचे लागते आई बाप तरी गरीब आहेत तेव्हा कोणीतरी जेवणास घालतात असे आहे हे वर्तमान खाशास समजल्यानंतर ज्यानी सांगीतले त्यास तिचा शोध करावयास सांगितला आहे शोध आणुन तिला यथे आणुन भोजनाची सोय करून द्यावी असे मनांत आहे.

१८ आक्टोबर १८४८ : बापुजी धोंडदेव जोशी पुणेकर यांस आज अकस्मात अडीच प्रहरी देवाज्ञा झाली जवळ कोणी दायाद नव्हता इतक्यात कोकणचे वामनभट जोशी ब्राह्मण होता त्याजकडून सार्थक खर्चास देऊन करविले तीन पिढ्याचा चाकर त्याजवर लोभ पूर्ण चिरंजीव म्हणुन लिहीण्याचा पाठ. बापूचा आजा कै. बापुजी धोंडदेव जोशी याणी श्री. कै पांडुरंगराव तात्यासाहेब यांची शागीर्दी केली व त्यांचे चिरंजीव बापुजी धोंडदेव याजकडे पुण्यातील वकिलीचे काम व सरकारी खरेदी जिन्नस वगैरेचे काम होते गहस्थ चांगला होता खाशास दुःख जाहले.

१९ आक्टोबर १८४८ : आज खाशांची प्रथम पत्नी कै. सौ. यशवदाबाई यांचे सावत्संरीक श्राद्ध तात्यासाहेब यांनी केले.

बापु शहापुरकर याणी एक सुरई 'गोरी' म्हणतात तसली उत्तम जातीची, परज सोनरी मुलाम्याचा भरगच्च आहे तसली विक्रावयास आली होती, ती खरेदी रु. ३० देऊन घेऊन खाशास नजर दिली.

सखाराम बाबा गोडसे गवई हे बनोसीस श्री. चिदंबर बावाकडे दर्शनास जाण्यासाठी खाशाचा निरोप घेऊन गेले.

२२ आक्टोबर १८४८ : करवीरचे बंडाचे वेळेस मेहरबा रिवीसन साहेब याचे पत्र कलागिरीचे पारपत्या विषयी आले त्याजवरून हरीहरराव दादा लागु हे फौज घेऊन गेले त्याजबरोबर गोविंद सिंग बिन उदेभान शिलेदार हे होते त्याणी काम केले सबब त्यास मौजे सिरगांव कर्यात कवठे एकंद येथे पन्नास रुपयांची जमिन इनाम देऊन ताकीद दिली.

चिंतो गणेश भिडे चिटणीशीचे कामावर आहेत ते सरकारकामाचे उपयोगी विश्वासुक सबब त्यास सरकारातून मोजे आंधळीस लावणीपैकी पन्नास रुपये व पडसरी पैकी पंचवीस रुपये एकूण पाऊणशे रुपयांची इनाम देऊन ताकीद दिली.

२३ आक्टोबर १८४८ : खंडोपंत करमरकर नाचणे ता. रत्नागिरी येथील राहणार हे मंत्राने पेढे वगैरे जिन्नस करतात ते येथे आले होते त्यास निरोप दिला खास पोशाख पैकी पागोटे व रोख रु. पंधरा व पागेपैको लहान घोडे बक्षीस दिले.

भाऊ भावे याचे कुटुंबास बरे वाटत नव्हते सबब यानी बनोसीस चिदंबर-बावास नवस केला होता त्यामुळे आरोग्य जाहली सबब दर्शनास जाण्यासाठी निरोप घेतला.

श्री. तात्यासाहेब याजकडील विठ्या काळवीट यास आजार होऊन मृत्य पावला त्यास दोन तीन दिवस झाले काळवीट वळू होता चांगला लढत होता.

२४ आक्टोबर १८४८ : उद्या दिपवाळो सबब श्री. देव व मंडळी वगैरे सांप्रदाया-प्रमाणे तेल तुरका पाठवुन दिला व वाड्यात मंडळी अभ्यंगास सर्व पदरची यास बोलावणे यादी प्रमाणे होते. तेल पाठविले ते बितपशील १. श्री गणपती महाराज १. वेण्या गाईस १. घरचे देव १. चांद घोड्याची औलाद १. गणपती बागेतला १. श्री गणपति मिरजमळा १. श्रीकृष्णाबाई १. श्री लक्ष्मी देवी घाटावरील १. श्रीदेव समस्ते १. तुळशीदास मिरज १ अमृतराव थत्ते १. गणपतराव मराठे १. हरवा दादा लागु १. बापु आठवले सालकरी १. गोपीनाथदादा १. पदरचे शिलेदार मानकरी १. पागेतील बारगीर १. बंदीवान यांस पाणी तापवुन नाहणे घालवले वर्षा प्रमाणे १. रघाप्पा नाईक धारवाड १. वगैरे मंडळीसही पाठविले.

मेहेरबां फ्रेर साहेब बहादूर हे धारवाडाहून मुंबईस जाणेकरिता डाकेवरून काल रात्री येथे येऊन तसेच परभारे गेले म्हणोन वेशीवरील प्यादयाने येऊन सांगितले.

२८ आक्टोबर १८४८ : गोविंदसिंग याची प्रकृती बिघडली सबब त्यास सांबारे वैद्याकडून औषध देवीले.

आज लक्ष्मीपुजन श्री. कै. हरभटबाबा खाशाचे पगजे यांची शिल्लक रुपये वगैरे जिन्नस त्याची पुजा व श्री कडील जामदार खान्यातील द्रव्याची पुजा करविली.

२९ आक्टोबर १८४८ : काल पाडवा दिपवाळीचा सबब पेठेतील महानाड देव याणी श्री. गणपती महाराजास नजर भेट वगैरे ठेविले व सरकारात शेटे आवटे–पणा आहे सबब खाशानी नजर आज श्री. पुढे ठेवले.

रघुनाथ राव विठ्ठल विंचुरकर हे पुण्यास गौरनर साहेब यांचे भेटीकरीता आपले चिरंजीव सहीत आले आहेत त्यानी सरकारात पत्र पाठविले आहे की आपले चिरंजीव बाळासाहेब यास बसावयास हतीचा छावा पाहिजे तर त्या देशात कर्नाटकातुन छावे सौदागर आणितात त्यास एक दोन अडीचशे पर्यंत खरेदी घेऊन पाठवून द्यावा हे पत्र त्याजकडील बापु मोहिते घेऊन आला आहे.

चिंतामराव सदाशिव हे मिरजेहून आले आहेत त्याणी जमखंडीचे वर्तमान सांगितले त्यातील हशिल राधाबाईचे व अप्पासाहेब याजमध्ये वाकडे आणणारी मंडळी कृष्णराव सुभेदार वगैरे यांस बाहेर घालविले आहे. त्यांच्या तैनाता नेमणुका बंद केल्या आहेत आणखीही चौकशी करून साहेब दुसरी मंडळी आढळतील त्यांचा बंदोबस्त करणार आहेत.

३० आक्टोबर १८४८ : कै. पांडुरंगराव तात्यासाहेबांचे सावंत्सरीक श्राद्ध चतुर्थीचे परंतु अपराण्ही चतुर्थी पावली सबब आज खाशानी केले किल्ल्यात ब्राह्मण भोजन सुमार अकराशे पात्र झाले दोन पैसे प्रमाणे दक्षणा दिली.

इचलकरंजीस पेशजी नवरात्रास स्वारी गेली त्या समई तेथील हत्यारे पाहण्यात आली होती ती पुन्हा पहावयास तेथुन दिवाकर रघुनाथ बापट याजबरोबर आली एकवीस हत्यारे तरवारी वगैरे आहेत.

हरण म्हणोन मुसलमान सांगलीत राहतो तो दारू नळे, चंद्रज्योती वगैरे करतो त्याजकडून दारू करवुन रात्री उडवुन पाहिली बरी केली आहे.

३१ आक्टोबर १८४८ : विंचुरकरास येथुन उत्तर गेले की हती विकाऊ मिळत नाही आणखी आल्यास घेऊन पाठवु.

२ नोव्हेंबर १८४८ : गोवींदसिंगाची प्रकृती काल रात्री पुन्हा बिघडली सबब त्याचे घरचे कागदपत्र जिनगानी बंदोबस्त करून कुलुपे घालून किल्या त्याचे थोरले बायकोजवळ दिल्या व गोप्रदाने दोन करविली व कांही सांगावयाचे किंवा कसे म्हणोन त्यांस विचारले तो म्हणाला एक कन्या आहे तिचे लग्न करावे व पन्नास रुपयांची जमिन इनाम आंबळोस दिली आहे ती जमीन व हे घर तिला द्यावे दोघी बायका आहेत त्यास धाकटीने, थोरलीचे आज्ञेत वागावे धाकटीने न एकल्यास कळेल तसा बंदोबस्त करून बाहेर काढून द्यावी नाही पेक्षा गोळी घालुन

मारुन टाकावी. खासा स्वारी तात्या साहेबाबरोबर त्याचे घरी जाऊन उभयता खाशानी अंगावर हात फिरवुन तोंडात साखर घातली खाशांच्या डोळ्यांने पाणी आले. मनुष्य चांगला मर्द व संभावीत मान्यस्त म्हणोन गुणवर्णन केले. खाशाने विचारले इच्छा असल्यास मुल दत्त देवे तो त्यावर त्याणी आपली भाची शिरसी बनोमीस आहे तीचा मुल आहे म्हणोन सांगितले त्यावरून त्यास आणवण्यास आज्ञा झाली सरकारातून पत्र पाठविले.

शहापुराहून नारळीच्या हुंड्या बागेत लावणे करीता भोई याजबरोबर आल्या.

हैदराबादेस राव रंभा यांचे चिरंजीव रुस्तुम दौला यानी घोडे बसावयास पाहिजे म्हणोन पत्र पाठविले होते त्याजवरून जर्दा गांगी देशपांडयाची सिंगा सामान सुद्धा तयार करून सुभान अल्ली बारगीर याज समागमे हैदराबादेस पाठविला

३ नोव्हेंबर १८४८ : आज आवळी बागेत साल गुदस्ताप्रमाणे आवळी भोजन झाले. धात्रीची पुजा खाशानी केली पदरच्या मंडळीस भोजनास बोलावले होते.

गोविंद सिंगाचा काळ दोन प्रहरी झाला.

रामाजी पंत दादा काणे इचलकरंजीहून आले इचलकरंजीकरांचे व बाळाजी पंत दादा नातु यांचे देण्याचा तंटा आहे याजकडे ठरावास जात आहे त्यास बहाना दारीचे पत्र सरकाराचे असावे म्हणोन मागावयास आले आहेत.

४ नोव्हेंबर १८४८ : भाऊ छापखाने पुण्यास जाऊन पुढे घरी जांभुळपाड्यास जाणार सबब त्यास शेला पागोटे दिले व त्याची मातुश्री येथे आली होती त्यास लुगडे दिले.

वे. रा. भटजी नामजोशी हे पुण्यास सरकार वाड्यात श्रीची पुजा पूर्वी करून होते ते येथे आले होते त्यास तीन रुपये खाशानी संभावना दिली.

गोपीनाथ दादा आगाशे पुण्यास दक्षणेस गेले.

मौजे सासुरवाड शंकर गड्डा तालुके शिरटी येथे माकडे फार आहेत ती सन सबा अरबैन साली स्वारी गेली होती ते समयी पाहण्यात आली त्यास हरभरे चारण्या बद्दल मौजे मजकूर पैकी शंकरगड्यातील पंचवीस रुपयांची जमीन कुळास लावणीकरून त्यातील हरभरे उत्पन्न माकडास चारणे विषयी इनाम जमिन देणे विशी ताकीद लागु मामलेदार याचे नावे दिली.

५ नोव्हेंबर १८४८ : आज कुशमांड नवमी सबब खाशानी कुशमांड दोन ब्राह्मणास दिली दक्षणा एक रुपया दिली.

५ नोव्हेंबर १८४८ : इचलकरंजीकरास खाशानी निरोप काळ्या बरोबर कळविला की नातूच्या देण्याची तोड दरसाल नऊ हजार रुपये देऊन सोळा वर्षात रदकर्ज करावे

७ नोव्हेंबर १८४८ : आज तुळशीची लग्ने सबब बागेपैकी आवळे चिंचा व ऊस असे आणवून गावात घरोघर व किल्यात वगैरे ठिकाणी पाठवून दिले.

दाजी पंडित करविरास कारभारी आहेत. ग्राम साहेबानंतर क्लार्क साहेब हे असीस्टंटचे कामावर करविरास आले आहेत त्याचे व दाजी पंडिताचे जमेना सबब पंडीत सहा महिन्याची रजा घेऊन घरी जाणार असे अैकीव वर्तमान.

रा. हैबत कुळकर्णी मौजे खरसींग याचे भाऊबंदकोचे वादामुळे खरसींग व देशिंग वगैरे गावचे कुळकर्णपण जप्त श्री कै नानासाहेब याचे कारकिर्दीपासुन अैंशी वर्ष सुमार होते हल्ली भाऊबंद आपसात समजुन इंग्रजी सरकारातुन वतनाची मोकळीक करून घेतली खरसिंग गांव इकडील इलाख्यातील सबब सदरहू गावची मोकळीक इकडून व्हावयाची सबब गावास ताकीद मोकळीकेची दिली

गोवींद बाबा सिध्ये म्हणोन मारूती भक्त त्यास साक्षात्कार श्रीचा असे महान् साधु थोर ब्राह्मण साताऱ्यास रहात असत. त्यानी जरंडचावर श्री मारूतीचे देवालय व मंडप वगैरे धर्मशाळा भिक्षा मागुन बांधिल्या ते अश्वीन शुद्ध ॥ ६ स सन्यास घेऊन समाधिस्त जाहले म्हणोन वर्तमान समजले खरे आहे.

९ नोव्हेंबर १८४८ : शिकाकडे इंग्रजी सरकारची फौज लढाईस रवाना होत आहे हे येथे समजले आहे व कान्हेरराव बापु याणी मे. इनवीरारटी साहेब याज जवळ गोष्ट काढली होती की आपासाहेब यांचे चित्तातुन सरकारची फौज जात आहे तर आम्हास जावे म्हटल्यास आम्ही जाऊ त्याचे उत्तर साहेबांनी केले आज पर्यंत अप्पासाहेबांनी इंग्रजी सरकारची कामे दोस्तीखातर बजावली आणखीही बजावतील ही खात्रीच आहे. तसेच कारण पडल्यास आप्पासाहेबास लिहू

कै. नाना फडणीस यानी रुप्याची घटकेची वाटी पळे समजण्याची केली आहे म्हणोन अैकीले होते ती वाटी पाहण्यास पाठवून द्यावी म्हणोन त्यांचे चिरजीवास लिहीले होते त्याजवरून त्याणी मेणवलीहून पाठवीली ती वजन साडे अैठयांशी भार आहे. तिजवर पाच पळापासुन साठ पळा पर्यंत समजणे करीता बारा रेघा पाच पळाचे अंतराच्या मारून केली आहे.

१० नोव्हेंबर १८४८ : असिकेलिंग साहेब डॉक्टर मडमसुद्धा रत्नागिरीहून सोलापुरास जाताना काल येथे येऊन अमराईत अुतरले आहेत त्यांची भेट झाली साहेबांनी खबुतरे मागितली त्यास सहा जोड दिले व नारळ व ऊस दिले डॉक्टर साहेबाला खाशानी आपले पायाची गाठ दाखविली साहेब म्हणाले मी येथे असतो तर कापुन बरी केली असती तुम्ही करवीरास फ्रेझर साहेब डॉक्टर आहेत त्यास दाखवा

११ नोव्हेंबर १८४८ : अरगचे पाटलाने सरकारात अेक पिवळे मांजर आणुन दिले त्यास चार पाच दिवस झाले ते पिंजऱ्यातुन पळून गेले सबब गावात ताकीद केली होती ते आज गावात सापडले पिवळे आहे चांगले आहे

१२ नोव्हेंबर १८४८ : करवीरास पाच-चार आसामी ब्राह्मण याणी कळवातीण मुसलमानीण इचे घरी तिचे हातुन मद्यपान व कोंबडी वगैरे मास खाल्ले हे

वर्तमान पंडित कारभारी यास समजले नंतर त्यास धरून अंतर पदरी घालून त्याची धिंड काढून ब्राह्मण्यातून भ्रष्ट करून सोडून दिले म्हणोन वर्तमान समजले ठीक केले.

जातीचा भाट सौदागर आहे त्याणे एक हत्तीचा बच्चा विकावयास आणीला आहे किंमत हजार रुपये सांगत आहे बच्चा चांगला आहे लहान आहे म्हैसुरा-कडील आहे

१४ नोव्हेंबर १८४८ : चंदीचंदावराकडून कर्नाटकी सुतार याणी गव्याचे शिंगांची कमळे देवाचे पुजेस कातुन दोन विकावयास आणिली आहेत सरकारात पाहण्यास ठेविली आहेत

१५ नव्हेंबर १८४८ : राजश्री यशवंतराव जोशी सुखदेव जमखेंडीकर हे तालि-कोटाहून श्री. रा. बळासो। रास्ते याजकडून आले आहेत त्यांचे सांगण्यात बाळासा।। याणी आपलेस पुत्र नाहीं सबब दत्तमूल घेऊन त्याचे नावे जहागीर चालावी अशा भावाचे उद्योग आजपर्यंत करीत आहेत हली विलायतचा हुकूम मूल घ्यावा त्याज-कडे बाळासो। याचे मागे जहागीर वगैरे सर्व चालेल असा आला आहे म्हणोन सांगितले.

१६ नोव्हेंबर १८४८ : श्रीमंत रा. गणपतराव बाबासाहेब यास आज आठवे वर्ष लागले सबब किल्ल्यात वाढदिवस केला मुंबईचे वर्तमान तीन जहाजे सावकारी मालाची भरून येत होती ती वारा तुफान सुटून येक जहाज फुटून नाहीसे जाहले येक वाहवले व येक येऊन कडेस लागले म्हणोन सिवगिरी गोसावी याणी सांगितले

शाहनामा फिरदोस मुसीबत रवीरात म्हणोन पारसी किताब करवीराहून आला आहे फार चांगला आहे अडीचशे रुपये किंमत सांगतो

१७ नोव्हेंबर १८४८ : सापकर कदम याजवळ चित्ता वाघ जिवंत हरण धरतो मारीत नाही तो श्रीमंत रा० तात्यासाहेब यांस पाहण्याकरता कदम याणी पाठविला आहे

१८ नोव्हेंबर १८४८ : चित्तावाघ कदम याणी पाठविला त्याजकडून आज सकाळी श्रीचे देवळापुढे बकरे मोकळे सोडऊन त्यास जिवंत धरविले येक दोन वेळ तसे केले ते खाशानी वगैरे सर्वांनी पाहिले

२० नोव्हेंबर १८४८ : परवाचे दिवसी रामविजयग्रंथ श्रवण खासे करितात गोविंद हरी बिनिवाले वाचतात तो समाप्त होऊन पांडवप्रताप प्रारंभ जाहला.

सापकर कदम याजकडून चित्तावाघ घेऊन दरवेसी आला होता त्यास पाच सहा रुपये शेलापागोटे देऊन निरोप दिल्हा तो आज गेला

करवीराहून बो। रा. रघुनाथ जोसीराव याजकडून दोन बैल भरून अभ्रक आहे. पाटऊन देण्याविशी पेशजी लिहिले होते त्याजवरून आला आहे

२१ नोव्हेंबर १८४८ : रा. बाबाजी आंगरे कुलाबेकर आपले यजमाननीसहित

महायात्रेचे उद्देशे निघोन पुण्यास आली आहेत पुढे जातील बरोबर पाच हजार यात्रा संरक्षण करून न्यावी या बेताने निघाली आहे म्हणोन आज वर्तमान ऐकिले

रा. कोन्हेरराव बापूचे पत्र शाहापुराहून आले त्यांत शिकाकडे इंग्रजी सरकारची फौज जात आहे म्हणोन वगैरा बोलणी मेहरबा इनविरारेटी सा।। याजवळ निघाली होती ते समई श्रीमंत रा. आप्पासाहेब यांचे मनातून दोस्तीखातर इंग्रजी सरकारचे काम फौज पाठऊन अगर जातीने जाऊन बजवावे असा इरादा आहे म्हणोन वगैरा विनंती मी केली साहेब संतोष होऊन बरे आहे म्हणोन बोलले म्हणोन वगैरा मजकुराचे पत्र आले आहे त्याचे उत्तर खाशाचे गेले त्यात हल्ली इंग्रजी सरकारचे कामाबद्दल पैका खर्च करून काम बजवावे असे मनात तो वख्त हल्ली आला आहे इंज्यानेबची रवानगी करावी फौज सुध्दा करावी म्हणोन वगैरा लिहिले व सदरहू अन्वये मेहरबा इनवरारिटी सा ो यास लिहिले आहे

रा. आबा पारसनीस परभू सातारेकर याणी काही पारसी किताबतेतील चमत्कारिक गोष्ट व नीतो लिहून पाठविली आहेत त्यास पारसी अक्षरे लिहून त्याचा मतलब हिंदवी करून पाठविला असे

साल मजकुरी पदरची मंडळी वारली त्यांच्या अस्थी श्री कासीस गंगेत सोडणे वा।। सिचन करून पाठविल्या त्या

१ श्री. कै. सौ. गंगाबाई वहिनीच्या सालगु।। वारली
१ हरीरामचंद्र दाते सालमजकुरी वारली
१ बाळाजी नारायण गडबोले सालगु।। वारले
१ बापूजी धोंडदेव जोशी साल मा।।री वारले
१ भाऊ सरनोबत सालगु।। वारले
१ गोविंदसिंग साल मजकुरी

६

१ विठू बिन पिराजी सिंदा याची आई

–पुण्याहून जिन्नस दौलताबादी गड्डुचा व गुलाबपाणी वगैरे जिन्नस सरकारांत आणिला होता तो आज आला आहे.

–धारराव पवार बारगीर हे पुण्यास सौ. आवडी बाईस पोचवावयाकरता गेले होते त्याणी वर्तमान सांगितले जे मुंबईस फरासीस याची दोन जहाजे येऊन लागली आहेत बाकी नऊ जहाजे मागाहून समुद्रातून येत आहेत पुढे दोन आली त्यात फरासीस आहेत त्यांचे इंग्रजास म्हणणे की ही मुंबई आमची आम्हाकडून पेशवे याजकडे होती त्याचे देणे होते ते आजपर्यंत फिटले आता आमची आम्हास द्यावी सध्या आम्हास राहण्यास जागा मुंबईत द्यावी वगैरे बोलणी आहेत म्हणोन सांगितले.

२३ नोव्हेंबर १८४८ : हरिसन साहेब हे जनेरीचे कामावर होते त्यांची भेट

खाशाची सनसबा अव्वैन साली धारवाडचे मुकामी जाहली होती ते अलीकडे पुण्यास होते ते वारले म्हणोन वर्तमान आले

२४ नोव्हेंबर १८४८: रा. प्रभाकर शास्त्री मुनसफ हे सांगलीस आले आहेत वासुदेवपंत कराडे याचे घरी उतरले आहेत चंदी वैरण वगैरे पाठऊन दिली.

२७ नोव्हेंबर १८४८: गोविंदराव पालेकर हे कोकणांत गोमंतकाकडे गेले होते ते काल आले आज खाशास भेटून तिकडून कमळाचे गड्डे पांढरे वगैरे आणिले ते प्रविष्ट सरकारांत केले.

यजंटसाहेब हे रहिमतपुरास जाणार कारण बेळगांवापासून पुण्यापर्यंत सडक इंग्रजी सरकारातून बांधावयाची सबब रस्ता पाहण्यास जाणार श्रीमंत रा. माधवराव बाबासाो। मिरजकर हे बेळगावास तीस चाळीस माणसानिसी देशापांडे यांचे घर भाडयाने घेऊन आहेत त्याणी एक ब्राह्मणाचा मुलगा कविता सुमारत करितो त्यास जवळ बाळगून शास्त्रविद्या पढवावी असे मनात आहे फार मर्जीत वागत आहे

१ डिसेंबर १८४८ : मे. इनवरारिटी साहेबाबरोबर बाळाजी पंत माटे मुनसी वगैरे मंडळी कचेरीची सांगलीस आली आहेत.

३ डिसेंबर १८४८ : इनवरारिटी सो। याणी श्रीमंत तात्यासो। यांस ज्वर येत असतो सबब समाचारास रा. बाळाजी पंत माटे मुन्सी यास पाठविले होते.

श्रीमंत रा. पंतप्रधान बाजीराव साहेब यांची पत्नी रा. बळवंतराव आण्णा आठवले यांची नात ती कार्तिक शु।। ७ स वारली अ.ज महिना झाला म्हणोन वर्त-मान आले वाईट गोष्ट जाहली.

५ डिसेंबर १८४८ : मुंबईहून सवदागर पिस्तुले व आणखी जिन्नस घेऊन आला आहे.

रा. विनायकपंत काळे अखबरनीस नि।। इंग्रजी सरकार हे येथे आहेत त्याची वर्तणूक येथील सांप्रदायास फार जिकीरीची व नालस्ती व लटकी इंग्रंजी सरकारात लिहितात याविसी साहेबाची खातरी जाली सबब त्यास येथून कामावरून काढणे-विसी काल साहेबानी सांगितले आहे त्याप्रो ते जातील.

६ डिसेंबर १८४८ : १. आज सरकारपदरचे बारगीर वगैरे याणी येऊन मोहरमाचे फकीर होऊन तबक खाशापुढे आणून ठेविले सांप्रदायाप्रमाणे फकिरी-बा।। देविले.

१. दादा भिडे व त्याचे चिरंजीव आण्णा भिडे हे पंढरीहून काल आले तिसरे प्रहरी खाशाकडे येऊन एक आरसा जाड भिंगाचा आणून दिला.

७ डिसेंबर १८४८ : १. आज मोहरमचे डोले झाले होते ते गेले समारंभ पाहा-वयास खाशाची स्वारी श्रीचे नगारखान्यापुढे जाऊन बसली होती डोले सुमार ९ बितपसील.

१. फकिराचा	१. चावडीतील
१. बारगिराचा	१. मदार महावत
१. भालदार	१. कवाइती
१. गोलंदाज	१. सेखचांद जमादार
१. पखाली	
५	४

९

८ डिसेंबर १८४८ : मेहेरबां कर्नलसाहेब करवीराहून सोलापुरास खटले सहित जाणेकरिता वाल मडम व येक मुलगी सुद्धा येऊन उतरले अहेत त्यास आज गावातील वगैरा बेगारी १५० सुमार देविले खटलें आज भोसेयास गेले. आज सकाळी साहेब घोडचावर बसुन येकटाच किल्याचे दरवाजात येऊन आत जात होते तो चौकीदार यास माहीत नाही त्याने जाऊ. नये म्हणोन परभारे सांगितले हे वर्तमान दोन प्रहरानंतर समजल्यानंतर त्याचे पारपत्य केले संध्याकाळी खाशाची स्वारी आंबराईत साहेबाकडे गेली साहेब सामोरे येऊन हात धरून बहुत खुषीने खुरसीवर वसणे जाहलेनंतर साहेब बोलले जे मी आपणास पेशव्याचे लढाईत बहुत वेळ पाहिले होते अलीकडे भेट नाही आपण वृद्ध जाहला मीहि जाहलो नंतर सोलापूर विज्यापूर कोल्हापूर पाहिले किंवा नाही म्हणोन. खाशानी उत्तर केले जे पाहिले नाहीं करवीर मात्र पेशवाईत सिंदे अलिजा बहाद्दर याची पलटणें येऊन लढाई जाहली त्या लढाईत आम्ही पेशव्याकडून फौज घेऊन होतो तें समई पाहिले म्हणोन म्हणताच बहुत खूष जाहला. नंतर बापट वकील याणी सकाळी मजकूर किल्यात जाणेचा जाहला तो चौकीदार याजकडून न कळत जाहला म्हणोन साहेबास सांगितले साहेबानी उगेच रहा बोलू नको चौकीदारास ठाऊक नाही त्याजकडे काये आहे ? आम्हास राग नाही म्हणोन वगैरे संतोषाचे बोलणे बोलला. आपासाहेब याणी आमची बरदास्त बहुत ठविली आम्ही संतोष जालो याप्रो करवीरास ग्रामसाहेब यास व मेहरबा अडरसनसाहेब यास वगैरे लिहितो म्हणोन वगैरे खुषीची बोलणी जाहली व खाशानी आज किल्ल्यांत येऊन मेजवानी घेऊन जावे म्हणोन सांगितले तेव्हा साहेब बोलले उदईक जाणेची निकड आहे फिरून मला यावयाचे आहे आलो म्ह. किल्ला पाहून घेईन नंतर खाशास निरोप दिल्हा, साहेबानी हात धरून घोडचावर वसविले आणि म्हणाले जे बहुत थोर सरदार प्रकृत फार खराब जाहली वृद्ध आहेत साऱ्यानी मिलोन पदरच्यानी यांस संभाळावे. साहेब सत्तर वर्षाचे सुमार आहेत दात पडले आहेत हिंदुस्थानी व मराठी भाषा बहुत सुंदर बोलतात काबूल खंदाराकडे लढाई होते तो देश फार वाईट हा चांगला म्हणोन सांगितले. उदईक पहाटेस पुढे चालते होतील.

११ डिसेंबर १८४८ : १. श्रीमंत कै. ब्रह्मीभूत हरभट बावा याची पुण्यतीथ आजची ती आज खाशानी केली पांच ब्राह्मण सांगितले होते.

१. वे. शा. सं. रा. रा. बाळाचार्य धारवाडकर हे विद्या पढावयास काशी ब्रह्मावर्ताकडे होते श्रीमंत रा. पंतप्रधान बाजीरावसाहेब यांजवळ शंभर रु. दरमाहा घेऊन होते न्यायशास्त्रांत व वेदशास्त्रांत प्रवीण होऊन धारवाडास घरीं जाणे करिता आले आहेत येथे वासुदेवपंत कराडे यांचे घरी उतरले आहेत ते आज खाशाकडे भेटीस आले होते आशीर्वादार्थ दोन तीन श्लोक नवीन कविता करून आणिले होते ते म्हणून अर्थ सांगितला व वे. रा. नारायणशास्त्री माईणकर यांचे चि. कृष्णशास्त्री याणी काही न्यायशास्त्रातील विषय काढिला होता त्याची उत्तरे जाहली. आचार्य बहुत थोर विद्यासंपन्न आहेत त्यांस संभावना रु. १५ व धोतरजोडा १० चा देऊन निरोप दिला बरोबर खटले मेणा वगैरे पांचचार सिष्ये आहेत.

१३ डिसेंबर १८४८ : १. रा. माधवराव देशमुख जावई यास बसावयाकरिता पागेतील घोडी कुमैत म्हाळसेची शिंगी आज खेत्री पवार खिजमतगार याजबरोबर पाठविली.

१४ डिसेंबर १८४८ : जिन्नत मकान राबीनसनसाहेब याची मडम विलायतेस आहे तिणे सालगु।। पांढरे मोर पाठविले तिला येथन येक हिऱ्याचो आंगठी पत्र सहित पाठविली आहे.

१५ डिसेंबर १८४८ : १. नरसू पाटील खरसिंगकर यास सरकारी सिपाई यास अधिक आगळे बोलला सबब पाशांत बेडी घातली होती त्यास बेडी काढून गुन्हेगारी ठरून सोडला.

१६ डिसेंबर १८४८ : १. मुंबईकडील वर्तमान इंग्रजी सरकारजी फौज सिकाकडे जात आहे ती पुन्हा परत येत नाही तिकडेच राहात आहे आणखीही दक्षण व हिंदुस्थानच्या फौजा पलटणें जात आहेत गामंतकाचे जहाज येक फौज वगैरे सामान भरून आले आहे ते आम्हास जागा व्यापारास द्यावी म्हणोन मागतात. त्याचे उत्तर मुंबईकर याणी सांगितले जे विलायतेस लिहून उत्तर येईल त्याप्रमाणे सांगू म्हणोन आणखीहि मागाहून जहाजे भरून येत आहे म्हणोन मोठा बखेडा जाहला आहे ईश्वर सत्ता जसी असेल तसे होईल म्हणोन.

१६ डिसेंबर १८४८ : १. वे. शा. सं. रघुनाथ रा. रावजीशास्त्री आगाशे हे मातुश्रीसह बडोद्यास वे. शा. सं. रा. त्रिंबकशास्त्री हे बडोद्यास गाईकवाड याजवळ अधिकारावर बारासे दरमाहा घेऊन असतात ते गोपिनाथदादा याचे सिष्य त्याजकडे गेले होते रावजी काही पढले आहेत त्याची प्रतिष्ठ त्रिंबकशास्त्री याणी चांगली करविली तीन साडेतीन हजार रु।। चा विजय मिळऊन दिला ते मातुश्रीसहित काल सांगलीस आले.

१. रा. भाऊ भावे हे आपले उभयता चिरंजीव व पत्नी वगैरे सर्व कुटुंबसुद्धा

जेजुरीस खंडोबा आहे ते कुलदैवत सबब त्याचे दर्शनास जाणार सबब आज खाशाचा निरोप घेतला उदईक जातील.

१७ डिसेंबर १८४८ : १. वे. रा. रघुनाथभट बापट हे पुळ्याचे गणपतीचे पुजारी हे आले आहेत खाशास येऊन भेटले व आपणास काही ब्रह्मस्व आहे ते आपण फेडावे म्हणोन विनंति केली.

१८ डिसेंबर १८४८ : १. शृंगीरीकर स्वामी याचा व हुबळीकर अय्याचा अडवी पालखी प्रकर्णी पेशजी खटला नवीन जाहला त्यास जंगम लोकांत अशी चाल नाही पुन्हा न व्हावे येविसी गौरनर साहेब यास थैली येथून गेली होती त्याचे उत्तर साहेब यांजकडून आले त्यांत गैरशिरस्त हिंदू ब्राह्मण याणी सांगितले जे रस्त्यातून पालखी आडवी जंगम याणी चालविली. या संमंध नाही म्हणोन सांगितले त्यावरून लिहिले आहे म्हणोन साहेबाचे भिडेमुळे व जंगम लोकांचे भिडेमुळे हिंदू ब्राह्मण याणी सांगितलं खरे परंतु आजपर्यंत कधींच सिरस्ता जंगमाचा नाही अलीकडे मनास वाटेल तसे करितात असो आणखी सरकारातून याविसी लिहिणी जातील.

१९ डिसेंबर १८४८ : श्रीमंत रा. गंगाधरराव बाळासाहेब मिरजकर यांची पत्नी श्री. सौ. उमाबाई यास कफोदर जाहले होते तेणेकरून आज प्रातःकाळी सूर्योदयास देवाज्ञा जाहली ईश्वर इच्छेस इलाज नाही खाशास वगैरे अशौच्य वर्तमान संध्याकाळी समजले.

२० डिसेंबर १८४८ : १ कै. चिमणाजी नाईक भिडे पुणेकर हे वारले त्यास इनामगांव मौजे राहटणी ता॥ पुणे हा आहे. तो त्यांचे नावें चालत होता तो जप्त जाहला त्यास बंधु तिघे बाळकृष्ण नाईक व दादा भिडे हे तेव्हा चिमणाजी नाइक याचे कारकन रा. शामराव म्हणोन तेथे पुण्यास आहे त्याचे पत्र दादाचे नावे आले त्यांत माझे नांवे मुखत्यारनामा पाटवावा म्हणजे गाव सुटेल असे आहे तो मा॥र त्याणी विनंति केली आज्ञा जाहली काल या प्रकारचा ! तुम्हीच पुण्यास जाऊन आपले नावे याद कोडतात द्यावी आणि तेथील रंग पाहून मग काय ते करावे म्हणोन.

१ इचलकरंजीकर तात्यासो यास ज्वर येत आहे त्यास त्याचे पत्र सैंधवाची आवळकाठी व लिंबाचे लोणचे पाठवणेविसी ब्राह्मण घेऊन आला त्याजवरून दोन जिन्नस पाठविले आहेत.

१ तासगावास रमाबाई गरोदर आहेत ती खरी किंवा कसे याचे चौकसीस मेहरबा सो डाकतर व मडम असी बेलगावाहून इग्रजानी पाठविली ती काल तासगावास जाऊन बाईकडे जाऊन परीक्षा डाकतर याणे हात पाहिला व मडमेने जवळ बसून परीक्षा केली आणि तुम्हास महिने किती जाहले वगैरे भाषणे जाहली त्याचे उत्तर तुम्ही इग्रजाकडून आला हात पाहिला तुम्ही महिने किती जाहले ते परीक्षा

करून सांगावे म्हणोन वगैरे स्पष्ट केली असी अप्रतिष्ठा करण्याचे प्रकार होत आहेत ईश्वर इच्छा प्रमाण !

१ मेहरबा इनविरारेटी सो। याचे पत्र आले त्यात मुलास विद्याभ्यासाकरिता शाळा घालून मुले तयार करणार सबब सर्व दक्षणेतील सरदार जहागीरदार याजवर हजार पाचशे योग्यता पाहून रुपये घेऊन तो खर्च करावा असे ठरून येथे दोन हजार रु।। द्यावे म्हणोन लि।। आहे त्याचे उतर येणून आज्ञा जाहली जे बेकायदा नवीन आम्हास पत्करावयाचा नाहीं ! आम्हास पाहिजे तर आम्ही शाळा घालून आपली मुले तयार करू म्हणोन वगैरे विसी वकिलास सांगितले आहे सदरहू अन्वये थैलीचे उत्तरहि गेले आहे.

२५ मोहरम शुक्रवार : १ खासा स्वारो मिरजेस श्रीमंत रा. बाळासो। यांची पत्नी वारलो सबब समाचाराकरिता जाणेचा बेत होता परंतु उशीर झाल्यामुळे जाणे राहिले.

२३ डिसेंबर १८४८ : खासा स्वारी मिरजस समाचारास जाणेचा बेत होऊन मिरज मळ्यातच भोजनास जाणे जाहले भोजनोतर किल्ल्यात दोन घटका बसून श्रीमंत मातुश्री रमाबाई याजकडे जाऊन स्वारी मळ्यात आली तेथे स्नान होऊन फराळ होऊन दोन घटका आवशीचे रात्रीचे सुमारी निघाली ती प्रहररात्रीचे सुमारे सांगलीस आली.

२४ डिसेंबर १८४८ : सातारेकर सिंग वाजविणारा येथे आला आहे त्याणे श्रीचे देवळांत येऊन सिंग व नामसर वाजविले व पाखरांचे अनेक तऱ्हेचे शब्द बोलला व करंजा (करणा?) उडवून सिंग वाजविले तात्यासाहेब वगैरे मंडळी बघावयास बसली होती.

२५ डिसेंबर १८४८ : करवीराहून रा. गोपाळ धोंडो उचगांवकर याचे पत्र आले त्यांत हसील अजम दाजीबा घोरपडे याचे चिरंजीव मल्हारराव घोरपडे नि।। इंग्रजी सरकार त्याजकडे स्वाराचे रिसाल्याचे काम त्याची व त्याचे पदरचा बारगिराची खटखट होऊन एकमेकास जखमा लागोन उभयता काल ठार जाले म्हणोन मल्हारराव याचा मुडदा पुण्यास रवाना केला आहे म्हणोन.

२९ डिसेंबर १८४८ : १ खाशास आज पंचाहत्तरावे वर्ष लागले सबब अभ्यंग वगैरे होऊन भोजन जाहले.

१. इंग्रजी सरकारातून सांगलीस अकबारनिसीचे कामावर रा. विनायक गोविंद काळे होते त्याची बदली जाहली त्यास जमखेंडीस नेमिले सबब ते गेले सांप्रदाय बदली जाहली असता खाशाचा निरोप घेऊन जागेचा परंतु त्याची चाल एक प्रकारची ! सबब निरोप न घेता गेले. असो.

१. काळे अखबारनीस याचे कामावर चनप्पा बिन सिवप्पा जंगम हे आज

प्रातःकाळी आले ते खाशास येऊन भेटून मा।र आम्ही कामावर आलो म्हणोन सांगोन ठिकाणास गेले.

३१ डिसेंबर १८४८ : १. इचलकर्जीहून पत्र आले त्यात ठाणातील कोठीवरील दुमजल्यास मंदवारो तीन प्रहर रात्रीचे सुमारे आग लागोन वरचा मजला जळाला खालचा मजला शाबूत आहे म्हणोन.

५ जानेवारी १८४८ : भास्करपंत जोसी हिपरगीकर याजकडे मिरज दौलतीचा कारभार पेशजी होता त्याचे हिशेब हली मेहरबा अंडरसनसा। बहादुर हे रा. विनायकराव पंडित याचे विद्यमाने घेत आहेत त्यांत तफावत वगैरेचा टपका त्याजवर आहे त्याजविसी त्यास सवाल जबाब चाललेच आहेत परंतु हिपरगीकर याणी दौलती प्रकर्णी हिसेबाचे छपाणीचे ! (छचावणीचे) कागदपत्र सांगलीस हरी यशवंत निमये हे त्यांचे बहिणीचे भ्रतार याचे घरी ठेविले असा वहमा येऊन साहेब बहादुर यांची थैली घेऊन येथील अकबरनीस चेनय्या हे आज मध्यरात्रीचे सुमारे येऊन लिमये याचे घरांत येऊन तेथे माणसे चौकीस ठेउन येथील कारभारी यास मजकूर कळऊन लिमये याचे घरचे कागदपत्राचे रुमाल येके ठिकाणी करून खोलीत ठेविले चौकी तशीच होती.

४ जानेवारी १८४९ : अखबरनीस याजकडून कारकून सरकारात विनंती करावयास आला होता की लिमये याचे घरचे रुमाल मिरजेस न्यावयाचे आहेत त्यास ओझ्यास उट द्यावे म्हणोन त्याचे उत्तराची आज्ञा झाहली जे येथील पदरचे लिमये त्याचे घरचे रुमाल मिरजेस पाठवावयाचे नाहीत तुम्हास वहमा असल्यास तुमचा कोण असेल तो येऊन रुमालाचा झाडा लिमये या देखत पाहून कागद छपावणीचे (छचावणीचे) असल्यास घेऊन जावे म्हणोन त्याजवरुन अखबारनीस याणी जाहला मजकुराचा रपोट साहेबास लिहिला.

रा. रावजी लिमये याचे घरी जप्ती बसली सबब आपले घरी कागदपत्र नाहीत वगैरे मजकूर साहेबास कळवून जप्ती उठवावी म्हणोन लिमये हे गेले सरकारातून रा. नागोपंत बापट वकील यासहि आज्ञा होऊन तुम्ही साहेबाकडे जाउन मजकूर बोलोन आशा गोष्टी अब्रूदाराचे अब्रूस बट्टा येविसी बोलावे आणि चौकी उठवावी म्हणोन सांगोन त्यास लाऊन दिल्हे उभयता साहेबाकडे मिरजेस जाउन सर्व मजकूर साहेबाशी बोलले त्याजवरून साहेबानी केशवराव म्हणून कारकून यास सांगलीस पाठऊन देतो ते सर्व रुमाल पाहून चौकशी करून कागद सापडल्यास घेऊन येतील म्हणोन सांगितले शिवाजीपंत गोखले हे येथे स्वाधीन इंग्रजी सरकारातून पूर्वी केले होते ते हल्ली मुंबईस आहेत त्याचे कारण हल्ली पडले आहे त्यास आणवावे म्हणोन साहेबानी सांगितले सबब त्यास येणेविसी पत्र लिहिले आहे तोही मजकूर अंडरसनसाहेबास कळवावा म्हणोन बापट यास आज्ञा जाहली आहे.

११ जानेवारी १८४९ : सातारेकर बाबाजी तमाशावाले हा सांगलीस आला आहे त्याचा तमाशा रात्रौ श्रीचे वाड्यातील चौकात जाहला खासा स्वारी व तात्यासो यांची स्वारी बसली होती.

१२ जानेवारी १८४९ : आज संक्रातीबा। श्री. सौ. मा. बाईसाहेब याणी मळ्यातील उसाचा फड ब्राह्मणाकडून लुटविला

१४ जानेवारी १८४९ : संगमरवरी दगडाची चौकी अष्टपैलू विकावयास आली आहे त्याची किंमत दीडसे रुपयेपर्यंत सांगतात देवळात पाहावयास आणविली आहे रा सदाशिव रामचंद्र मनोहर याचे वि।ाची आहे

१५ जानेवारी १८४९ : विष्णुदास शेटजी सातारेकर याजकडून सुपारीचे बिया फळे सहासे आणिवली होती ती आली

२० सफर पौष वद्य ८ मंगळवार : सरकारात इंग्रजी तऱ्हेची तरवार खरेदी पाच रु।ास घेतली मुलाणी याजवळ घेतली.

१८ जानेवारी १८४९ : रा. भाऊ छापखाने हे मुंबईस गेले होते ते आले त्याणी सरकारात फर्मासी जिन्नस काचेचा वगैरे व बुकें वाचावयाची व चाकू कात्र्या वगैरे आणिले आहे

२० जानेवारी १८४९ : ह. भ. परायण रा. रघुनाथबावा गोसावी सासवडकर याची कीर्तने दोन सरकारात जाहली सबब त्यास बिदागीबा। दहा रुपये सरकारातून दिले १ वे. शा. सं. रा. गोपीनाथदादा आगाशे शास्त्री वाईकर हे पुण्यास दक्षणेस गेले होते ते आज आले अस्तमानी खाशास येऊन भेटले त्यांचे सांगण्यात लाहोरमुलतानाकडे सिकाचे राज्यात इंग्रजांची सिकाची लढाई होत होती इंग्रजांची पंचवीस पलटणे होती ती मुलतानचे किल्ल्यात पंधरा पलटणे होती त्यासुद्धा किल्ला सिकांनी घेऊन किल्ल्यास वेढा घालून पंधरा पलटणे कापून काढली सिकाची सर आहे म्हणोन.

२२ जानेवारी १८४९ : रा. कोंडोपंत जोशी उमरजकर यास घोरपडे हे नवकस सातकस कसे याची माहिती लिहून पाठवावी म्हणोन पत्र गेले त्याजवरून त्याजकडून माहिती लिहून आली आहे

कर्नाटकातील बल्लारीच्या कलवांतिणीच्या पोरी येथे येऊन विष्णूच्या देवालयात उतरल्या आहेत त्यांचा नाच देवळात जाहला बऱ्या फिरस्त्या आहेत.

२४ जानेवारी १८४९ : १ मिरजेस मेहरबा अंडरसन सो। आहेत त्याणी मिरजकर याचे दौलतीप्रकर्णी दरबार खर्चाचा ऐवज व सिलकी ऐवजात तफावत कारभारी व जामदार याणी केली हा टपका ठेऊन घरे जप्त केली त्याचा लिलाव करावा म्हणून आज हुकूम दिला.

१ आपा जामदार यास पंधराशे रुपये द्यावे अगर घर लिलाव करू म्हणून निकड

केली त्याचे म्हणणे पंधरासे रुपये किंमत नाहींत दोन तीनसे देतो म्हणोन घरांत जिनगी वगैरे पाहिली असता दोनसे तीनसे पर्यंत आहे. कसे होते पाहावे.

१ गुंडापा जामदार पथकाकडील यास दोन हजार रु. द्यावे नाही पेक्षा घर लिलाव होईल म्हणोन त्याजवरून त्याणे अठराशे रुपये हप्तेबंदीने ठरऊन मोकळीक करून घेतली हप्त्याची निशा दिल्ही.

१ नरसिंह दामले याचे घर लिलाव होणार.

१ कै. वा. गोविंदपंत खाडिलकर याची पत्नी रखमाबाई याचे घर नाही बिराडाने आहेत तिची जिनगी पाच दहा रुपयेची होती तीहि तशीच लिलावास घालणार.

येणे प्रो मजकूर आहे सिवाय भास्करपंत हिपरगी याजकडे तफावत काही लागू होत नाहीं परंतु त्याजकडे काही तरी गुन्हा ठेऊन बुडवावे अशी मसलत आहे. पाहावे.

२६ जानेवारी १८४९ : १ खासा स्वारी वगैरे कोकणात जावयाची बरोबर जाणे करिता श्री. सौ. अवडाबाईअक्का सासरी व श्रीमंत सौ. गंगाबाई वहिनी ही माहेरास पुण्यास गेली आहेत त्यास आणावयाकरिता सरंजाम वगैरे देऊन रा. भाऊ छापखाने कानिटकर यास आज रवाना केले देशमुख व जोग यांचे नावे पत्रे व हलवा संक्रातीबद्दल व खण वगैरे पाठऊन दिले.

१ रावरंभा याची कुणबीण भवानी सालगुदस्ता येथे येऊन राहून करवीरास लग्नाकरता गेली होती ती मंडळीसुधा लग्न करून परत हैद्राबादेस जाणे करिता आली आहे बरोबर खटले वगैरे आहे.

१ रा. बाबाजी भंडारी शेणवी इंग्रजी लिहिणार शाहापुरास असतो तो खाशाचे भेटीस म्हणोन आला आहे. भेटून गेला.

१ श्रीमन्महाराज छत्रपती करवीर यास पुत्र साल मजकुरी जाहला त्यासंमंधे बाळंतविडा देऊन रा. दाजीनारायण दिग्रजकर यास पा। बरोबर कृष्णा मोरे यास दिल्हे (पुढे बाळंत विडयाचा तपशील)

२७ जानेवारी १८४९ : गावात कोणी कोकणातील ब्राह्मण विष्णूचे देवळात येऊन राहिला आहे तीन दिवस उपोषण करीत आहे गावकरी याणी जेवावयास दिल्हे असता घेत नाही ससारतापत्रयामुळ मी जीव देणार म्हणतो सबब त्यास येथे राहू नये दुसरे गावी जाऊन काय पाहिजे ते कर जा म्हणोन सांगितले.

२८ जानेवारी १८४९ : १ मेहरबा फ्रेरसाहेब रसीदंट सातारा याचे पत्र आले त्यांत मद्रासाकडून मेहरबा फ्रियेरसो हे स।। चे दोस्त ते साताऱ्यास येणार ते सांगलीवरून येणार त्याची बरदास्त राखावी म्हणोन ते पत्र घेऊन स्वार कराड मु।। हून साहेब जमखंडीस आहेत तेथून आला आहे त्या स्वाराने येक भाला मागितला त्यास भाला दिला.

१ इचलकर्जीहून पत्र आले त्यांत श्रीमंत रा. तात्यासाहेब घोरपडे याचे थोरले पत्नीस पित्तवायू जाहला आहे त्यास सांबारे यास पाठऊन द्यावे म्हणोन त्याजवरून रातोरात मशाल देऊन पाठऊन दिल्हा.

१ भवानी नि॥ रावरंभा ही हैद्राबादेस जाणे करिता आली आहे. उदईक पुढे जाईल. तिणे येक खाशाची तसबीर चित्र मागितले त्याजवरून काढलेली तसबीर विठ्ठलपंत चितारी याचे हातची होती ती दिल्ही.

२९ जानेवारी १८४९ : १ मेहरबा ग्रामसो बहादुर इलाखा करवीर हे मुंबईस रजा घेऊन गेले सबब त्यांचे कामावर मे. अंडरसन सो ब॥ हे मिरजेहून आज प्रातःकाळी गेले अगटिंग होऊन गेले आहेत.

१ श्रीमंत रा. बळा सो मिरजकर यांस त्यांचे दौलतीचे काम मुखत्यारीने करावयास साहेबानी सांगितले सबब आज निघोन करवीरास कामावर गेले तेथे दोन दिवस राहून बेळगावास जाऊन पंधरा दिवसी परत करवीरास येतील आपला बंगला वगैरे सामान विकून अथवा व्यवस्था करून परततील.

३० जानेवारी १८४९ : १ यमुनाबाईचे अवलादीच्या गाई शंभर सुमार वासरे सुद्धा मंगळवेढयाहून आल्या आहेत त्या पाठवावयाकरिता आवळीच्या बागेत बांधून स्वारी जाऊन पाहिल्या त्यास वैरण घालविली.

१ मे. फ्रेरसाहेब जडज हे मद्रासचे बेळगावाहून सातारेस जाणे करता येऊन आंबराईचे बंगल्यात उतरले आहेत त्याजकडे खाना वगैरे सिरस्तेप्रो पाठविला.

१ बाळाजीपंत दादा नातू याचे (मुळांत मध्यें जागा सोडली आहे) लग्न माधव॥ १स सातारेस आहे त्याजकडून कारकून लग्नपत्र घेऊन आले आहेत त्याजकडे सिधा चंदी वैरण दिली

१ हैद्राबादेकडील कारवान आरबी वगैरे घोडो विकावयास घेऊन आले आहेत.

३१ जानेवारी १८४९ : १ सखाराम बावा गवई याचे घरी श्री गणपति उच्छाह काल समाप्त जाहला काल रात्री जलसागाणे जाहले ते उज्याडेपर्यंत जाहले.

१ माघ शु॥ १३ सोमवारी स्वारी कोकणात जाणेचा निश्चय होऊन तयारी चालली आहे.

१ फेब्रुवारी १८४९ : मेहरबा इनवरारिटो हे वसगडयाहून सांगलीस आले. सामोरे भाऊसो गेले होते. तहनाम्यातील × × प्रकर्णी अकरा कलमाची याद अंडरसन साहेबाकडे पाठविली होती ती त्याणी घेतली नाही. आमचा मजकूर खरा कीं लबाड चौकशी व्हावी त्यास आपण वाका विलायतेस पाठविला पाहिजे व आपणही खातरी करून घेतली पाहिजे म्हणोन खाशानी सांगितले. साहेब बोलले बरे वाका वाचून पाहून विलायतेस रवाना करू. पुढील वर्षी तात्यासोचे लग्न होणे आहे त्यास सरकारांत जकातीब॥ २८ हजाररुपये बाकी राहिली आहे म्हणोन सांगितले. त्याचे उत्तर सरकारात मुंबईस लिहून ऐवज देवितो म्हणोन साहेब बोलले.

तात्यासो याणी हरणे सोडून दाखविली नंतर साहेब खाशाचा निरोप घेऊन मुकामास गेले.

१ सातान्यास सालगु।। महाराज वारत्यातागाईत राजमंडळ म्हणोन गादी कायम राखोन कागदपत्री लिहीत होते त्यास हल्ली सातान्यास विलायतचा हुकूम आला कीं मुलगा आपासाहेब महाराजानी दत्तक घेतला तो कायम करावयाचा नाही सव राज्य खालसा करून कुंपणी सरकारताबेत आणून राज्य चालवावे व माहाराजाच्या राण्यास नेमणूक दरमहा अदमासे बारा हजार सातान्यास व कासीस बुवासाहेब महाराज याणी दत्त घेतला त्यास व बाइको आहे त्यास तेरा हजार रुपये दरमहा खर्चास द्यावे सातान्यास मुलगा घेतला त्यास काही नाही म्हणोन वर्तमान आहे.

१ मेहरबा अंडरसन सो। हे करवीरचे कामावर गेले त्याचे कामावर बेळगांवास येजंटाचे हाताखाली असिष्टण पोलिटिकाल एजंट मेहरबा म्यानसोन सो ब।। हे येणार आहेत म्हणोन इनवरीरिटीसोानी सांगितले.

२ फेब्रुअरी १८४९ : १ अगस्कुऱ्या घाटावर सरकारी छत्र आहे तो गांव करवीर इलाख्यातील तो गांव इकडे घेऊन मोबदला दुसरा गांव देणेचे केले आहे.

यादी दिनचर्या सु।। तिस्सा अर्बैन मयातेन व अलफ शके १७७० कीलकनाम संवत्सरे

३ फेब्रुअरी १८४९ : १ बापू आठवले हे सातारे इलाख्यात तारगाव पेटचास मामलेदारीचे कामावर होते त्याजवर बेहुशारीचा टपका येऊन बरतर्फ जाहले म्हणोन पक्के वर्तमान ऐकिले.

१. आज सुतकास अकरावा दिवस. स्नाने वगैरे करून श्री. रा. तात्यासो यांची सावत्र मातुश्री श्री. कैं. सौ. भा. माईसाहेब जकातवाडीची यांचे सांवत्सरिक श्राद्ध माघ शु।। ९ चे तें आज केले. (माघ शु।। ११ मदवार)

१. मिरजेस आण्णासाहेब मळ्यातील यांचे येथे अत्पागिरीस अग्न लागून दग्ध जाहली ऐसे ऐकिले वाईट गाष्ट जाहली शांतीहि करविली.

४ फेब्रुअरी १८४९ : १. सिवगिरी गोसावी हे कैं. मनसागिरीचे समाधीवर लिंगस्थापना करून अर्चा उदईक १३ सोमवारी (शु।। १३ रविवार माघ मास) करणार यास्तव स्वारी यावी म्हणोन विनंति करावयास आले होते.

१. उदईक स्वारी मुहूर्ते कोकणात जाण्यास निघणार सबब गावातील सिष्ट सखंभट गाडगीळ वगैरा आले होते क्षणभर बसून ठिकाणी गेले.

१. गजेंद्रगडकर घोरपडे याजकडून कारकन आला आहे त्याणे विनंति केली जे हली इग्रजी सरकारातून विचारणा घोरपडे यास होत आहे की गजेंद्रगड हा गांव तुम्हास कोणी इनाम दिल्हा व कधी दिला येविसीचे कागदपत्र असतील ते दाखविणे म्हणोन त्यास आम्हाजवळ कागदपत्र नाहीत परंतु बहुत दिवसापासोन गांव आहे कसे करावे म्हणोन त्याचे उत्तर खाशानो सांगितले जे श्रीमंत पेशवे

बहाद्दर याणी गाव दिला बहुत वर्षे जाहली कागदपत्र दंग्यात व वाघाचे लढाईत वगैरे गेले म्हणोन.

५. फेब्रुअरी १८४९ माघ शु॥ १३ सोमवार.

१. आज खासा स्वारी वगैरे मुहूर्ते निघोन वाड्यातून श्री देवळांत येऊन राहिली.

१. अकरा घटका एकोणतीस पळाच्या मुहूर्तावर खासी ढाल श्रीकृष्णाबाईचे पलीकडे वाडीचे उत्तरेस मळीत दिली आहे व खासा डेरा आवळी बागेत दिला त्यांत रा. बिनीवाले व बारगीर मंडळी व लगी डंका वगैरे स्वारीचे सामान आहे.

५ फेब्रुवारी १८४९ : १. हुबळी लिंगायत अय्या आहे त्याणे अलीकडे दोन तीन वर्षे सुमार आडवी पालखी चालविण्याचा पाठ नसता चालवीत होता त्याविसी कुंडलगीकर संस्थानिक स्वामीची फिर्याद बेळगांव व मुंबई वगैरे ठिकाणी होऊन साहेबानी हुकूम दिल्हा जे सरकारी रस्त्यांत कोणास पाहिजे त्याने चालावे कोणी हरकत करू नये म्हणोन. नंतर हुबळीतच कोष्टी यांचा अय्या हा आहे तो रस्त्यातून चालणेचा सिरस्ता नाही. चालला असता सारे लिंगायत व अय्या यांस वाळीत पडते असे आहे. तेव्हा त्याणे सरकारातून मोकळीक चालणे विसी जाहली सबब तो रस्त्यातून जाऊ लागला तेव्हा लिंगायत यास वाळित पडून खटला जाहला आहे व लिंगायत अय्या हाहि मृत्य पावला तेव्हा ते सारे खटले उलगडले.

१. श्रीपादवाडीस श्रीचे सनिध पुढे घाट आहे त्याचे लगत उत्तरेस घाट मातीत नवा निघाला आहे कारण वाडीस कोणी येक ब्रह्मचारी आहे त्यास श्रीचा दृष्टांत जाहला की तू भिक्षा मागून त्या ठिकाणी उकर म्हणजे घाट निघेल म्हणोन. त्याप्रो त्याणे करून उकरले तेव्हा घाटाचा मुद्दा निघाला चांगला दगडी काम आहे. आणखी उकरीत आहेत.

१. श्रीमत गंगाधरराव नाना रास्ते यांची प्रकृत बिघडली होती ते आज प्रातः काली देवआज्ञा जाहले म्हणोन मिरजेचे मळ्यातील अण्णासो याजकडून वर्तमान आले फार वाईट गोष्ट जाली परंतु लग्न राहिले प्रतिकूळ जाहले.

१. श्रीमंत रा. केशवराव तात्यासो इचलकरंजीकर यांची थोरली पत्नी सौ. लक्ष्मीबाई आज पहाटेस देवाज्ञा झाली.

१. राजापुरास श्रीगंगा आली आहे अनयासे सिवरात्रहि आली आहे तेव्हा स्वारी पूर्वी राजापुराहून कोतवड्यास जावे असा बेत आहे.

७ फेब्रुअरी १८४९ : १. हैद्राबादेहून रुस्तुमदौला याणी सरकारात गिरेबाज खबुत्र जोडा येक पाठविला. कागदी आहे.

८ फेब्रुअरी १८४९ : १. रा. बाबाजी कृष्ण सहस्रबुद्धे हे आपले वडील मातोश्रीस भेटण्याकरतां धारवाडास गेले होते ते आज आले ते धारवाडास असते वेळी हल्याळ सांवराणीस जाऊन वाघाची लढाई झालेले ठिकाण पाहून तेथील नकाशा

घेऊन आले आहेत व त्या प्रांतो तळी मोठी मोठी आहेत त्यातील कमळाचे बी व आणखी जिनसाचे बी आणले आहे.

१. शहापुराहून बियाचे नारळ पन्नास आले आहेत.

९ फेब्रुअरी १८४९ : १. मोहनजो गयावळ हे आपले गावी गयेस जात आहेत त्यास सरकारातून निरोपसमई शालजोडी व नख्त खर्चास शंभर रुपये देण्याचे ठरविले आहे. आज निरोपसमई देऊन रवानगी करून देतील.

१. गयावळ याणे सरकारात लहान तोफ हातभर लांबीच्या असी एक जोडी नजर दिली.

आज स्वारीबरोबर सरंजाम जाणेची तयारी होऊन सारे जमा जाहले.

१. बारगीर ७५ १. सिलेदार १२५ १ तोफा २ लहान

१. कवाइती १५० १. गाडदी ७५ १. हत्ती १०

१. उंट ३० १. बाणाच्या कैच्या १ १. लगी डंका

१. हत्तीवरील हौदा १. ब्राह्मण मंडळी २. कारकून वगैरे ७५

१. किरकोळ सामान घोडी वगैरे १२५

१. खाशा ढाले पैकी ढाल

७. एकंदर मनुष्य व जनावरे मिलोन सरासरी
हजार बारासे सिवाय मंडळीबरोबर

१. खासा स्वारी १. तात्यासो १. भाऊसो

१. बाबासाहेब १ बापूसो १ श्री. सौ. बाईसो

१. सौ. आवडीबाई १ सौ. गंगाबाई

१. हरिहरराव दादा १ बळवंतराव फडणीस १ पुरुषोत्तमरावदाजी

१. कृष्णरावजी १ नरसिंगरावजी १ चिंतामण देशमुख राहिले (?)

१. गोविंदराव बिनीवाले १ चिटणीस १ रामजी नाईक भिडे

१. रामभाऊ सहस्त्रबुद्धे १ विनायकराव खाडिलकर १ भाऊ भावे कवाइती रिसाला

१. बाबाजी सोनी तोफखाना १ बाळ नाना जोसी

१. दादा कुंटे खासगी १ पोतनीस १ बाबाजी सहस्त्रबुद्धे वाकनीस

१. पागेकडील कारकून ३ बाबा फडणीस पागा १ वाटवे उपाध्ये

१. पुराणिकबावा १ नारायणशास्त्री १ वैद्यबावा

१. पतोजीबाबा १ रावजी लिमये मंगळवेढयाहून येतील.

१. गोविंदराव पालेकर

१. दाजीबा मंगलवेढेकर १ गंगाधरदाजी दिगर (?)

१. मोरोपंत बिनीवाले १ गोंदुनाना पटवर्धन (कऱ्हाड (?) मु॥ येतील.)

१. वासुदेवपंत फडके १ रावजी पटवर्धन पुढे गेले आहेत. अगसखुराचे कारकून.

१ भाऊ नेरलीकर यास स्वारी बरोबर येण्याविसी पत्र गेले होते त्याजवरून ते आज ऐतवडेचे मुक्कामी सकाळी आले.

१ भाऊ भावे याजवर सरकारची इतराजी होऊन ते निरोप घेऊन घरी सांगलीस राहिले. इतराजी होणेचे कारण त्याणी येक नरी म्हणोन आंध्र श्री (अंध स्त्री) ठेवली होती तिणे मेलिकटि सावकार सांगलीकर याचे गुमास्त्याशी व्यवहार केला सबब त्याजपासून शंभर रुपये भावे याणे घेतले सरकारात समजले असता पारपत्य भावे याचे न करता रुपये परत द्यावे म्हणोन आज्ञा जाहली असे असता रुपये न दिल्हे आणि निरोप द्यावा म्हणोन आग्रहाने बोलले सबब तुमचे कारण नाही म्हणोन आज्ञा होऊन निरोप दिल्हा रांडेस सरकारात पाहऱ्यात ठेवली होती. तिणे सरकारात गुन्हेगारी शंभर रुपये देऊन सुटन गेली

१ देशमुख चिकोर्डेकर याजकडील कारकून गणेशपंत फडणीस फडफर्मास घेऊन आले होते

भोजनोत्तर चिकोर्डेकर देशमुख येऊन चिकोर्डेस घरी स्वारी यावी म्हणोन विनंति करून गेले

१ स्वारी निघाली ती सरूडावरून सवत सुपली सिरगांव वगैरे खेड्यावरून मलकापुरास दोन घटका दिवसास आली. मलकापुरास गणेशपंत बापू तांबे कारभारी विशाळगडकर प्रतिनिधी याजकडील ते सिबंदी व गावकरी दहावीस स्वारानिसी एक कोस अदकोस कडवी नदीपर्यंत सामोरे येऊन भेटून बरोबरच होते वाटेत साखरपेकर गद्रे येऊन भेटले.

१ स्वारीचे पुढे बिनीवाले येऊन गावचे उत्तरेस आंबराई आहे तेथे कडवीचा व विशाळीचा संगम आहे तेथे जागा पाहून ढाळ दिली होती तेथे आली.

१ विशाळगडकर गं. भा. राधाबाईसाहेब ही वृद्ध बहुत थोर आहेत त्याजकडून फर्मासी जिन्नस सखारामपंत सुपनेकर कारकून घेऊन आले होते.

१ विशाळगडकर मामलेदार याणी गोटात आपलेकडील कारकून तरतुदीस ठेविला होता व लस्करचे भोवते स्वार व सिबंदीची घस्त ठेविली होती.

१ रस्ता अवघड डोंगरीरान व मजल मोठी सबब तोफखाना मागे दोन कोसावर अजमासे राहिला आहे.

१ रावजी लिमये आज मुकाम मजकुरी अस्तमानी आले

१ राजापुरास श्रीगंगा आली सबब आंबे घाटातून जाणेचा बेत राहून अणस-खुरा घाटाने राजापुरास जाणेचा बेत ठरला

१ सातारेकर महाराज याणी सालगु॥ दत्त मुलगा घेतला तो नामंजूर होणार असे वर्तमान पेशजी ऐकिले होते परंतु तसे नाही कायम होईल असे वर्तमान आहे

१ श्री. कै. महाराज छत्रपति बुवासाहेब कासीस होते त्यांची कन्या गोजराबाई ही कासीहून सातारियास माघ वद्य १ स आली.

१ विशालगडकर यास सालगुदस्त दत्त मुलगा दिल्हा ते समई त्याजकडे पाऊण लक्षाचा मुलुख होता त्यापैकी वरघाटी वीस हजाराचा मुलुख ठेविला बाकी कोकण प्रांत पन्नास हजाराचा त्यापैकी चवतीस हजार रुपये रोख वसूल करून खावे आणि सारा मुलूख खालसात करवीरकरानी केला व बंडाचे वेळेस खर्च बसला सबब तीस हजार रु. व दत्त मुलगा घेतला ते समई नजर पंचवीस हजार रुपये असे घेतले म्हणोन तांबे कारभारी याणी सांगितले

१ अइतवडयाहून मलकापूर कोस दहा.

१४ फेब्रुअरी १८४९ : मु॥ मांजरे इलाखा विशाळगड

१ खासा स्वारी वगैरे खाशी मंडळी राधाबाईसो प्रतिनिधींच्या भेटीस गेली खाशानी बाईपुढे लुगडे किंमत रुपये पंचवीसचे ठेऊन नमस्कार केला. राधा-बाईनीहि सर्वास लुगडे खण पोषाख दिले. स्वारी राधाबाईचा निरोप घेऊन निघाली ती डोंगर चढून मौजे मांजरे येथे आली तेथील कमाविसदार गोपाळपंत कानिट-कर यांनी भेटून फडफर्मास आणून दिली. सदरहू मुकाम कोस ५

१ आज वे. मू. विष्णुभटजी वैद्य सांवारे व गुंजुमामा हे सांगलीहून आले.

१ तोफखाना आज सकाळी मलकापुरास आला पुढे गाडे चालावयास वाट नाही डोंगररान चढउतार फार सबब हत्तीवर उंटावर गाडे मोकळे करून सामान आणविले

१ स्वारीचा मुक्काम मौजे माजरे येथे गावचे उत्तरेस कासारी नदीपलीकडे जाहला.

१५ फेब्रुअरी १८४९ : मु॥ अणस्कुरा घाट छत्र इलाखा करवीर पेटा पन्हाळा

१ अणस्कुरा घाटातील सरकारच्या (सांगलीकरांच्या) अन्नछत्राचे कारभारी वासुदेव रामकृष्ण फडके छत्रास यावे म्हणून भेटून विनंती करून गेले.

१ दोन प्रहर दिवसास स्वारी घाटास दाखल झाली छत्राचे वाड्यात व शेजारी घरे आहेत तिथे राहिली लष्कर गावचे ईशान्येस ओढा आहे तेथे उतरले.

१ खासा स्वारी व भाऊसाहेब संध्याकाळी चार घटका दिवसाचे सुमारे अणस-खरा गांवापासून एक गोळीचे टप्प्यावर घाटमाथा आहे. तेथे जाऊन श्री महादेव स्थान देवालय आहे तेथे जाऊन देवदर्शन घेऊन समुद्र दुर्बिणीतून पाहिला व घाट अवघड आहे तो व बावडा किल्ला दिसतो तो वगैरे पाहून देवाजवळ क्षणभर बसून अस्तमानी परत आली.

१६ फेब्रुअरी १८४९ : मु॥ अणस्कुराघाट

१७ फेब्रुअरी १८४९ : ”

१८ फेब्रुअरी १८४९ : ”

१ नाना पतकी अणस्कुरे घाटास असतात त्याणी आपले घरी स्वारी यावी म्ह. विनंति केली त्याजवरून अस्तमानी आली.

१ एकादसी सबब गावातील श्री विठोबा व रामचंद्र यांच्या दर्शनास स्वारी जाऊन आली.

१९ फेब्रुअरी १८४९ : १ मेहरबा इनवरारेटीसो याजकडून वट नंबरची थैली आली त्यात मुलतान शहर इंग्रजी सरकारानी हल्ला करोन घेतले म्हणोन

१ उदईक घाटाखाली स्वारी उतरून जावयाची सबब आज खटले काही रवाना केले.

२० फेब्रु १८४९ : मु।। रायपटण १ पहाटे कूच होऊन दहा घटका दिवसास अडीच प्रहरचे सुमारे रायपाटणास येऊन दाखल झालो गावचे दक्षणेस नदी आहे तिचे दक्षण तीरी मुकाम जाहला अणस्कुऱ्याहून सदरहू मु।। कोस ५·१ रत्नागिरीहून मेहरबा कोलस साहेब बहादुर माजिस्ट्रेट याचे पत्र आज प्रातःकाळी अणस्कुरास आले सरकारचे नांवे. त्यांत इंज्यानेबाची स्वारी आंब्याघाटाने यावयाची राहती करून अणस्कुराघाटाने येणार त्यास आपल्यास कळावे म्हणोन कलमी केले त्यास आपली स्वारी अणस्कुरास आली व राहणे जाहले ही गोष्ट आमचे जिवास लागली आम्हास ठाऊक नाही आम्हास इशारा बेळगावाहून आला होता त्याजवरून अंजनवेल व आंबेघाटास इशारा आमचा गेला आहे हाली इकडे वाटने येणे जाहले त्याजवरून खुसी जाहली आपणास येण्यास काही हरकत नाही विजयदुर्ग तालुकेचे मामलेदार यास बरदास्त राखणेविसी वगैरे हुकूम आजचे रोजी गेला आहे म्हणोन कालचे मितीचे आले.

१ गंगाधरपंत करमलकर हे अणस्कुरा घाट येथे पतकी आहेत त्याणी सरकारास फणस केळी व सुरण वगैरे दिले

१ भास्करभट जोसी हे ह्या भागातीलच त्याणीही वरीलप्रो जिन्नस भेट आणून दिला.

१ येसाजीपंत पळसुळे येथील देसाई याणी पिकाऊ फणस व केळी व गुळाची साय व सुरण भेट मु।। आणून दिले.

१ स्वारी मु।। स आल्यावर जेथे मुकाम होता तेथे नारळाचे झाड होते त्या नारळास नारळ हाते त्यास खाशानी व मडळीनी व बारगीरमंडळी याणी गोळचा मारून नारळ पाडले.

२१ फेब्रुअरी १८४९ : मु।। राजापूर प्रातःकाळी पहाटेस कुचाचा डंका करऊन दोन घटका रात्रीस स्वारीची तयारी करून स्वारी सूर्योदयाचे सुमारे निघाली ती सौंदळावरून राजापूरचे पूर्वेस पाव कोसावर उन्हाळे आहे तेथ आली तेथे बाग आहे व समुद्राची खाडी आहे त्याचे दक्षणचे अंगास उन्हाळे व गंगा आहेत बागहि तेथच आहे तेथे सावलीत उतरून प्रथम सर्वांनी उन्हाळेचे स्नान करून नंतर उन्हाळ्याचे पूर्वेस श्री गंगा वर लहानसा डोंगर आहे तेथ आहे. तेथे जाऊन स्नाने केली. गंगा गायमुखाने काही वाहात नाही परंतु कुंडांत आहे. तेथे खाशानी व सर्वांनी दक्षणा

ठेवली नंतर गावचे पश्चमेस बाग आमराई आहे तेथे स्वारीचा मुकाम जाहला राय-पाटणाहून सदरचा मु॥ सात कोस आहे ७

१ सर्व खासी मंडळी राजापूरचे नैऋत्येस पाऊण कोसावर धोपेश्वर महास्थान आहे तेथे जाऊन दर्शन घेऊन दक्षणा ठेऊन खाशी मंडळी एकादशणश करून आली.

१ अजम अहमदसो मामलेदार व जोगलेकर सिरस्तेदार वगैरे कचेरीची मंडळी येऊन नजर करून भेटून गेले.

१ वे. लक्ष्मणभट काळे गंगापुत्र येथील राहणार त्यानी नजर आणली.

१ भास्कर अनंत खोत शेंबवणेकर हे खाशांचे परिचित भेटून गेले.

१ वे. रा. केशवभट पाध्ये गुर्जर हे येथील राहणार कराडे याचे अंगावर समंध पूर्वी त्याचे लहानपणी येत होता स्वारी सन खमस अशरांत पायउतारा आली होती ते समई श्री धोपेश्वराजवळ केशवभटजी हे होते ते समई भटजीचे अगावर समंध आला होता तो वेद म्हणे व पुष्कळ बोले व त्याचे हाल होत तेव्हा खाशानी त्या समंधास विचारले तुम्ही या भटजीचे अंगावरून कशाने जाल तेव्हा तो बोलला कीं श्रीकृष्णाबाईचे उदक माझे अंगावर शिपडले म्हणजे जाईन म्हणाला. तेव्हा स्वारीबरोबर कृष्णोदक होते ते शिंपडले नंतर तो समंध अंगावरून गेला त्या अली-कडे त्यास मुले होऊन नालवंडेहि झाली तैं भटजीचे स्मरण खाशानी धोपेश्वराजवळ केले तेथे नव्हते भटजीस वतमान घरीं कळताच ते भटजी खाशाकडे येऊन नारळ ओल्या सुपाऱ्या फणस बदाम खडीसाखर वगैरे जिन्नस पुढे ठेऊन आशीर्वाद करून बसले आगत स्वागत बोलणें होऊन त्यास निरोप दिला.

१ मे. कोलस साहेब बहादुर माजिस्ट्रेट जिल्हा रत्नागिरी याणी येथील मामले-दार यांजवर मोठा टपका ठेविला कीं आपासो यांची स्वारी अणुस्करा घाटाने आली हे कसे कळविले नाही व तुम्हास आपासाहेबांनीं लिहिले असता तुम्हीं चौकीवर परवानगी कशी सांगितली नाहीं ? व आम्हास कसें लिहिलें नाहीं ? आपासो थोर सरदार त्याचे राहणे चौकीचे हरकतीमुळे चारपाच दिवस घाटावर राहाणे जाले फार गोष्ट वाईट जाहली म्हणोन रागे भरून टपका ठेवला आहे साहेब उदईक रत्नागिरीहून खाशाचे भेटीस येणार आहेत काल तेथून निघाले.

१ आज स्वारीचा मुकाम उन्हाळेजवळ बागेतच व्हावयाचा होता परंतु पाणी गोडे नाही सबब मुकाम मजकुरी मुकाम जाला.

२२ फेब्रुअरी १८४९ : मु॥ राजापूर प्रातःकाली खासास्वारी स्नानसंध्या आटपून श्री. सौ मा. बाईसो वगैरे व भाऊसो यांची स्वारी श्रीगंगेस जाऊन स्नानें करून गंगेची पूजा करोन खाशानी पुतळी व सर्वत्र खासी मंडळीनी दक्षणा ठेऊन स्वारी परत आली भाऊसाहेब याची स्वारी समुद्राची खाडी गावचे दक्षणेस आहे तेथे बंदर पाहावयास गेली होती आज भरती होती व मचवे व लहान बंदरबोटया भरून जिन्नस तांदूळ नारळ वगैरे जिन्नस येऊन सावकार लोकांचे वखारीत येत होता तो पाहून

नंतर बाबासाहेब काजी म्हणोन सावकार आहे त्याणे आपले वखारीत भाऊसो यास बलाविले सबब क्षणभर जाऊन बसून वखार पाहून त्याणे विडा दिला तो घेऊन परत गोटास आलो.

१ ठिकाणास स्वारी आल्यानंतर दर्शाचे ब्राह्मणाचे उदक सोडून भोजने जाहली काल येकादष्ण्यांचे ब्राह्मणास भोजनास बोलाविले होते.

१ तिसरे प्रहरी स्वारी खाशाची श्री धोपेश्वरास जाऊन श्रीचे दर्शन घेऊन आली श्रीचा मुखवटा पंचमुखी सोन्याचा आहे त्याचा फर्मा लिहून विठ्ठलंत चितारी याजकडून आणिला.

१ मे. कोलस सो माजिस्ट्रेट रत्नागिरीहून कचेरीसुद्धा मु॥ मजकुरी मडम मुलगी-सुद्धा आले आमचे लस्करचे उत्तरेस नजीक उतरले आहेत संध्याकाळी दोन घटका दिवसास साहेबाची मुलगी तीन वर्षांची आहे तो हवा घ्यावयास लस्करांत आली होती तो सौ बाईसो यांजकडे येऊन दोन शब्द हिंदुस्थानी बोलून गेली तिला खाऊ दिला.

१ आज फडफर्मास घेऊन मंडळी आली होती बितपर्सील.

१ राघो वामन शेवडे राजापूरकर सावकार.

१ विठ्ठलपंत बेडेकर गोवळकर

१ राघोपंत लेले राजापूरकर हे पूर्वी श्रीमंत पंतप्रधान बाजीरावसो यांचे जवळ शागिर्दीस होते त्याणी विनंति केली जे पूर्वी आपले वचन मला रोजगारास लावीन म्हणोन. त्याचें उत्तर काही केलें नाहीं.

१ बालप्रभु देसाई कातापूरकर

१ ठकार याजकडील मंडळी फर्मासी जिन्नस देऊन भेटून गेले.

१ काल रायेपाटणास गुलाब घोडा आजारी होता तो काल दोन प्रहरी तेथे मेला त्याचे सार्थक तेथेच करविले

१ आज संध्याकाळी अस्तमानी नादरगज हत्तीस सर्दीचे आजाराने खाली पडून चारसहा घटकाचे सुमारे मेला औषधी उपाय केले परंतु बचला नाही नदीत पुरला

१ नारायणशास्त्री आपले बहिणीचे घराहून आज आले.

१ सातगौडा खानगौडा पा॥ सांगलीकर यास स्वारी बराबर येणेविसी सांगितले होते त्याजवरून आज आला आहे.

१ उदईक ब्राह्मणभोजनाचा बेत गावांत भटआळीस रा. हरिपंत जोसी यांचे घरानजीक मोठेमोठे मांडव आहेत व शेजारी नदी आहे जागा विस्तीर्ण आहे सबब तेथे करविला आहे आज पाणी वगैरे जिन्नस तरतूद करविली आहे.

माघ व॥ ३० सह फाल्गुन शु॥ १ क्षयतीथ तेरा दिवसाचा पंधरवडा. शुक्रवार २३ फेब्रु. १८४९ मु॥ राजापूर.

१. प्रातःकाली तात्यासाहेब यांची स्वारी तयारी करून उन्हाळे वर जाऊन स्नानसंध्या करून तेथन मौजे विल्हेस वामन रामचंद्र दाते यांचे घरीं गेली. तेथे भोजन व मंडळीनी फराळ करून विडे घेतले. दाते याणी तात्यासाहेबास शेला पागोटे दिले. तात्यासाहेबानी दात्यांचे घरचे देवास एक रु॥ दक्षणा व गावातील दोन देव यास आठ आणे प्रो॥ येक रुपया व वामनाजी पंत याचे मुलास पाच रु॥ दिले व गावांत वे. मू. रा. गडबोले हे मोठे विद्वान यास येक रुपया दिला. तेथे रा. विठल महादेव दाते डोंगरकर हे आपले घरी येऊन साखरपाणी घेऊन जाणे म्हणोन विनंति करावयास आले. त्याजवरून डोंगरगांव वाटेवर व दाते गणेशवाडी सांगलीकडील तेथे सावकारी वगैरे करून आहेत. तेथील परिचयातील सबब येते समई त्याचे घरी जाऊन. मंडळी व सिलेदार वगैरे सर्वांनी साखरपाणी व फराळ करून विडे घेतले. त्याणी तात्यासो॥ यास शेलापागोटे दिल्हे. बेत फार उत्कृष्ट केला होता तेथून तीन प्रहरचे सुमारे स्वारी लस्करांत आली. कोस २.

१. आज ब्राह्मण भोजन जाहले. पंधराशे पात्र जाहले. पात्रावर चार पैसे प्रो॥ दिले व गावात घरटी रुर्वास चार आणे आठ आणे एक रुपया याप्रो॥ दिले. बेत सर्व उत्कृष्ट जाहला होता. ब्राह्मण संतोष जाले.

१. गावातील मंडळी फर्मासी जिनस घेऊन येऊन खाशास भेटून गेले. ते बित-तपशील १ अंताजीपंत शेंबवणे १ मुरारसेट सापळे १ भाटे गुजर वीस पंचवीस आसामी सावकार १ श्रीधर लाडजी अमीन कोड॥तील मुनसफ जात खत्री. १ बावासाहेब काजी खोत.

१. रा. कृष्णाजीपंत बेडेकर हे दामाजी शंकर भिडे यांचे घरी पुण्यास पहिले कारकीर्दीतील कारकून हे भेटीस जिन्नस घेऊन आले होते त्यासा मागील माहि-तीची बोलणी झाली त्यास खासे पंगतीस भोजनास बोलाविले होते.

१. मे. कोलससो॥ माजिस्ट्रेट हे मु॥ मजकुरी आले आहेत. त्याची भेट व्हावयाची होती परंतु ब्राह्मण भोजनाचे गडबडी मुळें जाहली नाही उदईक होत आहे.

१. खासा स्वारी व श्री सौ. मा. बाईसा॥ यांची स्वारी श्री गंगस जाऊन तेथे उभयतानी श्रौ गंगेस वायन दिले. दक्षणा पुतळी व लुगडे खण व मणी मंगळसूत्र व सौभाग्य वायन फणी करंडा वगैरे सामान सुधा दिले.

१. गावातील मंडळी आज खासे पंगतीस भोजनास बोलाविली हती.

१. गावातील मुसलमान मेणाची झाडे करणार. त्याणे काल येक गुलाबाचे फुलाचे झाड आणून नजर दिले. आज करण्याची कृत समजून घेणेस्तव आणून कसें हे पाहिले.

२४ फेब्रुअरी १८४९ : फाल्गुन शु॥ २.

१. खासा स्वारी कोलस साहेबास भेटून आली त्यास मेजवानीचे निमंत्रण केले.

१. श्री. सौ. यमाताई यास आज दिवसा अडीच प्रहर रजोदर्शन प्राप्त जाहले सबब बाईसो वगैरे बाइकामंडळी व बळवंतराव फडणीस येथेच राहणार. खासा स्वारी उदईक पुढे जाणार.

१. मु॥ मजकूरचे पेठेतील मुसलमान दारू करणार याणे अस्तमानी येऊन दारू केलेली लाऊन गेला.

१. कोलससाहेब येऊन मेजवानी घेऊन गेले. नंतर साहेबानी आपली मुलगी लस्करांत खाशाकडे पाठविली तिला सौ. बाईसाहेब यांजकडून चिरडी खण व दाईस देहनगी देऊन निरोप दिला.

१. आज चांदरात्र सबब सिरस्तेप्रो पांच तोफा रात्रौ केल्या.

२५ फेब्रुअरी १८४९ : मु॥ विलवडे.

१. स्वारी भोजनोत्तर तात्यासाहेब व भाऊसोसुद्धा निघाली ती तीन प्रहरचे सुमारे मु॥ मजकुरी दाखल जाली. मुक्काम कोस ५. वाट अवघड. मध्ये गाव नाही पाणीहि नाही.

१. कै. रामचंद्र कराडा ब्राह्मण पेशजी सांगलीस सरकारात भाकरी करावयास होता त्याचे घर मौजे वाटले विलवडेपासून कोसभर पूर्वेस आहे तेथे त्याचे घर. त्याचे मुलाने व बायकोने भेट भाजीपाला घेऊन आली त्यास ३ रु. देऊन निरोप दिला.

१. सांगलीहून पत्र आले त्यांत श्री. रा. रामचंद्रपंत आपासो जमखेंडीकर याणी आपले दुसरे लग्न माघ स केले. कै. रावजी दीक्षित सांगलीकर यांची कन्या बारा वर्षाची होती ती केली म्हणोन लि॥ आहे.

२६ फेब्रुअरी १८४९ मु॥ पाली पीलसावंताची वाटेस गांव लांझे ३. आणभरी वरून २॥. पाली २॥. कोस ८

१. भास्करपंत जोशी गणेशवाडीकर यांचे बंधु रावजी जोसी हे गणेशवाडीहून मुद्दाम खाशाचे भेटीकरता मु॥ मजकुरी आले विनंति केली. त्यातील हशील भास्करपंत आपास मिरज दौलतीचे कारभाराचे चौकसीकरता पेशजी मिरजेहून कैद करून बेळगावास नेले होते. तेथे गेल्यानंतर श्री. बाळासो मिरजकर हे बेळगावास येऊन दौलतीची मुखत्यारी घेऊन मिरजेस निघाले. आण्णाची चौकसी काही न करिता पन्नास हजार रुपये दंड व पाच वर्षे कैदेत ठेवावे असे ठरून मुंबईस साहेबाचा रपोट जाणार. आण्णास मात्र मिरजेस प्यादे बरोबर पाठविले आहेत. साहेब बेळगावाहून मुंबईस गेल्यानंतर तिकडून उत्तर आले म्हणजे मग सदरीप्रो मिरजेस बाळासो पन्नास हजार रु॥ घेऊन पाच वर्षे कैदेत ठेवणार असे आहे.

२७ फेब्रु. १८४९ : मु॥ कोतवडे वाडा.

गावण सरकारी ठिकाणांत.

१. कोतवड्यास येताच श्री महालक्ष्मीचे दर्शन घेऊन स्नाने करून स्वारी श्री

कुसुमेश्वर अर्ध कोस आहे तेथे दर्शनास गेली स्वारी गावणवाड्याचे पश्चमेस डोंगराची घाटी आहे ती चढून ढोकंबळे वाडा कोतवाड्यातील दीड कोस आहे तेथे समुद्र आहे तेथे जाऊन समुद्रस्नान केले. परत ढोकंबळ्यास गणपतराव केळकर खोत मौजे कोतवडे यांचे घरी जाऊन स्वारी घटका रात्रीस परत आली.

१. कोतवडेकर सहस्रबुद्धे वगैरे खोत मंडळी व रावजी पटवर्धन व कृष्णाजी पंत तात्या रोटे पटवर्धन हे श्रीलक्ष्मीपर्यंत गोलीचा टपा आहे तेथपर्यंत पुढे आले होते. पालीहून सदर मुकाम कोस ८.

२८ फेब्रु. १८४९ : मु॥ गावाण वाडा.

सरकारी ठिकाणांत.

१. खासा स्वारी भोजनोत्तर कोतवडेकर खोत मंडळी यांचे घरी जाऊन खोत याचे घरचे उपाध्येपणा सबब त्यास नारळ देऊन आसीर्वाद करून येतेसमई गावण वाड्याचे दक्षणेस खाडी समुद्राची आहे त्या ठिकाणी महांगिऱ्या आहेत तेथे जाऊन अस्तमानी परत आलो. खोत मंडळी बि॥.

१. विनायकपंत घारपुरे वाडी घारापुरी.

१. दाजीबा घारपुरे वाडी घारपुरी

१. सहस्रबुधे वाडा नवेदर

१. विनायकपंत मोने वाडा लावगन.

श्री धरणकरी देवी म्हणोन लावगण वाड्याचे दक्षणेस आहे तिचे दर्शन घेतले.

१. रत्नागिरीहून मामलेदार याजकडून बरदास्तीकरता तीन आसामी चपरासी आले आहेत खाशास येऊन भेटले.

३ मार्च १८४९ : १. कै. बापूशास्त्री आगासे रत्नागिरीकर यांचे चिरंजीव वे. रामचंद्रशास्त्री आगासे हे काल खाशास भेटून आसीर्वाद करून गेले त्यास संभावना २ रु. दिले.

१. खासा स्वारी व भाऊसो यांची स्वारी आज रत्नागिरीचा किल्ला पाहावयास जाणेचा बत होऊन तिसरे प्रहरी स्वारी केळेमाजगाववरून गेली.

१. बाबाजी सोनी आज सांगलीहून आले आहेत.

४ मार्च १८४९ : १. श्री महालक्ष्मी कोतवडे येथील ती मूर्ती पाषाणाची आहे. तिचे नाक प्रापचेसकरणात (?) पडून मोडले होते हली स्वारी आल्यानंतर देवीस कौल लाऊन तिची आज्ञा घेऊन बरोबर कारागीर आहेत त्याजकडून नीट करविले.

५ मार्च १८४९ : १. प्रातःकाळी तात्यासो. बाबासो. व श्री. सौ. मातुश्रीबाई सो. वगैरे सर्व मंडळी समुद्रस्नानास गेली होती. स्नाने करून ढोकमलयास गणेशपंत केळकर यांचे घरी फराळ करून दोन प्रहरा परत आली.

१ मार्च १८४९ : १. स्वारी गावात खोतांचे घरी जाऊन आसीर्वाद करून आली.

१. उमरवाड्यात.

१. बापू खासगी १. रघुनाथ पांडुरंग.

१. गावणवाड्यांत

१. कासीनाथपंत १. बाळाजी दामोदर

१. भास्करपंत

२ मार्च १८४९ : १. खाशानी महालक्ष्मी व कुसुमेश्वर यांची महापूजा केली एक पुतळी, लुगडे खण सेला पागोटे वगैरे दाखल्याप्रो ठेवली.

१. समाराधना १२०० ब्राह्मणांचो केली. २ आ।णप्रो दक्षणा दिली.

१. आज गावातील गुरव याणी खाशाकडे येऊन दोन प्रहरी टिपऱ्या व गाणे म्हटले व रात्रौ पोऱ्याचा नाच कसया (?) म्हणोन केला.

छ ९ रा। खर फा। मास सोमवार

१ खासा स्वारी व भाऊसो। यांची स्वारी आज तिसरे प्रहरी रत्नागिरीहून आली.

१ सांगलीहून पत्र आले त्यांत हंशील–श्रीमंत रा. लक्ष्मणराव आण्णासो मिरजकर यांची कन्या श्री. रा. बाळासाहेब रास्ते यांचे पुतण्यास द्यावयाचे ठरून लग्न फाल्गुन शु।। ४ सोमवार इचलकर्जी मुकामी जाहले येथून आहेर देऊन रा. बापू लागू यास पा।। होते त्यास शेला पागोटे रास्त्यानी मात्र दिले ब्राह्मण भोजनाची बडाळी फार जाहली. सावली नव्हती. दक्षणा दोन्हीकडील मिलोन आठ आणे दिली दोनचारसे ब्राह्मणास अेक रुपया प्रो दिला एकंदर ब्राह्मण दहा हजार अजमासे जाहले लग्नाचे दिवशी गृहप्रवेशाचा मुहूर्त होता याजमुळे गृह प्रवेश जाहला साडे वगैरे गुरुवारी सप्तमीस जाले, वाड्यातून गृहप्रवेशास बाहेर येते- वेळेस मंडपाचे तोरणास दिवटी लागोन नारळ खाली पडला बाळासो। रास्ते यांचे बोलण्यांत आपासो। याणी सांगलीहून वे. रा. गोपीनाथदादास पत्रे याजमुळे लग्नाचा योग जाहला एरवी मनांत नव्हते. सौ. यमुनाबाईस स्वारीबरोबर नेली हे नीट केले नाही म्हणोन बोलत होते म्हणोन वगैरे लिहिले आहे.

१ मे. जरव्हिस सो।बहादुर याणी दुमी बकरीचा कळप केला होता त्याचा खर्च फार होऊ लागला सबब त्याणी इकडे द्यावी हे मनांत आणून आनंदा माने बारगीर याचे हवाली इकडील वकिलाचे विद्यमाने केली ती सुमार ९२५ सवानऊशे त्यापैकी दोनशे मेहरबा रवीससो। बहादुर हे हल्ली पुण्यास एजंटीच्या कामावर आहेत त्याणी घेतली बाकी पैकीं शेपन्नास मयत वाटेने जाहली बाकी सहाशे सुमारे सांगलीस माने हे घेऊन आले म्हणोन आज पत्र आले व जरव्हिससाहेब यांचेहि पत्र आले आहे.

१ सदरहू बकऱ्याचें कामावर साहेब याजजवळ रा. बाळकृष्ण हरी वाडकर हे

होते ते हल्ली रिकामे सबब आम्हास चाकरी येथे मिळावी या हेतूते त्याणी खाशास पत्र लिहिले तें आले आहे.

१ सांगलीस बाजारात एक घर खाटकाचे होते ते दग्ध जाहले तें विज्ञवलें म्हणोन पत्र आले आहे.

१ मे. अंडरसन सा। यांचे पत्र आले त्यांत सिक लोकांची इंग्रजी सरकारची लढाई जाहली त्यात सीक लोक पळोन त्याजकडील तोफा इंग्रजी सरकारानी बहुत घेतल्या त्याजबद्दल इंग्रजी सरकारचे छावणीवर दर छावणीस एकवीस तोफांचे बार केले म्ह. कळविले आहे

१ मे. इनव्हिरारटी साहेबांचे पत्र आलें त्यांत इंग्रजी सरकारातून शाळा बांधून शाळा घालावयाची आहे त्याजबा। आपलेकडून काय मदत होईल ते कलमी करावे म्हणोन.

१ श्रीमंत मातुश्री लक्ष्मीबाई प्रतिनिधी कराडकर हे हल्ली किनईस आहेत व त्यांचे दत्त चिरंजीव सातारेस आहेत बाईची भेट व्हावी हे खाशांचे मनात बहुत दिवस. त्यास स्वारी कोकणातून कुंभारले घाटाने जाणार ती कराडास जाऊन पुढे पंढरपुरास जाणेचा बेत. यास्तव प्रतिनिधीचे वकील दादोबा पटवर्धन हे सातारेस असतात त्यास पत्र सरकारातून पाठविले होते. त्याचे उत्तर आज आले त्यांत हसील. स्वारीचा मजकूर बाईस कळविला बहुत संतोष जाहला भेटीचा योग व्हावा हे बाईच्या मनांत सबब बाईचे आज्ञेवरून मे. रसीदंटसाहेब यांस कळऊन त्याचा हुकूम घेऊन ठेविला आहे स्वारी कराडास कोणचे तेरिखेस येणार हे लिहिण्यात आले म्ह॥ त्या बेताने रावसाहेब बाबासाहेब यांची स्वारी कराडास येईल म्हणोन लिहून आले

१ स्वारी रत्नागिरीस मंदवारी गेली तेथील वर्तमान

१ स्वारी मंदवारीं दोन प्रहरी निघाली ती खाडीस भरती आल्यामुळे केळेवरून मिर्जोलीस जाऊन तिकडून रत्नागिरीस चार घटका दिवसास जाऊन पोवली मामलेदार याणी स्वारी उतरावयास जागा ब्राह्मणाचे घरी केली होती परंतु जागा नीट नाहीं सबब वे. मू. रा. बाळजोशी नामजोशी याचे घरी आगरांत स्वारी राहिली रा. मामलेदार परभारे खाशाकडे दाहा पांच मंडळी कामगार सुद्धा येऊन भेटन फर्मास ठेऊन क्षणभर बसून ठिकाणी गेले. वाळ्याचा एक पंखा दिला

१ रविवारी स्वारी कलकटर सो याची भेट घेऊन कोतवड्यास येण्याचा बेत परंतु अदितवारी भेट होणेची नाहीं सबब तें दिवसीं राहणे जाले स्वारी भोजनोत्तर रा. विष्णु भिकाजी फडके सावकार व रा. बाजी बलाळ यांचे घरीं जाऊन मंडळींनी साखरपाणी घेतले व अदालतीचे शिरस्तेदार यांचे घरीं जाणें जाहले होते. खाशास शेला पागोटे दिल्ही नंतर स्वारी रत्नागिरीचे किल्ल्यावर जाऊन किल्ल्यातून श्री देवीचे दर्शन घेऊन बसणे जाले तेथे गुरव याचे अंगात देवीचा

आसर आला होता त्या समई जवळचे गुरव वगैरे मंडळी होती त्याणी श्रीस प्रार्थना केली जे आपासोा त्यांजवर कृपा असावा त्यांचे कल्याण असावे बरे आहे कल्याण होईल म्हणोन (त्या अंगात आलेल्याने) सांगितले नंतर श्रीचा प्रसाद नारळ घेऊन स्वारी निघाली ती येते वेळेस सदर अमीन शेणवी याचे घरी जाऊन विडा घेऊन स्वारी ठिकाणास आली गावातील सिमग्याचे खेळ वगैरे आले होते त्यासहि काही रुपये दिले सदरअमीनाची मुलगी अगावर दागिने घालून आठ वर्षांची होती ती आली होती.

१ सोमवारी प्रातःकाळी मामलेदार हे येऊन खाशास खबुत्राची जोडी दिली स्वारी भोजनोत्तर मेहरबान कलकटर सोा यांचे बंगल्यास जाऊन घटकाभर बसणे जाहले आगत स्वागत बोलणी जाहली साहेबानी हत्ती व घोडी फेरून दाखवावी म्हटल्यावरून फेरून भाले वगैरे दाखविले व हत्ती दाखविले नंतर साहेबानी निरोप दिल्हा स्वारी निघाली ती सिरगांवावरून तीन प्रहरचे सुमारे कोतवडेस दाखल जाहली गावातील सिष्ट ब्राह्मण भेटीस आले होते त्यांस संभावना योग्यते प्रोा दिली.

१ आज पहाटेस श्री गणपति पुळे येथील याचे दर्शनास मुहूर्त सोा अस्तमानी कुचाचा डंका करऊन चार घटका रात्रीस स्वारी निघाली ती मध्यरात्रीचें सुमारे श्री गणपति जवळ येऊन दाखल जाहली खाशानी व तात्यासोा याणी पुतळी प्रोा दक्षणा ठेवली वरकड खाशा मंडळीनी एक रुपया प्रोा दक्षणा ठेवली दर्शन घऊन समद्राचे दर्शन घेतले व दक्षणा ठेऊन रात्रौ सर्वत्र मंडळीनी श्रीचे धर्मशाळेंत निद्रा केली मु।। कोस ३

६ मार्च १८४९ मु।। पुळे : १ प्रातःकाळीं स्नानसंध्या पूजा वगैरे आटपल्यानंतर मेण्यात बसून समुद्राचे कडेने स्वारी हिंडून येंऊन संकल्पविधाने खाशानी श्री सौ बाईसाहेबसुधा स्नान करून पूजा करून दक्षणा ठेऊन नंतर श्रीगणपतीची पूजा केली.

१ खासा स्वारी मात्र श्रीचे दक्षणेस धर्मशाळा आहे तेथे राहिली बाकी तात्यासोा वगैरे सर्व मंडळी श्रीचे मागे पुळचा नजीक आगरात राहिली.

१ विठलपंत आणा शेणवी महालकरी व लक्ष्मणपंत सिरस्तेदार माळगुंडकर वगैरे मंडळी खाशाकडे येऊन फडफर्मास ठेऊन भेटून निरोप घेऊन गेले

१ तिसरे प्रहरी हत्ती सारे समुद्रात नेणे करितां घातले होते ते पाणियांत शिरले नाहींत. भिऊन मागे सरून पळून गेले नाहींत

१ स्वारी तिसरे प्रहरी गावांत बापू कोलटकर याचे घरी जाऊन आली

१ स्वारी कराडास गेली म्हणजे श्री रा. पंतप्रतिनिधीस ढाल तरवार देणेची तयार करून सांगलीस ठेवली होतीं ती देशमुख यास लिहून आणविली

१ उदईक ब्राह्मण भोजनाचा बेत होता सबब आसपासचे गावचे शेदोनशे ब्राह्मण जमले होते त्यास भोजनास दोन प्रहरी व संध्याकाळी घातले

१ वासुदेवपंत रावजी जोशी (भास्करपंत हिपरगीकर यांचे बंधु) याच्या विनंतिवरून मे. गौरनर सो। यास मुबईस पत्र लिहिले त्यातील हशील – चौकशी करावी म्हणत असता न करून दंड केला त्यास ते पदरचे त्यांचे आजे कै. बाळाजी गणेश जोशी याणी आमचे मातुश्रीची सेवा केली त्याजकडून सरकारी कामे मोठी जाहली आहेत तर त्याजकडील हिसेबाची चौकशी पुरी करून मग जे लागू होईल ते देण्यास कबूल आहेत तर मेहरबानानी एजंट साहेबास हुकुम द्यावा म्हणोन

१ मे. कलकटर सो। याणी रत्नागिरीहून दुर्बीण पाहावयास पाठविली होती ती परत पत्रासहित पा। दिली.

१ परवाचे रात्री व आजचे रात्री लष्करांत व श्री देवाजवळ वाघाची चाहूल जाहली होती

१ वे. अनंताचारी यास कोतवडे मु।। ज्वरांश जाहला होता तो हल्ली बरा आहे

७ मार्च १८४९ : १ खासा स्वारी तिसरे प्रहरी नेवरेस मंडळीचे निमंत्रणावरून गेली होती. पांच घटका रात्रीस आली

१ श्रीधर नाईक देसाई कोलटकर याचे तीर्थरूप बाळकृष्ण पंत भाऊ यांचे घरी

१ कै. मोरो वासुदेव कोलटकर देसाई यांचे घरी. त्याचे पुतणे रा. बापू देसाई हे होते

१ सदाशिव महादेव कोलटकर देसाई

१ खेर कुलकर्णी कराडे

फाल्गुन शु।। १५ गुरुवार शिमगो पौर्णिमा ग्रहण पहाटेस चार घटका रात्रीस लागते उदईक लागून मावळते सबब उपोषण.

ता. ८ मार्च १८४९ मु।। पुळे नजीक श्री गणपति.

१ बाळकृष्ण पंत भाऊ कोलटकर देसाई याणी आपले घरी नेवरेयास कारभारी वगैरे मंडळीस भोजनास बोलाविले होते सबब जाऊन आली.

९ मार्च १८४९ : १ पहाटेस चार घटका रात्रीस ग्रहण लागले सबब सर्व खाशा मंडळीनी समुद्रस्नाने केली तिळपात्र व गोप्रदाने खाशानी दान दिल्हे नंतर चंद्रअस्त ग्रहणसुधा जाहला चार घटका दिवस आले नंतर पुन्हा मुक्तरूपाने समुद्राची (स्नानें) मंडळीनी करून स्वाऱ्या ठिकाणी आल्या.

१ आज गोप्रदान दिले त्या समई येथील माहितगार याणी सांगितले जे गावचे जोसी यास देणेचा सिरस्ता आहे त्या प्रो। त्यास द्यावे म्हणोन परंतु श्रीचे पुजारी गावातील बापट भटजी याणी अडथळा केला कीं जोसी याणी गावात मात्र जोसीपणा करावा. श्रीजवळ व समुद्राचा अधिकार आमचा आहे आम्हास गोप्रदान द्यावे.

तेव्हा विचार करून उभयतासहि दिल्हे नाही मनसोतिष्ठ उदक सोडून ज्यास देणेचा सांप्रदाय असेल त्याचा शोध करून द्यावयाचे. मुक्तस्नानाचे पूर्वी श्री. रा. तात्यासाहेब व भाऊसो वगैरे मंडळी समुद्राचे वाळवंटीत मृदंगपाट वगैरे सर्व मंडळी घेऊन खेळ खेळले. रा. महादेवभट रानडे रत्नागिरीकर हे श्री. कै. गंगाधरराव काकासो यांची दुसरी पत्नी कै. सौ. उमाबाई काकू (कै. बाबूराव गोखले यांची कन्या) तिचे बहिणीचे पुत्र हे खाशाचे भेटीस आले होते.

१० मार्च १८४९ : आज समुद्रस्नान झाले. कोतवडे येथील वृत्तीसंबंधे खटला तुटावयाचा. त्या विसीचे कागदपत्राचे मसुदे कृष्णाजीपंत रोटे यागी केले. खाशानी पाहून दिले. श्री. बाईसाहेबानी गणपतीचे पर्वतास एकवीस प्रदक्षणा घालण्याचा बेत करून आज चार घातल्या. प्रदक्षणा अर्ध कोसाची आहे. आज ब्राह्मण गावोगावचे आले होते त्यास भोजनास घातले. श्री. कै परशराम गणपतराव भाऊसो तासगावकर हे सालंगु।। वारले त्यांची पत्नी गरोदर होती ती तासगावास फाल्गुन शु।। ११ इंदुवारी प्रात:काली प्रसूत झाले पुत्र झाला त्या विशीची पत्रें घेऊन हुजरे आले आहेत. खाशास कळवावयाचे परतु परवाचे दिवशी श्रींची महापूजा व समाराधना व्हावयाची सोयेर सबब कळ विली नाही. आजचा सहावा दिवस.

११ मार्च १८४९ : खासा स्वारी दाजी भट शेंडे पुराणिक व सखंभट भिडे अग्निहोत्री यांचे घरी जाऊन आली. रात्रौ पोरे याचा नाच दुसरे आले होते त्यांचा करविला. बराच जाहला. बारा घटका रात्रपर्यंत झाला.

१२ मार्च १८४९ : ब्राह्मण भोजन लष्करांतच आंबराईच्या सावलीत १५०० पात्रझाले दोन आणे प्रो दक्षणा दिली. तिसरे प्रहरी गणपतीचा छबिना मिरवला स्वारी पाय उतारा होती बरोबर छबिन्यांत स्वारीबराबरच्या कलावंतिणीही होत्या रात्रौ खाशानी स्वत: महापूजा केली दक्षणा व पूजा साहित्य व सवाशे रु.चा पोषाक दिला. श्रीकडील उपाध्येपण बापट पुळेकर याचे असता दुसरे वे. मू. शंकरभट बापट हे आम्ही चौथाई हिसेदार म्हणोन स्वारी आल्यापासोन येकंदर वहिवाट करीत होते आज बाकी ब्राह्मणानी अडत घालून आम्ही अनुष्ठानास वगैरे येत नाही आमची वृत्ती बुडती आहे म्हणोन अडून बसले. खाशानी सारे उत्पन्न शंकरभटास पावले होते ते परत आणून घारोपंत कोल्हटकर देसाई नेवरे व बाळकृष्ण पंत या जवळ ठेवले व बापटांचा वत्तीचा कज्जा तुटल्यावर ज्याचे ठरेल त्यास द्यावे असे ठरविले. रात्रौ श्रीपुढे नाच जाहला

१३ मार्च १८४९ : श्री. रा. महाराज छत्रपती शिवाजी महाराज करवीर यांची वहीण बाळाबाई आक्का यांचे लग्न व।। ५ बुधवारी वर रा. नारायणराव घाटगे सर्जेराव यास नेमस्त केली आहे म्हणोन लग्नपत्र घेऊन विठ्ठल रायाजी चिटणीस कारकन आले आहेत सरकारची भेट जाहली. श्री. गणपतीच्या मुर्ती मृत्तिकेचे ठशा च्याकरून रंगऊन रत्नागिरीस पाठविल्या पत्रसहित. वासुदेवराव सदर अमीन

केशवशेट तांबट. श्री गणपतिमहाराज पुळे येथे श्री. कै. चिमणाजी रघुनाथ पेशवे याणी नगार खाना वगैरे इतमाम ठेविला आहे तो अद्यापपर्यंत इंग्रजलोक चालवीत आहेत पगार वगैरे नेमणूक रत्नागिरीहून येत असती दरमाहा ऐसी रुपयेचा खर्च आहे तेथील अधिकारी आबा नाइक खरे जामदार यास शेला पागोटे खाशानी दिले. रत्नागिरीहून येथे श्री गणपतिजवळ कारकून उबीवर रा. भाऊ खरे असतात त्यास शेला पागोटे दिले.

१४ मार्च १८४९ : पुळ्याहून मुक्काम हलून वाटेत स्वा. नेवऱ्यास विनायकपंत भाऊ बर्वे याजकडे जाऊन आली हे बर्वे नेवऱ्याचे मोकादम. याजकडे द. म. २०० रुपयावर रत्नागिरी सुभ्याची मामलेदारी होती आता बदली होऊन नगर सुभ्याच्या दप्तरदारीवर बढती झाली आहे द. म. ३०० रुपयावर. त्यांच्या बागेतील गज सवा गज उंचीच्या आंब्याच्या कलमाना आंबे लागले आहेत ! नेवऱ्याची घाटी चढून कोतवड्यास १२ घटका दिवसास स्वारी दाखल झाली. कोतवडे येथील ठिकाणात रोटे याचा व सरकारचा कज्जा होता तो तुटक होऊन उभयतांची याद मान्यतेची व खोत व देसाई वगैरे गावकरी यांची साक्ष जाहली. आज अठरा घटका दिवसानंतर आपले निम्मे हिस्सेचे ठिकाणात घर बांधावयाचे त्या ठिकाणी तात्यासो याजकडून मुहूर्त पायास दगड घातले. स्वारी पुळ्याहून निघतेसमई दाजीभट शेंडे पुराणिक यांस संभावना १० रु. दिले. गोविंदरावनाना पटवर्धन सांगलीहून आले त्यांच्या बोलण्यातील भाव. मिरजकर बाळासो हे बेळगावास जाऊन त्यांस अंडरसनसो याणी गौरनरसो याची थैली मुखत्यारीची होती ती दिली ती घेऊन मिरजेस येऊन आपले दौलतीचे काम आपण पाहू लागले. विनायक पंडित करवीरास गेले आहेत त्याजकडे तासगांवकर यांस पुत्र जाहला आहे तेथील काम मिळेल असे आहे म्हणोन.

१५ मार्च १८४९ : सांगलीहून पत्रें देशमुखाची आली त्यांत हसील. कृष्णराव बाबा विशाळगडकर याचे लग्न फाल्गुन व॥ ५ बुधवारी बाबाजी पाठक पुराणिक मांडवगणे राहणार सातारा यांची कन्या त्याजकडे आहेर पाठविला म्हणोन. करवीरास महाराजाचे वहिणीचे लग्न सबब पंडित कारभारी याचे पत्र स्वयंपाकाची भांडी प॥ देण्याविसी होते त्याजवरून पाठविली. रमाबाई घाटगे कागलकर याचे पुत्राचे लग्न महाराजाचे बहिणीशी. लग्न पत्रे घेऊन आपाजी सदाशिव मजमदार व हुजरे आले होते. त्यांजकडे अहेर पाठविला म्हणोन.

१५ मार्च १८४९ : तिसरे प्रहरी स्वारी गावांत खोत वगैरे यांचे घरी जाऊन आली. वे. रा. सदाशिव बाळशास्त्री वझे हे कोकणातील उपाध्ये त्याचे घरी जाऊन आले. गणपतराव वासुदेव सीलकर पटवर्धन हे मांद्रेस (?) होते ते फाल्गुन शु॥ १३ बुधवारी देवआज्ञा जाहली ते वर्तमान सांगलीहून आज आले.

१६ मार्च १८४९ : बापु शहापूरकर याचे पत्र शहापुराहून आले त्यातील हसील.

गौरनरसो। विलायतेस गेले त्यांचे कामावर ब्लेक साहेब मुंबईस आले त्याजकडे उत्तर प्रांतची रेव्हेन्यू कमिशनरीचे काम होते त्या कामावर शाव साहेब गेले व बेसल (ठोसन ?) सो हे वर्षाप्रो कर्नाटकात रिव्हीन्यू कमिशनरीचे काम पाहावयास आले आहेत म्हणोन. अष्टे गांव जप्त होऊन इंग्रजी खालसा अम्मल जाहला म्हणोन. मेहरबा म्यानसनसो याचे पत्र आले त्यांत राजा सिरसिंग सिक याचे फौजेची व इंग्रज सरकारचे फौजेची लढाई होऊन राजा सिक पलोन गेला त्याबा। एकवीस तोफाचे बार केले म्हणोन.

१७ मार्च १८४९ : सांगलीहून कै. गोविंदसिंग याची बाईको रमाबाईचे पत्र आले त्यांत सरकार आज्ञेप्रो इचलकर्जीचा मुलगा दत्तक फाल्गुन शु।। ३ रविवारी शके मजकुरो घेतला नांव रघुनाथ सिंग ठेवले साखर पाठविली आहे. श्री रा. भाऊसो व काही मंडळी धोकले नजीक महांगिरीत बसोन कोस दीड कोसपर्यंत समुद्रात गेली होती. कोकणातील वृत्ति सरकारची उपाध्येपणाची त्याविसी श्रीमंत रा. चिंतामणराव आप्पासाहेब व कृष्णाजी नारायण पटवर्धन या उभयतांचा विचार होऊन दोन यादी वाटणी व ठरावाच्या केल्या त्या रा. अंताजीपंत सरदेश कुळकर्णी मौजे मजकूर याचे हातच्या लिहून त्याजवर खाशानी निशाणे केली व खाशानी व कृष्णाजी नारायण याणी खाली सह्या केल्या व चिकटबंदावर भोर्तब सरकारची दोन दोन प्रो जाहली. कृष्णाजी नारायण याणी दोन भोर्तबमध्ये आपले नाव लिहून खुण केली आहे या प्रो कारभार उलगडला व देशमुख कोलटकर बापू व सहस्त्रबुद्धे खोत याच्या साक्षी उदईक घालावयाच्या. सदरहू यादी पुरत्या आज साडेचार घटका रात्री उपरांतिक जाहल्या मुहूर्त चांगला होता.

१८ मार्च १८४९ : कोलटकर देसाई व सहस्त्रबुध्धे खोत व मोने खोत व घारपुरे खोत व केळकर खोत असे बारा वाड्याचे येकंदर ब्राह्मण मंडळी यास भोजनास बोलाविले होते. ते आले होते. येथील माती चांगली स।। माती भिजवून कुंभार यास आणऊन काही मडकी करऊन पाहिली. बरी होतात.

१९ मार्च १८४९ : मु।। कोतवडें. काल रात्री नेवरेकर कोलटकर देसाई वगैरे आले होते त्यास निरोप दिला. निरोप समई शेला पागोटी दिली बि।। नारो भास्कर देसाई १ रामचंद्र अनंत देसाई १ नारायण वासुदेव बर्वे मोकादम १ अंताजी गंगाधर देसाई १ अंताजीपंत भाऊ खरे देशकुळकर्णी. गोवलकोटाहून काल कर्जाईचा अंगारा व नारळ तेथील मुसलमान खोत याणी पत्र सहित प।। त्याचे उत्तर गेले. सांगलीहून पत्र आले. त्यांत रामजी आतारी गवई यास दुखणे येऊन वारला म्हणोन. गावणवाड्यातील ठिकाणाची वाटणी होऊन घर बांधणेस प्रारंभ जालाच आहे व बाग आहे तिची वाटणी आज करून दक्षणेकडील हिस्सा इकडे सरकारात हवाली करून घेतला. कृष्णाजीपंत रोटे याचे घरचे बाइकामुलांनी कधी कलावंतिणीचा नाच पाहिला नाहीं. सबब रमा व गुलाबी याजकडून नाच तिसरे प्रहरी करविला. वे. रा.

सखारामभट लावगनकर वैद्य हे खाशास भेटावयास आले होते. त्याणी रससिंदूर व हेमगर्भ मात्रा आणिली होती. ती पाहिली परंतु सरकारात सिलकेस आहेत. सबब परत दिल्या. ते गेले. श्रीमहालक्ष्मीची पालखी आज शिमग्याब॥ बारा वाड्यांत जाऊन खोत यांचे घरी जाण्याचा पाठ त्या प्रो प्रथम गावणवाड्यात बाळाजी दामोदर वगैरे खोत यांचे घरी आली होती. तेथे त्याणी श्रीची पूजा करावयाची त्या समई श्री. रा. तात्यासो। याणी जाऊन पूजा सांगून उपाध्येपणाचे आमीष घेऊन आले.

२० मार्च १८४९ : मु॥ वेळें. १ स्वारी अस्तमानी साहा घटका रात्री केळच्यास आली. रा. वासुदेवपंत भावे खोत वाडाज़ना हे खाशाकडे येऊन भेटून गेले. अंध आहेत. पुणेकर रामराव भावे हे ते येक आहेत.

२१ मार्च १८४९ : मु॥ वानरी १ केळच्याहून दोन प्रहरी निघोन मु॥ मजकुरी संध्याकाळी स्वारी आली. केळच्यापासून मुकाम कोस पाच. श्री महादेव वानरेश्वर गावात महास्थान आहे. त्याचे दर्शनास स्वारी गेली श्रीचे अभिसेकपात्र आहे त्यातून सिंहनाद होत असतो. त्यांत पाणी घालून नाद ऐकून स्वारी ठिकाणी आली.

२२ मार्च १८४९ : १ प्रातःकाळी कुचाचा नगारा करऊन स्वारी भोजनोत्तर दाहा घटका दिवसास निघाली ती कसबे संगमेश्वरास उन्हाळे आहे त्याचे उत्तरेस मैदानांत मु॥ जाहला आहे पाणी नदी आहे तिचे नांव वरुणा. त्या नदीत मध्येच पाणी ऊन पन्नास साठ हात लांबी आहे. खाली वर थंड पाणी आहे. या प्रो चमत्कार आहे. पाणी ऊन जसे ज्यास पाहिजे तसे आहे. लक्ष्मणराव व त्याचे पुतणे कृष्णराव सावंत देशमुख×× हे कै. नाना फडर्णीस यांचे पदरी त्याचे घर खेणउसमसी (?) नजीक वानरी त्याचे स्मरण सरकारातून काढले सबब त्याचा शोध केला तो खरेच. तेथीलच. तेव्हा सदरहू उभयता येशवंतराव ख नवेल्कर हे त्रिवर्ग मंडळी सुधा स्वारी निघते वेळेस वानरीस येऊन रामराम करून बसले. लक्ष्मणराव हे वृद्ध साठ वर्षांचे बेतात चांगले आहेत त्यासी श्रीमताच्या कारकीर्दीच्या गोष्टी बोलणे जाहले. त्याचा सत्कार केला. त्यास सांगितले जे श्रीमंतांची पत्रें अगर नाना फडणीसांची पत्रें तुम्हास स्वारीसिकारी प्रकर्णी लढायाचे वगैरे आले असतील ते पाहाण्यास पाहिजेत म्हणोन त्याजवरून त्याणी कागदपत्र घरी आहेत त्या पैकी पाहून जे सापडतील ते घेऊन चिपळोणास येतो म्हणोन बोलले. त्याणी नारळ वगैरे जिन्नस आणून दिला त्यास विडे देऊन निरोप दिला. त्याचा बहुमान रत्नागिरीचे साहेबाकडूनहि मोठा आहे. कृष्णराव हे रत्नागिरीस नेहमी सरकारीं काम पडते स॥ तेथे असतात. खानवेलकर हे सावंत यांच्या सोयरिकी करवीरकर छत्रपतीसी आहेत मोठे आहेत. वानरीपासून संगमेश्वर रस्ता खाडी किनाऱ्यानेच. सेवटपर्यंत वाट लहान अडचणीची. डोंगरी रान. लोकांचे हाल वाटेने जाहले. काही पडले वगैरे असे जाहले.

२३ मार्च १८४९ : खासा स्वारी वगैरे आज उन्हाळ्याची स्नाने करून खाशाची चतुर्दशी. सबब फराळ व मंडळी वगैरेनी भोजन करून प्रहर दिवसास निघाली ती वाटेने उन्हाळे फार कढत पाण्याची रानांत कुंड आहे तेथे येऊन पाणी पिऊन क्षणभर बसून आरवलीस आली. तेथे श्री आदित्याचे देवळांत स्नाने करून साखरपाणी घेतले. लष्कराचा मुकाम गावाचे उत्तरेस लहान आंबराई आहे तेथे गंडकी नदीचे तीरास जाहला. आज माणकीस मुकामास जाणेचा बेत होऊन बिनीवाले व ढाल गेली होती परंतु ऊन फार जाहले. उन्हाच्या झळा येऊ लागल्या सबब बिनीवाले व ढाल परत आणऊन येथेच मुकाम केला. संगमेश्वरकर समस्त ब्राह्मणास दाहा रु संभावना संगमेश्वरास दिली. संगमेश्वरनजीक महावळ गांव आहे तेथील भिडे मंडळी भेटावयास आली होती. त्यास आज सकाळी भोजनास बोलाऊन पांच रुपये सभावना दिली. मे. होटन सो इंजनेर हे रत्नागिरीहून नहरास हवा घ्यावयास गेले ते आज मु॥ मजकुरी रात्री दिवटी लाऊन घोड्यावर बसून गेले ते वर्तमान समजताच गोविंद हरी बिनीवाल्यास व गणपतराव भोसल्यास त्यांच्या शोधास पाठऊन शोध करून त्यास सलाम सांगितला त्याणीही परत सलाम सांगून पुढे चालते झाले.

२४ मार्च १८४९ मु॥ दहीवली नजीक माणकी. १ स्वारी मुकाम मजकुरी आल्यानंतर मौजे मजकुरचे रानांत कापसी नदीची सोव. त्या नदीवर मुकाम जाहला आहे त्या लगत श्रीगणपतीचे देवालय आहे त्याचे दर्शन घेतले. गणपतीचे स्थान पूर्वी शके १७४३ साली स्वारी आली तेव्हा ही मूर्ती याच रानांत माळावर होती ती मूर्ती आणऊन शंभर रु. खर्चास देऊन गोसावी याचा मठ आहे त्या गोसावियास देऊन देवालय बांधोन स्थापना केली ते हे स्थान. सदरहू मूर्ती मोठी आहे. मनुस्या येवढी बसलेली आहे. सांगलीहून आपा कुंटे यांचे चिरंजीव रावजी कुंटे आज आले त्याणी वर्तमान सांगितले जे – तासगावास श्री. मा. रमाबाईला पुत्र झाला त्याचे वर्तमान सर्वास महशूर असता सत्यभामाबाई ताई सोनीकर याणी एक ब्राह्मणाची बायको रमाबाई बाळंतीण जाहली त्याचे यक दोन दिवस आधी आरती परती बाळंतीण जाहली तिला हजार रुपये देण्याचे करून तिजकडून तिचे पोर मागविले पुढे काही दिवसानी त्या बाईकडून इंग्रजी सरकारात रिविसनस॥कडे फिर्याद करविली की तासगांवकर बाईचे कारकून व बाईने मी बाळंतीण जाहल्यानंतर माझे मूल नेऊन ठेविले आणि आपलेस पुत्र जाहला म्हणोन साखरा वाटल्या. त्यास ती काही बाळंतीण झाली नाही. पण साहेबानी पूर्वीच खास देखरेखीखाली बाळंतपण करून मुलगा झाल्याची खात्री करून घेतलेलीच होती. म्हणून या कुटांत असलेले ताईचे बंधू बळवंतराव मामा व त्यांचे चिरंजीव इ. स. कैदेत घातले.

२५ मार्च १८४९ : मु॥ निवळोण प्रातःकाळी स्वारी दहिवलीहून निघाली ती

गोवळकोटास कर्जाईचे दर्शनास गेली. नंतर देवीचे दक्षणेस जवळ गावात श्रीगणपती आहे तेथे येऊन भोजने झाली. पाडवा. सबब गुढीपूजन व लगीपूजन झाले. तिसरे प्रहरी गोवळकोटाहून श्री परशरामक्षेत्रगावास डोंगर चढून जाऊन श्री परशरामाचे दर्शन व श्री रेणुका व श्री गणपतीची मूर्ती संगमरवरी परशरामाचे देवालयाचे बाजूस देवळे जवळ आहेत त्यांची दर्शनें घेऊन प्रत्येकी एक एक रुपय दक्षणा ठेऊन अस्तमानी दोन खाडया समुद्राच्या चिपळोणानजीक आहेत त्या उत रून गावचे पेठेतून बंदरावरून चिपळुणास पेठेचे दक्षणेस गोडी नदी आहे तिचे दक्ष णेस पागा म्हणून बाग आहे आमराई आहे. तेथे मु॥ जाहला होता. तेथे स्वारी आली गावातील ब्राह्मणाची मुले पाच पंचवीस लहान स्वारी पाहावयास आली होती त्यास पेढे खरेदी करून त्या सर्वत्रास दिले. परशरामाचे पश्चमेस बापतीर्थ म्हणोन मोठे कुंड देवळाचे आवारांत आहे त्यात पाणी फार व गोड आहे व त्याचे पश्चमेस आवाराचे भिंतीस कोनाडा खडकाचा आहे त्यातून पाण्याचा झरा वाहात आहे ते पाणी फार गोड सबब ब्राह्मण पाठऊन पाणी प्यावयास आणविले. चिपळोणास मामलेदार आहेत ते सरकारी कामाबद्दल गुहागरास गेले आहेत. सबब विष्णुपंत केतकर सिरस्तेदार मामलेदाराचे दुय्यम हे व आणखी कृष्णराव देशमुख ओक व एक दोन मंडळी येऊन भेटली. भेट ठेवली. बरदास्तीचा बंदोबस्त करून पट्टेवाले ठेऊन ठिकाणी गेले. आज चांदरात्र सबब सिरस्तेप्रो पांच बार झाले.

२६ मार्च १८४९ : मु॥ चिपळोण. १ खासा स्वारी परशरामास जाऊन श्रीची पूजा करून दक्षणा धोतरजोडा शेला पागोटे पूजेसमई दिला. गोवळकोटचे मुसलमान खोत सकाळी खाशाच्या भेटीस येऊन फर्मास जिन्नस नजर केले. गावातील खेळे टिपऱ्या खेळतात त्या तऱ्हेचे खेळे फार आले होते. त्यास तीन रु॥ दिले. वे. रा बाऊभट चितळे वगैरे चितळे मंडळी व गावातील विद्वान मंडळी भेटीस आली होती. रा. तात्या व बळवंतराव जोसी गावात सावकारी करून मान्यतेने आहेत ते दाजीबा जोसी याचे चिरंजीव. ते तिसरे प्रहरी खाशाकडे येऊन भेटून गेले. आज रात्रौ वसंत पूजा केली. ब्राह्मण शंभर होते. दक्षणा आठ आणेप्रो दिली तात्या स॥नी ब्राह्मणांचे पाय धुतले मंत्राक्षता खाशानी घेतल्या. बेत उत्कृष्ट जाहला फराळास पदरची मंडळी बोलावली होती.

२७ मार्च १८४९ : मु॥ चिपळोण १ खासा स्वारी व खाशी मंडळी गोवळकोटास कर्जेश्वरीस गेली. महापूजा केली दक्षणा व लुगडे खण दिले. महारुद्र व श्री सूक्ताच्या आवृत्ती ब्राह्मणाकडून करविली. आज श्रीची समराधना करावयाचा बेत करून दोन प्रहरी ब्राह्मण भोजन जाहले. भोजनास पात्र सुमार ८०० जाहले ब्राह्मणास दक्षणा दोन आणेप्रो दिली. तिसरे प्रहरी खाशी मंडळी चिपळोणचे बंदरास जाऊन मचव्यात बसून सहल करून आली. रत्नागिरीकर मामलेदार यांणी खबुत्राची जोडी दिली. ती आज उन्हाने एकाएकी घाबरी होऊन चारसहा घटकानी

मेळे सातारेकर महादू गोंधळी तमाशेवाले याचा तमाशा आज रात्रौ जाहला उत्तम जाहला.

२८ मार्च १८४९ : मु॥ कुंभारली घाटाखाली.

२९ मार्च १८४९ : मु॥ हेळवाक. १ खासास्वारी कूच करून मध्यरात्री निघाली. कुंभारलीहून घाट चढून मु॥ मजकुरी अरुणोदयास आली. मागाहून खटले आले. हरिपंत देशपांडे हेळवाककर हे खाशाचे परिचयातील ते येऊन भेटून गेले. १ आज घाट चढन तोफखाना येत होता. बैल बुजून उधळले तोफ खाली पडून गाडा बळी गडी म्हणोन आहे त्याच्या अंगावरून चाक गेले गडी हैराण जाहला पण वचेल. १ म्हैसू आवटी मौजे वडी का। सांगली हा कैदेत आहे हातापायांत बेडी आहे. असे असून लुच्चेगिरी करून चौकीदाराचे मिलाफोने भिकी कुणबोण इची पोरगी सांगलीस आहे. तिजबरोबर बदकर्म केले हे समजलेवरून चौकीदाराचे पारपत्य केले व त्यासहि मार दिला म्हणोन सांगलीहून वर्तमान. स्वारीचा मुकाम कोयना नदीचे तीरी उत्तर तीरास जाहला.

३० मार्च १८४९ : मु॥ पाटण कै. आपाजीराव पाटणकर यास सातारे इलाख्यातून पुरातन पंचवीस हजाराचे इनाम पाटणखोरा गावसुधा आहे व त्याचे घर पाटणास आहे नेहमी मुले माणसेसुधा एकंदर मनुष्ये सातारेस हुजूर राहतात कारकून वगैरे पाच चार आसामी येथे राहतात परंतु त्याचे घरी येथे रामनवमीचा उच्छाह आहे सबब त्याचे थोरले चिरंजीव पंधरा वर्षाचे येथे आले आहेत ते स्वारी आली म्हणोन पुढे सामोरे येऊन खासास्वारी ठिकाणास येउन पोचल्यावर घटकाभर बसोन निरोप घेऊन गेले. पाटणकर याजकडील कारकून दोन चार आसामी व भले माणूस असे फड फर्मासी जिन्नस पेढे वर्फी साखर खडीसाखर इत्यादि जिन्नस पंधरा सोळा व द्राक्ष फणस वगैरे वहुन घेऊन आले त्यांकी काही कारकून वृद्ध व भले माणूस होते त्यास आपाजीराव पाटणकर हे पिढीजादे वहुत वर्षे श्रीमतांचे पदरचे यांचे वडिलानी कामकाजे लढाईत मोठीमोठी केली व इकडे सरकारांत चाकरीसही होते वगैरे माहितीची बोलणी जाहली व इकडीलही केलेली. हत्यारें व इंग्रजी सरकरातून बदूक आलेली त्यास दाखऊन विडे देऊन निरोप दिला.

३१ मार्च १८४१ : मु॥ बहुलेश्वर पेटा कराड. १ खासा स्वारी अष्टमी सबब फराळ भोजन करून श्री नाईक वनपुरीची हा देव सरकारचा सबब दर्शनाकरता गेलो नारायणराव देशपांडे काळेवाडीकर याचा इनामगांव वनपुरी. सबब त्याणी देवाजवळ घर बांधिले आहे तेथे साखर पाणी घेतले दिवसास निघाला ती वाटेने चार कोस बहुलेश्वर तेथे मु॥ मज पंत प्रतिनिधी कडोल कारकून बळवंतराव श्रीपत गोडबोले येऊन पत्र येण्याविसी दिले. चाफळास श्रीरामनवमीचा उच्छाह आहे सबब हरिभक्त लक्ष्मणबावा रामदासी स्वामी शिष्यपरंपरेचे त्याजकडून पत्र घेऊन

कारकुन आले आहेत. स्वारी यावी म्हणोन त्याचे उत्तर कराडास जाणेची निकड आहे स।। येणे होत नाहीं म्हणोन कारकून निरोप घेऊन गेले. गोपाळ बापूजी सिराळकर हे कराडहून आले. त्यांचे सांगण्यांत श्री. मा. लक्ष्मीबाई प्रतिनिधी यांचे भेटीचा योग दशमी सोमवारी पंधरा घटका दिवसानंतर व्हावयाचा बेत केला आहे. रा. बाळाजीपंत दादा नातू हे आले आहेत ते सरंजामा निशी बाईकडील कारभारी घेऊन भेटीस सामोरे आज पुढे येणार असा बेत आहे. स्वारी उतरणेचा बेत गावांत मुतालकांचे घरीं वगैरा ठिकाणी केला आहे म्हणोन.

१ एप्रिल १८४९ : मु।। कराड १ बहुलेश्वरचे गावचे समस्त ब्राह्मणास पांच रु. दिले. बहुलेश्वरास लघुरुद्र करविला. कृष्णाजी रघुनाथ व राजारामपंत जोसी गारवडेकर नजीक बहुलेश्वर ते भेटीस आले होते त्यांचे घरो जाऊन दशभुज व ताम्रमय मूर्ती गणपतीचो पाहिली. स्वारी बारा घटका दिवसांचे सुमारे निघाली ती तीन प्रहरचे सुमारे कराडाहून श्री. मा. लक्ष्मवाई प्रतिनिधीकडील कारभारी रा. दाजीबा पटवर्धन हे सरंजाम हत्ती घोडे अंबारी लगी डंका स्वार शिपाई कवाइती वगैरे शेपन्नास घेऊन सामोरे आले. त्यावी भेट खाशाची होऊन तात्यासो यांस अंबारीत बसऊन मोठे समारंभाने कोयना नदी उतरून कराडचे पेठेतून मनोऱ्या-वरून मुतालिकांचे घरी जावयाची परंतु पाणी नेण्यास वाट वाईट स।। खासा स्वारी प्रीतिसंगमा नजिक बाग आहे तेथे राहिली लष्करहि तेथेच राहिले. बाई सो वगैरे मुतालिकांचेकडे गेली. बाळाजीपंत नातू भेटीस आले होते. गावातील ५०।६० सिष्ट शास्त्री वैदिक वगैरे आशीर्वाद करून नारळ देऊन गेले. सखारामपंत सफ्रे हे परिचयाचे कराडचे, आबा पारसनीस परभु सातारेकर परिचयाचे ते येऊन भेटून गेले. श्रीमंत रा. रावसाहेबपंत हे येथे डेऱ्यास भेटीस पंधरा घटका उपरांत येणार सबब मंडपांत बिछायत घालून सर्व तयारी कचेरीचे लोक वगैरे बोलाऊन केली. नंतर मुहूर्ताचे सुमारे पंत व मंडळी व भले माणसे पंचवंस व गोविंदराव नाईक फलटणकर व बाळाजी पंत नातू व दाजीबा पटवर्धन कारभारी इ. मंडळी सुद्धा आले. खासा स्वारी पुढे मंडपाचे आघाडीपर्यंत जाऊन त्यास घेऊन येऊन गालिच्या-वर बसले. नंतर क्षणभराने पंत यांस ढालतरवार देणेची तयार केली होती ती खाशानी आपले हाते पडदळे सुधा गळयात घातली नंतर वस्त्रे दुपटा पागोटे बांधलें व सिरपेच हिऱ्याचा किंमत अदमासे रु. १००० चा दिल्हा. विडेअत्तर गुलाब होऊन पंत ठिकाणास गेले. खासा स्वारी डेऱ्यापर्यंत पोचविणेस गेली होती. पंत गेल्या उपरांत खासा स्वारी खाशामंडळी सह कोटात गेली प्रथम श्री. जगदंबेचे संस्थानाचे दर्शन घेतले नंतर श्री. मा. लक्ष्मीबाईसोकडे जाऊन खाशानी जमिनीस कपाळ लाऊन नमस्कार केला. तात्यासो भाऊसो बाईच्या मांडीजवळ बसले. बाईनी म्हटले जे आजपर्यंत आपला व माझा बहीण भावाचे नाते परंतु समक्ष भेट कधी नाही हा दिवस सुदिन फार संतोस जाला. खाशानी हात जोडून म्हटले सर्व वडील-

पणा अ.पलेकडे. आपली कृपा ही मुख्य. ही मुले आपले स्वाधीन केली आहेत नंतर निरोप घऊन स्वारी परतली. नंतर सर्व खाशी बायकामंडळीहि जाऊन भेटून आली. संध्याकाळी चार घटकाचे सुमारे खासा स्वारी कराडचे वरले आंगास कृष्णाबाईचे पात्रात खडकावर धबधबा पाणी पडत आहे ते पाहून येणे झाले आज दोन प्रहरी पंतांची भेट जाहल्यावर खुषीत्रा। तोफेचे १० बार केले कवाइती लोकांच्या व बारांच्या पाच चार करविल्या. खाशानी आपण होऊन फराळास येतो म्हणोन बाईकडे सांगून पाठऊन अस्तमानी स्वारी गेली. मंडळी एकीकडे काढून पाच चार मंडळी मात्र राहिली बाईजवळ दोन हात अंतराने बसून उभयतांची. बोलणी सुख-दुखाची जाहली त्यात हसील. बाईचे म्हणण्यात श्री. कै. पंत यांचा काळ सालगु॥ जाहला. रावसाहेबास वोटचांत घेण्याचा उद्योग दाजीबा पटवर्धन याणी मोठा केला महाराजानी त्याप्रो बहुमान करून वस्त्रे दिली रसिदटसोहि अनकूल सर्व गोष्टी पंत यांचे पुण्य ने घडून आले. यानंतर पंतानी कैलासवास केला हे दुखप्रद जाहल आपलेकडे बधूपणा सर्व तुम्ही आहा मला येकवेळ कासीस पोचवावे म्हणजे देह निर्वाह तेथे करीन म्हणज भाऊ बहीणपणाचा मान ईश्वरे सिद्धास नेला आताचे दिवस फार कठीण आबरूने राहणे कठीण आहे म्हणोन. खाशानी ऐकून घतले. मोठा गहिवर आला जे आपले मनांत ते श्री गणपति सिद्धीस नेईल म्हणोन सांगून खाशानी स्नान करून फराळ केला. पंगतीस रावसाहेब पंत होते. नंतर निरोप घेऊन स्वारी ठिकाणी आली.

२ एप्रिल १८४९ : नेरलीकर चाफळाहून आले त्यानी विनंति केली जे चाफळास काशीहून एक ब्राह्मण आला आहे त्याणी सांगितले जे त्या देशांत सिकाची व इंग्रजाची लढाई जाली त्या लढाईत इंग्रज सिकस्त होऊन मागे हटून पाच पन्नास कोस मागे गेले सिक आपले ठिकाणी गेले इकडे वर्तमान इंग्रज आपले बहादुरीचे सांगतात व लिहितात हे काही नाही ! हे वर्तमान मी प्रत्यक्ष पाहिले म्हणोन !

३ एप्रिल १८४९ : खासा स्वारी गावात सरकारचे घर आहे ते पाहण्यास गेली होती. रा. चिमाप्पा हर्षे हे पूर्वी कै. बळवंतराव फडणीस नि॥ प्रतिनिधी याजकडील कारभारी त्याजकडून वकिलीस होते ते सकाळी खाशाकडे भेटीस आले होते. स्वारी तिसरे प्रहरी कोटांत श्री. मा. प्रतिनिधी याजकडे जाऊन दोन घटका बसून कोटातील विहीर मोठी आहे ती पाहून परत आली. श्री. रावसो पंत हे खाशास मेजवानीस आमंत्रण देण्यास आले होते बरोबर बाळाजीपंत नातू व दाजीबा पटवर्धन होते. रा. बज्याबा दादा पराडकर हे सातान्यास छत्रपती थोरले यांचे पदरचे त्याजवर गैरमर्जी होऊन त्यास तीनसे रु॥ पेनसील करून दिल्हे ते कराडास आठ नऊ वर्ष सुमार आहेत ते येऊन भेटून गेले. रा. गणपतराव देशपांडे शहापूरकर आले त्याणी सरकारात घोडा नजर दिला तो परवा गुरुवारी अठरा घटकानंतर जमेस धरावयाचा. लक्ष्मण कासी किबे साताराकर यास कराड पेट्याचे वगैरे

अमीनीचे काम आहे ते येऊन भेटून गेले सातारे संस्थान एकंदर इंग्रजानी खालसा आमल केला म्हणोन वर्तमान पक्के आले. रा. बाळाजीपंत नातू यास मगळवेढेस दोनसे रुपये इनाम जमीन सालगु।। दिले त्याची इनामपत्रें करून द्यावा म्हणोन त्यानी विनंति केली.

४ एप्रिल १८४९ : खाशा स्वारीस सर्व खाने मंडळीसह कोटांत मेजवानी झाली बाळाजीपंत नातू वगैरे मंडळीहि होती. भोजनोत्तर प्रतिनिधी याणी श्री. तात्या-साहेबास घोडा कर्डा व हतीण एक व भरजरी अफ्तागीरी कचेरीस दिली. गावातील अंतु सोनार कारागीर हा सरकारचे भेटीस आला होता काम खोदीव वगैरे करीत असतो सबब खाशानी चोपदाराची काठी सांगलीस केलेली व तरवारेचा परज असे दाखविले. सौ. लक्ष्मीबाई केळकर दाई सांगली आपली मुले घेऊन पंढरीस जाणे-करितां आली आहेत. गावातील सिष्ट वैदिकाची वसंतपूजा केली. दक्षणा दर आसामीस आठ आणेप्रो दिली. मे. मानसीनसो याजकडून थैली पत्र आले त्यात 'ज्ञानप्रकाश' बुक छापून आपलेकरिता रवाना केले आहे म्हणोन आले. त्याचे उत्तर जे मूढ असतील त्यास ज्ञानप्रकाश बुक पाठवन द्यावे. श्रीगणपति महाराजाने ज्ञान दिले त्यात सर्व गोष्टी चालल्या आहेत म्हणोन. इनवरारिटीसोचे पत्र आले त्यात लढाईत सीक लोक पळोन गेले त्याब।। इंग्रजी छावण्या आहेत त्या ठिकाणी तोफांचे बार २१ करणेस हुकूम केला आपलेस कळावे म्हणोन. नारायण पांडुरंग दामले यांचे नाकाम पेनसीचा उपद्रव जाहला होता त्याने जेर होऊन चैत्र शु।। ९ स देवाज्ञा झाली म्हणोन सांगलीहून पत्र आज आले.

५ एप्रिल १८४९ : सकाळी दाजीबा पटवर्धन पंतांचे कारभारी हे खाशाकडे आले होते त्याणी खाशास पंतास दत्त मूल दिला त्याविसीच्या महाराज सरकारास यादी दिल्या व महाराजानी इंग्रजी सरकारात यादी दिल्या त्या व पंतानी पटवर्धन यांस मुखत्यारी दिल्याचे पत्र वगैरे सर्व कागद दाखविले. खासा स्वारी तिसरे प्रहरी हरिभक्त कै. निरंजनबावा रामदास स्वामीचे वेळचे ज्यास साक्षात्कार शाळग्रामास श्रीगणपतीची सोंड फुटली ते, त्यांचे वंशज संस्थानिक गणपती पेठ याचे मठांत जाऊन श्रीस दक्षणा नारळ ठेऊन स्वारी निघाली. नंतर मातुश्रीबाई व पंत सर्वांनी भोजनास यावे असे निमंत्रण करण्याकरत कोटींत गेली. स्वारी रा. बाळाजीपंत नातू याचे ठिकाणी जाऊन भोजनाचे निमंत्रण केले. उदईक मेजवानीचा बेत गावांत मुतालिक यांचे वाड्यांत केला आहे.

६ एप्रिल १८४९ : प्रातःकाळीं रा. नागेश राघवेंद्र मामलेदार पेटा कराड (घर वाईस) हे खाशाकडे येऊन भेटन गेले. मेजवानी झाली. ७०० सातशे पान झाले. नाच सनगे देणे झाली. पत प्रतिनिधीकडील बगडी नाइकीण व तारा नाइकीण यास मंडळीसुद्धा गुलाबो व रमाकडून बोलाऊन फराळाचा बेत करऊन खण देविले खाशास मुजरा करून ठिकाणास गेल्या.

७ एप्रिल १८४९ : स्वारीचा मुकाम पंतांचे वाड्याचे उत्तरेस नजीक जाहला आहे. वाड्याचे तटावर बंगला आहे तेथे पंत मंडळीसह प्रातःकाळीं बसले होते त्यास कवायती लोकांची कवाइत बाराच्या फैरा मारून करून दाखविली व सारे हत्ती तयार करून आणून दाखविले व घोडींहि दाखविली. बाईसो पंतप्रतिनिधी यांस खाशानी हिऱ्याची आंगठी किंमत रु. ८० ऐसीची दिल्ही व खाशा गाईपैकी दोन गाई तांबड्या झुली करून दिल्या. तिसरे प्रहरी बाळाजीपंत नातू येऊन 'उदईक साताऱ्यास जातो पत्नीची प्रकृत बिघडली आहे तिला पुण्यास पाठऊन दिली. मागाहून मी जाणार' सबब निरोप घेऊन गेले.

८ एप्रिल १८४९ : मु॥ रेटरे. प्रातःकाळी कुचाचा डंका केला. स्वारी कराडाहून पाच घटका दिवसास निघाली ती मौजे वाडे पेटा वाळवे येथे आली. भोजन करून अस्तमानो रेठऱ्यास दाखल झाली. स्वारी पंढरीस जाणार सबब बरोबर बिनीकडील निशाण व अंबारी व नौबत आणावयास फाकडा हत्ती व नगीसमशेर हत्ती असे रामा बरडपा खिसमतगार यास सांगलीस पा॥ दिला. म्हादू आवटी वाडीकर हा कैदेत सांगलीत आहे त्याणे सिपाई फितऊन वगैरे लुचेगिरा करून रांडेसो गेल्याचे मागे लिहिले आहे सबब त्याचा येक हात व येक पाय तंडन टाकून मोकळा करून हाकून देणेविसी सांगलीस पत्र चिंतोपंत भिडे यास लिहिले आहे.

९ एप्रिल १८४९ : मु॥ धोंडो इ॥ इस्लामपूर : १. प्रातःकाळी स्नान भोजन करून रेटरेनजीक कृष्णाबाईचा डोहो आहे तेथे रेठऱ्याहून नांव आणऊन खासा स्वारी सडो पलीकडे उतरली आणि जनोबा आगासे याणी आपले गावी देवराष्ट्रेस बोलाविले स॥ निघाली ती साखरेश्वराचे डोंगराचे खोऱ्यांत जाऊन तेथे स्नान खाशानी करून देवराष्ट्रेस गेली अस्तमानी फराळ करून स्वारी निघाली ती कुंडले वरून मु॥ मजकुरी प्रहर रात्रीस आली कोस ८ श्री. सौ. मातुश्रीबाईसो यांची स्वारी रेटरे नजीक नाव उतरून नरसीपुरास येऊन श्री. नरसिंहाचे दर्शन घेऊन तेथून बहेचे मारुती जवळ येऊन दर्शन घेऊन अस्तमानी मुकामी आली. लस्करचा भाडेकरी वाणी हा रेटरेकडून नाव उतरून येकलाच मधले वाटेने येत होता तो बालूप॥ रेटरे नजीक वांड्यात चोराने लुटला मार दिला पाच चार रुपयेचा विषय नेला.

१० एप्रिल १८४९ : मु॥ मौजे बोरगांव प्रातःकाळी स्वारी कुच करून कुंडले-वरून मौजे आंघळी इ॥ सांगली येथे वेरळा नदी तेथे स्नान केले. रा. नागोपंत वापट याचे पत्र बेळगावीहून आले. त्यांत हशील. जमखंडीकर याचे दौलतीत ताईचे व चिरंजीवाचे दाकडे येऊन फार बखेडा जाला आहे सबब रा विनायकराव पंडित कारभारी यास कामावर नेमले म्हणोन. इनामवयामेटीत सकेश्वरकर स्वामीचे गांव सर्व जप्त होऊन खलसा अमल जाहला. फक्त संकेश्वर ताब्यात राहिले आहे म्हणोन. रा. बाळकृष्ण धोंडदेव कारकून हे तासगावाहून आले आहेत ते आज खाशाकडे

येऊन विनंति केली. व तासगांवकर रमाबाईचे पत्र आणिले त्यांत हशील सर्व मजकुराची विनंति करावयास मशार निले यास पा। आहेत. मा। निलेनी विनंती केली त्यातील हशील. बाईस पुत्र जाहला त्यासमई इंग्रजी सरकारातून मड्म आलेली व आणखी येकदोन बाइका व दुर्गाबाई आक्का रास्ते श्रीमंत कै. माधवराव दाजी सो। यांची कन्या अशी वगैरे होती चार पांच दिवस प्रसूत होऊन जाहल्यानंतर मडमेस निरोप दिल्हा ती गेली. तिणे ज्या वेळेस पुत्र जाहला त्या वेळेस व मामलेदार यास मजकूर समजून त्याजकडून व आपण रपोट बेळगावास लिहिला, असे असता कोणी लुच्च्याने मामलेदाराजवळ अर्जी केली जे हा मुलगा जाहलेला लबाड चिंचणीस दिक्षित म्हणोन भटजी आहेत त्याची बाइको बाळंतीण जाहली तिचा मुलगा आणून तो मुलगा जाहला म्हणोन आवई उठवोन साखर वाटली त्याबद्दल त्यास एक हजार रुपये रमाबाई कडील कारकुनानी दिल्हे म्हणोन तो मजकूर मामलेदाराने म्यानसीन सो। नहरास होते त्यास लिहिला व बेळगावास एजंट सो। यांसहि लि। म्यानसिनसाहेब नहराहून बारावे दिवसी तांबडतोब तासगावास आले त्याणी चौकसी सर्व मनुष्यें बोलाऊन आणून केली त्यात दीक्षित चिंचणीकर याणी लिहून दिल्ले जे माझा मुलगा उपजल्यावर काही दिवसानी मेला ती वर्दी व जाहलेल्याची वर्दी व मुलाचे दहन केल्याची वर्दी सर्व चिंचणीचा फौजदार यास ज्या वेळची त्या वेळेस काइद्याअन्वये दिल्ही त्याणे रपोट अथणीस मामलेदार यास लिहिला आहे त्याजवरून समजेल मी काही मुलगा दिल्हा नाही व मला कोणी हजार रुपये दिले नाहीत व मी असे कर्म केले नाही म्हणोन व दुर्गाबाई आक्का वगैरे बाइका मंडळी प्रसूत होतेसमई होती त्यास सवाल केले त्याणी मुलगा जाहला खरा आम्ही प्रत्यक्ष होतो वगैरे जाहला प्रकार लिहून दिला व साहेब हे रमाबाईकडे गेले तिणे प्रत्यक्ष आपले स्तनाचे दूध वाटीत काढून दाखविले असे असता सोदे याणी दीक्षित चिंचणीकर यास दोन रुपये देऊन त्याजकडून दुसरी जबानी देविली त्यात माझा मुलगा उपजताक्षणी नेऊन मला हजार रुपये दिले म्हणोन. याजवरून पुन्हा साहेबास वगैरे संशय येऊन या विसीची क्यामेटी पन्हाळचास अगर हुकेरीस चार शाहणे जमऊन करावी असा बेत केला आहे कारभारी व सदाशिवपंत जोसी वकील यास कैद करून ठेविले आहेत पुढे कसे होते पहावे म्हणोन.

११ एप्रिल १८४९ : मु। मौजे वलगवडे मिरजेहून बाबा फडके कारकून श्री. बाळासाहेब याजकडून पत्र घेऊन आले आहेत त्यात श्री. दादासो। मिरजकर यास ज्वर एकसंतत चवीस दिवसपर्यंत येत आहे घर्म नाही कालपासून मात्र दोन दिवस ज्वर येऊन निघतो कानाचे मागे काही सूज आली आहे राघोपंत करमरकर औषध देत असतात परंतु गुण नाहीं यास्तव सांबारे वैद्य यास मिरजेस पाठवून द्यावे म्हणोन आनंदराव माने बारगीर सांगलीहून भेटीकरता आले आहेत त्याणी मुंबईहून छऱ्यांची छरदाणी व गुलाबाचे फल बिरगुटाचे असे जिन्नस आणिले होते ते

सरकारात दिल्हे त्याणी बकरी मऊ लोहोकरीची आणिली ती नांद्रचास आहेत त्यापैकी काहीं दाखविण्यास आणावी म्हणोन नांद्रचास पा॥ दिला.

१२ एप्रिल १८४९ : मु॥ जायगव्हाण १ श्री रा. तात्यासो यांची स्वारी बलगवड्याहून निघाली ती वजरचवडेवरून गव्हाणास येऊन तिसरे प्रहरी मु॥ मजकुरी मळण गावावरून आली रा. नाभजीराव सिंदे मळणगांवकर हे खासा स्वारी आलीयानंतर भेटीस आले होते.

१३ एप्रिल १८४९ : मु॥ कोरेवाडी इ॥ सांगलो १ मु॥ मजकुरी खासा स्वारी बळवंतराव फडणीस याणी उत्तरेस गावालगत धर्मशाळा बांधली आहे तेथे राहिली नायगव्हाणापासून मु॥ मा॥र कोस ४.

१४ एप्रिल १८४९ : मु॥ वटवरे १ रा. रामराव पेठे याचा गडी हतीजा (?) नजीक रवेत येत होता त्यास टेच लागून पुढे झोल गेला हातात सोटा होता तो मांडीस लागन चोलणा फाटून आंडास लागून आंड फाटला त्यास मलम वगैरे लाविले आहे. १. लस्करचामु॥ मजकुरी गावाचे व माणनदीचे उत्तरेस मैदानात जाहला पाणी माणेचे सदरहू मुकाम कोस पक्के ९

१५ एप्रिल १८४९ : मु॥ मांजरी इ॥ सातारा पेटा पंढरपूर. प्रातःकाळीं निघून खासा स्वारी सांगोल्यावरून मु॥ मजकुरी दोन प्रहरी आली. पांडुरंगराव आपा व कासीनाथराव माधदेव व दाजीबा लागू असे मंगळवेढेहून स्वारीत आज आले. बाबा जोसी हे आज स्वारीत वटंबरेस आले

१६ एप्रिल १८४९ : मु॥ पंढरपूर. काल अवर्शीचे बारा घटका रात्रीस कूच करून स्वारी निघाली मांजरेहून ती पहाटेस प्रहर रात्रीस गोपाळपुराजवळ आली. स्वारी गोविंदपुऱ्यात सरकारच्या वाड्यात आली. स्वारी वाड्यांत आल्यानंतर पाच घटकापासून दहा घटका दिवसपर्यंत श्रीचे दर्शनाचा मुहुर्त होता. खासा स्वारी एकंदर मंडळीसुधा पाय उतारा पांडुरंगाचे दर्शनास गेली. नारायणराव नाना मंगळवेढेकर व भास्करराव नाना व गंगाधरराव तात्या किल्लेदार व हरिपंत नातू फडणीस व रावजी दप्तरदार व जिवाजीपंत मंगळवेढेकर व गोपाळराव म्हैसकर वगैरे मंडळी मंगळवेढ्याहून आले आहेत. खाशास येऊन भेटले. रा. खासगीवाले याचे घरी तात्यासो सुद्धा गेले. तात्यासो यांची सख्खी मावशी सईबाई खासगीवाले यांचे घरी दिली आहे त्याजकडे तात्यासो जाऊन साखरपाणी घेतले. वे. शा. सं. कै. विठ्ठल पाध्ये यांचे नातू लहान पाचसहा वर्षाचे नारायण पाध्ये आहेत त्यांचे घरी जाऊन श्री. देवघरचे यास दक्षणा ठेवली मोरोपत पंडित आर्या करणारे यांचे नातू वे. शा. सं. कासीनाथबाबा व हरिभक्त कै. भडगांवकर बाबा याचे नातू आले होते त्याणी चमत्कारिक श्लोक व आर्या म्हटल्या खाशानीही त्याची उत्तरे श्लोक व आर्या म्हणून केली उभयतानी आपले घरी येऊन विडे घेऊन जावे म्हणन

विनंति केली. कासीनाथबावा पंडित यांचे घरी जाऊन देवास दक्षणा ठेऊन विडे घेऊन निघाली. गोविंदशास्त्री भडगांवकर यांचे घरी सदरीप्रो होऊन स्वारी वाड्यात आली. सरकारचे बडवे प्रल्हादबाबा व वाड्यातील श्रीचे बडवे वगैरे विद्वान् मंडळी वोळखीची वगैरे येऊन सर्वांनी आसीर्वाद करून गेले.

१७ एप्रिल १८४९ : मु॥ श्रीपंढरी. प्रातःकाळी खासा स्वारी पांडुरंगाचे दर्शनास जाऊन तेथे वेणुनाद व नारद व पद्मावतीस व पुष्पावतीचे दर्शन घेऊन आले. तिसरे प्रहरी खासा स्वारी कं. अहल्याबाई होळकर याणी श्री. रामचंद्रजीचे देवालय बांधिले आहे व वाडा बांधला आहे व छत्र आहे तेथे श्रीस जाऊन दक्षणा ठेऊन दर्शन घेतले श्रीच्या पागोट्याचा तुरा कलगी मोरे व फुलेसुध्धा पागोटे फार चमत्कारिक बांधिले होते व पोषाख फार चांगला केला होता. अहिलेची मूर्ती पुढे बसलेली आहे ती पाहिली नंतर बाबाजी कासारास मौजे अनवली येथे दाहा बिघे इदलशाही जमीन इनाम दिली आहे त्यांत त्याने मळा व बंगला फार चांगला केला आहे ता पाहण्यास गेले. फराळ करून आले. रा. नारायणराव नाना मंगळवेढेकर याजकडे क॥ मंगळवेढेची वहिवाट रसद घेऊन आहे हल्ली स्वारी आली सबब त्यास स्वारीचे खर्चाब॥ चार हजार रु॥ क॥ पैकी मागितले त्याणी देत नाहीं म्हणोन सांगितले व सालमजकुरी सर्वत्र मंडळीकडून येकसाली घेतली त्याणी काही दिली नाहीं हल्ली खर्चासहि दिले नाही सबब त्याजकडे तैनातीस कसब्यापैकी जमीन व धर्मगाव (?) आहे (अर्धा गांव ?) त्याची जप्ती करून ती नेमणूक रा. त्रिंबक नाईक कानडे यांजकडून नेमून देऊन च्यार हजार रु॥ घेतले रदकर्ज चार हजाराचे होईपर्यंत सदरहू नेमणूक त्याजकडे सांगितली या प्रो निशाणाच्या ताकिदी दिल्या.

१८ एप्रिल १८४९ : मु॥ श्रीपंढरी १ आज श्रीची महापुजा करणेचा बेत करून ब्राह्मणभोजन व गावातील शिष्ट मंडळीची याद लिहून भोजनाचा बेत केला आहे मुक्तद्वार रमण्याचा बेत खासगीवाले यांचे घर मोठे सबब तेथे केला आहे भोजनाचा बेत मक्ता शेकडा १४ रु. ठरऊन दिल्हा आहे पुरणपोळी व दोन पळच्या खीर याप्रो बेत करून विठोबा आचारी पंढरपूरकर यास ठरऊन दिला एकंदर पात्रें सुमार २००० जाहली दक्षणा चार पैसे प्रो दिली. आंधळे पांगळे सुधा एकंदर कोणी अतीत राहिले नाहीं सिष्ट मंडळीचा बेत कारकून आमंत्रणास पाठऊन सरकारी वाड्यांत स्वयंपाकाचा बेत घरीच करऊन केला पात्रे ४०० जाहली पोळी पुरणाची व लाडू बुंधीचे केले होते दक्षणा ।· प्रो दिली स्वारी सकाळी महापूजेस श्री पंढरीनाथाच्या गेली होती खाशानी श्रीची पूजा श्रीं. सौ. बाईसो सुधा उभयतां पंचामृताची केली श्रीचे अंगावर दागिने श्रीकडील सांप्रदायाप्रमाणे घातले व सरकारातून सिरपेच हिऱ्याचा व पिवळा पैठणी पोषाक व धोतरजोडा व मोहर दक्षणा व सर्व खाशामंडळीनी येक रुपया प्रो दक्षणा ठेविली व रखमाबाईचे

पूजेसमई लुगडे खण व गळचांत हरपर रेवडयाची माळ सोन्याची दुपदरी दिल्ही व अन्नपूर्णा व राधिका व सत्यभामा यास लुगडी खण दक्षणा येक रु॥ प्रो॥ ठेविली नंतर स्वारी परत येऊन सिष्टपंगतीसच भोजन जाहले तिसरे प्रहरी गावातील काशीनाथबाबा पडित व पाधे व पुराणिक आपा व पांडुरंग नाईक वेळापुरे वगैरे मंडळी खाशाकडे येऊन भेटून गेली अस्तमानी रा. पुराणिक हे पेशजी चिंतापंत दादा लिमये यांचे घरीं होते ते परिचयातील स॥ त्यांचे घरी जाऊन विडा घेऊन आले त्यांचे वय ऐंशी वर्षांचे आहे. इंग्रजी सरकारातून तरवार आलेली श्रीपांडुरंगास दाखवावयास प॥ होता व किताबही वाचून दाखविला सर्व बडवे व उत्पात वगैरे मंडळीनी पाहिली व कासीनाथबाबा पडित व पाध्ये वगैरे विद्वान यांचे घरींहि पाठविली होती. गावात येक बैरागी आहे त्याजवळ हिंदुस्थानी तसबिराचे मुरक्के आहेत ते पाहावयास रात्री आणिले होते पाहून परत दावले

१९ एप्रिल १८४९ : मु॥ श्रीपंढरी १ आज पांडुरगाचे दर्शन घेतल्यानंतर स्वारी वे. शा. स. रा. आपा डिगरे पुराणीक फार उत्तम वरदी घराणे क्षेत्र सोडून बाहेर जाणे नाहीं नित्य पुराण श्री देवघरचे याज पुढे ठेवावयाचे ते भेटीस वाडयात एक दोन वेळ आले होते त्याचे पुराण ऐकावे असे मनांत सबब त्यांचे घरी जाऊन पुराण भागवत दशमस्कंद सर्व गोपिकानी गान्हाणे यशोदेस सांगितले तो अध्याय फार चांगला सांगितला पोथीपुढे दक्षणा ठेऊन स्वारी निघाली आपा डिगरे याचे मुलास एक रुपया दिला खाऊबद्दल. तेथून स्वारी कै. बाबा पाध्ये व तात्या पाध्ये याची समाध आहे त्याचे दर्शनास जाऊन दक्षणा नारळ उभयतानी ठेऊन स्वारी ठिकाणास आली. आज सरकारातून श्री. पांडुरंगाची अलंकार पूजा करावली ती पाहण्यास खासा स्वारी व तात्यासो॥ व भाऊसा॥ व बाबासो॥ व बापूसो॥ व सौ. श्री. मातुश्रीबाईसो॥ व सौ. अवडाबाई व सौ. यमाताई व सौ. वहिनीबाई वगैरे व पदरची सर्व मंडळी तिसरे प्रहर जाऊन श्रीची पाद्यपूजा तात्यासो॥ याणी करून श्रीमूर्ती दागिने घातलेली सर्व पाहून स्वारी परत आली मागाहून सर्व खासी मंडळीनी पाहून नंतर पदरची मंडळीनी पाहिले नतर अनुक्रमाने लष्करची माणसें यास दाखविली श्रीचे अंगावर श्रीमंत रा. बाजीराव साहेब याणी मोत्याची कंठी थोरली, मधे हिरा तरतरा येक लक्ष साठ हजार किमतीचा ती व सिरपेच अहिल्या- बाई होळकर याणी दिलेला वगैरे सर्व दागिने होते अगावर काळी घोंगडी मोती लावलेली होती मस्तकास जडिताचा किरीट होता वगैरे सर्व दागिने होते. स्वारी तिसरे प्रहरीं अलंकार पूजेस गेलीं ते समई प्रथम गोविंदपुऱ्याचे उत्तरेस श्री. व्यासो नारायणाचे दर्शनास जाऊन तेथे गौड स्वामी व सत्पुरुष ब्राह्मण होता त्यास येक रु॥ प्रो॥ दिल्ही बाबाजी कासार पंढरपूरकर याणे सरकारात पितळी तोडे गाइचे गळ्यातील अकरा आणून नजर दिल्हे.

२० एप्रिल १८४९ : आज गोविंदराव कानडे याजकडे खाशे मंडळीस मेजवानी

केली भोजनाचा बेत सरकारवाड्यांत केला होता. आज तिसरे प्रहरी श्री. रखमा-बाईचे देवळात हळदींकुंकवाचा समारंभ श्री. सौ. बाईसाहेबानी केला. हळद कुंकू खरबुजे पेढे वर्फी केळी वगैरेनिसी वोटचा भरल्या. गावातील बायकांस बलावणे पाठविले होते. उद्या खासगीवाले मेजवानी करणार त्याचे आमंत्रण त्यानीं केले. १ रा. पंत कुळकर्णी चलहेकर हे गोष्टी चांगल्या सांगतात सबब त्याणी येऊन गोष्टी सांगून गेले.

२१ एप्रिल १८४९ : मु।। श्री पंढरी १ आज आंधळे पांगळे यास येकरु।। प्रो दिल्हे व आंधळे यांच्या काठ्यास चार पैसे प्रो दिल्हे झाडून सर्वांस दिले येकंदर दोनसेरु।। जाहले श्रीमंत नारायणराव दादासो मिरजकर यांस विषमज्वर जाला त्यांत कर्णमूळहि जाले अपथ्यहि जाहले तणैकरून पंचवीस सव्विसावे दिवसी चैत्र व।। ५ गुरुवार पहाटेस प्रहर रात्रीस देवाज्ञा जाहली म्हणोन सांगलीहून पत्र आज आले आज दहावा दिवस. बहुत गोष्ट वाईट जाहली. रा. लक्ष्मणराव बाबा मंगळवढेकर यांचे चिरंजीव रा. बापू याची पत्नी आनंदीबाई पंढरीस औषधोपचारा-करता येऊन राहिली होतीं ती आज अस्तमानचे चार घटका दिवसास वारली तें सुतक आजच कळले तेव्हा पहिले सुतकात हे सुतक गेले. आज दोन घटका रात्री-नंतर प्रहर रात्रपर्यंत पाऊस चांगला पडला.

२२ एप्रिल १८४९ : मु।। पंढरीं १ आज सरकारातून गंधाचीं उटींची पूजा बांधविलीं हाती ती पाहून वे. शा. सं. कृष्णाचार्य शास्त्री कै. विठल पाध्ये तात्या यांचे सिष्य दोन शास्त्रें अध्ययनाचे त्यांचे घरी जाऊन भेट घेतलीं. गावातील सिष्ट मंडळी व संत मंडळी यांस संभावना योग्यता पाहून दोनसे रुपयेपर्यंत नावनिसीवार दिल्ही व खरबुजे दिल्ही.

२३ एप्रिल १८४९ : मु।। किले मंगळवढे १ आज मंगळवेढ्यास स्वारी जावयाची सबब कुचाचा नगारा करविला. खाशानी घाटगे यांचे बागेत गोसावी महंत राहतात त्यांचे दर्शन घेतले तेथून सदाशिवपंत नांदणीकर यांच्या बिऱ्हाडी जाऊन विडा घेऊन नंतर पांडुरंगाचे दर्शनास आली. निरोपसमई खाशांस देवाची प्रासादिक पागोटी दिली. नंतर तेथून सरकारचे बडवे प्रल्हार बाबा बडवे यांचे घरी विड्यास गेले नंतर तेथून श्रीमंताचे बाबा बडवे यांचे घरी स्वारी जाऊन आलीं नतर राउळांत गोपाळसख्याचे सिष्य आणखी साधुसंत यांची दर्शने घेऊन स्वारी वाड्यांत आलीं. प्रल्हाद बाबा बडवे यांस शालजोडी व पागोटे व शंभर रु।। संभावना दिलीं. भोजनोत्तर दोनप्रहरीं स्वारी पंढरीहून निघाली ती अनवलीकर बाबाजी कासार याच्या मळ्यात आलीं तेथे स्नाने करून साखरपाणी घेऊन मग माणनदी उतरून मलवडीवरून का।। मंगळवेढ्याचे रानात गावचे उत्तरेस नागपाचा (नागण्याचा ?) मळा आहे तेथे नारायणराव नाना मगळवेढेकर यांच्याकडे साखर-पाणी झाले. नंतर शनवारपेठेतून गावचे वेसीने किल्ल्यात अर्धघटका दिवसास येऊन

दाखल झाले. प्रथम किल्ल्यातील श्रीदेवाचे दर्शन घेतले खासा स्वारी किल्ल्यातच राहिली. रात्री फराळ झाल्यानंतर कै. श्री. विठ्ठलराव बापूसाहेब यानी स्थापन केलेल्या गणपतीचे दर्शन घेतले. हा गणपति किल्ल्याबाहेर आहे तेथे पीर गैबी आहे त्याचेहि दर्शन घेतले. तेथून किल्ल्यात श्री नरसोबा व महादेवाचे दर्शन घेतले.

२४ एप्रिल : १ नारायण विहीर पाहिली व शंभर लिंगांची स्थापना खाशाच्या मातुश्री बाईसाहेबानी केली त्याचे दर्शन घेऊन किल्याबाहेर श्रीगणपतीचे दर्शन घेऊन नाना मायदेवाचे घरी गले नानाची पत्नी सौ. रखमाबाईनामी ही सासू सबब त्यास नमस्कार केला. किल्ल्यांत नारायणराव नानांचे घरी अनंतमूर्ती शाळ-ग्रामाची आहे ती पाहिली. १. खासा स्वारी व भाऊसो यांची स्वारी तिसरे प्रहरी श्री. गणपती किल्ल्याबाहेरील तेथे जाऊन विहीरीतील गाळ गावची माणसे धरून त्याजकडून काढविला. नंतर येकवीरी गावचे नैऋत्येस आहे तिचे दर्शन घेऊन अस्तमानी स्वारी परतली.

२५ एप्रिल : गावचे पश्चमेश निमजगा आहे त्याचे पूर्वेस गावची पांढर आहे त्याजवर उभे राहून नाचले म्हणजे पोकळ जमीनीसारखे वाजते. सबब तेथे उकरून पाहिले तो तीनचार हात खोलीवर दगड लागला आहे उदईक काय होईल ते पहावे. १ गावचे देशमुख देशपांडे कुळकर्णी व रयत याणी खाशाकडे येऊन नजर मोहोर ठेऊन मुजरा करून गेले. १ रात्री गावातील पोऱ्याचा खेळ जाहला. मामले-दार याणी सोल पुराहू र येक पोरगी आणविली आहे. १ गावातील रयत वगैरे याणी सरकारात अर्जी दिली त्यांत नारायणराव नाना मगळवेढेकर याजकडे कस-बेची वहिवाट आहे ते आम्हावर फार जुलूम जाजती करतात ते आम्हास नको म्हणोन. त्याची उत्तरे तुम्हावर जाजती काय केली त्याची याद लिहून द्यावी म्हणोन.

२६ एप्रिल : १ येथील किल्ल्यात जेजाला व तोफा आहेत त्या आणून पाहिल्या फार नाशाडी जाहली आहे त्या नीट करावयास लाविल्या आहेत १ स्वारी तिसरे प्रहरी किल्ल्याचे बाहेरून फिरून पाहिला किल्ल्याची पड-झड फार उत्तरेचे बाजुने वगैरे जाहली आहे. येविसी रागे भरणे जाहले. १ किल्ल्यात महादेवाचे देवालय आहे त्यानजीक विहीर आहे त्या विहीरीत श्री. गणपति आहे व अश्वत्थ आहे त्याजपुढील दक्षणा गावचे जोशी याची असे असता महादेवाचे पुजारी कुंभार म्हणोन आहेत त्याणी घेतली स॥ त्याजवर जोसी याणी अर्जी दिली आहे. १ निमजग्यानजीक पोकळ वाजत होते तें उकरताना आत दगडाची खाण असते तसी आहे त्यात मोठे मोठे दगड आहेत. बाजत दुसरे नाही ! १ ऐकीव वर्त-मान—मिरजेस श्री कै. नारायणराव सो वारले ते पदरच्या मंडळींच्या अनास्थेमुळे असे कोणी इंग्रजास समजाविल्यावरून मिरजेहून बापू भिलवडीकर बापू माधव पटव-र्धन व भिकाजीपंत गोखले रावोपंत करमरकर वैद्य यांस चौकशीसाठी बेळगावास

नेले म्हणोन. तसेच तासगावकर वाईस मूल झाला तो पुन्हा हुकेटीस क्यामेटी होऊन लबाड असे ठरले म्हणोन वर्तमान.

२७ एप्रिल : १ दोन प्रहरी नारायणराव नानाचे घरी भोजन. अत्तरगुलाब व सोलापूरकर राधा नाइकिणीचा नाच.

२८ एप्रिल : १ सांगलीहून पत्रे आली त्यांत तात्यासो इचलकरंजीकर यांची मातुश्री महायात्रेहून आली सबब तात्यासो कराडापर्यंत आडवे गेले आहेत म्हणोन.

२९ एप्रिल : १ खासा स्वारी गावचे उत्तरेस दामाजीपंत याच्या पादुका व विहीर पाहून आली.

३० एप्रिल : १ नगी समशेर हत्ती यास सर्दीचा आजार होऊन आज तिसरे प्रहरी एकाएकी पडून मेला ख.शास फार वाईट वाटले किल्ल्यात चौबुरजीचे लगत ईशान्येच्या बुरजानजीक दफन हत्तीकडून वोढून करविला. १. श्रीमंत रा. गंगाधर-राव बाळासाहेब मिरजकर यांचे लग्न वैशाख शु॥ ९ मंगळवारचे ठरले आहे.

२ मे : मंगळवेढे. १. कृष्णतळे म्हणोन किल्ल्याचे पश्चमेस पांडुरंगराव आपा याजकडे वहिवाटीस आहे. त्याचे पूर्वेस जमिनीत एक जुने देवालय कोरीव दगडाचे निघाले. ते उकरावयास लाविले आहे. ते पाहून स्वारी आली.

३ मे : मु॥ किल्ले मंगळवेढे. १. मौजे ढवलस (?) पा॥ मंगळवेढे येथील न्हाव्याने एक पाखरू चमत्कारिक पाय दीड हात उच बारीक बोटासारखे मान उंटासारखी व आंग बदकासारखे पांढरे. उडावयाचे पंख तांबडे तोंड धन-चिडोसारखे असे आहे. ते आणून सरकारांत दिले. १ मे. म्यानसीनसाहेब ब॥ असिस्टण जिल्हा बेळगांव याचे पत्र आले त्यांत फोडी काढणार डाकतर यांजकडून मुलास देवी काढल्या असता मुले जाया होत नाहीत. यास्तव सर्व ठिकाणी डाकतर चाकरीस सर्व लोकांनी ठेविले आपला मनोदय कसा आहे. तो पाहावा म्हणोन.

७ मे : मु॥ किले मंगळवेढे. १. गावातील व परगावचे पट्टे खेळणार व इटे खेळणार आले आहेत. त्याजकडून इटे व पटे किल्ल्याचे बाहेर मैदानात सकाळी श्री. तात्यासा॥ याणी खेळविले. १. तिसरे प्रहरी स्वारी कृष्ण तळ्याजवळ जमिनीत देवालय दगडी निघाले ते पाहावयास गेली होती.

११ मे : १. कोणी सोद्याने गंगाधरराव किल्लेदार हे भाऊसा॥ व नरसिंगराव पटवर्धन याजवर जादू करीत आहे ॥ म्हणोन चिठी लिहून महादेवाचे देवळानजीक टाकली.

१२ मे : १. बाइजा नाइकीण माइणीकर या देशांत आली आहे. रात्रौ गाणे खाशाजवळ झाले.

१४ मे : आज रयतेने सरकारात मेजवानी वाड्यातच केली. १ रयेत वगैरेनी सरकारस्वारी आली सबब सरकारात ऐवज रोख दिला तो.

५०० श्रीगणपतीमहाराज संस्थान सांगली यांचे सिखराचे सोनेरी मुलाम्याचे कळस करणेब॥

५०० मेजवानी केली त्याब॥पोसाखाचे.

५०० नारायणरावनाना कडील वहिवाट काढावी दुसरे कारकून वहिवाटीस ठेवावे म्ह. नजर.

१५००

१ रयेत लोक समक्ष येऊन मुजरा करून स्वारी आली संतोस जाहला गावातील वगैरे फिर्यादी मनास आणून चौकशी यथास्थित केल्या म्हणोन विनंति केली आज्ञा जाहली जे तुमचा व रयतेचा सर्व बंदोबस्त करून दिला आहे. तुम्हावर कोणी जाहली जबरी केली असता तुम्ही दांडगाई करू नये. जो मजकूर असेल तो येऊन सांगलीस सरकारांत कळवावा म्हणजे सर्व बंदोबस्त करून देईन म्हणोन आज्ञा जाहली व तुम्ही रयत लोक खुशाल तर मी खुशाल म्हणोन आज्ञा जाहली. रयत लोक खुशाल होऊन निरोप घेऊन गेले.

१७ मे : मु॥ विजापूर. १ प्रातःकाळी खाशांची स्नानसंध्या जाहल्यावर मामलेदार वगैरे मंडळी आली होती त्याणी इंग्रजानी शिकाचे राज्य घेतले त्याचा जाहीरनामा आलेला दाखविला. व सातारचे राज्य खालसा केले त्याविसी जाहीरनामा आजच सकाळी आला म्हणोन सांगोन त्याची नकल दाखविली व रसिदंटसो सातारेहून आले होते व आणखी साहेबलोक येतात त्यास विजापुरास मोठमोठ्या इमारती केलेल्या आहेत त्या कोणी केल्या त्याच्या माहितीचे बुक केलेले दाखविले. त्यास इकडून इंग्रजी सरकारातून करांचली आलेली दाखविली. विडे देऊन निरोप दिला. १ स्वारी भोजनोत्तर निघाली बरोबर मामलेदार होते. प्रथम अर्क किल्ल्याचे तटाचे खंदकांत श्रीनरसोबाचे देवालय आहे त्याचे दर्शन घेऊन अर्क किल्ल्यात गेली साऱ्या हवेल्या पडिल्या आहेत. आंत झाडी वाढलीं आहे वस्ती अगदी नाही ते दुरून पाहून अर्क किल्ल्यातच मक्का मसीद आहे ती पाहून तेथून अर्क किल्ल्याचे बाहर पूर्वेस खंदकास लागून असारमहाल आहे तेथे जाऊन असारमहालात पादशहाचे तक्ताची जागा आहे ती पाहून तिला खुरनीस करून येक रुपया ठेविला नंतर असारमहालातील दुमजल्यावर जाऊन सोनेरी मुलाम्याचे काम आहे ते पाहून नंतर पातशाहाचे वेळची बिछाइती सामान गालिचे वगैरे मोठे मोठे आहेत ते पाहून स्वारी खाली आली असारमहालाचे पुढे लगत मोठा हौद पाणी भरलेला आहे ते पाणी नळाचे आणिलेले आहे ते पाहून नंतर मोठ्या मोठ्या दगडांचे चवरंग आहेत ते पाहिले व येक दगडाच्या चौकीवर वेलदार बुट आंगचे आहेत ते पाहिले.

१८ मे : मु॥ विजापूर १ प्रातःकाळी स्वारी निघाली ती मुलुखमैदान तोफ किल्ल्याचे तटाचे बुरजावर आहे ती आठ हात लांबीची आठ हात पुरे दीड

हात उंचीचा गोळा असी आहे. ती पाहून नंतर उपल्याबुरुज किल्ल्यातच आहे त्याजवर बांगडी लोखंडी दोन तोफा आहेत. एक दहा हात लांबी व एक पंधरा हात लांबी अशा दोन आहेत. पंधरा हात आहे त्याचा गोळा एक वीत सहा बोटे आहे त्या तोफावर चढ़न पाहून तेथून चंदाबावडी म्हणोन विहीर आहे ती चंदा कळावंत, पातशाहाचे वेळची होती ती पाहून तसे अमीनसाहेब अली पीरजादे होते त्याचा दरगा किल्ल्याचे पश्चमेस अर्ध कोस आहे तेथे जाऊन दर्गा पाहिला. अमीन-साहेब याचे वौंशिक पीरजादे आहेत ते पुढे सामोरे आले. त्याचे मकाणास गेले. त्याणी आपली हत्यारे करांचल्या दाखविल्या. तेथून स्वारी इभ्रामरोजा म्हणोन मोठी महर्जद आहे तीं जाऊन पाहिली. त्या महजदीवर चौगीर्द पारसी अरबी अक्षरे दगडावर खोदली आहेत. त्याजवर सोनेरी मुलामा चढविला आहे. परंतु हल्ली तो लोकांनी खरडून नेला आहे. आत सहा कबरी आहेत. पुढे मोठी मसूद आहे. वर गुमट आहे. त्याचे पश्चमेस मोती घुमट म्हणोन मोत्याचा गिलावा चुन्याचा आहे तो पाहून स्वारी परत ठिकाणास आली.

१. तिसरे प्रहरी नागोकृष्ण मामलेदार मंडळीसह आले. त्याणी येक गावातील चितारी मुसलमान याजवळ तसबिरा पुराण्या होत्या. त्या पाहावयास आणिल्या होत्या त्या पाहिल्या. त्यापैकी येक स्त्री पातशानी पूर्वी ताजखान वजीर याजकडून पृथ्वी शोधून आणली होती. त्या तसबिरीचा फर्मा व दुसरी आणली येक असे दोन उतार विठ्ठलपंत चितारी याजकडून करऊन घेतले.

१९ मे : १. प्रातःकाळी सहा घटका दिवसास स्वारी निघाली. मोतीं घुमट म्हणोन इभ्राम रोज्याचे पश्चमेस आहे तेथे जाऊन कबरीस मोत्याचे चुन्याचा गिलावा आहे तो पाहून सदर घुमटाचे उत्तरेस अर्धा कोस चिन किशा फकीर याचा दरगा आहे. तेथे त्याचे वौंशिक आहेत. त्यानी बोलाविले होते सबब गेली. दर्शन घेऊन स्वारी निघाली.

२० मे : मु॥ हिरडेफळ (?) १. कूच करून कोटलगीचे मार्गे मु॥ मजकुरी दाखल झाली.

२१ मे : मु॥ कवठे महांकाळ १. पहाटेस स्वारी निघाली ती बिलूराहून मिरजवाडा म्हणोन खेडे तीन कोसावर आहे तेथे वोढ्यात प्रातःस्नान केले व डफळापुरास आली. तेथे रामचंद्रराव डफळे यानी जमीन श्रीगणपतीस इनाम ४० रु. ची दिली आहे. ती पाहून स्वारी गावात आली. रामचंद्रराव डफळे यल्लमास गेले होते. वाटेने ज्वर येऊ लागला. पण स्वारी आल्याचे वर्तमान कळून रात्रीस येथे आले आहेत वाड्यात स्वारी यावी असे त्यांच्या कारकुनानी सांगितले. त्यांचे घरी गेली. मान पान शला पागोटे सर्व झाले. खाशानी त्यास आपले हाते काढा लिहून दिला व वैद्यहि पाठऊन देतो म्हणून सांगितले.

२२ मे : मु॥ खरसिंग १. प्रातःकाळी कूच होऊन सिरढोणचे रानात देसिंगास

हिंदुराव घोरपड्यांच्या घरी जाऊन अडीच प्रहरीं मु॥ मजकुरी आली. १. जर्दा घोडा रहिवल गोमतीचा यास कवठे मुकामी आजार येऊन वाटेने आणिताना येकायेकी खाली पडून मेला.

२३ मे : मु॥ सांगलीं १. खरसिंग मुकामी स्नानसंध्या उरकून उदनवाडी-करांनी लष्करातच मेजवानीचा बेत केला होता. तेथे भोजन करून स्वारी निघाली ती दंडनाथास येऊन दर्शन करून सिदेवाडी कलबी तानग कुपवाडीचे मार्गे तात्या-सोाचे मळ्यात आली. वरकड बुनगे वगैरे भोसेकडून सांगलीस आले नंतर साहा घटका दिवसानंतर अस्तमानी स्वारी निघाली ती देवदर्शने करून किल्ल्यात आली हल्ली श्री. रमाबाई तासगावकर यानी मुलाप्रकरणी घोळ पडला व दौलतीचा बदो-बस्त नाही म्हणून दौलतीची मोकळीक करण्याची खटपट करण्यासाठी मुंबईस गौरनरसाहेबाकडे पाठविले म्हणोन वर्तमान समजले.

२८ मे : १. रामाजी नाइक याची कन्या बाबासाो यास देणेचा निश्चय ठरला. परंतु पुन्हा ऐसे ऐकीले की मुलगी जेष्ठ व पुत्र जेष्ठ व मास जेष्ठ त्यापेक्षा मुलगी करू नये म्हणोन गोपीनाथ दादा वगैरे याणी येऊन विनंती केली. त्याज-वरून नाईक यास विचारले त्याणी सांगितले जे ही मुलगी वडील नव्हे हिच्यापूर्वी येक वेळ गर्भपतन जाहले म्हणोन त्याजवरून पुन्हा तोच निश्चय कायम केला.

३१ मे : १. आज दशहार श्रीकृष्णाबाईचे उच्छाहास आरंभ जाहला. सिरस्ते प्रो.

१ जून : १. राजश्री विष्णूपंत फाटक रमाबाई तासगावकर यांचे बंधु व गोविंद-पंत नेने हे रमाबाईकडून पत्र घेऊन तासगावाहून आले. येऊन भेटले. पत्रातील मजकूर नि॥ केला. विनंती करतील म्हणोन विनतीतील भाव बाईस पुत्र जाहला असता लुच्याचे बोलण्यात मुलगा दुसऱ्याचा आणिला म्हणून येजट साहेब वगैरे म्हणतात. बेलगावास आम्हाकडील मा॥र ऐकून गावास आला. उत्तर सांगात नाहीत. सोा नहरास हाली गोरनर साहेब आले आहेत. त्याजकडे थैली घेऊन राजश्री बापु आठवले यास पा॥ आहेत. त्याणी तेथे जाऊन साहाबा. वतीने भेट घेऊन थैली दिली. सोा त्याणी सांगितसें जे तुमचा मजकूर जो असेल त्याची याद द्यावी म्हणोन त्याज वरून यादीचा मसुदा करून पहून देण विसी आठवले यांचे पत्र आले आह. ते पाहावयास आणिले आहे म्हणोन व आम्ही येक मसुदा लिहिला आहे. पाहून नीट करून दिल्हा पाहिजे म्हणोन व येकवल स्वारी तासगावास येऊन मुल कृपादृष्टीने पहावे म्हणोन कल्याण मुलाचे होईल म्हणोन बाईने फार प्रकारे विनंती करण्यास सांगितली आहे.

३ जून : १. खाशास्वारी स्वानंदभूवनाचे तल्यास पाणी पुष्कळ आले आहे. सोा प्रातःकाली भोजनासच जाणेचा बेत करून दोन प्रहरी स्वारी जाऊन तिसरे प्रहरी परत आली. १. भाऊसाहेब याची स्वारी कुरुंदवाडाहून आमत्रंण करून आली.

४ जून : १. सिवगीरी गोसावी यांणी सरकारात मोती दहा हजाराचे दाखवावयास आणीले होते. माल चांगला आहे. घेणे होईल.

५ जून : १. वर्षास श्रीकृष्णाबाईस वाण दशमीस देणे प।। परंतु सीमंत सौ वती मातुश्री बाईसाहेब यांची स्वारी येथे नव्हती. स।। आज दिल्हे.. १. श्रीमंत राजश्री बाबासाहेब यास राजश्री रामाजी नाईक भिडे यांची कन्या द्यावयाची निश्चय होऊन लग्न पत्रे सुद्धा लिहीली. परंतु बाबासाहेब यास ज्वर येत होता तो हाली येतच आहे. स।। तो बेत रहाता होऊन राजश्री तात्या लागू याचे चिरंजीव केशवराव आहेत त्यास देणेचे ठरविले. वद्य ३ मंदवारी लग्न व्हावे असे ठरविले. सर्व सिद्धता लग्न ची सरकारातून होत आहे.

९ जून : १. श्री. क्षेत्र कासीहून रा. भाऊ खाडिलकर याचे पत्र अधिक वैशाख शु।। ५ शके मजकूरचे आले त्यात क्षेत्री राजघाटी इंग्रजाच्या दारूच्या नावा सुमारे २५ येऊन मिति मजकुरी राहिल्या. त्याजवर कुलपी गोळ्याचे पीप होते. त्यापैकी एक नावेस रात्री आग लागली. गोळा फुटून गंगातटावरास पडला. त्याचा अवाज सहस्र विजाप्रमाणे जाला. त्यामुळे शहरातील हवेल्याची पूर्वेकडील कवाडे धक्क्याने निघून पडली व कितीएक कोहंडे निघाले व कितीएक हवेल्या पडल्या. वरान घाटी दिलीपती पातशाहाचा वौशिक याची हवेली पडून शहाजाद्याची बायका व मुले मेली. तो एकटा राहिला आहे. ×× इंग्रजाचीहि ×× पनास हजार रुपयाची इमारत होती. ती जमीनदोस्त जाहली. नंतर दुसऱ्या नावेस आग लागली. त्यातील कुलपी गोळे गंगेत आग लागून पडले. त्याणी पाणी उसळून बाकीच्या नावा गंगेत बुडाल्या. ३ हजार सुमारे माणसे नावेतील मेली. (आपल्या) सरकार वाड्याचेहि नुकसान जाले. साल गु।। जनोबा देशपांडे याचे पत्र छ २२ रजब अखेरीस आले त्या प्रो हे वर्तमान आले खरे आहे.

१० जन : १. रा. विष्णुपंत भावे याणी राम अवतारिक खेळ वाड्यांत दोन तीन केले

२३ जून : १. मेहरबान म्यानसिन साहेब याची थैली आली. त्यात आसाहेबाचे पदरचे सरदार लोक वगैरे उमेदवार असतील ते इंग्रजी सरकारात परीक्षा घेऊन नोकरीस ठेवणेचे आहे. सबब जे असतील त्यास पाठऊन द्यावे म्हणोन आली आहे.

६ जुलै : १.रा. कोन्हेरराव बापू शहापूरकर बेळगावास जाऊन मे. रिविसनसो। याची भेट घेऊन प्रकृतीचे मान कळविले व पेशजी येथील दौलतीचे मालक श्रीमंत तात्यासाहब हे थोर होईपर्यंत मुखत्यारीने कारभार रा. हरिहररावदादा लागू व कोन्हेरराव बापू देशपांडे हे करतील. थोर जाल्यावर आपली कामे आपण तात्यासो। पाहतील. येविसी व भाऊसाहेब यास एकवीस हजार रुपये नेमणूक एक ठिकाणी न राहि-ल्यास द्यावी येविसीचे वगैरे कामाची याद करून गौरनर सो। याजकडे पाहण्यास पाठऊन द्यावी म्हणोन बेळगावास पाठविली होती. तो मजकर साहेबानी बापूजवळ

काढिला. त्यात मिरजकर याची व जमखंडीकर यांची दौलत त्यांचे कारभारी याणी बुडविली. कर्ज करून ठेविले तसा प्रकार हा दिसतो. ही याद आम्ही काही गौरनर सो। याजकडे पाठवीत नाही. येविसीचे भाव बोलले. तो मजकूर बापूनी सरकारात लिहिला. त्याजवरून येथून सरकारातून मे. रिविसनसो। यास थैली पाठविली. त्यांत आम्ही जी याद केली ती ठीकच आहे. कामगार विश्वासूक आहेत. यांस बाध आणावयाचा नाही. यादी गौरनर सो। याजकडे पाठऊन यादीवर सही करून आणावी म्हणोन लिहून पाठविली आहे.

१० ऑगस्ट : १. श्रीमंत रा. पंतप्रधान बाजीरावसाहेब पेशवे ब्रह्मावर्तास आहेत. वृद्धापकाल जाहला आहे. नेत्रास दिसत नवते. अलीकडे कोकणचा ब्राह्मण ब्रह्मावर्तासि गेला होता. त्याणे औषध घालून डोळे नीट केले. दिसते चांगले. त्यास काय पाहिजे ते मागावे म्हणोन श्रीमंतानी आज्ञा केली. त्याणे दोन हजार रुपये द्यावे म्हणोन बोलला. पुढे काही दिवसांनी इंग्रजी सरकारातून खर्चाबद्दल साठ हजार रुपये येतात ते आले. ते समई त्या ब्राह्मणास तो दरमहा सर्व देऊन सदरहूची हुंडी पुण्यास दयाराम आत्माराम याचे दुकानी येऊन लागली म्हणोन

२० जुलै : चिदंबरबाबा दीक्षिताचे चिरंजीव बनोसीकर हे बनोसीस महासाधु थोर आहेत. त्याचे पत्र आले. त्यात हा ज्वर पस्तीस दिवस सुमारे राहील परंतु साडेसाती आहे. शनीची पीडा वगैरे चार ग्रह तीन महिने अनिष्ट आहेत. त्याची दाने वगैरे योग्य असतील ती करवावी. मृत्युंजयाचा जप करवावा वगैरे मजकूर लिहिला आहे. त्या प्रो। पेशजी मृत्युंजय व ग्रहदाने वगैरे सर्व केलेच आहे. आज पस्तीस दिवसही जाले. श्रीगणपति महाराज कृपा करील असे दिसत आहे.

१२ ऑगस्ट : १. नागपंचमी सबब सुभाना सिदे याचा लेक गणु याने एक दोन नाग धरून आणिले आहेत. व नागकुळे सिराळचाहून गणू जाधवाने आणली आहेत.

१६ ऑगस्ट : १. विनायक रामचंद्र कानिटकर यांची व राजी सोनारीण इची लेक कुसी इची दोस्ती होती तिणे काही दादल्याची सोडचिठी न घेता येथे व्यहार करीत आहे. सबब मिरजेहून दादला भाऊ सूर्यवंशी म्हणोन आहे. त्याणे येऊन खटले करून तिला व त्यास धरली. सरकारात समजले. तिला पाहऱ्यात देऊन ठेवली आहे. चौकसी होत आहे.

२४ ऑगस्ट : १. शेतकामाची व सुतारकामाची व लोहारकामाची व तांबटकामाची व सोनारकामाची फार चमत्कारे या देशात आहेत. त्याचे तिकोने लाकडी करऊन द्यावे म्हणोन त्याचे उत्तर लि।। आहे.

२८ ऑगस्ट : १. खंड नाक म्हार सरंजामी कलबीकर हा खाशाचे समाचारास म्हणोन आला आहे. त्यास दरवाजाचे बाहेर घाटीजवळ खासा स्वारी जाऊन खरसीवर बसोन त्यास बोलाऊन दाहा-बारा हाताचे अंतराने बसऊन मुजरा घेऊन प्रकृतीचे वगैरे बोलणे झाले. त्याणे विनंती केली. त्यात इंग्रजी सरकारात

सरंजामी चाकरीबद्दल स्वार आसामी आहे. त्याचा नख्तऐवज दरमाहे रुपये २५ प्रो द्यावे म्हणोन बेळगावाहून थैली आली आहे. त्याचे उत्तर गावचे उत्पन्न ८ शे ९ शे रुपये नापिकामुळे होते. त्यात ४ शे रुपये बाबतीस द्यावे लागतात. रोख स्वाराबद्दल म्हटले म्हणजे चारसे पाहिजेत. मग याणे निभावणी कसी होतो? पेशजी प्रो स्वाराने चाकरी करावयाची त्या प्रो घ्यावी म्हणोन मेहरबानास थैलीचा ज ब लिहिला आहे म्हणोन एकून घेऊन ठीक आहे म्हणोन आज्ञा जाहली. त्यास निरोप दिल्हा. ठिकाणी गेला.

३० ऑगस्ट : नासिककर बाबा संध्याकाळी खाशाकडे आले होते. सारमंडळ वगैरे गीत प्रकर्णी दाखविले. दोन घटका बसून ठिकाणी गेले.

२ सप्टेंबर : १ आनदराव माने बारगीर हे पुण्यास गेले होते. ते काल आले. जिनस खरेदो आणिला आहे बिल तपशील.

१. तोफेया नावा (?)
१. इंग्रजी खरारे
१. मेणबत्या लावण्याची घडवंची
१. इग्रजी फळझाडे बी
१. खुसबोई सामान
१. थोर मखर (?)
१. संगमरवरी कारंजे अक्षई
१. जेजाला सुमार ४
१. हत्यारे खैराती
१. जितहेची माती
१. किरकोळ जिन्नस

३ सप्टेंबर १. हिंदुस्थानी कायत लाला पारशी विद्येत आहे. तो सांगलीस आहे. काही मुले यास सिकवीत असतो.
त्याचे नांव लाला.

५ सप्टेंबर : १. मातुश्री लक्ष्मीबाई प्रतिनिधी कराडकर यांस श्रावण वद्य ४ सोमवारी अस्तमान घटकां दिवसास देवाज्ञा जाहलो.

६ सप्टेंबर : १. रा. सखारामबावा परांजपे गवई पौष मासी श्रीकासीयात्रेस गेले होते. सांगलीस काल आले. आज येऊन खाशास भेटले. त्याणीं काशीस गेल्या प्रकर्णी ब्रह्मावर्तास गेलो होतो दोन महिने श्रीमंताजवळ होतो म्हणोन सांगितले व श्रीस्वामी जगद्गुरु मठ संकेश्वर हे सातार प्रांती देशावरास गेले अ हेत. गुरुसांप्रदायाप्रो गावगना पैका घेतात सबब सातारचे रसिदंट सो याणी हुकुम फर्माविला की स्वामी ज्या गावी राहतील तेथे गावकरी याणी दररोज १० रुपये स्वामीपासून घ्यावे व गावातील लोकानी कोणी पैका देऊ नये म्हणोन त्याजवरून स्वामी पैका घेत नाहीत. कराडास मात्र चातुर्मास आपला खर्च खाऊन आहेत म्हणोन व पंढरीस आषाढी कार्तिकीस यात्रा येतील. तेव्हा मरीचा उपद्रव होतो सबब यात्रा कोणी येऊ नये. आली असता यात्रेवर कर बसविणार असा हुकूम जाणार आहे म्हणोन.

१० सप्टेंबर : १. ब्राह्मणांस कोंगणेश्वरीचे दरवाजात दक्षणा दर आसामीस

सरसकट चार आणे प्रो। देऊन आवारांत कोंडले. दक्षणा जाहलेवर मुक्तता केली. ब्राह्मण दक्षणेस सुमार ६००० जाहले.

११ सप्टेंबर : १. खाशाचे मनांत शास्त्रीय विषय काही ऐकावा असे मनांत त्याजवरून शास्त्रीमंडळी श्रीदेवालयांत सभा करऊन चार घटका वादविवाद जाहला. मडळीपैकीं बालाचार्य याचे व रावजी शास्त्री आगासे याचे बोलणे जाहले. मध्यस्त गोंदूनाना भिलवडीकर व गोपीनाथ दादा.

२१ सप्टेंबर : १. फ्रेर साहेब कमिशनर जिल्हा सातारा हे श्रीमंत पेशवे अव्वल तागाइत अखेरपर्यंत बखर करीत आहेत त्यास श्रीमंत पेशवेमंडळी व पदरचे सिंदे होळकर व पटवर्धन वगैरे मोठे मोठे सरदार याचे जेथे नाव येईल त्या ठिकाणी त्याची तसबीर ल्याहावयाची सबब आप्पासो। याजवळ सग्रह मोठा आहे. ज्या तसविरा असतील त्या आणऊन त्याचे उतार घेऊन परत पाठऊन देऊ म्हणोन लि।। आहे म्हणोन त्याजवरून ज्या तसविरा येथे होत्या त्या साहेबाचे नावे थैली पत्र लि।। पाठऊन दिल्या

१२ सप्टेंबर : १. नासिककर बावा हे सारामंडळ वाजवितात. सबब सरकारी सारमंडळ तयार करविले आहे. मिरजेस आण्णासाहेबांनी तयार केले होते. तेहि पाहावयास आणविले आहे.

१४ सप्टेंबर : १. सरकारची चित्याची जोडी बापू दरवेशी याजवळ सिकारीस दिली होती. त्यापैकीं मादी आजाराने मेली. तिचे कातडे व नख सरकारात दरवेशाने आणून दिल्ही

१५ सप्टेंबर : १. कासम वगैरे व दाजी लावण्या व पवाडे करणार मिरजकर आले आहेत. त्याजवळ धोंडजी वाघ याचे स्वारीचा वाका आहे. त्यातील हसील मजकूर लिहून दिला आहे. त्याचा पवाडा करून आणा म्हणून सांगितले आहे.

२५ सप्टेंबर : १. पर्जन्यामुळे धारण महाग जाहली आहे. गोरगरीब उपासी मरतात. आपली पोरे विकावयाकरतां सागलीत येक दोन आसामी घेऊन आले आहे‌त. त्यास सरकारातून सांगितले की, तुम्ही पोर विकू नका. तुम्हास पोटास देवितो म्हणोन सांगोन पोटास देविले. १. सातारप्रांती अन्नावाचून पाच चौघानीं पाण्यात जीव दिला म्हणोन वर्तमान समजले. असा अनर्थ पावसाचा जाला आहे.

२७ सप्टेंबर : १. आज गावातील सर्व ब्राह्मणास सरकारातून ताकीद देऊन पर्जन्याकरितां अनुष्ठानास लाविले आहेत. त्याणी अस्तमानपर्यंत उपोषित अनुष्ठान करावयाचे त्यास फराळास व साखरपाणी सरकारातून करविली आहे.

२६ सप्टेंबर : १. अष्टे वाळवे येथे शुद्र व त्याची बायको व मुले अन्नावाचून बहुत कष्टी होऊन बाइको जी होती ती विहीरीत जीव देणेकरता गेली. तेथ एक दगड होता. तो उचलन पदरी बांधोन उडी मारावी म्हणोन दगड उचलती तो खाली एक नाग पाहिला. तेव्हा उडी मारावी. त्यापेक्षा सर्प चाऊन

मरावे हे बरे असे म्हणोन नाग धरला. तो धरताच सुवर्णाचा जाला. घरी आली. नवऱ्यास वर्तमान समजले. सरकारात आपटे मामलेदार यास समजले. त्याणी चकवसी करून साताऱ्यास साहेबास लिहिले. साहेबानी वगैरे आश्चर्य करून दैव िचे म्हणोन तो सुवर्ण सर्प त्याचा त्यास द्यावा म्हणोन हुकूम दिला. १. करवीराहून सडक इंग्रजी सरकार बांधीत आहेत. त्या सडकेस मुरूम पाहिजे. याजकरिता डोंगरानजिक खाणेस आरंभ केला. तों खणता खणता एक विहीरीसारखे खोल सापडले. त्यात नर्मदी बाण असतात. त्याप्रो हजारो बाण पुजेचे लहान मोठे ढीगच सांपडला आहे. त्यापैकी येथे सरकारात वगैरे आले आहेत.

३० सप्टेंबर : १. श्रीमंत कै. पंतप्रधान सवाई माधवरावसाहेब यांचा महालय पौर्णिमेचा तो आज केला.

९ आक्टोबर : १. काल उदगांव येथील पश्चमेचे नदं वेसीचे बुरजात एक तोफेचा गोळा सापडला. लोखंडी आहे. आठ नऊ शेरपर्यंत वजन आहे.

११ आक्टोबर : १. पाछायाच्या वगैरे तसबिरा नामी पाहावयास घोरपडे याजकडून आणविल्या होत्या त्यांपैकी काही उतार लिहून घ्यावयास आणल्या आहेत.

८ आक्टोबर : १. ह. भ. कै. रामजोसी सोलापूरकर याचे नातू रा. पांडोबा जोसी हे आले आहेत. रात्री त्याजकडून जोसी याणी केल्या त्या ईश्वरपर लावण्या वगैरे पदे म्हणविली.

१० नवंबर : १. रात्री किल्ल्यात भावे याजकडील खेळ करविला. श्रीमंत सो. मातुश्रीबाईसो याणी लुगडे किंमत ५० जरीकाठी दिल्हे.

१३ नवंबर : १. रा. त्रिंबक विष्णु सहस्त्रबुद्धे पंतोजी यास इनाम द्यावयाचे ठरले होते त्याप्रो इनास जमिनीची ताकीद दिली. बिघे ५० का॥ नांद्रे ५० मौजे काचाल.

११ आक्टोबर : १. वे. रा. विठ्ठल भटजी काळे घोरपडे यांचे आश्रित. त्याजकडे येथील उपाध्येपणाची वहिवाट आहे. ते चवदार पदार्थ उत्पन्न होते ते सांगलीस पाठवेत असतात ते येऊन भेटून आशीर्वाद करून गेले.

१७ आक्टोबर : १. नवसाबद्दल गुलाबी जरंडचास गेली. डोली वगैरे सरंजाम सरकारातून दिला.

२० आक्टोबर : १. श्रीमंत कै. वा. पंतप्रधान सवाई माधवरावसो यजमान धणी सबब त्यांचे सांवत्सरिक श्राद्ध सालगुदस्तपासून कर्णाचा पाठ केला आहे त्याप्रो आज केले.

२२ आक्टोबर : १. खाशास अलीकडे महिनापंधरा दिवस मूत्रमेहाचा उपद्रव होऊन दिवसास दहावीस व रात्री दहावीस वेळा जावे लागते औषध वैद्याचा देत असतात.

२७ आक्टोबर : १. रा. नरसिंगराव अकबरनीस हे आपले कामाकरतां मुंबईस जाणे करतां निरोप घेतला. त्याजबराबर गौरनरसो यास थैली कारभारी

मुतालिक होणेब।। वगैरे मजकुराची लिहून दिल्ही व कामगार साहेबलोक यास आगत स्वागताची थैली यादी पाठविली.

१ नवंबर : १. आजही सभोवते पाऊस पडत आहे. येथे मात्र नाही. पर्जन्य सर्व प्रांतात महामूर होऊन आबादानी जाली. सर्व पिकें फार सुंदर आहेत. असे पांच पंचवीस वर्षांत पीक आले नव्हते. आता मात्र पाऊस न पडावा म्हणजे सर्व ठीक आहे नाहीपेक्षा नासाडी होईल धारणहि येथील पेठेत साडेचार पावणेपाच पायली जोरी व हरभरे सारखेच आहेत. सर्व चांगले आहे. कोकणपटी मात्र काहीसी गेली. भाताचे पीक कमी आलें आहे.

३ नवंबर : १. बंदिवान सरकारी सर्व यास सांप्रदायाप्रमाणे (दिपवाळी-निमित्त) नाहाणेचे करविले.

५ नवंबर : १. खासा स्वारी श्रीस्वामी रामानुज आले आहेत. जाऊन दर्शन घेऊन बसणे जाले. बोलणी जाहली त्यांत जयपूरकर राजे याणी स्वामीस स्वामी आपले गुरू सबब बलावणेकरिता माणसे आली आहेत. सबब जात आहो तेव्हा सर्व उत्तर मानसयात्राही होईल म्हणोन स्वामीं बोलले. संस्कृत बोलतात स्वामीनी प्रसाद धोतरजोडा खाशास दिला. खाशानी पन्नास रुपये रोख व धोतर जोडा दिला. चंदीचंदावरकर राजे याणी आपले कारागीर याजकडून हत्तीदाताची पालखी करून स्वामीस दिली. ती पालखी फार सुंदर आहे. वेलबुट चित्र सर्व कोरीव फार नामी काम आहे ती पाहिली.

७ नवंबर : १. हैदराबादेहून राव रंभाचे चिरंजीव रा. खंडेराव अर्जुन बहाद्दर (रुस्तुमदौला) याजकडून खुबुत्रे जोड्या घेऊन माणसे आली आहेत. ती सरकारात येऊन भेटली. खबुत्रे दिली. पाहिली. माणसांचे बरदास्त करविली.

८ नवंबर : १ मिरजकर कासम बाणदार (व दाजी आवटी) वगैरे कडून खडर्याचे व बाघाचे स्वारीचे पवाडे सरकारांत करविले त्यास ४० रु. बक्षीस दिले.

६ डिसेंबर : १. मे. फेनिंग सो बे।। मोजणीदार आले आहेत. दोन-तीन दिवस राहणार आहेत.

११ डिसेंबर : १. मुंबई वगैरेकडील सौदागर याणी सामान विकावयास आणिले आहे. त्यापैकी वस्ता लिहिण्याचा डोळे फिरवी ती बाहुली वगैरे सामान ७५/१०० पर्यंत सरकारात घेतले. १. बन्या नाइकीण वस्ती उदगांव ही काही खटल्याकरता सांगलीस आली होती. तिणे रात्री आपलेवर आरोप येतो या भयाने गळफास लाऊन जीव सांगलीत दिला. जिनगो वगैरे वारस पाहून त्यास दिल्ही. सार्थक करविले. १. सालाबादप्रो मिरजेस आंधळ्या पांगळ्याचा सत्कार होऊन धर्म होतो त्याप्रो मार्गसीर्ष शु।। १३ मिरजेस जाहले. नंतर सांगलीस आले. त्यास सालाबादप्रो दर आसामीस चार पैसे व सेरभर दाळ मीठ मिरची प्रो दिले.

२८ डिसेंबर : १. सातारेकर श्रीमंत कै. आपासो। महाराज याच्या राण्या हल्ली आहेत. त्याजवळ पहिल्या मंडळीपैकीं मंडळी होतीं त्यास व त्यातील रा. गोविंद गोपाळ येकबोटे सांगलीकर हा अलीकडे होता. त्यास कैद करून पाहऱ्यात घातला व चौदा पेट्या गूल पार (?) साहेबानी केला म्हणोन वर्तमान आले.

१० जानेवारी १८५१ : १. रामराव बाबूराव जाधव नरसिंगराव व आण्णा म्हणोन चंदी चंदावरकर राजे याचे पदरचे ते राजाची लग्नें व मुलाची वगैरे व्हावयाची त्यांस नवऱ्या पहावयास म्हणोन या देसीं आलें आहेत. सरकारात विनति सांगोन पाठविली की आम्ही भेटीस येणार म्हणोन. त्याजवरून मेहरबांसाहेब यांस कळऊन त्यास येण विसी सांगून पाठविले. त्रिवर्ग येथे आले आंबराईत उतरले आहेत तिसरे प्रहरी ते राजाचे पदरचे सबब खासा स्वारी आंबराईत भेटीस गेली. ते पुढे येऊन भेटी जाहल्या. बंगल्यात कचेरी जाहली. तिकडील वर्तमान सर्व पुसिले. सरंजाम सर्व तालुका वगैरे सर्व इंग्रजी सरकारांत गुदरून दरमहा लक्ष रुपये इंग्रज देतात. म्हणोन सांगितले.

१७ जानेवारी : १. बाजारी वर्तमान सातारेकर श्रीमंत कै. महाराज छत्रपती याणीं दत्त मुलगा कासी क्षेत्रामध्ये घेतला. तो मंजूर होऊन जाहीरनामे लागले आहेत म्हणोन व तासगावकर बाईस पुत्र जाहला त्याविसी चौकसी इंग्रजी सरकारांत पडली आहे त्याचा तपास करण्यास पुन्हा मे. गौरनर सो। तासगावास येणार म्ह. वर्तमान ऐकिले पहावे.

१३ जानेवारी : १. गोकाककर जिनगर याणी लाकडी डोंगरावर सांबाचीं देवळे त्याचे पुढे वाघाची व हत्तीची लढाई जवळ तीन स्वार हत्यार चालविलेले व पायचे सिपाई हत्तीवर साहेब बसून बंदुखीची गोळी घातली असे तऱ्हेचे पोकळ (फलावल ?) झाडे आहेत असे करून रंगऊन सरकारात आणून दिल्हे. फार चांगले काम केले. त्यात येक डुकर गोळी घालून मारिला आहे.

१३ फेब्रुवारी : १. वे. रा. चिंतामणभट ताटके कराडे विद्वान मोठे जन्मांध दोन्ही नेत्र. परंतु विद्या दशग्रंथ जठापाठी चौसष्ट अवधानी आहेत. त्यांची भेट वाड्याची जाहली.

१८ फेब्रुवारी : १. श्रीमंत रा. पंतप्रधान बाजीरावसाहेब पेशवे हे ब्रह्मावर्तास होते. प्रकृत अशक्तच जाहली होती नेत्रास अधपणा, पायहि गेले होते. त्यास देव आज्ञा माघ व॥ १२ स जाहली नगारखाना किल्ल्यातील व वर्दीचा वार तीन दिवसपर्यंत बंद केला आहे.

१९ फेब्रुवारी : १. रा. बाळकृष्णपंत फाटक बेळगावास असतात. त्याणी इंग्रजी अखरेचे बुक सरकारात दिल्हे.

२४ फेब्रुवारी : १. श्रीमंत महाराज रा. छत्रपति संस्थान करवीर उभयता ... हे श्रीपादवाडीस यात्रा पाहावयास व देवदर्शनास आले ते दोन तीन

दिवस जाहले. येथे वर्तमान समजल्यावर आज फळफळावळ मिठाई जिन्नस वगैरे देऊन रा. नरसो रामकृष्ण फडके याजबरोबर श्रीपादवाडीस पाठविला.

२५ फेब्रुवारी : १. देशमुख जावई यांचे पत्र काल मातुश्रीनी वेगळे ठेविले म्हणोन लिहिले होतें त्याचे उत्तर इतका प्रकार मातुश्रीकडून होऊं नये असे असता जाहला उपाय नाही. परंतु आपण त्यांची अवज्ञा न करता जसे सांगतील तसे एकोन मर्यादेने वागावे म्हणोन श्रीमंत सौ. अवडाबाई आक्कासही सदरहू अन्वयेच लिहिले आहे.

३ मार्च : १. कोतवडेकर मंडळी यास नव्या तैनाता करून दिल्या वि. कृष्णाजीपत तात्या शेटे पटवर्धन कोतवडेकर. १. विष्णु महादेव सहस्त्रबुद्धे वोरखलीकर १०० १. नारायणभट पटवर्धन रोढेवाडा गावण १०० १. आठचार दिवशी नांद्रयास एका बायकोने जीव दिल्याचे सरकारात समजले होते त्यास हल्ली चौकशी जाली त्यात नांद्र येथील जैन याची बाइको इणे दादल्याचे ऐकिले नाही सबब रागे भरला व थोडसे मारले. सबब तिच्या आईने आक्रोश करून त्याचे घरात येऊन जीव दिला असे आहे. ज्याचे घरी जीव दिला त्याबद्दल चारशे रुपये गुन्हेगारी सरकारात घेतली.

४ मार्च : १. वे. रा. अनंतभट आपटे हे बाळाजी नाईक केळकर याचे घरी पुण्यास असतात. ते विद्वान आहेत. त्यास पांच रुपये देऊन निरोप दिला. १ खाशास मूत्राचा विकार होऊन आग व तिडीक येते त्याजवर आज संध्याकाळी मिरा हकीम याणी तजवीज करून चिपलणी (?) चालऊन औषधीने धुऊन काढिले.

६ मार्च : १. श्रीमंत रा. भाऊसाहेब याची स्वारी कुरुंदवाडास भाऊसाहेब कुरुंदवाडकर वारल्याचे समजलेवरून समाचारास गेली. संध्याकाळी परत आले.

७ मार्च : १. उन्हाळे दिवस दोन महिने बाजारास लोक परठिकाणचे येतात त्यास भाकर खाते समई ताक द्यावे म्हणोन सरकार आज्ञा जालेवरून शनवार दोन प्रहरापासून रविवार दोन प्रहरपर्यंत नदीवर जे लोक भाकर खातील त्यास द्यावयास आजपासून प्रारंभ जाहला.

१० मार्च : १. आज खाशाची प्रकृत बरी आहे. चिपनली घेतात तेणे करून लघुशंका समई आग नाही वगैरे बरे आहे.

१४ मार्च : १. सापकर कदम याणी चित्ता शिकारीचा पाठविला तो शिकारीस खडे राजुरीच्या रानात दरवेशानी नेऊन जिवंत काळवीट धरून आज सकाळी आणिला आहे. सरकारात हरणात बांधला आहे. मोठा हुषार आहे. – संध्याकाळी काळवीट मेला. १. कुरुंदवाडाहून पत्र आले आहे त्यात उदकुंभदानास हत्ती पाहिजे तो दान देऊन ब्राह्मणाकडून किंमत देऊन परत पाठविण्यांत येईल. म्हणोन त्याचे उत्तर दान दिलेला परत घेण्याचा सांप्रदाय येथील नाही. सबब पाठविला नाही.

१६ मार्च : १. मौजे कोतवडे येथील वतनी जागा सरकारची आहे. त्याजवर घर बांधावयाचे होते. ते बांधले म्हणोन रा. रामचंद्र बापूजी पटवर्धन यांचे पत्र आले. फाल्गुन वद्य ९ स वास्तु करावयाची म्हणोन लिहिले असे. १. अस्तमानी खासा स्वारी दोन घटका रात्रीस श्रीपुढील होळी व चावडीवरील किल्ल्यातील होळीस जाऊन आली.

१६ मार्च : १. आज धुळवड मंगळवार सबब करण्याचा सिरस्ता नाही.

१७ मार्च : १ रात्री देवळात राधेचा खेळ जाहला.

१८ मार्च : १. आज धुळवड जाहली. १. तिसरे प्रहरी खाशाजवळ विठी कसबीण वक्षीची इचे गाणे जाले.

२१ मार्च : १. श्रीगणपति महाराजापुढे सालाबादप्रो कचेरी होऊन पदरचे मंडळी सर्व बोलावून श्रीमंत रा. तात्यासो व भाऊसो वगैरे सुधा बसून नाच जाहला, बिडे अत्तर गुलाब होऊन रंगाचा समारंभ रुप्याचे बंबानी वगैरे बहुत जाहला. हत्ती दोन तीन पांढरे पोषाख करऊन त्याजवरही रंग घातला. खाशास श्रीचा प्रसाद गुलाबदाणीतील केशरी रंग पागोट्यावर श्रीकडील कारकुनानी घातला.

३० मार्च : १. आज बावन घटकास मेष राशीस शनी गेला. खाशाची रास कुंभ. साडेसाती सरली.

१ एप्रिल : १. श्रीगणपति महाराजाचे देवालयाचे पुढील नऊ खणी सोपा तयार होत आहे. त्याचे चाफेखणाचे लगीचा धोंडा आज वर कमानीवर चढविला.

५ एप्रिल : १. खाशाची प्रकृत बरी आहे. अलीकडे पाय दुखतात. त्यामुळे चालण्यास अमळ श्रम होतात. मूळव्याध व मूत्रकृच्छाचा उपद्रव आहेच काही दोन बरे असते दोन दिवस जाजती होते. मिराभाईचे व सांबारेबावाचे औषध नेहमी चाललेच आहे. श्रीगणपति महाराज कृपा करणार समर्थ आहे. १. अलीबक्ष हत्ती मोकळा आहे. आता बाजार माणसास उपद्रव करील सबब महात वगैरे याणी श्री कृष्णाबाईकडे नेऊन वाडीचे रानात खेळविला.

६ एप्रिल १. आज तेवीस घटका दिवसा उपरांत कन्या रासीस गुरु वक्री आला. सवब खासा स्वारी वगैरे उपहार घेऊन समयास वाजत गाजत कृष्णाबाईस श्रीगंगा आली, सबब सामोरे जाऊन संकल्पपूर्वक स्नाने केली. तोफेचे बार पाच केले.

१० एप्रिल : १. मौजे दिगरजेस सरकारी रेडा आहे. त्याणे गावातील दोन तीन माणसे मारली. जखमी जाहली आहेत. १. सातारकर कारागीर यांणी यंत्राची पेटी आणली आहे. ती शंकर करजगर याचे विद्यमाने सरकारात दाखवावयास आणली होती. तिची किल्ली दिली म्हणजे माणसाने हात लाविला म्हणजे झटका बसतो ! व कपाल व पोट दुखत असेल तर त्या ठिकाणी स्पर्श केला म्हणजे दुखण्याचे राहाते. ती पाहून परत ठिकाणी गेले.

९. एप्रिल : १. श्रीगणपतिमहाराजाचे पुढील नाव खणीचे चाफेखणाचे लगेचा दगड जोतिबाचे डोंगरातून आणला.

११ एप्रिल : १. कै. बाबा भावे पुणेकर याजवळ वज्रनीळ पन्नास हजार किंमतीचा होता. हल्ली त्याचे चिरंजीव रावजी याणी पुण्यास घेऊन जातो. कोणी घेतल्यास देईन म्हणोन घेऊन गेले.

१२ एप्रिल : १. अलीबक्ष हत्तीस सकाळीं बांधावयाचा उद्योग देवळापुढे चालला होता फासे पायात अडकू लागले तेव्हा तेथून माणसाचे पाठीस लागून श्रीकृष्णाबाईकडे चालला. कृष्णाबाईत जाऊन यशवदाघाटावर जाऊ लागला. तेथे श्रीमंत सौ. यमाताई वगैरे अंग धुवीत होती. सबब महातानी थोरले घाटाजवळ मागे भाला करून फिरविला. तो तसा मागे फिरून घाट चढू लागला. इतक्यात घाटावरील सारी माणसे मागे पळाली. दिनकर बापूजी भिडे नि।। सरकार हे वृद्ध स्नान करून घाटाचे-नजीक उत्तरेस तलवटीत संध्या करीत होते. तेहि आसन वगैरे गोळा करून निघाले. तो हत्तीने येऊन गाठले. त्याचे सभोवते फिरू लागला. तो ते हत्तीच्या सोंडेचे धक्याने खाली पडले. दुसरे माणूस सुभाना सिंदा वगैरे होते त्याणी हटकल्याबरोबर निघाला. तो भिडे यांचे अंगावरून गेला. पाय काही हत्तीचे त्यांचे अंगावर पडले नाहींत परंतु मागील पायाचा सपाटा बसला. नखी लागली. मांडीस लागले. त्याणे दोन पायाचा मांडाची हाडें आंत मोडली. तेणेकरून भिडे यांस देवाज्ञा जाहली. सरकारात समजलेवरून राग आला. हत्तीस या घटकेस जाऊन बांधावे म्हणोन सांगितले ! त्याजवरून रा. हरिहरराव दादा व पागेतील बारगीर घोड्यावर बसून व कवायती लोक भाले घेऊन व महात गडेकरी जाऊन वाडीस वडाचे झाडाखाली घेरला झाडावरून फासे टाकिले आणि फासे पडताच माणसानी लगट करून बिडा भरला. हत्ती बांधून टाकिला आहे. १. सिवगिरी गोसावी याणी सांबरी शिंगाची जोडी मोठी आणून दिल्ही. त्याचबरोबर श्रीकमलेश्वराचे देवळात मिरजेस नि आरतीचे वेळेस वाजवावयास शंख एक दिला. १. वाई वगैरे सातान्याकडे व कर्नाटकांत माहामारी उपद्रव बहुत जाहला आहें. श्रीपादवाडीसहि आरंभ जाहला आहे म्हणोन ऐकिले. १. सगनभाऊ म्हणोन लावण्या करणार जेजुरीस राहणार तो अलीकडे वारला. त्याचा लेक म्हणोन येथे आला आहे. लावण्या वगैरे कवनें म्हणत असतो. परवाचे दिवसीं सरकारात येऊन काही म्हणून दाखविले. सुमारात आहे. म्हणणे चांगले नाहीं.

१३ एप्रिल : १. अलीबक्ष हत्तीस बिड्यासून (?) अलीकडे त्याचे ठाणावर आणून बांधिला. १. श्रीमंत रा. महाराज छत्रपति करवीरवासी श्रीपादवाडीस आहेत. त्याजकडे बागेतील दवणा व गुलाबाची फुलें व असोले नारळ पत्रसहित पाठऊन दिले.

१५ एप्रिल : १. आज हनुमज्जयंती. मौजे वाडी का।। सांगलीस श्रीचा उछाह गावातील मंडळी मिळोन नवे देवालय बांधिले आहें तेथे करीत असतात. १. सापकर कदम याजकडून चित्ता वाघ आला. त्यास तेथे कदमाचे नांव लागले नाही.

सबब लिहितो त्याचे नांव यादवराव कदम किताब आईतरा मुद्दौल आभारतमाहा म्हणोन आहे.

१६ एप्रिल : १. मौजे अंधळी पो मिरज येथील पाटीलकीचे वतन संबधे वडील धाकटेपणाचा खटला बहुत शंभर दीडशे वर्षे आहे. त्याची चौकसी सरकारातून चालली आहे. कागदपत्री उभयताचा पुरावा सबळ नाही. तेव्हा उभयताचे विचारे गावची पांढर आणून श्रीकृष्णाबाईस घालून वादपूस व्हावी म्हणजे पांढर वदेल ते मान्य म्हणोन त्या गावचे बारा बलुते व पाटील कुळकर्णी वगैरे सर्व तीस चाळीस आसामी आणून कृष्णाबाईत घालून वादपूस करविली. जबान्या सर्वाच्या जाहल्या आहेत. निर्णय होईल.

१७ एप्रिल : १. श्रीमहाराज छत्रपति श्रीपादवाडीस होते. तेथील सांप्रदाय महाराज आले असता चतुःष्पादवध व्हावयाचा नाहीं असें असता जवळचे मराठे वगैरे याणी करविला ! त्याजवरून श्रीचा क्षोभ होऊन पाचचार माण सें गत जाहली. नंतर श्रीस शरण येऊन कृपा करावी म्हणोन विनंति केली. १. श्रीमंत महाराज करवीरवासी यांचा सिरस्ता कन्यगती तीर्थविधीस बारा हजार रुपये खर्च करण्याचा. सालमजकुरी पंडित कारभारी याणी तीन हजार रुपये खर्च करावे म्हणोन ठरविले. त्याप्रमाणे खर्च करता हजार दीड हजार रुपये जाजती लागले हें पंडित याचे मनास आले नाहीं. परंतु खर्च जाहले तेव्हा देणे प्राप्त तेव्हा दिले. इतकी अडचण महाराजास जाली आहे.

१९ एप्रिल : १. खाशास काल ज्वरांश जाहला होता. तो आज सकाळापासून जाजती होऊन अगदी निपचित होते. संकष्टीचे उपोसण. तिसरे प्रहरी अगदी तोंड वाळले. तेव्हा घोटभर पाणी घातले. वेशुद्धपणाने प्रहर रात्रपर्यंत तसेंच. सरासरी शास्त्र संध्या पूजा करविली. नंतर जेवण जाहले. काही एक खाल्ले नाही. सालमजकुरी जेष्ठ मासीं दुखणें प्रथम आले त्यासमई जी अवस्था तशीच आज जाहली आहे. त्यांत ज्वरांत मुत्र होतेसमई तिडीक जी येते ती अनिवार श्रम होतात. ते पाहवत नाहींत. जीव घाबरा होतो. सर्व अंगास मुरडा होऊन घाम येतो अशी अवस्था.

२१ एप्रिल : खाशास अष्टमस्थानी गुरु कन्या रासीस आहे. सबब एकंदर ग्रहप्रीत्यर्थ ग्रहमख होमपूर्वक केला. देवळातील वाड्यातच केला. पाचपन्नास ब्राह्मणांचे अनुष्ठान जाहले.

२५ एप्रिल : १. मेहरबा रीविसन साहेब मुंबईस जाणार म्हणोन ऐकिले. १. मेहरबा उलियमसाहेब मुंबईस सकटतारीचे कामावर कौसलात असतात ते विलायतेस जाणार म्हणोन खैरपुषीच्या थैल्या येथून साहेबास पाठऊन दिल्या.

२६ एप्रिल : १. मे. टौसन साहेब व उलबीसो व ज्यारविक्स साहेब व इनविरानेटीसो असे विलायतेस जाणार सबब त्यांचे नांवे थैल्या दौलतीचा बदोबस्त करून चि. रा. धुंडाराव तात्या याजकडे मालकी ते थोर होईपर्यंत मुख त्यारीने काम हरि

हरराव दादा मामा व कोन्हेरराव बापू हे करतील येविसीचा पुस्तपन्हा साहेबाच्या सर्वोपरी असला पाहिजे म्हणोन पत्र लिहून रा. आणाजी कृष्ण देवलापूरकर वकील याजकडे पाठऊन दिली.

२९ एप्रिल : १. काल रात्री मध्यान्हचे सुमारास खाशास जागृतीत कोणी भयंकर पुरुष दोन चार वेळ दृष्टीस पडला तेव्हा जवळच्या मंडळीस सांगित - कीं मला असें दृष्टीस पडले. तेव्हा मनांत संशय कीं बापूसाहेब याचे मळयांत विहीर जुनी उकरून तयार होत आहे ती विहीर ३०।३५ वर्षेपूर्वी खंडली होती तिची भुडकी तयार जाहली मोट लावली नंतर मोट कणा मोडून मोट गडीसुधा विहीरीत पडून मेला त्याजवर ती बुजऊन टाकली. हल्ली उकरली आहे त्यास तो गडी भूत होऊन राहिला असल्यास त्यास प्रार्थना करून देवाचा अंगारा लावितो व त्याठिकाणी नारळ टाकून यावा हाच भाव असल्यास पुन्हा ते दृष्टीस पडू नये म्हणोन त्याप्रो ते वेळेसच कारकून पाठऊन नारळ देऊन टाकिला व अंगारा लाविला मग दृष्टींस पडेनासारखे झाले. नंतर आज सकाळी खाशानी स्नानसंध्या भोजन करून सहा घटका दिवसास सकाळी सव्वा पाईलीचे अन्न पंचपक्वान्नाचे करून नारळ चार पैसे दहीभात करून स्वारी जाऊन त्याठिकाणी ठेऊन येणे जाहले.

२९ एप्रिल : १. नंतर त्याचे चिरंजीवास नेमणूक अगर कोणाचेच काही अद्याप ठरले नाही म्हणोन कासीहून पत्र आले.

१ मे : १. श्री जोतिबाचे डोंगरचा दगड पाच गज लांबी गजभर हमचौक असा श्रीचे देवळाचे लगेचा यावयाचा होता. तो प्रथम जोत्या पाहरजी मख्तेदार गेला होता त्याणे आणिला.

४ मे : १. श्रीगणपतिमहाराचे मागले अंगास जुना मंडप आहे. तो अगदी पडला जाहला आहे. तो उलगडून बांधावयाचा सबब आज पाडावयास लाविले आहे. न्यायाधीश कचेरी श्रीचे मंडपात बसली आहे. चिटणीस कचेरीमागील कवलारांत आहे.

९ मे : १. रा. विष्णुपंत जोसी मे. म्यानसिनसाहेब याजवळ मुनसीगिरीवरी असतात. त्याजवर कोणी येकाने मुंबईस फिर्याद केली कीं एकंदर जहागिरदार लोक वगैरे याजकडून लाख रुपये सुमारे अंतस्थ खाल्ले आहेत याची चौकसी व्हावी म्हणोन. त्याजवरून मुंबईचा हुकूम येऊन त्यास ससबिड (सस्पेंड) केले आहेत. पाच सहा दिवस जालें म्हणोन वर्तमान आले.

१० मे : १. श्रीमंत रा. केशवराव तात्यासो इचलकरंजीकर यास संतति होत नाही. जाहली असता वाचत नाही सबब त्याणी नागबळी नारायण बळीकेला.

१२ मे : १. श्रीमंत कै. थोरले महाराज सातारा यांची कन्या कासीहून हल्ली सातान्यास आली आहे.

२६ मे : १. रा. रघुनाथ शास्त्री पर्वते म्हणोन पुण्याचे शाळेत इंग्रजी सरकारात होते. त्यास पाउणशे रु. दरमहा होता. त्याची परीक्षा होऊन सर्टिफिकीट मिळाले.

दीडशे रु. पगार होऊन धारवाडचे शाळेचे काम मिळाले.

२७ मे : १. कुशी कसबीण हिचे गाणे खाशाजवळ दोन प्रहरीं दोन घटका जाले सातान्याहून आली आहे. १. कवलापूरचा महार चोरीच्या वहम्याकरतां काजीचे (?) कुलपी खोड्यात घातला होता. तो सईल भोक होते त्यातून पाय काढून तटावरून पळून गेला. चौकशी चालू आहे.

४ जून : १. वे. रा. विष्णुभटजी सांबारे याणी सरकारास विनंति करून नारायण बळी नागबळी करणार म्हणोन करून आजपासून आरंभ केला आपले घरीं.

६ जून : १. खासा स्वारी प्रातःकाली श्री देवास जाऊन येऊन आंबराईतील नारलीच्या बागेत भोजनास गेली होती. प्रकृत बरी आहे. १. रावोपंत भिडे यास पटकीचा आजार होऊन आज मृत्य पावले. वाईट गोष्ट जाहली च्यार प्रहरात गेले. मरते समई सर्व व्यवस्था चिरंजीवास सांगून राजश्री बलवतरावजी फडणीस याचे हातात उभयता मुलास दिल्हे. संरक्षण कर्णेविसी सांगितले. धर्मशाला वगैरे दानधर्माची व्यवस्था सांगितली. १. वेदशास्त्र संपन राजश्री गोपिनाथ दादा शास्त्री पुण्यास दक्षणेस कार्तिकमासी गेले होते. ते येऊन भेटले. मुंबईस व पुण्यास सालमारी पाण्याची कम फार आहे व पटकीचा उपद्रव फार आहे म्हणोन सांगितले.

८ जून : १. खासा स्वारीची प्रकृत बरीं आहे ज्वर कमी आहे. १. राजश्री राधापानाईक धारवाडकर हे पत्नी व चिरंजीव सुध्धा गुलहसुराहून आले. खाशास भेटून घरी गेले.

९ जून : १. श्री कृष्णाबाईचे उछाहास आज प्रारंभ झाला. किर्तन गाणे वगैरे गावकीकडून वगैरे सांप्रदाया प्रो बाबाजी कृष्ण सहस्त्रबुध्ये कमाविसदार सांगलीचे ते करवीत आहेत.

१० जून : १. राजश्री जोत्याजीराव बहादर याचे कन्येचे लग्न दिगरजेस शु॥ ७ स जाहाले. त्याचे आप्त राजश्री संभाजीराव घोरपडे समाचारास व भेटावयास म्हणोन सांगलीस काल आले त्याची भेट जाहाली सिधा व चवी व खासे पान पा॥ दिल्हे. १. राजश्री बलवंतरावजी फडणीस याणी देवालय बांधिले त्यात श्री राधाकृष्ण मुरलीधर याची स्थापना करावयाची आहे.

११ जून : १. फडणीस याचे देवाचे स्थापनेस चवदा घटकास खासा स्वारी व तात्यासो वगैरे सर्व मंडली गेली. स्थापना जाहाली समारंभ चांगला केला.

१२ जून : १. फडणीस याणी आर्चेबा। ब्राह्मण भोजन घरी केले. हजार सुमार पात्र जाहाले. भोजन दक्षणा दोन पैसे प्रो दिल्हे. देवालयाचे कामगार गवंडी व पाथरवट वगैरे यास वक्षीस दिल्हे. त्यात मुख्य कामगार १. रामा गवंडी सर्व कामगार यास साह्य तोल्याची कठी दिल्ही १ बालंभट तोरो देखरेख वगैरेचे यास सदरहू प्रो १. वरकड यास कोणास रुप्याचे कडे तोडा अशा मानाचे दिल्हे व

सर्वत्रास शेला पागोटी दिल्ही. येकंदर धर्मादाव व देहेनगी मिळोन दोड हजार अठरासे रु॥ खर्च केला. भक्तीनें ययास्थित केले. काल आज दोन दिवस फडणोस तेथेच आहेत. १. जेजुरीहून श्रीखंडोबाचे पुजारी आले आहेत. खाशाकडे येऊन प्रसाद नारल देऊन गेले.

जून १३ : १. राजश्री गोविंद हरि बिनीवाले लग्नाहून आले ते खाशाकडे येऊ नमस्कार करून मानाची सनगे पुढे ठेविली. १. फडणीस याणी अर्चेबा सर्व कारागिर मंडळी शूद्र इत्यादी यास जेवणचे घातले. पाचशे पात्र जाहाले. १. मृग नक्षत्र निघाल्यापासून तुटक पाऊस पडत आहे. परंतु काल रात्रीपासून आज अस्तमानपर्यंत बराच पडला. श्री कृष्णाबाईस पाणी दोन पटांगणे चढले आहे. १. वैद्य बाबा याणी नारायणबली नागबलीस साल गु॥ जेष्ठ ५ स आरंभ केला व विधयुक्त कृत्य येकादेसीस समाप्त जाहाले. १. राजश्री राघोपंत काले तरदळाहून बनोसीत श्रीचिदंबर जोशी याचे दर्शनास गेले होते. ते दीड महिना तेथे होते. तेथून निरोप घेऊन सांगलीस आज आले. खाशाचे दर्शन घेतले. १. सालगु॥ श्रीमंत सौभाग्यवति मातुश्री बाईसो याणी खाशास ज्वर आला ते समई वडसावित्रीचे व्रत च्यार दिवसाचे दर पौर्णिमेस करून बारा महिन्यानी समाप्ति करावयाची ती आज व्हावयाची परंतु असरीरामुळे राहिली उपोषण वगैरे मात्र केले १. श्रीकृष्णाबाईचे उछाहचे समाप्ति आज ब्राह्मण भोजन पर्जन्यामुळे किल्यात जाहाले समयास खासा स्वारी समाचारास गेली होती. सातशे पात्र जाहाले. भोजन दक्षणा यक पैशा प्रो॥ दिल्ही रात्रौ कीर्तन ललीत जाहाले. काल ब्राह्मणाचा वेदघोष जाहाला. निराहाराचे फराळाचा बेत च्यार पैस प्रो॥ दक्षणा दिल्ही. ललीताचा नारळ प्रसाद खाशास आणून दिल्हा सर्व खर्च गावकोकडून आहे सरकारातून शंभर रु॥ रोख पावतात. काही भोजनाचे सामान पावते त्याप्रो॥ जाहाले.

१४ जून : १. आज पाऊस उघडला आहे. १. राजश्री रामरावजी पेठे याणी आथर्वणवेदी भटजी नरगुंदास आसवात ते आले आहेत त्यास आणून खाशास भेटविले. १. मेहेरबा लिजिटसो॥ बहादूर हे मुंबईहून धारवाड बेळगाव तालुक्यात आले आहेत. आठच्यार दिवसी सांगलाकडे यणार म्हणोन रावोपंत काले याणी विनंति केली. १. मजरे हरिपूर येथे कृष्णाबाईस पाणी आले आहे. तेथे नाव नाही. दुसरे प्रहरीपर्यंत नाव पाठऊन देणेविसी श्रीमंत राजश्री लक्ष्मणराव आणासो॥ याचे पत्र आले आहे. त्यावरून पाटणाहून खरेदी दोन नावा घेतल्या त्यापौ होती ती पा॥ दिल्ही नवी नाव करीपर्यंत दिल्ही आहे. १. श्रीमंत राजश्री रघुनाथराव दादासो॥ कुरुंदवाडकर यांचे बंधू भाऊसो॥ यांचे पुत्र बापूसो॥ याणी खबुतराच्या जोड्या मासळे मासल्याच्या पाहिजे म्हटल्यावरून दादासो॥ याणी पत्र पो॥ होते. त्याजवरून जोड्या सरकारात आहेत. त्यापो॥ पाच पा॥ दिल्ह्या १. चैत्र शु॥, प्रतिपदेपासून छत्र ब्राह्मणाचे भोजनाचे. होते ते आज समाप्ति जाहाली. पुरण घातले

होते. च्यार पसे प्रो। दक्षणा दिल्ही. १. राजश्री राघो कोंडदेव याणी दतपुत्र घेतला होता. सन तिसा आरबैनात वारला. त्याची पत्नी राजश्री बलवंतरावजी फडणीस याची कन्या ती लहान आहे. तिचे वोटचात घालणेकरिता काले याणी कोकणचे भाऊबंदाचे मुलगे आणले त्या मुलाचे जात नाव वगैरे कसे आहे हे विच्यारणे करिता बनोर्स स बावाकडे गेले होते. बावास विच्यारून त्याणी जो मुलगा घेणेस सांगितला तो आणविला व काही मागील पूर्वकर्म आहे त्याबा। अनुष्ठान करावे व नारायण नागबली करावा व समुद्रस्नान उभयतानी पत्नीसहीत करावे म्हणोन सांगितले वरून त्याप्रो। त्याणी कोकणात वेंगुर्ल्यास जाऊन बली व समुद्रस्नान करून बनोर्स स बावाचे दर्शन करऊन सांगलीस आमुक दिवसी आमुक वेलेस यजमान स्वामीचे पायावर घलावा म्हणोन सांगितले वरून आज बारा घटकेस दिवसास सकाली मुहूर्त त्यावेलेस यजमानाचे पायावर घालून सनगे पुढे ठेविली. मुलाचे पाठीवर हात फिरऊन मुलाचे नाव कोंडीबा टेवावे म्हणोन सांगितले. त्यास साखर देऊन सुमुहुर्ते दतविधान करावे म्हणोन आज्ञा जाहाली. १. गोकाककर जिनगर याणी लाकडाचा हती व वाघाची शिकार करून जवल माकड येक व स्वार दोन व सिपाई असे करून सरकारात आणिले आहेत. पहावयास ठेऊन घेतले आहे. ते किमतीस सुलभ पडल्यास घेणेत येतील.

१५ जून : १. जेजुरीकर पुजारी ब्राह्मण यास पंक्तीस भोजनास बोलाविले होते. त्यास दाहा रु।। देऊन निरोप दिल्हा १. नांद्रेकर फकीर याचे तक्यातील आंबे ते घेऊन आले. त्यास सालाबादी जी द्यावयाची ती दिल्ही. १. खाशास तिसरे प्रहरी किंचित ज्वरांश भासला होता.

१६ जून : १. खासा स्वारी बागेत आंबराई स्वानंदभुवन नवमला वगैरे ठिकाणी जाउन भजन जाहाले. १. वा। राजश्री नारायण आच्यारी सिरटीकर याणी तिसरे प्रहरी भारतातील आध्याय पुराण सांगितले. १. कलेगिरमाहून सरकारी बागेप्रो आंबे गोमांतकी जातीचे ५०० श्रीपतराव देसाई याजकडे वहिवाट आहे. त्याणी पा। आहेत. सरसिताहून ११०० आंबे आले आहेत. १. यंदा भरणी नक्षत्राचा पाऊस कर्नाटकात कार्तिकस्वामीकडे पडला. त्या प्रांतात तली फार. पाऊसाचे पाण्याने तली फुटून वाहुवली म्हणोन वर्तमान ऐकिले. १. मिरजेच्या वाघ्या व मुरल्या सांगलीस आली आहेत ती श्रीखंडोबाचे गाणें गाऊन लोखंडी लंगर तोडतो म्हणून समजले वरून श्रीमंत राजश्री तात्यासा। याणी संध्याकाली श्रीकंगणेश्वरीच्या चौकात आणऊन दोन घटका गाणे गावऊन लंगर तोडविला सर्व मंडलीनी पाहिला. १. अनगोलास श्रीमंत राजश्री दादासा। व बाबासा। कुरुंदवाडकर व सोवति उमाताई असी आहेत. दादासा। यांचा व बाबासा। यांचा तंटा इंग्रजी सरकारात चालला आहे. १. बावधनची येक ब्राह्मणाची बाईको सवाष्ण मुलासुद्धा येथे येऊन राहिली आहे. तिचा नवरा दाहाबारा वर्षे देशावरास आहे. हली तिणे ज्यारकर्म

करून गरोदर जाहाली प्रसूत होणार. नऊ महिने जाहले. औषध उपाय करून पोटचे पडावे म्हणोन औषध खाले आणि प्रसूत सकाली जाहाली. फार हैराण आहे. डोले गेले. तिणे कबूल केले स॥ पंचनामा करून साहित्य देऊन सरकारातून बदोबस्त राखिला आहे.

१७ जून : १. अंगारकी चतुर्थी. १. खासा स्वारी श्रीगणपती हरिपुर बागेतील याचे दर्शन घेऊन आली. निवल निरवक जाहाले. १. श्रीधोपेश्वर नजीक राजापूर येथे श्री नवल तीर्थ आहे. तेथे काही पडझड जाहाली आहे. वगैरे काम आहे त्याचे खर्चाब॥ दीडशे रु॥ पा॥ देणेविसी आज्ञा जाहाली आहे. जातील. १. श्रीमंत राजश्री आणासाहेब मिरजकर यांची धाकटी कन्या च्यार वर्षाची आहे ती साडी पाहिजे म्हणोन हट घेती. मिरजेत वगैरे दुकानी शोध घेतला. लहान साडी मिलत नाही. येथे सरकारात असल्यास दिल्ही पाहिजे म्हणोन त्याजवरून श्रीकडील सिधि-बुध्धीच्या पोषाखापैकी तांबडी जरकाठी साडी व खण जरकाठी असपत्र सहीत पा॥ दिल्हा. १. आज सकाली खाशानी स्नानसंध्या श्रीचे देवलात स्नान करून श्रीची पूजा केली. प्रकृतीचे मानामुले आपले पायाने जाणेयेणे होत नाही. दुसरे यानी उचलून पाटावर नेणे जाहाले. याजमुले देवापुढे स्वारी बसून फार प्रकारे कस्टी जाहाले. ते दुख लिहिता न ये कारण श्रीचे चरणी द्रढ भाव भक्ती तसीच आहे. त्यायोगे दुख जाहाले. असो ज्याचे चरणी निष्टा तोच कृपा करणार समर्थ आहे.

१८ जून : १. गणपतराव चव्हाण हिमत बहादर दिगरजकर याचे मुलाचे करवीर इलाख्यातील वासी म्हणोन गाव आहे. तेथे लग्न जावयाचे. पाहारा कवाइतीचा वगैरे सरंजाम मागितल्यावरून दिल्हा. १. आज पुन्हा मरीचा उपद्र(व) गावात जाहाला आहे.

१९ जून : १. राजश्री गोविंद हरि बिनीवाले याचे कन्येचे लग्न जाहले स॥ त्यांणी खाशास वगैरे मेजवानीचा बेत करून विनंति भोजनास येणेविसी केली.

२० जून : तिसरे प्रहरी तात्यासाहेब याची स्वारी किल्यात श्रीमंत सौवति बाईसाहेब याजकडून जाऊन दोन घटका बसून आली.

२१ जून : १. खासा स्वारीस आज प्रकृतीस ज्वरांश आहे. ग्लान आहेत. १ राजश्री बाळकृष्णपंत कुलकर्णी लक्ष्मेश्वरकर हे त्यास येणेविसी खाशाचे निरोप गेले होते. त्याजवरून चिरंजीवासह आले आहेत.

२२ जून : १. खासा स्वारीस मिरजेस तात्या केलकर व गणेशपंत फडके वैद्य येक दोघे आहेत त्यास पत्र पा॥ आणऊन त्याचे व सांबारे याचे विच्यारे औषध घ्यावे असे ठरले आहे. पत्रे गेली आहेत. १. मेणवलीहून श्रीमंत राजश्री माधवराव फडणीस याजकडून सांप्रदायाप्रमाणे आंबे उत्तम जातीचे आले आहेत. १. रहिमत-पुरकर विश्वासराव माने याजकडून उत्तम आंबे आले आहेत व भालेकाठ्याविसी लि॥ आहे. १. आबाजी फडतरा खिजमतगार याची बाईको वारली. स॥ दुसरे

लग्न कर्णेविसी आज्ञा जाहाली होती. त्याजवरून आज लग्न सांगलीस त्याणे केले.

२३ जून : १. खासा स्वारीस रोजचेप्रा। तिसरे प्रहरी ज्वरांश जाहाला होता. १. श्रीमंत सोवति मातुश्री कैलासवासी आंबाबाईसा। याचे सावछरीक श्रध्ध दशमीचे आज पडले स॥ श्रीमंत राजश्री तात्यासा। याणी केले पिंडदान केले. १. सायंकालचे दोन घटका दिवसापासून सहा घटका रात्रपावेतो पाऊस बराच पडला. तल्यास थोडेसे पाणी आले आहे. १. खाशाचे प्रकृतीस रसराज म्हणोन रसायण आहे ते मानले म्हणोन सदासिव बलाल दिगरजकर याणी विनंति करविल्यावरून कारभारी याचे विच्यारे रसायण तयार कर्णेविसी मशारनिल्हेस सागून सोने वगैरे जिनस देविले. मशारनिल्हेस कृत माहीत आहे तेच करतात.

२४ जून : खासा स्वारीस आडीच प्रहरी ज्वरांश जाहला आहे. थोडाच आहे परंतु अशक्तता आहे. १ गोकाककर जिनगर हती वाघाची लढाई लाकडी केलेली सरकारात दिल्ही. त्यास बाहा रु॥ रोख व खास पोषाख पौ। दुपटा पागोटे दिल्हें. १ श्रीमंत कैलासवासी हरिहररावसो। याचे सावछरीक श्राध्ध उदईक येकादसीचे ते आज केले. कृष्णाबाईस पाणी बरेच चार-पाच पटांगणे कालचे पाऊसाने आले आहे.

२५ जून : खासा स्वारी प्रातःकाली संध्या करून श्रीदेवास जाऊन येऊन बागत तल्यास पाणी आलेली पाहून येऊन फराल केला. गणेश तल्यास हातभर पाणी आले आहे. आनंदभुवनचे तल्यास दोन हात उचीचे पाणी आले आहे. १ रसराज औषधी करण्यास आज सदाशीव बलाल दिगरजकर याणी आरंभ करविला. आपण आपले हाताने अच लावीत असतात. १ राजश्री बलवंतराव आणा यांची पत्नी आज फार हैराण आहेत म्हणोन चिठी आल्यावरून श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याची स्वारी मिरजस सकाली गेली. भाऊसाहेब जाणेचे पूर्वीच तिचा काल आज सकाली जाहला. नतर दहन वगैरे जाहाले. उपर संध्याकाली भाऊसो। यांची स्वारी परत सांगलीस आली. नंतर अशौच्य सर्व पटवर्धन मंडलीस व खाशास वगैरे समजले.

२६ जून : खासा स्वारीस लघवीवाटे खर आरक्त दाट पडती तेणेकरून अशक्तता फार आली आहे.

२७ जून : तालीकोटाहून श्रीमंत सौवती यमाताई यास नेणेकरिता सरंजाम परभारे आल्यावरून काल ती व मल्यातील आणासो। याची कन्या असी उभयता तालीकोटास जाणेस चालत्या जाहला. तालीकोटाहून बोलावणे आले असता येथे भेटून ताईनी जावयाचे परंतु सालतिगस्ता तालीकोटाहून बोलावणे आणसखुऱ्यास आले ते समई सोवती यमाताईस पाठविणे जाहाले नाही त्या रागाव॥ सांगलीस बोलाविणे अगर पोचविणे हे काहीच करावयाचे नाही म्हणोन परभारे गेली. १ वो। राजश्री तात्या केलकर यास गाडी बोलावणेकरिता गेली होती त्याजवरून ते आले आहेत. खाशाची हातनाडी बघितली. सांबारे यांचे व त्याचे सांगणे येक १ आज सायंकाली खाशानी निजूनच पथ्य संध्या केली कारण

आजच्या ज्वराने फार हैराण जाहले आगदी उठवेना असे जाहाले व कषायाने अडीच प्रहर रात्रीस शौच्य चांगला होऊन मग प्रकृत (बरी झाली.)

२८ जून : १. आज खासा स्वारीचे बसणे होऊन प्रातःसंध्या व पथ्य घेतले. नंतर मेण्यात बसून श्रीदेवास जाऊन आली. प्रकृत आहे तसीच आहे.

२९ जून : खासा स्वारी सायंकाळी दुसरे याचे हात धरून उठून आपले पायाने च्यार पावले संध्येचे ठिकाणी जाऊन सध्या पथ्य घेतले.

३० जून : राजश्री बाबा फडणीस वोकयाणी चिरंजिवाचे लग्नाबद्दल कारभारी यास वगैरे मंडलीस मेजवानीस बोलाविले होते. १ राजश्री विष्णुपंत मुनसी उगारास दिगंबर बावा स्वामी साधु मौनी आहेत त्याचे दर्शनास आले आहेत. १ रात्री रामा विन विठू सिंदा नि॥ सरकार याचे घरी चोरी जाहाली. दोनशे रु॥चा विषय गेला. १ बा। १४ पासून आज तीन दिवस गावात भावईचा सप जाहला.

१ जुलै : खासा स्वारीस लघवीची मात्र तिडीक आहे. १ श्रीमंत राजश्री माधवरावबाबासो मिरजकर खाशाचे समाचारास आले होते येऊन दोन तीन घटका बसून प्रकृतीचा सार विचारून प्रकृतीस व पथ्यास जपावे. वैद्य वगैरे सांगतील ते पथ्य करून बरे व्हावे. केवल आपले मनानेच वागणेचे सामर्थ्य राहिले नाही म्हणोन बहुत प्रकार सांगून श्रीमंत सौवति मातुश्री बाईसो याजकडे जाऊन क्षणभर वसोन त्याणी आंबे दिल्हे ते खाऊन पाणी पिऊन मिरजेस गेले. १ वो। राजश्री कृष्णाभटजी वैद्य नरगुंदकर यास कुरुंदवाडास पत्र पा। आणविल होते ते आज सायंकाली आले. १ खासा स्वारी तिसरे प्रहरी श्रीदेवास जाऊन आली.

२ जुलै : खाशानी प्रातःसंध्या करून पथ्य घेतले. त्यावेलेस निद्रेत मनस्वी बोलणे व जागृतीत कोणचे गोष्टीचे स्मरण न राहता आकस्मात दुसरेच बोलणे आगर दुसरेच कर्णे असे होते. त्याजवरून कोणी माहापुरुषास प्रार्थना करून नारळ ठेविला आहे गुणावह दृष्टीस पडल्यावर समाराधना करावयाची असी प्रार्थना केली आहे. वरकड प्रकृत ज्वरांश आहेच. लघुशंकाही नित्याप्रो। वरचेवर होती. औषधीउपाये सांबारे करीतच आहेत लघवीस वेग येऊन होते त्याणे श्रम होतात. १ कालचे पहाटेस राजश्री फडणीस याच वि॥ची सिलक अजदमासे पंचवीस हजार ती श्रीमंत सौ॥वती बाईसो। याजकडे देणाविसी आज्ञा जाहाली १ श्रीमंत राजश्री आणासो। मिरजकर येऊन खाशाचा समाचार घेऊन दोन तीन घटका बसून परत गेले. १ आणासो यानी दादा गोरे याजकडून आपले आपरोक्ष विनंती खाशास करविली जे हरिपूर येथील गणपतीबागेचे प्रश्र्ण गावचे कागदपत्रावरून जसे वाजवी असेल तसे व्हावयाचे ते कागदपत्र आम्ही व हरिहररावदादा व फडणीस याणी पाहून शास्त्रार्थ मनात आणिला आहे. ते विनंति करतील त्या प्रो। आज्ञा जाहाली पाहिजे म्हणोन त्याजवरून आज्ञा जाहाली जे उभयता विनंती काय करतात ते व मागील वहिवाटीच कागदपत्र पाहून जे वाजवी असेल त्यात फेर

यावयाचा नाही म्हणोन बरे आहे म्हणोन आज्ञा घेऊन गोरे गेले. १ वो। राजश्री कृष्णंभटजी वैद्य नरगुंदकर हे पाहाटेस खाशाकडे येऊन हात पाहिला. प्रकृतीचे मान सांवारे याचे सांगणेत तेच याचे सांगणेत मुख्य मेह प्रकृति. १ चेनया अकबारनीस नि।। इंग्रजी सरकार हे मिरजेहून खाशाची प्रकृत पाहावयास तिसरे प्रहरी येऊन प्रकृत पाहिली. खाशानी प्रकृतीचे मान जे आहे ते सांगितले. घटकाभर बसून निरोप घेऊन मिरजेस गेले.

३ जुलै : १ खाशाचे देवास जाऊन येणे तिसरे प्रहरी जाहालें. १. नरगुंदकर व केलकर व सांवारे वैद्य मिलोन वैदिक ग्रंथावरून यजमानाचे प्रकृतीची चिकिछा चालली होती सायंकाली.

४ जुलै : १ मिराभाई वैद्य यास येणेविसी दाजीबा पंडीत कारभारी यास पत्र करवीरास गेले होते. त्याचे उतर श्रीमंत माहाराज सा।त्रति बालाबाई आकाम हाः राजांची बहीण ही प्रसूत जाहाली आहे. पाच साहा दिवस जाहाले. आणखी पाच साहा दिवसी येतील म्हणोन. १. बहादरगज हतीस काल आजार जाहाला होता. आज किल्यातून चालवीत सकाली बाहेर आणिला. नंतर दोन प्रावे सुमारास मेला. घटसर्पाचा आजार. कफन फतेअलीचे थडग्याजवळ केले. १. राजश्री दाजीबा जोशी- राव हे करविराहून सांगलीस खाशाचे समाचारास आले. १. खाशा स्वारी तिसरे प्रहरी श्रीदेवास जाऊन बापू सो याचे वाड्यापर्यंत जाऊन मार्तंड शामजी याचे धाकटा मुलगा जवलच घर आहे. त्यास बरे वाटत नाही सा। समाचार घेऊन आली. १. खाशास सायंकाली ज्वरौष जाहला आहे.

५ जुलै : १. आज अशौच्यास अकरावा दिवस. खासा स्वारी कढू पाण्याने स्नान करून संध्या वगैरे करून भोजन जाहाले. प्रकृत बरीच आहे. ज्वरांस नाही. लघवीस पांढरे दिवसातून दोन वेल सकाली व सायंकाली मात्र पडते मग नाही. १. श्रीमंत कैलासवासी विठलराव बापूसो याचे सावछरीक श्राध्य जेष्ठ व।। ११ चे सुतकाः मुले अंतरले होते. ते श्रीमंत राजश्री ताथ्यासो याणी देवलातील वाड्यात केले. १. यमा नायकीण श्री.येलमास म्हणोन जाणेकरिता तेरदलास घरी गेली होती. ती काल आली. खाशास मुजऱ्यास तिसरे प्रहरी आली होती.

६ जुलै : १. खासा स्वारी प्रातःसंध्या वगैरे करून पथ्य घेतले. आज ज्वर आला नाही. सावधगिरीही बरीच आहे. तिसरे प्रहरी श्री देवास जाऊन येणे जाहाले. १. चिमणाराम मारवाडी याचे मुलगा व पुतण्या दुकानचे गुमास्ते मारवाड देशाहून आले. ते सकाली खाशाकडे भेटीस आले होते. त्याणी संगमरवरी दगडाचा चवरंग अठपैलू व येकगीर्द गजभर गाल्याचा येकसद वरली फली आठ पाय मात्र निराले असा येक व खुरसी जालीदार संगमरवरी अशी आणून दिल्ही. जिनस फार चांगला आहे. १. आज पाहाटेस खाशास स्वप्न पडले. जे कोणी येक ब्राह्मण येऊन त्याणे सांगितले जे पुल्याचे गणपतीचे दर्शनास जाणार असा हेतु तुमचा आहे. परंतु जाणे

जाहाले नाही. त्यास तुम्ही पुल्यास जाऊन श्री.चे दर्शन घ्यावे म्हणजे प्रकृतीस लवकर आरोग्य होईल. म्हणोन ते स्वप्न खाशाली जवळचे मडळीस सांगितले. १. श्रीमंत राजश्री आणासाो मिरजकर याजकडे हरिपूरची वहिवाट साल गा। पासून घरप्रकर्णीचे वादीप्रो जाहाली. परंतु हरिपुरचे बागतील मली व कुरणाची वहिवाट नवती. त्याविसी त्याणी विनंति केली जे आम्हाकडे घोडयास वगैरे वोल्या गवताची सोय नाही. त्यास दिल्हे पाहिजे म्हणोन त्याजवरून कुरणाचा मजकूर थोडका सा। वहिवाट करा व गवत नेणेविसी सांगितले. वरकड चिंचेची वगैरे झाडे मात्र आहेत. पिकाचे रान नाही. १. आज खाशाची प्रकृत बरी आहे कागदपत्रांवर निशाणे केली. अलीकडे दहाबारा दिवसात जाली नव्हती १. राजश्री सदासिवपंत नाचणीकर हे खाशास रसराज म्हणोण रसायण सुवर्णपारा मिलोन करीत आहेत. साडेद हा तोळे सोन्याचा मसका केला. तो अचीत घालता घालता दाहा तोळे मसका काढून खिशात घातला ते समई काही कारण काढून दोन आसामी गडो होते त्यास कामास लाऊन देऊन हे कृत्य केले. लागलीच त्याचे देखरेखीवर बुध्याबा असतात. त्याणी पाहिले. तो आत मसका कमी असे वाटून वजन केले तो कमी होताच. तेथे विचारिता कबूल जाहाले. नंतर औषध तयार होणे प्राप्त सा। नीट चौकसीने काम चालविले आहे. मा।र निल याची चाल पहिले पासून असीच किमयत वगैरे आहे. १. हरिपुरचे सिष्ट ब्राह्मण सर्व दाहावीस आसामी तिसरे प्रहरी खाशाकडे समाचारास आली होती. १. वे।। राजश्री कृष्णंभटजी वैद्य नरगुंदकर यास पत्र पा। आणविले होते. त्याणी प्रकृत पाहिली सांबारे औषधी उपाय करीत आहेत तोच उतम आहे म्हणोन सांगितले.

७ जुलै : १. आज प्रकृत कालचे प्राोच आहे. परंतु वैद्यबाबा याणी कषायात रेचकात घातल्यामुळे दोन वेले रेच चांगले जाहाले. तिसरे प्रहरी श्रीदेवदर्शन करून आलेवर लघवीचा विकार जाहाला. रोजचे पेक्षा बामल जाजती होत होती. येरवी बरे आहे. १. तिसरे प्रहरी श्री. तुलसीराव बावा मिरजेहून खाशाचे समाचारास आले होते.

८ जुलै : १. खासा स्वारी प्रातःकाली प्रातःसंध्या करून भोजन जाहाले. प्रकृत आहे तसोच आहे. श्रीदेवास जाऊन येणे जाहाले. १. खडेराव घाटगे गारगावकर हे चंदीचंदावरास असतात. त्याणी कुमैत घोडा सरकारात नजर दिल्हा. १. राजश्री रावजी लिमये चिंचणी विठलराव बापू भिलवडीकर हे मिरजेहून आले. १. राजश्री रावजी लिमये चिंचणीकर चिंचणेहून आले आहेत.

९ जुलै : १.खासा स्वारी प्रातः स्नानसंध्या करून लिरशन आहार येकादसी सा।। घेतला. मूत्राचे वगैरे विकार कालचे प्राच आहे १. राजश्री गोविंदराव नाना भिलवडीकर हे मिरजकर बालासो याचे दौलती प्रकर्णी कामे आहेत. सा। खाशास निरोप घेतला. रिविसन सा।े व म्यानसिनसा।े याचे नावे दोन थैल्या विनंति केल्यावरून दिल्ह्या आहेत. त्यात नाना याचे घरगुती वगैरे कामाकरिता साहेबाकडे आले

आहेत. समजून देतील. नाना हे चिरंजीव दोन भाऊबंद आबरूदार आहेत म्हणोन वगैरे लिहिले आहे. १. वा। राजश्री नारायणाच्यार्य बिन कृष्णाच्यार्य भहिषी राहणार सिरटी याणी विनति हरिहरराव दादा लागू याजकडून करविली. जे मौजे बागेवाडी ता। सिरटी येथे देसाई याणी दोन मार जमीन इनाम करून दिल्ही आहे. बागेवाडीत वाघाचा उपद्रव सा। ती जमीन मोबदला करून वा। सिरटीस द्यावी म्हणोन कैलासवासी केशवरावजी लागू यास कलविले वरून दोन मार जमीन सिरटीस सन समान असरिनात दिल्ही. वर्षसनाव॥ दीड मार जमीन सिरटीस आहे तो व दोन मार असे असे येक डाग आहेत. त्याची वहिवाट आज ता। करीत आहे. त्याविसीचे दुमारुपत्र सरकारातून करून घ्यावे म्हणोन त्याजवरून दुमालपत्र मारनिल्हेचे नावे करून दिल्हे. निशाण आज करून द्यावयाचे आहे. १. मेहेरबा अडरसन सो। म्हणोन करवीरास पलटणवर लपटणचे हुद्यावर असतात. त्याचे पत्र आलेवरून आठ सरूच्या हुंड्या पा। दिल्ह्या. १. श्रीमंत सौवती मातुश्री बाईसो। याणी आपले भाचीचे नवन्यास हरिपुरास भिकाजीपंत भिडे याचे नातवास आषाढपाटी पाठऊन दिल्ही. सरजाम सर्व सरकारचाच. १. खाशास परवा स्वप्न पुल्याचे गणपती जावे म्हणजे प्रकृत चांगली होईल म्हणोन पडलेवरून श्रीची प्रार्थना करून च्यार पुतल्या व नारळ भाक बांधून ठेविली आहे. प्रकृतीस आमल बरे जाणे जोगे जाहले म्हणजे स्वारी दर्शनास जावे म्हणोन ठेविली आहे.

१० जुलै : दाने खासे मंडलीनी द्यावयास आरंभ केला १. खाशानी येक रुपया रोख. १. तात्यासा। याणी दान व च्यार आणे दक्षणा १. श्रीमंत सौवती बाईसा। मध वाटीभर व च्यार आणे दक्षणा. १. च्यातुर्मास दर द्वादसीस बारा ब्राह्मण खिरीचे भोजनास घालून च्यार आणे दक्षणा द्यावयाची परिपाठ त्याप्रा। आज द्वादसीस किल्यात ब्राह्मण सांगितले होते.

११ जुलै : १ खासा स्वारी प्रातःस्मश्रु करऊन स्नानसंध्या करून पथ्य घेतले. प्रकृत आहे तसीच आहे. लघवीस पांढरे पडते तसेच आज थोडे जाजती पडले. सायंकाली पथ्याचे वेळेस सुरुली ठेऊन पथ्य घेणेचे आणि निजलेनंतर बारा घटका रात्री निजूनच पथ्य घातले. १. श्रीमंत कै. गणपतराव बाबासा। याचे सावछरीक श्राध्द उदईक चतुर्दशीचे ते आज पडले सबब भाऊसा। याणी किल्यात केले. १. आज मूल नक्षत्र सबब बेंदूर गावात जाहाले. १. हरिपूर येथे आणासा। याणी धर्मनाव पहिली होती. त्याप्रा। हलील बंद करून धर्मनाव चालविली आहे. म्हणोन समजले खरे आहे

१२ जुलै : १. खासा स्वारीस सकाली प्रहर दिवसास ज्वर मोठाच आला. तो सायंकालचे सुमारे घाम पुसकल येऊन निघाला. १. राजश्री जनार्दन कृष्ण केळकर यांचे सुनेच अष्टमांगल्य काल जाहाले. आज त्यानी डोहाळ जेवण केले. स॥ श्रीमंत सौवति बाईसा। यास भोजनास बोलाविले होते. त्याजवरून सर्व बाया मंडली भोजनास गेली होती.

१३ जुलै : १. खासा स्वारी प्रातःसंध्या करून पथ्य घेतले. प्रकृत दोन अडीच प्रहरापर्यंत बरीच होती. नतर किंचित ज्वरांश जाहला. तो सरासरी तीन प्रहरचे सुमारे भरू लागला. तो पुष्कलच भरला. दोन घटका रात्रीचे सुमार अमल हुशारी आली. ज्वरही पक्व जाहाला. नंतर बिछान्यावरच संध्या किंचित करऊन पथ्य घातले. हिवासारखा ज्वर आला. कालचे पेक्षा मात्र काहीसा कमी होता. काल आज श्रीदेवास जाणे जाहाले नाहीं. १. राजश्री बलवंतरावजी फडणीस आषाढ शु।। ९ स पंढरीस जाणेकरिता येथून निघाले ते येकादसीस जाऊन पोचले. येकादसी द्वादशी त्रयोदसी त्रिरात्र राहून काल शनिवारी चतुर्दस स निघोन ते आज अस्त-यानी सांगलीस आले. खाशाची भेट घेतली. १. खाशाचा ज्वर दाहा घटका रात्रीस घर्म येऊन काहीसा कमी जाहल्यावर पथ्य घातले. नतर पाहिले तो पोटास फुगवटी येऊन मूत व शौच्य बंद जाहाला मग ओषधी इलाज बहूत केले. शेकणे रेचक औषधे दिल्ही परंतु उजाडेपर्यंत दोनी नाहीत गुदद्वारी वगैरे औषधे उपच्यार बहुत केला आहे पाहावे. १. आषाढी पौर्णिमाचा उछह गावात श्रीकेशवनाथ चा सालाबाद होतो. त्याप्रा। दशमीपासून जाहाला. आज गोपालकाला जाहला. पालखी नगरप्रदक्षणेस निघाली होती.

१४ जुलै : १. खाशाची प्रकृत आहे. तीच आहे संध्या ब्राह्मणाकडून म्हणऊन आपण ऐकिली. परंतु हुशारी आहे. मूत व शौच्य बंद आहे तो आहेच. औषध देत आहेत–क्लेश संमधे आज शत गोप्रदान प्रत्यक्ष खिलारचे वगैरे गाई आणऊन येक पुतली दक्षणा याप्रा। व नवद प्रायश्चिते च्यार रु।।प्रा। असे येकंदर उदक खाशानी स्वमुखे म्हणून उदक सोडले. सरकारी आश्रीत वगैरे यास प्रायश्चिते दिल्ही व दाहा ब्राह्मणास शंभर पाच गोप्रदाने दिल्हीं बाकीची वरचेवर ब्राह्मण पाहून देतील. तसीच प्रायश्चितेही देतील. अडीच प्रहरानंतर कांही पथ्य बिछान्यावर घातले. सायंकालीही पथ्य घातले. दाहा घटका रात्रीचे सुमार शौच्यास साफ जाहाले. नंतर अमल हलके पडले. १. आज कर्क संकरमण पंचावन घटकेस निघते तेव्हा दिवसा पंचवीस घटका उपरांत पर्वकाल नंतर सर्व जनानी स्नान दाने भोजने केली. खाशानी सकाली श्राद्ध केले. बाकीचे सांप्रदायाप्रा। करविली. १. समाधा मलीकटी मिरजेहून समाचारास आले आहेत. १. श्रीमंत राजश्री माधवराव बाव सा। मिरजकर समाचारास दोन प्रहरी येऊन गेले. १. छ २ रमजानी पहाटेस राजश्री फडणीस यास आज्ञा जाहाली जे तुम्हाकडील सिलक वगैरे जे आहे ते घरात सा।विती यजकडे द्यावे म्हणन त्याप्रा। फडणीस याणी काल येकंदर अदमासे पंचवीस हजार व गहयाची असी माप करून खाशाजवल दिल्हीं. खाशानी ती याद घेऊन फडणीस याचे हातचा लाखोटा करून पाहाटेस काल रविवारचे श्रीमंत सा।विती मातुश्री बाईसा। यास जवळ बोलाऊन त्याचे हातात दिल्ही. आपला अंतकाल आला हे समजून देते किंवा त्याचे ते जाणत. च्यार समाधानाच्या

गोष्टीही जवळ घेऊन सांगितल्या बाईसाो यांणी डोळयास पाणी आणीले आणि म्हटले जे आपण बरे व्हावे यांत माझे सर्व आहे. माझी इच्छा दुसरी काही नाही म्हणोन नंतर क्षणभर बसोन उठोन गेल्या. १. अस्तमानी च्यार घटका दिवसापासून मेण्यांत बसून रोजचेप्रा। श्रीदेवास जाणेचा ध्यास धरून मेणा आणवा म्हणोन बहुत आग्रह पडला परंतु प्रकृतीस दाहा प्रहर मळमूत्र बंद पोट फूग वायूचा विकार भाषण वगैरे चालले नंतर दोन तीन घटकानी श्वाशाचे मुखांतून आशा आशा असे दोनच परवले शब्द निघाले तेव्हा गोविंद हरि विनीवाले वगैरे मंडली होती. त्याणी विचारिले जे आशा कोणती ते आज्ञा व्हावी तेव्हा आज्ञा जाहाली जे मेणा आणावा म्हणजे बाहेर सांगतो म्हणोन तेव्हा पोटांतील भाव देवाजवळ जावे आणि देह ठेवावा असा वाटला परंतु प्रकृत सूक्ष्म जाहालेमी नेता येत नाही नतर विनती केली जे आता दोन घटका रात्र जहाली आहे. आणि आपण संध्या करून आण घ्यावे. मग देवास जाण्यास येईल म्हणोन म्हणताच बरे आहे म्हणून संध्या करतो. शागीर्दास बोलवा म्हटले वरून तयारी करऊन संध्या केली आणि मंडलीनी बसऊन पथ्य घातले नतर घटकानी सुमारे शौच्यास साफ जाहाले. परंतु लघ्वी जाहाली नाही तेव्हा धाक होताच परंतु घटका भरान होईल म्हणोन म्हणून स्वस्थ मंडली राहिली पुढे गोंधळी यास बोलाऊन देवीची पदे वगैरे म्हणविली असे आनदात मध्य अडीच प्रहर रात्र पर्यंत चालले होते. त्यात दोन घटका निद्राही लागली होती. अस्तमानेचे सुमारे श्रीमंत सावित्री बाईसाो यास बोलाविले आणि मला पाणी पाज म्हणोन म्हटले तेव्हा बाईसाो अस्पर्श दुसरा दिवस म्हणोन सांगितले बरे म्हटले नंतर सोबती सिध्धीबाईस बोलाऊन जवल घेऊन आसिर्वादार्थ मस्तकावर हात फिरऊन सुखी असेस म्हणोन म्हटले. जेव्हा मेणा आणवा म्हणोन आग्रह केला ते समई तात्यासाो हे जवल येऊन विनंति केली जे आपण जावयाचे ते मी आपले वाटचा जाऊन येतो आता रात्र जाहाली आहे. आपण जाऊ नये म्हणोन बोलले त्याजवर या गोष्टीचे उत्तर काहीच न करिता क्षणभर मधे जाऊन तात्यासाो यास सांगितले जे नित्य देवास जात जा विसरु नको म्हणोन यातच सर्व उपदेश केला. १. भिलवडीकर याची पत्नी भिलवडीस होती तिला क्षयाची भावना होऊन आषाढ शु॥ १० मंगलवारी भिलवडीस देवआज्ञा जाहाली. १. श्रीमंत राजश्री माधवराव बाबा वगैरे पटवर्धन मंडलीस भिलवडीचे सुतक मिरजेस समजले होते. परंतु बाबासो। समाचाराकरिता म्हणोन तिसरे प्रहरी सांगलीस आले. यजमानास न भेटता परभारे समाचार घेऊन गेले. कारण सुतक समजले म्हणजे घोटाला होईल म्हणोन भाऊसो। यास समजून गेले भाऊसाो यास सुतक लागलेवरून ते किल्यात निघोन गेले. १. संगापा मेलीकटी हे समाचारास मिरजेहून आस्तमानी आले येऊन भेटले केव्हा आला उतरला कोठे चढी वैरण पा॥ द्या म्हणोन.

सदरहू अन्वये द्वारकादास आले त्यासही पुसिले वगैरे जी जी मंडली आली त्यास

ज्यासी जसे बोलावयाचे तसे हसून संतोषी करुन लाऊन दिल्हे. कारण दुसरेस आपली ग्लानी व कमी दिसू नये म्हणोन केले इतके धैर्य आपला अंतकाल जवळ आला असे खास समजले. परंतु येक श्री गणपति महाराजांकडे अंतःकर्ण वरकड दौलत प्रकर्ण अगर तात्यासो॥ यास वगैरे लोभातील मंडलीस सुध्धा कोणाचेही काहीच भाषण नाही. १. चेनशा अकबरनीस समाचारास आले. त्यासी भाषण प्रकृत बरी आहे. तुम्ही केव्हा आला. आज राहणार किंवा मिरजेस जाणार. आज राहातो म्हणून ते बोलले. नंतर निरोप घेऊन गेले. १. मध्यानीचे सुमारे आपले हाताने दोन बोटाच्या खुणा करीत मग कोण दृष्टीस पडत ते पडोत. १. भटभटजी भाऊ व नारायण जोसी याणी सांगितले. जे अडीच प्रहर रात्रीचे सुमार वेल कठीण आहे. तेवढी वेल गेली म्हणजे काही धका नाही. तेवढी संभालावी म्हणोन पूर्वी कारभारी वगैरे याजवळ सांगितले होते.

१५ जुलै : १. पहाटेस नऊ घटका रात्रीस खाशाची प्रकृत आहे तसीच होती. बोलणे वगैरे हुशारी कालचेप्रा होती. नंतर येकायेकी कफाची विकृति जाहाली. घसा दाटला. मात्रा घालावी म्हणून म्हटले. परंतु अगदी ध्यापले फुरसत पडेना. समय जवल दिसू लागला. मग भाषण बंद जाहाले जवलच्यास समजले की आता काही ठीक दिसत नाही. वैद्यबावानी हात पाहिला. नाडी सुटली तेव्हा बाहेर जागा सारऊन बाहेर खाशास नेणेविसी सर्वास सांगितले. तेव्हा बिनिवाले हे जवल होते. त्याणी सांगितले जे महाराज आता गजाननाचे स्मरण करावे म्हणोन तेव्हा भाषण न करिता मान डोलविली. माझे लक्ष तिकडेस आहे म्हणोन मान वलऊन खुणा केली. मुखात श्रीभागीर्थीचे उदक व तुलसी घातल्या इतक्यात उचलून बाहेर नेले क्षणभराने देह ठेविला. सारी गडबड अर्ध घटकाचे अवकासे कमीच जाहाली. पुढे च्यार घटकानी कर्क संकरमण लागावयाचे. इतक्यात उतरायणात देह विसर्जन जाहाले. श्रवण नक्षत्र सोमवारची रात्र. दुसरे दिवसी म्हणजे धनिष्ठा नक्षत्र. धनिष्ठा नक्षत्र फार वाईट असे असून उत्तम समई देह ठेविला. असा योग साधिला पुण्य व प्रताप व शूर व धैर्य कोणाचेच नाही. जन्मापासून वय ७६–६–१३ वर्षे जाहाले. खाशासारखे मनुष्य मात्र द्रिष्ठीस पडणे नाही. ईश्वराची मर्जी. नंतर पदरची मंडली जवल होती. गावात बातमी लागलीच समजली. हजारो मनुष्य जमा होऊन जो आरडा जाहाला तो न भूतो न भविष्यति त्यासमई गावात दंगा वगैरे होईल म्हणोन स्वार व प्यादे व कारकून पाठऊन रस्तोरस्ती नाकेबंदी करविली नंतर सर्व तरतूद पुढील विधीची करऊन पाहाटेचे च्यार घटका रात्री श्रीकृष्णाबाईवर नेऊन स्नान घातले. भागिर्थीच्या घागरी होत्या त्या घातल्या. कृष्णाबाईचे पाणी चढू लागून जेथे शव ठेवले होते त्याजवर लाटा येऊन स्नान जाहाले असे पुण्य. नंतर चंदन व बिल्व व तुलसीकाष्टे आणऊन पहिली पेरूची बाग अवली बागेचे पूर्वेस होती ती झाडे वठली म्हणोन तोडली होती. त्या ठिकाणी जागा करऊन देहसार्थक मंत्राग्नि विधीपुरस्कर श्रीमंत

राजश्री तात्यासो याणी केले. इतके होईपर्यंत प्रहर दिवस सकालचा आला. नंतर श्रीमंत राजश्री बाबासो व आणासाा मिरजकर आले. तेही त्याच ठिकाणी येऊन च्यार घटका बसून नंतर तिलांजुली देऊन परत मिरजेस गेले. तात्यासो नित्य पिंड-विधी वगैरे शास्त्रोक्त करून दोन प्रहरचे सुमारे सर्व मंडली सहीत ठिकाणी येऊन देहअवसान ठिकाणी दीप व अन व पाणी दूध ठेवणेचे प्रकारे ठेऊन भोजने श्रीदेवा-कडील स्वयपाकातून वाढून आले त्यातील भाऊसो वगैरे सुतकी मंडलीस घातले. बाईसो याचे तर दुःखास पारच नाही. तो गहजब दुखाचा कोठवर त्याहावा. त्याची मातुश्री जवल होती. त्याजकडून अंग धूवाबयास घालून काहीं जेवणाचे करविले. त्यात तिसरा दिवस असा गोष्ट जाहाली. ईश्वर सतेस उपाय नाही. १. दोन प्रहरचे सुमारे श्री तुलसीदास मिरजेहून आले क्षणभर बसून ते परत मिरजेस गेले. त्यांचा व खाशाचा ऋणानुबंध फार ते काटी फार जाहाले. त्याणी आपले हाताने चदन-काष्ठ चितेत घालून स्नान करून गेले १. श्रीमंत राजश्री बालासो मिरजकर व तात्यासो इचलकंजीकर व दादासो कुरुंदवाडकर व आपासो कागवाडकर यास वर्तमान समजलेवरून ते सायंकालपावेता येऊन दोन दोन घटका बसून परते आपले गावी गेले. १. कारभारी याणी खाशाचे देहावसान जाहालेवर कारकून पाठऊन ज्या ज्या कामगाराकडे जी कामे त्याच्या खोल्या व पेटचा व जामदारखाने तोफखाने सिलेखान जिनसखान वगैरे झाडून त्यास पहिली कुलपे होतीच त्याजवर मोहरा करऊन ज्यास कुलपे नवती त्यास नवी कुलपे घातली. पुढे मोजदाद करऊन पहिले कामगाराकडेसच कामे ठवावी असे केले आहे. १. सर्व खाशी मंडली देवलातील वाडचातच आहेत. जवल कारकून वगैरेचा बंदोबस्त केला आहे.

१६ जुलै : १. श्रीमंत राजश्री तात्यासो याणी नित्य पिंड वगैरे रोजप्रो करून आज दिवस चांगलासाा अस्तीं जमा करून श्रीकंगणेश्वरीचे कटचाजवळ उत्तरेस ठेविल्या आहेत. वर वृंदावन बांधविले. अस्तीचे वेलेस सर्व भावबंध मंडली होते. श्राध्धे वगैरे शास्त्रा प्रो केली. १. श्रीमंत राजश्री दाजीसो चिंचणीकर समाचारास येऊन गेले. १. सिवगिरी गोसावी करविराहून तिसरे प्रहरी तात्यासो याजकडे येऊन घटकाभर बसून ठिकाणी गेले. १. आज पर्जन्य पाहाटेपासून बहुत लागला आहे. कृष्णाबाईस पाणी चढत आहे. पात्राचे वरते पाणी आले आहे. १. कालपासून किल्यातील व श्रीकडील नगारखाना व वर्दीच्या तोफा बंद आहेत. अजीं संकष्टी परतु श्रीचा छबिना वगैरे काही नाही. तीन दिवस जाहालेवर श्रीकडील नगारखाना व तोफा होण्यास सागितले. आहे १. झाडून स्नेही गणगोत वगैरे यास खाशाचे वर्तमान पत्रे कारभारी याचे नावेचीच पाठविली. साहेब लोकास वगैरेस मात्र तात्यासो याचे नावे त्यांचे हातून निशाण व पुर्ती व सिके व मोर्तब करऊन पाठविली. तात्यासो याणी निशाणे करण्यास आरंभ सुमुहूर्त पाहून केलेला आहे. १. आज आठ दाहा दिवस जाहाले. कोतवालचावडीचे निशाण येकाये की वाऱ्याने

मोडून पडले व बहादरगज हाती मेला व पागेतील येक घोडे मेले अशी दुश्चिने जाहाली. त्याचे हे फल आहे व ज्या दिवसी खाशाचे देह अवसान जाहाले ते समई उतरेचे बाजूस पाहाटेस मोठा येक तारा पडला. १. बाईसो यास आज चवथा दिवस अंग धुणे घातले कारभारी याणी जवळ जाऊन बहुत प्रकारे समाधान केलें जें आपण कोणचे दुख मनात न आणिता तात्यासो हे आपले चिरंजीव त्याणी व आपण मिलोन सर्व दुखाचा घोट गिलोन सर्व आम्हा पदरच्यास आपासो गेले असे समजू देऊ नये म्हणोन विनंति केली. ती सुज्ञ आहेत आहेत परंतु त्याजवर ईश्वरी गहजब जाहाला आहे.

१७ जुलै : १. आज तिसरे प्रहरी तात्यासो वगैरे मंडलीनी गरुडपुराण ऐकिलें. बाबा पुराणिक याणी सांगितले. १. खाशाची उतरक्रिया करावयाची त्याचे मान पहिले खासगीतून दाखले श्रीमंत कैलासवासी बापूसो व बाईसो मातुश्री व सरस्वतीबाई काकूचे आणविले. बापूसो व बाईसो याचा सोळा सोळा हजाराचे आहेत. काकूचा अकराचा आहे. दाने वगैरेचे मान सोळा हजार रुाचे दाखल्याचे यादीचे मान धरले आहे देकारचे मान मात्र स्वाधीन नाही. जे ब्राह्मण होतील ते होतील. दर आसामीस येक रुपया प्रो द्यावा असे केले आहे. येकंदर तयारी पंचवीस हजार रुाची कारभारी याणी केली आहे. लाकडी सामान पलंग वगैरे वगैरे झाडून तरतूद करावयास कामगार लाविले आहेत. १. आज अस्तमानी कारभारी बाईसो याजकडे जाऊन विनंति केली जे असा प्रसंग तर प्राप्त जाहाला आहे. तात्यासो लाहान. आता जे विच्यारणे ते आपल्यास विच्यारावयाचे त्यापेक्षा निरुपाय जाणोन विनंति करितो वर लिहिले प्रो तरतूद करविली आहे. आपलेस कलवली. पुडे तात्यासो व आपण व भाऊसो व आम्ही सर्व पदरचे याणी दौलती प्रकर्णी जे करावयाचे ते येक विच्यारे करून आपासो याणी लौकीक संपादिला आहे तो संरक्षण करावयाचा असे येक विच्यारे जाले. म्हणजे कोणे गोष्टीस धका नाही. इंग्रजी या प्रकारची ते घरफूट व्हावी म्हणोन संधी पाहात आहेत. जसा प्रसंग प्राप्त होईल त्या प्रसंगास येक विच्यार असावा म्हणोन त्याचे उत्तर बाईसो याणी केले. ज मजवर तो असा प्रसंग प्राप्त जाहला. माझे वय लाहान मी फख्त अज्ञान परंतु आता जें प्राप्त जाहाले. त्यास भिऊन उपयोग नाही, असो तुम्हावर यजमानाचा विश्वास. सर्व भरवसा तुम्हावर त्यापेक्षा ज्या गोष्टीने यजमानाचा लौकीक राही ते सर्वांनी आम्ही करावयाच्या माझे मूल तात्यासो मी त्याची आई. दुसरा विच्यार अगदी नाही. जसे सांगाल व मला सुचेल ते मी तुम्हासी कलवीन. तुमचे आमचे विच्यारे ज होणे ते होईल. तुम्हावाचून दुसरे कोणीं नाही. दुसऱ्यानें जरी मला गोष्टी काही कलविल्या तत्राप तुमचे विच्याराखेरीज काही कर्तव्य नाही. च्यार पदरची मंडली यजमानाच्या लोभांतील त्याचे संरक्षण व्हावे. सावकाराचे कर्ज फिटावे. यजमानाचा लौकीक राहावा असे जे तेच येक विच्याराने करावयाचे. तुम्ही

काही मनात अंदेशा मजविसीचा आणू नका. सदरहू प्रो। भाऊसो। यासही सांगा की आजपर्यंत जे जाहाले ते यजमान वडील होते त्याबरोबर सर्व बरे वाईट गेले. पाठीमागे तुम्ही अम्ही सर्व आहो. त्यापेक्षा जी यजमानांची आज्ञा ती येक विच्यार वागून लौकीक संरक्षण करावा म्हणोन त्याप्रो। तुम्ही दुसरा विच्यार मनात न आणिता सर्व दौलत वगैरे यथास्थित चाले ते करावे म्हणोन त्याप्रो। भाषणे होऊन कारभारी आपले आपले घरी गेले.

१८ जुलै : १. भाऊसो। वगैरे वरकड मंडलीचे सुतक आज फिटले. कारण पाहिले सुतकात हे सुतक गेले. पाणी कृष्णाबाईस फार आले आहे. पाणी मागील बंगल्यानजीक आले. १. खाशानी पेशजी दौलतीप्रकर्णी याद करून ठेविली आहे. त्याप्रो। कारभारी याणी चालविला आहे. जे विच्यारणे ते तात्यासो। व भाऊसो। व बाईसो। यास विच्यारून कारभारी करितात असे असता मी वडील माझे नावे कागदपत्रात असावे म्हणोन वगैर बोलणी बाईसो। व कारभारी याजवल भाऊसो। याणी घातले आहे. कारभारी व बाईसो। याणी उतर सांगितले जे येजमानानी विच्यार करून आज्ञा केली व याद लिहून ठेविली त्याप्रो। सर्वांनी चालावयाचे. तुमचे जे बोलणे होते ते यजमान असता वेली बोलून घ्यावयाचे. आता नवीन बोलून उपयोग काय. तुम्ही आम्ही सर्वांनी येक विच्यारे यजमान याची आज्ञा वंदून करून दौलत चालवावयाची. यात ज्याजकडून गैरराहा होईल त्यास निक्षून सांगून आज्ञ प्रो। करावयाचे. भलतेच बोलून उपयोग नाही. म्हणोन सांगितले जात्या बुध्य तितकीच परंतु काही मंडलीचे उपदेशाने हे बूट निघाले आहेत आज अशौच्य फिटले आपण वडील त्यापेक्षा आपणास सुतक नाही. तेव्हा वैश्वदेव किल्यात करण्यास चिंता नाही. म्हणोन करण्याचा उद्योग भाऊसो। याणी चालविला होता. हे समजलेवरून उपाध्यास साफ कारभारी याणी सांगितले कीं या फंदात तुम्ही पडू नये म्हणोन. १. श्रीगणपती माहाराजांकडील नगारखाना वाजविण्यास आजपासून परवानगी सांगितली.

१९ जुलै : बापू शाहापूरकर आज मंदवारीं सांगलीस सायंकाली आले. तात्यासोास येऊन भेटलें. तिकडील वर्तमान पर्ज्यन्याचे व नद्या भरल्याचे वगैरे सांगितले खाशाचे प्रकृतीचे वर्तमान सर्व ऐकून घेतले कष्टी जाहाले. १. आज पर्ज्यन्य दोन प्रहरपासून उघडला आहे. पाणी मात्र चढत आहे. १. सरकारी सिलेखान्यात रोही म्हणोन जनावर होते. त्यास अजार येऊन आज रात्री मृत्य पावले. गंगेत नेऊन सोडले. १. श्रीमंत राजश्री केशवराव बाबासो। कुरुंदवाडकर हें इचलकर्जीस आहेत. त्यास विकार वोकारीचा आहे व अनजात नाही.

२० जुलै : १ श्रीमंत राजश्री तात्यासा। याणी प्रातःस्नान सध्या करून नित्य पिंड देण्याचे ठिकाणी पाणी कृष्णाबाईचे आले सा। काल शास्त्रार्थावरून उच कटा ब्राह्मणाकडून घालविला होता. तोही आज पाण्याने बुजू लागला. सा। आणखी

जाजती चढऊन त्याजवर नित्यकृत्य करऊन पुन्हा स्नान करून भोजन जाहाले भाऊसो। आज किल्ल्यातच भोजन केले. १. आज पाणी उतरावयास लागले. साल गु।। पेक्षा दोन हात उची पाणी कमी आले आहें. १. राजश्री आपा मंगलवेढेकर व नारोपंत नाना मायदेव व जिवाजी यशवंत मंगलवेढेकर हे मंगलवेढ्याहून तिसरे प्रहरी आले. तात्यासो। याजकडे येऊन बसून बाईसो। याजकडे जिवाजीपंत खेरीज करून जाऊन दोन घटका शांतवन करून ठिकाणी गेले. १. खाशाचा काल जाहाल्या दिवसापासून आजपर्यंत न्यायाधिसी कोडत बंद होते. काम तटू लागले. सा। आज कारभारी याची परवानगी होऊन चालते केले. १. राजश्री रामचंद्र बापूजी पटवर्धन याजकडे सिलकी जवाहीरखान्याचे दागिन्याचे काम ते काम त्याचे चिरंजिव नागो रामचंद्र पाहतात. त्याची चालती पेटी किल्यात बापुसो। याचे चौकात पेटी होती. तिला कुलूप त्याचे त्यात खाशा बाया मंडलीचे वगैरे दागिने मोडतोडीचे नीट वगैरे होते व पटवर्धन याचेही होते. खाशाचा काल जाहाले समई सर्व बंदोबस्त केला. ते समई त्या पेटीस पहिले कुळुपावर कागदाची मोहर केली ती तसीच होती. आज वर मोहर तसीच कुळूप मात्र मोकळे निघालेले असे चौकीदाराने पाहिलेवरून वर्तमान कारभारी यास समजिवले. त्याणी राघोपंत काले यास चौकसीस किल्यात पा।। दिल्हे. त्याणी पटवर्धन याजवल पेटीत जिनस काय आहेत त्याची याद मागितलेवरून याद लेहून दिल्ही. नंतर पेटी उघडून मोजदाद करविली तो केवल यादीस मिळाले असे नाही. पटवर्धन तर काले यास म्हणतात तुम्हीच येऊन मोहर करून गेला. ती मोहर तसीच आहे. किली मजजवळ आहे आता तर अस आहें चौकसी करावी म्हणोन. पुढे कसे होते ते पहावे. १. सरकारचा जकातीसंबंधी ऐवज इंग्रजी सरकारात येणे त्याविसी मेहेंरबा डिवीसन सो। बहादूर पोलिटक्याल येजंट यास तात्यासो। याचे नावे थैली लिहून पा। दिल्ही त्यात इहिदे खमसैन आखेर ऐवज येणे तो नागो सदासिव बापट याजकडे देऊन पावती घ्यावी म्हणोन आज लिहून याद दिल्ली.

२१ जुलै : १. श्रीमंत मातुश्री सत्यभामाबाई ताई सोनीकर सोनीहून समाचारास तिसरे प्रहरी आली प्रथम बाईसो। याजकडे व नंतर तात्यासो। याजवल बसून परत गेली. १. तिसरे प्रहरी सर्व मंडळी कचेरीस येऊन दोन दोन घटका बसून गेली.

२२ जुलै : १. राजश्री हरि बालकृष्ण बिनीवाले काल पढरीहून आले ते व त्याचे चिरंजीव असे आज सकाळी येऊन भेटून समाधानाच्या गोष्टी सांप्रदायाप्रो। सांगून घरी गेले. १. श्रीमंत राजश्री बालासो। मिरजकर तिसरे प्रहरी मिरजेहून आले. देवलातील वाड्यात तात्यासो। याजवल दोन घटका बसोन पुढील अकरावे दिवसापासून दानधर्माचा वगैरे विच्यार कोणे प्रकार कसा केला आहे तो मा।र विच्यारून परत मिरजेस गेले. जातेसमयी भाऊसो। किल्यात होते त्यास भेटून त्यासी

बोलून भिरजेस गेले. १. राजश्री गोपाल माणकेश्वर म्हैसकर हे नरगुंदाहून समाचार घेऊन ठिकाणी गेले. १. राजश्री भास्करबावा किलेदार याजकडे को। मंगलवेढे येथील चवधरी याचे थलाचे नजरेबा। ऐवज येणे त्याविसी सरकारातून पाचशे रु।।ची वरात जाह्याली होती. त्याचे म्हणे उभयता बंधू उभयता जवलून घ्यावे कारण मागील वाटणीचे पूर्वीचे देणे व येणे उभयतानी सरकारी वगैरे वारावे असे सरकारातून ठरले आहे. त्याजवरून सायकाली कचेरीस उभयतास आणउन मा।र समजून घेतला त्यात उभयतानीही सरकारी ऐवज द्यावा असे ठरले आहे. १. शाहापूर व मंगलवेढे व तेरदल वगैरे माहाली सावकारी देणे यास ऐवज लाऊन दिल्हे आहेत. त्याप्रो। खाशाचे उतरकार्यास वीस हजार रु।।चे वराता ज्याचे नावे रदकर्जास ऐवज पावतो त्याचे नावे जाहल्या आहेत त्या प्रो ऐवज आणऊन काम चालविले आहे. १. कृष्णाबाईचे पाणी उतरले आहे अद्यापि पात्राच्या पोटात काही गेले नाही. १ पदरची मंडली ज्याजवर खाशाचा लोभ ती मंडळी तात्यासो याजकडे आली म्हणजे या बसा वगैरे सनमान उत्तम प्रकारे भाषण वगैरे करून तुम्ही कस्टी होऊ नये. मजकडे यत जा. मी लहान मला च्यार गोष्टी अकलेच्या सांगत जावे आपासो। याचे पुण्याने कोणाचे कमी श्रीगणपतीमहाराज पडू देणार नाहीं. म्हणोन सर्वास सांगितले. वृत्ती बहुत चांगली आहे. ईश्वर कृपेने व आपासो। याचे पुण्याने कोणचे कमी पडणार नाही असे वाटते.

२३ जुलै : १. आज मंडळी तात्यासो। याचे समाचारास येऊन गेली व आहेत. १. कृष्णरावमामलेदार पेटा अष्टे वालवे. १. कृष्णाजीपंत गोखले. १. राघोपंत वसगडेकर. १. येशवंतराव सालोंखे वगैरे सिलेदार मंडली पदरची. १. कोन्हेरराव पेठे मंगलवेढे. १. ज्ञानोबा आगाशे. १. विठलराव बिनीवाले १. मानसिगराव भोसले करवीरकर. १. राघो सखाराम फडके सिरसींकर १. आकपा देसाई तेरदलकर वगैरे मंडळी. १. तासगावकर बाईकडून कारकून.

२४ जुलै १. चैत्र वैशाखदोन महिने ब्राह्मणाचे छत्र असते त्या छत्राचे वाड्याचे उतरेस जागा करविली आहे. तेथे आकरावा बारावा दिवसाचे कृत्य करण्याचा बेत. कारण कृष्णेचे घाटाखाली पाणी उतरून गाल फार पडला आहे सा। त्या ठिकाणी तात्यासो। जाऊन दाहावे दिवसाचे कृत्य पिंड करून काकस्पर्श जाहाला. काकस्पर्श होणेस काही अवकाश पडला नाही. पिंड ठेउन मागे येणेबरोबर कावले येऊन सिवले. नंतर सर्व पदरची आप्त वगैरे झाडून मंडली कृष्णाबाईवर जाऊन स्नान करून तिळांजुली देऊन नंतर सर्व आले. १. बाईसो। प्रथम दिवसी आस्पर्श सा।। आज दाहावे दिवसी विधी करविला. त्या गहजबास तर पारावार नाही. ईश्वर इच्छा प्रमाण. १. आज तिळांजुलीस माधवराव बाबासो। व तुलसीदास बावा व आणासो। मिरजकर व दाजीसो। चिंचणीकर आले होते. लागलेच परत गेले. १ आपासो। याचा काल जाहल्यावर अकबरनीस याचें लिहीणे बेलगावास जाऊन तेथून गौरनरसो। यास

लिहिणे गेले. त्याचें उतर येऊन बेलगावहून कारकून साहेबाकडून येंणार असे वकिलाचें पत्र आले त्याजवरून कारभारी याणी विचार करून गौरनरसो। याजकडे राजश्री बापू शाहापूरकर यास पाठवावे असे ठरून त्यास तात्यासो। याणी थैली वगैरे दौलतप्रकर्णी कागदपत्र देऊन पाठविले. बाबाजी भिकाजी सोनी गेलें आहेत.

२५ जुलै : १. सिरगिरी गोसावी मिरजेहून आले आहेत. त्याणीही तिलांजुली दिल्ही. कारण त्याजवर लोभ पुत्रवत होता. १. आज अकरावा दिवस तात्यासो आईसो याची अशौच निवृती जाहाली. १. प्रहर दिवसानंतर अकरावे दिवसाचे दाने हती घोडी पालखी रथ असी शया वगैरे सर्व माहादाने व उपदाने व पूजा व एकोतिष्ट वगैरे सर्व जाहाले. हे होतोपर्यंत तीन प्रहर सुमार लागला. नंतर तात्यासो वगैरे स्नानें करून भोजने जाहाली. १. मर्दाना हती आंबारीसुध्धा कासीनाथभट खाडीलकर सांगलीकर यास दिल्हा. दक्षणा ५०० सिवाय सामान. १. कर्डा सूर्यचाद अवलादीचा सामान जीन वगैरे दक्षणा १०० निलभट नेने. १. रथ बैल सरकारी सामानसुधा धोंडभट पाधे सांगलीकर दक्षणा ७५. १. पालखी सामान सुध्धा केशवभट. १. आफ्तागिरी सामानसुध्धा दक्षणा १५ वामनभट मराठे. १. शय्या तैलंग दक्षणा दोनसे. १. केशवभट नातू दक्षणा १० सिवाय जिनस. १. येकोतिष्ट तैलंग विषय दक्षणा वगैरे मिलोन ५००. १. सिवाय उपदाने सर्व जी जी खाशास प्रीय ती ती. १. खाशीं देवपूजा रुप्याची उपकर्णी सर्व विषय येकदर ३००. १. भागवत व भगवतगीता गणेशगीता तांदूळ वगैरे सर्व दिल्हे. १. वृषोत्सर्ग उपाधे यास १. म्हैसदान नरभट जोसी उदगावकर. १. बेलगावहून साहेबाकडून तात्यासो याच्या नावच्या दोन थैल्या घेऊन राजश्री बालाजी पंत माटे कारकून हे तिसरे प्रहरी च्यार घटका दिवसास सांगलीस आले. प्रथम उभयता कारभारी यास लागूचे घरी भेटून तिकडील मार सर्व कलऊन नंतर तात्यासो याचे भेटीस देवलातील वाड्यात आले. पुढील चौकात उतरेचे सोप्यात येऊन भेटले. केव्हा आला कधी निघाला वगैरे तात्यासो याणी पुसीले. च्यार दिवस जाहाले निघून. आज आलो म्हणोन माटे बोलले. नंतर दोन्ही थैल्या तात्यासो याजपुढे ठेविल्या. दोन्ही थैल्या वाचून पाहिल्या. नंतर माट याणीं विनंति केली जे मेहेरबा रिविसनसो याणी आपलेस सांगितलें आहे. जे आपासो गेले म्हणोन आपण काही आदेशा बालगू नये. आपासो याणी इंग्रजी सरकारची दोस्ती जोडली आहे. आपले काही कमी होणार नाही म्हणोन बोलले. थैलीत भाव येका थैलीत आपासो गेल्याबा समाधान. येकात माटे यास पा आहेत ते आपल्यास दौलतीप्रकर्णी मार कलविऊल त्याप्रो समजून घेऊन चालवावे म्हणोन वगैरे लिहिले आहे. माटे यास कारभारी याणी आपासो याचे उतरकार्याप्रकर्णी खैरातची तरतूत सर्व केली आहे म्हणोन मार कलविला. बरे आहे म्हणोन म्हणाले. बोलण्यात साहेबानी मला पाठविले आहे. परंतु मी इकडील पदरचाच कोणचाच आंदेशा माझा न घेता आपण सर्व तजविजी

पहिलेप्रो चालवाव्या. कोणाचे पदरच्याचे वगैरे मानमरातब व चालविणे कमी व्हावयाचे नाही. पहिलेप्रो चालवावे. ज्याची कामे त्याणी करावी असे साहेबानी सांगितले आहे म्हणोन बोलले. न्यायाधिसीचे मात्र बोलण्यांत नाही. निरोप घेऊन गेले. सदरहू मा।र बापू शहापूरकर याजकडे लिहून पा। दिल्हा. माटे हे वासुदेवपंत याचे घरी राहिले आहेत.

२६ जुलै : आज बारावा दिवस. तात्यासो याणीं प्रातःकाली स्नानसंध्या करून राहिलेली दाने सर्व करून समई सपिंडी केली. ब्राह्मण आ। साहा होते. सातवा पिंड दर ब्राह्मणास विषय सरासरी शंभरपर्यंत अदमासे दक्षणेसुध्धा दिल्ही. नंतर वैतरणी गोप्रदान व मोक्षधेनु वगैरे दिल्ही. नंतर वाजपेयश्राध्ध केले. ब्राह्मणास वर्षाचे बा। पनास रुपये दिल्हे. इनाम जमिनीची उदक शंभर रु।।पचे सोडले वगैरे करून येऊन भोजन जाहली. तीन प्रहर सुमारे जाले. १. वो। सपन राजश्री दाजी मामा जोसीराव हे करवीराहून समाचारास आले आहेत. १. बाजी विनायक मराठे शाहुपुराहून आले आहेत. १. राजश्रीं बालाजीपंत दादा माटे हे आज सकाली किल्यात जाऊन खासगी पथक पागा वगैरेचे जामदार खान्याचे कुलपास पहिल्या चिठ्या मारल्या होत्याच त्याजवर लाखेच्या मोहरा केल्या व जवहिराच्या यादी मोजदादीच्या कारकुनाजवळ मागून घेऊन आपले जवल घेऊन पेटीत ठेविल्या आहेत. कुलूप घालून वर लाखेची मोहोर करून आले आहेत. मोज दाद करण्याचा बेत दिसतो. १. सायलीकाली दोन घटका दिवसास माटे तात्यासो याजकडे येऊन कचेरीस बसले. आजचे दानधर्माचे कृत्य व उदईक शांतोदकाचे व ब्राह्मण भोजनाचा व दक्षणेचा बेत वगैरे सर्व कारभारी याणी सांगितला. दोन घटका बसोन ठिकाणी गेले. १. कालपासून गावात पाच हजार सुमारे ब्राह्मण परगावचे आले आहेस. त्यास उभयता कारभारी याणी आपले घरी पदरची मंडलीस सागून तितक्यास भोजनाचा बेत करऊन भोजनास सर्वांस घातले १. उदईक ब्राह्मणाचे भोजनाचा बेत किल्यातच केला आहे. १. सांगली येथील उपाधे हे गावांतील सपिंडीची दक्षणा वगैरे विषय पाचपंचवीस वर्षे घेत होते. परंतु सपिंडी ही घरच्या उपाध्याची त्याणी आज खाशाची सपिंडीचा विषय वो। उपाधे याणी नेला. ग्रामउपाधे याणी सरकारात विनंति सपिंडीविसी करीत आहेत पुढे कसे होते पाहावे. १. मिरज दौलतीत अलीकडे गोंदूनाना हे कामकाज पाहतात. त्यास साल गु।। व तिगस्ता लक्ष्मेश्वर येथे वसुलाचे काम नीट चालेना सा। तेथें गेले होते. ते समई तेथील पाटील व कुलकर्णी याजवर काही गुन्हे होते ते शाबीत करून अन्याई ठरऊन लिहून घेतले आहे. हाली त्या लोकानी आम्हावर जुलूम करून लिहून घेतले्याची फिर्याद म्यानसिनसो। याजकडे केलेवरून गोंदूनाना जवल च्यार रुपये घेऊन लक्ष्मेश्वरकर लोकांचे समजुतीबा। हुजूर पा। द्यावे व नानाची भेट आपण घेऊ नये त्यास मिरजेस व जवल ठेऊ नये म्हणोन बालासाहेब यास थैली पा। देऊन आपण

इनाम क्यामेटीवर नेमणूक जाहाली सा। गेले. बालासाहेब यास लिहिलेवरून मा। निलेकडून च्यारशें रुपये घेऊन पा। दिल्हे. गोदूनाना हे मिरजेस जात नाहीत. येथेच आहेत.

२७ जुलै : १. आज शांतोदक तेरावा दिवस जाहाले. देवलातील वाड्यात पटवर्धन मंडली व आप्त व पदरची वगैरे भोजनास आमंत्रण करून बोलाविले होते. दोनसे पात्र सुमारे जाहाले. १. किल्यात ब्राह्मणभोजन जाहाले. पागेत व दिवाणखान्यात पाने मांडली होतीं. पात्रे सुमार ७००० जाहाली. तरतुदीस बलवंतरावजी फडणोस होते. गोसावी बैरागोस सिध्या देविला. १. तिसरे प्रहरी मिरजेहून श्रीमंत राजश्री माधवराव बाबासो। व बालासो। याची स्वारी येऊन तात्यासो। यास व बाईसो। यास दुखवटयाबा। शेला व पातल देऊन दोन घटका बसून गेले. कचेरीस बालाजीपंत माटेही आले होते. पदरची मंडली व स्नेही मंडलो मिरजेहून भानू सोनेहून परचुरे तात्या व तासगावकर जोग वगैरे सर्व आले आहेत. त्याणी दुखवटबा। शेले व पातले लुगडीही दिल्ही. १. तीन प्रहर वाजल्यावर श्रीगणपति माहाराजांचे दर्शनास तात्यासो। याची स्वारी जाऊन दर्शन घेऊन दक्षणा ठेऊन किल्यात श्रीदेव थोरले व जालीतील देवास दक्षणा ठेऊन दर्शन घेऊन ब्राह्मणभोजन होत होते तेथे जाऊन पाहून दिवाणखान्यातील दुमजल्यावर दोन घटका बसून नंतर देवलातील वाड्यात आले. माटे हे किल्यात समुदाय पाहण्यास गेले होते. १. आज ब्राह्मण भोजन समई पर्ज्यन्याने कृपा केली आला नाही. सकालो अवडंबर मोठे होते. परंतु बच्यावली. श्रीमंत यजमान स्वामीचे कृत्यास गणपति कमी पडू देणार नाही. १. आज किल्यातील नगारखाना वाजविण्यास परवानगी सांगितली. वाजता जाहाला. १. राजश्री तात्या लागू यास मागे उपद्रव होऊन खुल लागल होते. त्यास दाहा बारा वर्षे सुमार जाहाली. त्याप्रो। कालचे येकादसी पासून जाहाले आहे. पत्नीस व मुलास मारतात सा। येथे वाड्यात आणविली आहेत. १. आज शुरपालकर आच्यारी दक्षणेस आले होते. त्यास सिध्या सरकारातून देविला. कारण स्मार्तांचे घरी भोजन करीत नाहीत. सा। दोडसे आसामी सुमार होते. १. गणेशगोर येऊन दुखवटा घालून ते व सिवगिरी निरोप घेऊन गेले. सिवगिरी करवीरास गेले. १. तासगावीहून बाईकडून नेने दुखवटा घेऊन आल आहेत. १. ब्राह्मणास देकारास अस्तमानाबरोबर आरंभ जाहला. उजाडावयास ब्राह्मण सुटले. कंगणेश्वरीचे चौकात व दोन तीनी पागेत ब्राह्मण कोंडले होते. सरसकट बाईका पुरुष मुलेसुध्या व बैरागी गोसावी यासुध्या दर आसामीस येक रुपयाप्रो। दिल्या. ब्राह्मण सुमार १४००० जाहाले. दक्षणेस आरंभ जाहाला. पर्ज्यन्याचे अवडंबर मोठे परंतु उज्याडे पर्यंत नाही. भोवताला मात्र पडला. ब्राह्मण सुटल्यावर येथे लागला.

२८ जुलै : १. श्रीमंत राजश्री तात्यासाो याजकडून नित्य उदकुंभदान द्यावयास आरंभ कालपासून करविला आहे. दानास तांब्या येक व दक्षणा आठ आणेप्रो। देत

असतात. १. कागवाडकर याजकडून वामनराव जोग आले होते. दुखवटा देऊन परत गेले. १. आज सोमवती सा॥ बाईसो याजकडील वगैरे उपाधे याजकडून सोमवती घालविली. १. तिसरे प्रहरी च्यार घटका दिवसास कचेरीस सर्व पदरचे लोक सिलेदार सरजामी बारगीर वगैरे येऊन श्रीमंत राजश्री तात्यासो यास मुजरे केले. सर्वत्रास विडे दिल्हे. कचेरीस बालाजीपंत दादा माटेही होते. १. श्रीमंत महाराज छत्रपति राजश्री करवीरवासी याजकडून दुखवटा घेऊन कारकून व हुजरे व जासूद आले आहेत. त्याणी कचेरीसच अस्तमानी दोन घटका दिवसास येऊन दुखवटा शेला व पातळ बाईसो याजकडे देऊन गेले. १. वो॥ दाजीकाका जोसीराव हे समाचारास म्हणून करवीराहून आले. १. यशवंतराव जोग व बाबा मनोलकर वगैरे मंडली दुखवटे घेऊन व येरवीचे समाचारास जी जी मंडली आली ती ती निरोप घेऊन गेली.

२९ जुलै : १. श्रीमंत कैलासवासी यजमानाचे आज्ञेप्रा ो श्रीमंत राजश्री तात्यासाहेब श्रीगणपतीमाहाराजपंचायतनाची पूजा करितात व खासे पंचायतनाची व हत्याराची पूजा व श्रीकृष्णाबाईचे दर्शन घेऊन नित्य उदकुंभदान व नंतर भोजन याप्रा ो काल चवदावे दिवसापासून करतात व नित्य दानही देतात. १. राजश्री बालाजीपंत दादा माटे याणी सकाली देवलांत येऊन न्यायाधिसीकडील व चिटणिसीकडील वगैरे कागदाचे रुमालाच्या पेटचा व जिनसखान्याच्या व खोल्या होत्या त्यास कुलपे पहिली आहेत. त्याजवर चिठ्या आपल्या लाऊन मोहरा केल्या. चालते रुमाल मात्र कारकुनाजवल आपण पाहून ठेविले आहेत. १. श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत आपाता ो जमखडीकर हे बेळगावास होते ते साहेबाचा निरोप घेऊन जमखेडीस जाणेकरिता गोकाकेपर्यंत आले. तेथून उभयता पत्न्या बरोबर होत्या. त्यास परभारे जमखेडीस पाठऊन आज आडीच प्रहरी सांगलीस आले. दोन घटका बसून श्रीमंत कैलासवासी यजमान स्वामींचे बोलणे बोलून राजश्री भाऊ गोखले यांचे घरी उतरावयास गेले. त्यास भिलवडीकर यांचे घरचे सुतक समजले नवते. ते समजले. सबब दहा दिवस राहाणे जाहाले. १. कृष्णाबाईतून येक बायकोचा मुरदा वाहून आलेला समजला. त्यावरून कमाविसदार याणी पंचनामा करून त्याचे सार्थक करविले. कोणाचा हा पता नाही. १. इंग्रजी सरकारातून कारकून येऊन जामदारखान्यास वगैरे कुलपे घातली. जमेखर्चाचा अदमास कामगार लोक यास विच्यारून खर्चाचे तक्ते येकंदर इसमवार करून त्याणी मागविलेवरून ते म्हणतील तसे कारकुनास लिहून देणेविसी कारभारी याणी सांगितले. ते सांगतील त्यास नाही म्हणावयाचे नाही कारण इंग्रजी सरकारची दोस्ती येजमानानी मिलविली. त्या ठिकाणी येजमानाचा काल होताच दाहावे दिवसी लागलेच त्याणी असे करावे हे केवळ आबरूस कमीपणाची गोष्ट. परंतु कारकुनासी बोलून उपयोग नाही. जे बोलणे ते येजटसो व गौरनरसो याजवल बोलावे असा विच्यार करूनच

चालविले आहे. यात यजमान याचे पुण्येकडून व श्रीगणपतिमाहाराजाचे कृपेकरून
जे होणे ते होईल. परंतु फंद करतात असे म्हणू द्यावयाचे नाही. १. आज आस्त-
मानी माटे देवलात कारभारी याजकडे येऊन बोलले जे इकडील च्यारपाच माहलास
तात्यासाो याची पत्रे की माहालचा वसूल वगैरे जे काय पाहणे ते माटे इंग्रजी
सरकारतर्फेनें पाहणार त्यास त्याचे हुकुमाप्रो चालावे म्हणोन व मिहरबा येजटसो
याची थैली मी घेऊन आला आहे. त्याचे उत्तर साहेबी लिहिलेप्रो माटे याजकडून
काम चालविले आहे. म्हणोन लिहून द्यावी म्हणोन बोलले त्याचे उत्तर कारभारी
याणी केले जे श्रीमंत कैलासवासी येजमान स्वामीची जसी आज्ञा वर्तणेविसी
आम्हास व तात्यासाो यास त्याप्रो विच्यार करून जे लिहिणे ते लिहून थैली
साहेबाचे नावे पाठवीत आहो व माहाली पत्रे जे देणे ती कोणी द्यावी तात्यासाहेब
लहान त्यास काय ठाऊक आपले विच्यारास येईल ते आपण करीतच आहा म्हणोन
स्पष्ट सांगितले. १. आज मंगळागौर श्रीमंत साौवति वहिनीबाई याणी देवलातील
वाड्यातच पूजा केली. १. खाशाजवलची वगैरे मंडलीचे पाऊणसे ऐसी पात्रे सुमार
येकंदर देवळातील वाड्यात होईत त्याप्रो पाचच्यार आसामी मंडली तात्यासाो
याजवल राहणारी तितक्यासिवाय बाकीचे सर्व आजपासून किल्यात जाणेविषी
कारभारी याणी ताकीद करून पाा दिल्हे. मंडली राहिली ती १. रामाजी
नाईक भिडे १. रावजी लिमये. १. राघोपंत काले. १ गोविंदराव बिनीवाले.
१. पंतोजी. १. गुजुमामा व रामराव. येणेप्रो राहून बाकीचे गेले किल्यात. १. माटे
हे दौलतीचे खर्चाचे वगैरे तस्ते आपले ठिकाणी कारकून गंगाधरपंत मराठे व
विनायक कासी वगैरे मोसबे वडील नेऊन करीत आहेत.

३० जुलै : १. श्रीमंत राजश्री तात्यासाो स्नानसंध्या नित्य श्रीगणपति-
माहाराजाची व खाशा पच्यायतनाची व हत्याराची व कणेश्वरीची पूजा करून
नित्य उदकुंभ ब्राह्मणास उदक सोडून भोजन केले. १. श्रीमंत राजश्री माधवराव
दाजी चिंचणीकर येऊन दुखवटा घालून परत गेले. १. राजश्री सिनापा नाईक
धारवाडकर यास खाशाचे वर्तमान समजलेवरून गुर्लहसुराहून आज आले. तात्यासाो
यास व बाईसाो यास भेटून घरी गेले. १. आपाजीराव व सटवाजीराव व बापूजी-
राव डुबल गुडेवाडीकर हे आले होते. ते निरोप घेऊन कराडास गेले. येथील
नोकर सिलेदार आहेत.

३१ जुलै : श्रीमंत राजश्री तात्यासाो याणी कालचेप्रो नित्यकृत्य पूजा उदकुंभ
वगैरे करून भोजन केले. १. कोकणात पाऊस लागल्यामुळे कृष्णाबाईचे पाणी चढत
आहे दोन तीन हात पाणी उंची चढून गणपतराव दादाचे घरानजीक आले आहे.
इकडे पर्जन्य बारीक तुषार आहे. १. राजश्री बालाजीपंत माटे हे किल्यात दोन
प्रहरानंतर जाऊन खाशाचे खोलीस कुलपे होती. ती काढून मोजदाद करून आले.
१. आज विनायकी श्रीकडील छबीना वगैरे सिरस्तेप्रो जाहाले तात्यासाो छबिन्यास
गेले होते. १. श्रीमंत कैलासवासी खाशाचे वर्तमान ऐकून समाधानपत्र म्यानसनसो
याणी पाठविले ते माटे याणी तिसरे प्रहरी कचेरीस येऊन आणून दिल्हे.

● ● ●

व्यक्ती-सूची : (आकडे पृष्ठांचे)

अ

आ

इ

उ

ए

क

ख

ग

ध

न

प

• • •

स्थल सूची : (आंकडे पृष्ठांचे)

● ● ●

प्रकाशनासाठीं त्यांनीं पुणें विद्यापीठ आणि नौरोसजी वाडिया कॉलेज यांजकडून अनुदानेंही मिळवून दिलीं. दोहोंबद्दल त्यांस हार्दिक धन्यवाद. मंडळानें त्यांचे हें पुस्तक नुकतेंच प्रकाशित केलें.

मंडळाचें हीरक महोत्सवी वर्ष आजपासून सुरू होत आहे. या वर्षांत मंडळास आर्थिक स्थिरता लाभली तर तें मंडळाच्या पुढील स्वास्थ्यास अतिशय उपकारक ठरेल. सर्व मंडळप्रेमी सभासदांनीं या कार्यास हातभार लावावा हीच प्रार्थना.

चिटणीस

श. १८९२ आषाढ शुद्ध १

अनुक्रमणिका

५६८

भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिकाची केंद्र सरकारच्या नियमानुसार द्यावयाची माहिती (१९५६ चे नियम, नियम ८, नमुना ४)

१. प्रकाशन स्थळ – भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०

२. प्रकाशन काल – त्रैमासिक (सध्यां वार्षिक)

३. मुद्रकाचे नांव, राष्ट्रीयत्व व पत्ता – ग. ल. जोग, भारतीय, जेजी प्रिंटर्स, ६ बुधवार, यु. वे. बँक बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २

४. ५. प्रकाशक व साधारण संपादक यांचीं नांवें, राष्ट्रीयत्व व पत्ते – श्री. गणेश हरि खरे, श्री. सदाशिव विश्वनाथ जोशी, श्री. नागेश त्र्यंबक तपस्वी,–चिटणीस. भारतीय. भा. इ. सं. मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०

६. मालक व पत्ता–भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव पेठ, पुणें ३०

आम्ही उपर्युक्त तिघे चिटणीस प्रकट करतों कीं, आमची माहिती व विश्वास यांप्रमाणें वर दिलेला तपशील अचूक आहे.

दि. ४।७।१९७०

ग. ह. खरे, स. वि. जोशी, ना. त्र्यं. तपस्वी

प्रकाशक : श्री. ग. ह. खरे, श्री. स. वि. जोशी, व श्री. ना. त्र्यं. तपस्वी. चिटणीस, भारत इतिहास संशोधक मंडळ, १३२१ सदाशिव, पुणें ३०

मुद्रक : ग. ल. जोग, जेजी प्रिंटर्स, ६ बुधवार, यु. वे. बँक बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणें २